नवीन बहारदानीष.

नवीन बहारदानीष

अथवा

बहराम-जोहरा-कादंबरी.

हा ग्रंथ

मूळ फारशी ग्रंथांतील गोष्टीचा आधार घेऊन

Damale H. K.

हरि कृष्ण दामले

यांनीं लिहिला.

शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥
मुखीं अमृताची वाणी । देह देवाचे कारणीं ॥
सर्वांग निर्मळ । चित्त जैसें गंगाजळ ॥
तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ॥

पुणें.

सन १९०६.

1906

किंमत १। रुपया.

Indira Chhabakhan

पुणें येथें

"इंदिरा" छापखान्यांत त्र्यंबक हरि आवटे यांनीं छापिला; आणि
हरि कृष्ण दामले यांनीं घर नंबर ३२४, शनवा पुणें, येथं प्रसिद्ध केला.

प्रस्तावना.

बहारदानीष नांवाचें एक लहानसें पुस्तक पुष्कळ वर्षांपूर्वी मराठींत प्रसिद्ध झालेलें ऐकिवांत आहे. तें मला सबंध पाहण्यास सांपडलें नाहीं. फक्त एक भाग पाहण्यांत आला. त्यावरून प्रस्तुत ग्रंथाचा त्याशीं कांहींएक संबंध नाहीं असें स्पष्ट दिसून आलें. पूर्वी प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत बिक्रमबत्तिशी, शुकबहात्तरी, वगैरे पुस्तकांतल्या गोष्टींप्रमाणें कित्येक गोष्टी असून, हल्लींच्या या ग्रंथांत एकच सबंध व सलग गोष्ट आहे.

हा ग्रंथ अरेबियन् नाइटस्, पर्शियन् नाइटस् वगैरे ग्रंथांच्या धर्तीवर असून यांतील कथानक मोठें मौजेचें आहे. तें इतकें मनोरंजक आहे कीं, ग्रंथ वाचण्यास आरंभ केल्यावर तो संपेपर्यंत खालीं ठेवावासें वाटणारच नाहीं. विशाळ कल्पना, अद्भुत प्रसंग, शृंगारवीरकरुणादि रस, सृष्टिसौंदर्य, वगैरेंचें वर्णन यांत जिकडे तिकडे असून, खेरीज खानदानींतील माणसांवर कसलेही प्रसंग गुजरले तरी त्यांचें धैर्य कसें कसास उतरतें, त्यांचें पापभीरुत्व आणि निर्मळ व खरें प्रेम कसें निदर्शनास येतें, सुशिक्षणाचा आणि दृढनिश्चयाचा परिणाम कसा होतो, परमेश्वराच्या ठिकाणीं निष्टा ठेविल्यानें मोठ्या बिकट प्रसंगींही चित्ताची समता राहून तसल्या प्रसंगांतून मनुष्य कसा पार पडतो, इत्यादि गोष्टींचा ठसा या ग्रंथाच्या वाचनापासून मनुष्याच्या मनावर चांगला उमटण्यासारखा आहे. सारांश, आबालवृद्धांस सर्वप्रकारें प्रिय होण्यासारखा या ग्रंथांतील विषय आहे. या ग्रंथाचें नांव 'बहारदानीष' हेंच खरें; परंतु वर सांगितल्याप्रमाणें याच नांवाचें एक पुस्तक पूर्वी प्रसिद्ध झालेलें असल्यामुळें, दोहोंचा घोंटाळा न व्हावा म्हणून यास नवीन बहारदानीष हें नांव दिलें आहे.

या ग्रंथास मूळ आधार फारशी भाषेंतील याच नांवाच्या ग्रंथाच्या बखरीवजा त्रोटक भाषांतराचा असून, या भाषांतरास कादंबरीचें रूप देण्याची कल्पना प्रथम रा० तुकारामशेट पोतदार, राहणार पालांदूर, यांच्या मनांत येऊन त्यांनीं तो प्रयत्नही केला होता. परंतु या गृहस्थांची उमर आजमितीस जवळ जवळ पाऊणशें वर्षांची झाली असून यांना शिक्षणाचा लाभ फारच थोडा झालेला असल्यामुळें, त्यांच्यानें तें काम रेटेना. तथापि या वयोवृद्ध सद्गृहस्थांना ग्रंथावलोकनाची मोठी गोडी असुन, अशा प्रकारचा हा नामी ग्रंथ प्रसिद्ध व्हावा अशी त्यांची बहुत दिवसांची उत्कट इच्छा असल्यावरून त्यांनीं हें य ग्रंथाचें काम सर्व प्रकारच्या हक्कांसह मजकडे सोंपविलें.

रा० तुकारामशेट यांनीं मजकडे जी प्रत पाठविली तिच्य भाषेचा मला बहुतेक उपयोग झाला नाहींच; पण ती वाचून पाहतां तिच्यांत पुष्कळ असंबद्ध व थोड्या अप्रयोजक गोष्टीहि आढळल्या. तेव्हां ती प्रत या ग्रंथांतील कथानकास केवळ आधारभूत धरून व वरील दोषयुक्त गोष्टी वर्ज्य करून, तसेंच पुष्कळ निरुपयोगी व नीरस भाग गाळून आणि कांहीं पात्रां संबंधानें जास्त गोष्टी घालणें इष्ट वाटल्यावरून त्या त्या ठिक त्या घालून, व दुसरे अनेक फेरफार करून, हा एकंदर ग्र होईल तितका सुसंबद्ध रीतीनें व प्रचलित पद्धतीनें बहुते अगदीं नवीन लिहून काढिला आहे. या ग्रंथापासून आबाल वृद्धांचें मनोरंजन होऊन त्यांस बोधाचाही लाभ झाल्याचें ऐकिल्यास माझ्या श्रमाचें सार्थक्य झालें असें मी समजेन.

पुणें, तारीख २५ माहे जुलै
सन १९०६ इसवी.

हरि कृष्ण दामले.

अनुक्रमणिका.

—:*:—

नवीन बहारदानीष
अथवा
बहराम-जोहरा-कादंबरी.

भाग पहिला.

—:*:—

दिल्ली व तेथील एक नामांकित बादशहा.

जगीं सर्वसुखी असा कोण आहे ।
विचारी मना तूंचि शोधूनि पाहें ॥
रामदास.

या भरतखंडांत दिल्लीसारखें दुसरें शहर नाहीं. याला पूर्वी हस्तिनापुर म्हणत. कौरवपांडवांनीं येथें राज्य केल्यास आज हजारों वर्षे होऊन गेलीं. तेव्हांपासूनचा या प्रख्यात राजधानीचा बहुतेक विश्वसनीय इतिहास सांपडतो. त्यावरून, आजपर्यंत येथें किती राजवंश होऊन गेले, किती मोठमोठ्या लढाया झाल्या, किती विलक्षण उलाढाली झाल्या, त्यांचें वर्णन करूं गेल्यास एक मोठा प्रचंड ग्रंथ होईल. असो; यवनांनीं येथें बहुत काळपर्यंत आपली सत्ता गाजविली ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. जे अनेक प्रबळ यवन बादशहा येथील तख्तावर बसले, त्यांत औरंगबक्ष नांवाचा एक महाप्रख्यात बादशहा होऊन गेला. तो मोठा शूर, पराक्रमी, न्यायी, उदार, दयाळू व धार्मिक असे. त्याच्या

राज्यांत न्यायमनसुबा उत्तम रीतीनें चालत असल्यामु गरीबगुरिबांवर कधींही जुलूम झालेला दृष्टीस पडत नरे प्रजेपासून अगदीं नेमस्त कर घेऊन, तिचें सुख जेणेंकरू वृद्धिंगत होईल असे उपाय योजण्यांत तो सदोदीत निम असे. लोकांच्या सोईकरितां राज्यांत चोहोंकडे सडक तलाव, विहिरी, धर्मशाळा वगैरे त्यानें अनेक बांधिल्य होत्या. त्याची संपत्ति व सैन्य फारच मोठें असल्याका णानें आसपासचे राजेरजवाडे त्यास फार भीत असत, त्याची नामर्जी कधींही होऊं देत नसत. विद्वान् व का गीर लोकांचा तो मोठा चहाता असल्यामुळें, विद्या कलाकौशल्य हीं त्याच्या राज्यांत केवळ शिखरास जाऊ पोहोंचलीं होतीं. तो मोठा पापभीरु असून, धर्मसंबंधां कोणावरही त्याचा यत्किंचित् देखील जुलूम नसे. अस सर्वगुणसंपन्न प्रभु मिळाल्यावर प्रजेनेंही त्याला केवळ आपल्य पित्याप्रमाणें मानून, याचा आपला वियोग कधीं न घडे असें रात्रंदिवस चिंतन करीत असावें यांत नवल तें कोणतें

अशा प्रकारचा हा औरंगबक्ष बादशहा आणि त्याची ती प्रजा यांचा विचार केला असतां, या ठिकाणी उणें कांहींच नसावें असें सकृद्दर्शनीं आपल्या मनांत येईल. पण हाय हाय! या जगाची अशी कांहीं विचित्र रहाटी आहे कीं, कोणीही पूर्ण सुखी म्हणून आढळावयाचाच नाहीं! शोधाअंतीं कोठेंही कांहीं ना कांही तरी उणें म्हणून आढळल्यावांचून रहावयाचें नाहीं! हा औरंगबक्ष बादशहा सर्वगुणसंपन्न अ- सून त्याला कोणत्याही गोष्टीची प्रतिकूलता नव्हती हें खरें

पण त्याला संतान नव्हतें, यामुळें त्याच्या सर्व सुखावर विरजण पडून, संततीसंबंधानें तो रात्रंदिवस अत्यंत चिंतातुर असे. त्यानें आपणास पुत्रप्राप्ति व्हावी म्हणून आपल्या धर्माप्रमाणें गोरगरिबांस हजारों रुपयांची खैरात केली, व प्रख्यात पवित्र स्थानांस मोठमोठ्या देणग्या दिल्या; इतकेंच करून तो राहिला नाहीं, तर आपल्याहून भिन्नधर्मीय जे हिंदु लोक, त्यांच्या नवसाला पावणाऱ्या अनेक देवस्थानांच्या दर्शनास जाऊन तेथील प्रसादही त्यानें घेतले. फार काय, पण ब्राह्मणांकडून जपजाप्य, होमहवन वगैरेही त्यानें करविलीं; परंतु त्यापासून कांहींएक उपयोग झाला नाहीं. यामुळें बादशहा अगदीं नाउमेद होऊन त्याच्या चित्तास स्थिरता बिलकुल राहिली नाहीं.

बादशहाचा दानीषमंद नांवाचा वजीर होता. तो मोठा राजकारस्थानी, प्रत्येक कामांत चाकबगार व अत्यंत विचारी असून बादशहाची त्याजवर बहाल मर्जी असे. एके दिवशीं बादशहा एकांतांत बसला असतां त्याचें मन अगदींच घाबरून गेलें; काय करावें, कोठें जावें, हें त्यास कांहींच सुचेना. तेव्हां त्यानें वजिरास बोलावून आणविलें, आणि सद्गदित अंतःकरणानें त्यास ह्मणाला, ' माझ्या मनाची हल्लींची स्थिति तुम्हांस ठाऊकच आहे. आपणास आतां पुत्र होण्याची आशा नाहीं हें पाहून माझ्या अंतःकरणास पराकाष्ठेची उद्विग्नता झाली आहे. पुत्रप्राप्तीवांचून मनुष्यास सद्गति नाहीं, ही तर फारच मोठी व महत्वाची गोष्ट आहे यांत संशय नाहीं. पण तिचा परिणाम अदृष्ट असल्यामुळें ती आज

आपण एके बाजूस ठेवून या संबंधानें तात्पुरताच विचार केला तरी, ही गोष्ट मनुष्यास वारंवार किती दुःख देणारी आहे बरें ? प्रकाशावांचून जसें घर, चंद्रावांचून रजनी, अथवा फळांवांचून वृक्ष, तसेंच पुत्रावांचून आमचें हें जिणें होय! आमचे पश्चात् आमचें नांव व निशाण कायम राहण्याचें कांहींच साधन दिसत नाहीं. तर या गोष्टीस कांहीं तोड तुम्ही काढाल, असें जाणून मुद्दाम तुह्मांस बोलावून आणिलें आहे. पहा कांहीं विचार सुचेल तर!'

वजीर हात जोडून बादशहास ह्मणतो, 'राजाधिराज, या संबंधानें आपण बिलकुल खंती बाळगूं नये. या पृथ्वीवर आपणांसारखा महासमर्थ प्रभु कोण आहे? आपणांस जें काय पाहिजे त्या संबंधानें आपल्या तोंडांतून हूं येण्याचा काय तो अवकाश, आपल्या हेतूप्रमाणें वाटेल ती गोष्ट घडवून आणण्यास अलमदुनिया तयार आहे. आतां पुत्रप्राप्तीसारखी गोष्ट मनुष्याच्या शक्तीच्या बाहेरची आहे हें खरें, तरी पण ज्याप्रमाणें वैद्य हा एखादें औषध तयार करण्यास हवी ती वनस्पति न मिळाल्यास तिचा प्रतिनिधि तिचे ऐवजीं योजितो, त्याप्रमाणेंच, पुढें आपली कीर्ति व नांव चालण्यास पुत्र हें जें साधन, त्याच्या अभावीं त्याच्या प्रतिनिधीची आपणांस योजना करितां येईल. हें पहा, महाराज, आजपर्यंत या पृथ्वीचें राज्य ज्या पुण्यपुरुषांनीं केलें, त्यांच्या नांवाचा डंका त्यांच्या पुत्रपौत्रादिकांच्या योगानेंच वाजत आला आहे असें नाहीं; तर त्यांनीं या दुनियेवर आपल्या औदार्यानें, सामर्थ्यानें व गुणग्राहकत्वानें जीं महत्कृत्यें घडवून आणिलीं, त्यांच्या

योगानेंही त्यांचें नांव व कीर्ति अजरामर होऊन राहिली आहे. तर सरकार, आपणही असेंच एखादें अजब काम उठवून दिल्यास आपलेंही नांव अजरामर होऊन जाईल यांत संशय नाहीं !'

बादशहा म्हणतो, 'ठीक आहे. तर आतां तुम्हीच आपल्या कल्पनेनें असें एखादें स्थळ सिद्ध करा कीं, तसें आजपर्यंत कोणाचेही हातून झालें नसेल व पुढेंही होणार नाहीं. या कामास कितीही खर्च व श्रम पडले तरी त्याचा विचार मुळींच मनांत आणावयाचा नाहीं.'

भाग दुसरा.

दौलतबाग.

दिनयामिन्यौ सायंप्रातः ।
शिशिरवसंतौ पुनरायातः ॥

शंकराचार्य.

वजिरानें ही बादशहाची आज्ञा शिरसा वंद्य केली. त्यानें यमुना नदीचे ईशान्येस मोठें प्रशस्त मैदान पाहून तेथें दौलतबाग नांवाचें मोठें भव्य स्थळ तयार करण्याचे कामास सुमुहूर्तावर आरंभ केला. त्याकरितां त्यानें देशोदेशींचे कारागीर आणविले. ते आपल्या कामांत इतके निष्णात होते कीं, त्यांना विश्वकर्म्याचीच उपमा साजेल! या स्थळाची रचना अशी केली होती: प्रथम एक संगमरवरी चिऱ्यांचा विस्तीर्ण अष्टपैलू चबुतरा तयार करून त्यावर मध्यभागीं एक

भव्य इमारत बांधिली. ती मोठी प्रशस्त असून तिच्यांत सर्व प्रकारच्या सोई केलेल्या होत्या. तिचें बहुतेक काम स्फटिकाचें असून तें एकंदरीनें इतकें उत्तम बठविलें होतें कीं, त्याची तारीफ करावी तितकी थोडीच! त्यांतूनही तिच्या सरतेशेवटच्या मजल्यावर जो ऐनेमहाल ह्मणून तयार केला होता, त्याचें काम तर केवळ अप्रतिम होतें. त्याला मध्यभागीं एक घुमट असून त्याच्या चाऱ्ही बाजू सारख्या होत्या. त्या महालाच्या भिंतींस सोन्यारुप्याच्या विटा—म्हणजे एक थर सोन्याच्या विटांचा व दुसरा रुप्याच्या विटांचा—याप्रमाणें होत्या. त्याच्या प्रत्येक बाजूस सहा सहा खिडक्या असून त्या खिडक्यांचें जाळीकाम मोठें सुबक व कौशल्यानें केलेलें होतें; आणि त्यांस ठिकठिकाणीं हिरे, माणकें व पाच जडविलेले होते. तसेंच त्याच्या छतांत इंद्रधनुष्या प्रमाणें असंख्य रंगांचे हिरे मोठ्या खुमारीनें बसविलेले होते. सारांश, तो महाल म्हणजे एक लहानसें इंद्रभुवनच बनविलें होतें. ह्या एकंदर इमारतीस आराममंदिर असें नांव दिलें होतें, व ह्या मंदिरांत जिकडे तिकडे मौल्यवान् बिछाइती पसरलेल्या असून किनखापी चादरी घातलेलीं कित्येक हस्तीदंती कोचें मांडलेलीं होतीं. खेरीज ऐनेमहालांत भरगच्ची चादर घातलेलें एक उत्तम रत्नजडीत सिंहासन ठेविलें होतें.

या इमारतीच्या शेजारीं एक अत्यंत रमणीय सरोवर बांधिलें असून संभोंवतीं एक फारच मनोहर बाग लाविला होता. त्यांतील नारळी, पोफळी, बकुळी, जांभळी, आम्र, फणस, सिताफळी, रामफळी, पेरू वगैरे हजारों जातींचे

लहानमोठे फलवृक्ष, तसेंच द्राक्षी वगैरेंचे मंडप यांची यो-
जना अशी कांहीं चतुराईनें केलेली होती कीं, तिचें यथातथ्य
वर्णन करणें अशक्य आहे! त्याचप्रमाणें जाई, जुई, मोगरा,
निशिगंध, गुलाब, मदनबाण, मालती इत्यादिकांचे जे ताटवे
व मंडप लावून दिले होते, त्यांची शोभा व फुलांचा सुवास
हीं अवर्णनीय होतीं. मधून सतत वाहणाऱ्या संगमरवरी द-
गडांनीं बांधलेल्या पाटांचें पाणी यथाक्रम सर्व झाडांस हवें
तितकें पोहोंचत असल्यामुळें तीं सदोदीत टवटवीत राहि-
लेलीं असत. ह्या वाटिकेंतील सडकांच्या दुतर्फा सारख्या
अंतरानें कारंजीं उडत असून त्यांच्या तुषारांच्या योगानें त्या
सडका गारेगार होऊन गेलेल्या असत. अशा त्या अत्यंत
आल्हादकारक उपवनाच्या मध्यभागीं पूर्वी सांगितलेलें तें
अष्टपैलू चबुत्र्यावरील आराममंदिर फारच शोभायमान दि-
सत होतें. चबुत्र्याच्या पायऱ्यांवर ठेविलेल्या तऱ्हतऱ्हेच्या
रंगीबेरंगी फुलझाडांच्या बिलोरी कुंड्या फारच खुलत असत.
तसेंच त्या चबुत्र्याच्या प्रत्येक पैलूच्या ठिकाणीं एकेक सु-
रूचें झाड लाविलेलें होतें. त्यांपैकीं दोहोंदोहोंचे शेंडे एक-
मेकांशीं जुळवून दिलेले असून त्या योगानें बनलेल्या त्यांच्या
त्या कमानींवर सभोंवतालच्या कारंज्यांचे जे फवारे उडत अ-
सत, त्यांचें पाणी जमिनीवर टिवकतांना त्याचे ते बिंदु
सूर्यकिरणांच्या योगानें मोत्यांप्रमाणें चमकत असत.

याप्रमाणें हा दौलतबाग अगदीं लेश तयार झाल्यावर
तेथील मुख्य अधिकाऱ्यांनीं कित्येक फलपुष्पांचे उत्तम
नमुने नेऊन बादशहास नजर केले. ते पाहून बादशहाची

मर्जी फारच खूष झाली, व तत्क्षणीं तें स्थळ पहावयास जावें अशी त्याला उत्कट इच्छा झाली. याप्रमाणें तो दरबारच्या मुख्य मुख्य मंडळीसह मोठ्या उत्सुकतेनें दौलतबागाच्या दरवाज्याशीं येऊन ठेपतो तों तेथें एक विलक्षण अनर्थ गुदरला! तो असा कीं, तो सर्व बाग, मध्यभागीं असलेल्या आराममंदिरासह एकदम जळून खाक झाला! आणि त्याबरोबरच तेथल्या त्या सरोवराचें पाणीही नाहींसें होऊन तें अगदीं कोरडें ठणठणीत पडलें!

हा आकस्मिक प्रकार पाहून बादशहाच्या व इतर सर्व लोकांच्या मनाचा जो विरस झाला त्याचें काय वर्णन करावें! असा हा अकल्पित अपघात झाल्यामुळें, त्या कामावर नेमलेले सर्व लहानमोठे अधिकारी अत्यंत भयभीत झाले, व त्यांनीं बादशहाचे चरणांवर लोटांगण घातलें. बादशहानें त्यांस यत्किंचित्‌ही दोष न देतां म्हटलें, 'अरे, तुम्ही मुळींच कष्टी होऊं नका. यांत तुमचा कांहींएक अपराध नाहीं. हें सर्व माझ्याच दुर्दैवामुळें घडून आलें आहे!' मग वजिराकडे वळून म्हणतो, 'अहो, या लोकांनीं अत्यंत परिश्रम करून या कामाचा जो येवढा उठाव केला, त्याबद्दलच्या त्यांच्या श्रमांचा पुरा मोबदला त्यांस देण्यांत बिलकुल कसूर करूं नका; इतकेंच नव्हे, तर ज्याच्या त्याच्या कामाच्या योग्यतेप्रमाणें सर्वांना चांगलीं इनामेंही द्या. मी मात्र इतःपर हा सर्व राज्यभार सोडून देऊन एकांतामध्यें केवळ ईश्वरसेवेंत आयुष्य घालविण्याचा निश्चय केला असून माझी तुम्हांस अशी आज्ञा आहे कीं, तुम्ही स्वतःस

माझ्यां ठिकाणीं समजून, यथान्याय प्रजापालन करा, व याच मार्गानें माझी कीर्ति व नांव कांहीं दिवस राखतां येईल तर राखा.' इतकें बोलून बादशहानें केलेला निश्चय तत्काळ अमलांत आणिला.

भाग तिसरा.

—:*:—

सत्पुरुषदर्शन.

भूतांची दया हें भांडवल संतां ।
आपुल्या ममता नाहीं देहीं ॥
तुकाराम.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें, राजधानीपासून जवळच एका टेंकडीच्या पायथ्याशीं, उष्ण, शीत व पर्जन्य यांचें निवारण होईल इतक्याच बेताची एक झोंपडी बांधून, तेथें फक्त तीन चार नोकरांनिशीं बादशहा जाऊन राहिला. त्यानें याप्रमाणें सर्वसंगपरित्याग केला असून, राहिलेलें आयुष्य भगवच्चिंतनांत घालविण्याचा पक्का निर्धार केला होता. अशा प्रकारें एक वर्षभर तो त्या ठिकाणीं राहिला असतां, इकडे त्याची सर्व प्रजा अत्यंत खिन्न होऊन गेलेली होती. तेवढ्या अवधींत सर्व राज्यामध्यें कोणीं मंगलकार्य वगैरे कांहींएक केलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर सणावाराला गोडधड सुद्धां करून खाल्लें नाहीं! सारांश, इतकी कांहीं त्याची प्रजा त्याजकरितां झुरून राहिली होती. त्या लोकांना दुःखांत सुख इतकेंच होतें कीं, सर्व राज्याचा कारभार दानीषमंद वजीर हा मोठ्या चातुर्यानें, न्यायानें व

इभ्रतीनें चालवीत होता; आणि बादशहा जरी सर्वसंगपरित्याग करून राहिला होता, तरी तो परम स्वामिभक्त वजीर सायंकाळीं नित्य त्याचे दर्शनास जाऊन दिवसभर केलेल्या कारभाराचा गोषवारा त्यास निवेदन करीत असे.

याप्रमाणें पुरें एक वर्ष लोटलें असतां एके दिवशीं, मागें वर्णन केलेल्या त्या दौलतबागापाशीं, दिसण्यांत मोठा भव्य व तेजःपुंज असा एक अवलिया आला. तेथली ती इमारत व बाग हीं सर्व जळून खाक झालीं असून, तळ्यांत पाण्याचा लेशही राहिला नव्हता, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. असें असतां तेथें अवशिष्ट राहिलेल्या पडक्या इमारतीच्या रक्षणासाठीं जे थोडे शिपाई ठेविले होते, त्यांजवरील जमादारास त्या अवलियानें म्हटलें, ' जारे, हा कटोरा घे, आणि त्या तळ्यांतलें पाणी भरून आणून मला दे.' जमादार आश्चर्यचकित होऊन मनांत म्हणतो, ' येथें तर पाण्याचा थेंबही नाहीं; आणि हे फकीरजी तर कटोरा भरून आणण्यास सांगतात! यांच्या मुद्रेवरून यांस नाहीं होय म्हणणेंही कठीण! तेव्हां आतां करावें कसें ? ' असा तो बुचकळ्यांत पडलासा पाहून तो अवलिया त्याच्या अंगावर ओरडून त्यास म्हणतो, ' किती बेवकूब मनुष्य तूं आहेस रे ! सांगितलेलें काम करावयाचें टाकून उगीच विचार कशाचा करितोस ?' हें ऐकून तो बिचारा जमादार कांपत कांपत त्या तळ्याकडे चालला. तो कांठाशीं जाऊन पोहोंचती न पोहोंचतो तों काय चमत्कार झाला तो ऐका: तत्क्षणीं तें तळें पूर्वीप्रमाणें अत्युत्तम स्वच्छ पा-

ण्यानें भरून गेलेलें त्याला दिसलें! तेव्हां त्यानें मोठ्या आनंदानें तो कटोरा भरून त्या अवलियाचे हातांत आणून दिला. त्यानें किंचित् हास्यवदन करून त्या पाण्याचा एक घोंट घेतला, व बाकी राहिलेलें पाणी त्या पडक्या इमारतीवर व जळून गेलेल्या बागेवर शिंपिलें. तेव्हां आणखी मोठा अद्भुत चमत्कार असा झाला कीं, पहिल्याप्रमाणें तें आराममंदिर व बाग हीं सर्व जशाचीं तशीं दिसूं लागलीं—अशी कीं, जणू काय त्यांना कांहींच अपाय पूर्वी झालेला नव्हता!

ही सर्व हकीकत त्या जमादारानें धांवत धांवत जाऊन शहरच्या कोतवाळास जाहीर केली. कोतवाल येऊन पाहतो तों सर्व प्रकार अगदीं खरा! तेव्हां त्याला परम आश्चर्य व आनंद वाटून, ज्या सत्पुरुषाच्या कृपेनें ही गोष्ट घडली त्यास त्यानें त्या बागांतील द्राक्षीमंडपाखालीं नेऊन तेथें मुहूर्तमात्र बसण्याविषयीं विनंती केली. नंतर बागांतील उत्तम उत्तम फळपुष्पें सोन्याचे तबकांत भरून तो मोठ्या तातडीनें राजवाड्यांत गेला. तेथें दरबारामध्यें वजीर हा कांहीं महत्त्वाच्या कामांत गुंतलेला असतांही तितक्या गर्दीत एकदम घुसून कोतवालानें त्यास लवून मुजरा केला, आणि तें फळपुष्पांनीं भरलेलें तबक त्याजपुढें ठेविलें. वजिरास त्याचा हा अघोचरपणा पाहून प्रथम मोठें आश्चर्य वाटलें, व रागही आला. पण त्याचे तोंडून सर्व हकीकत ऐकल्यावर त्याच्या आनंदास पारावार नाहींसा झाला! नंतर लमलाच दरबार बरखास्त करून तो अमीरउमरावांसह दौड करीत बादशहाच्या भेटीस गेला, व तें फळपु-

ष्यांनीं भरलेलें तबक त्यानें त्याजपुढें अगोदर ठेवून दिलें, आणि हात जोडून, घडलेला सर्व वृत्तांत त्यास निवेदन केला. तो ऐकून बादशहाचा हर्ष त्रिभुवनांत माईनासा झाला! तो लगबगीनें उठून सर्व मंडळीसह टाकोटाक दौलतबागेकडे यावयास निघाला, व थोडक्याच वेळांत त्याच्या दरवाज्याशीं येऊन पोहोंचला. तेथून मोठ्या अदबीनें, फक्त दहा पांच निवडक दरबारी लोक बरोबर घेऊन, वजिरासह त्या अवलियासमोर. येऊन, त्यास वंदन करून तसाच तेथें तो तटस्थ राहिला. त्या सत्पुरुषाचें तेज इतकें कांहीं विलक्षण होतें कीं, त्याजपुढें बोलण्यास कोणाचीही छाती होईना. अशा प्रकारें ते सर्व लोक अधोमुख उभे असतां, अवलियानें किंचित् हास्य करून बादशहास ह्मटलें, ‘ अरे, तुला काय हवें तें मी देण्यास तयार आहें. माग लवकर. ’ बादशहानें त्याच्या पायांवर लोटांगण घालून अत्यंत नम्रतेनें उत्तर केलें, ‘ महाराज, या चरणांच्या आशीर्वादेंकरून दासाला कशाचीही उणीव नाहीं. फक्त एक पुत्रसंतान नसल्यामुळें, पुढें वंश खुंटणार या दिलगिरीनें रात्रंदिवस जीव झुरणीस लागला आहे. ’ हे बादशहाच्या तोंडचे शब्द ऐकतांच त्या पुण्यपुरुषानें त्याच्या मस्तकीं हात ठेवून म्हटलें, ‘ अरे जा, येवढी फिकीर कशाला बाळगितोस? तुला पुत्र होईल—खासा नामी—नामांकित पुत्र होईल ! ’ इतक्यांत वजिराचेंही मुख म्लान पाहून त्याजकडे वळून अवलिया ह्मणतो, ‘ तूं रे का बाबा खिन्न दिसतोस ?’ त्यावरून वजिरानेंही त्याच्या चरणीं

मस्तक ठेवून म्हटलें, 'हे महासमर्थ प्रभो, कोठें काय आहे, कोणाला काय पाहिजे, हें सर्व आपणांस ठाऊकच आहे; कोणीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. तथापि आज्ञा झाली त्या अर्थी बोलतों : महाराज, या दासालाही संतानान्यतिरिक्त दुसरी कशाची उणीव नाहीं.' हें ऐकून अवलिया म्हणतो, 'बरें जा, तुलाही ईश्वरकृपेनें एक कन्या होईल—फारच सुंदर—लौकिकवान्—कन्या होईल, समजलास !' इतकें बोलून तो सत्पुरुष तेथून उठून जाऊं लागला. तेव्हां बादशहा, वजीर व इतर सर्व लोक मोठ्या काकळुतीनें त्यास आडवे होऊन म्हणूं लागले कीं, 'हें काय महाराज ! इतक्यांतच येथून आपण निघून जावें हें आम्हांस अगदीं बरें वाटत नाहीं. या चरणांची आम्हां दासांकडून कांहीं दिवस सेवा घडण्याचा योग आल्यास आम्हांस विशेष आनंद होणार आहे.' तो हंसून म्हणतो, 'ज्याचें जेवढें काम, तेवढेंच त्यानें करावें; अधिकउणें करण्यांत धोका आहे.' हें सांकेतिक वाक्य ऐकूनही त्या मंडळीची समजूत जेव्हां होईना, तेव्हां अवलिया त्यांस म्हणतो, 'बरें, आतां अस्तमान होण्यास किती अवकाश आहे पाहूं या.' हें ऐकून सर्वजण आकाशाकडे पाहूं लागले, तों तो सत्पुरुष एकाएकीं अदृश्य झाला !

भाग चौथा.

—:*:—

बादशहा व वजीर यांस संततीचा लाभ.

ज्यांच्या स्मरणें केवळ तत्काळ गृहासि शुद्धता येते।
तद्दर्शनादि घडतां लाभ किती होय मज न वद्वे तें ॥

हा सर्व प्रकार पाहून, आपणावर भगवत्कृपा झाली असून संततीसंबंधानें आतां आपणांस काळजी वाहणें नको, असें बादशहा व वजीर या उभयतांच्या अंतःकरणांत पूर्णपणें बाणलें; आणि खरोखर पुढें सर्वप्रकारें ती गोष्ट त्यांच्या प्रत्ययासही आली. कारण एक दोन महिन्यांतच बादशहाची पट्टराणी गरोदर असल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. मग काय विचारतां? जिकडे तिकडे आनंदीआनंद होऊन गेला! बादशहाच्या जनानखान्यांत एकीहून एक सरस अशा अनेक परम रूपवती व चतुर स्त्रिया असून त्यांपैकीं एकीलाही राणीच्या या भाग्योदयाविषयीं बिलकुल मत्सर वाटला नाहीं; इतकेंच नव्हे, तर राणीचे डोहळे पुरविण्याकरितां व अनेक प्रकारांनीं तिचें मन रंजविण्याकरितां बादशहा जें जें म्हणून कांहीं करी, त्यांत त्या सर्वजणी उल्हासयुक्त अंतःकरणानें साहाय्य करून, प्रत्येक गोष्ट राणीला जेणेंकरून गोड वाटेल असेंच करीत असत. आज काय दौलतबागांत सहल करावयास जावयाचें, उद्यां अमुक पवित्र स्थानाच्या दर्शनास जावयाचें, परवां अमक्या ठिकाणीं चांदण्यांत विहार करावयास जावयाचें, असा

बहुतेक नऊ मासपर्यंत ख्यालीखुशालींत काळ घालविण्याचा बादशहाचा क्रम चाललेला होता.

शेवटीं राणी प्रसूत होऊन तिला सूर्यासारखा तेजस्वी पुत्र झाला. तेव्हां बादशहानें आपल्या दरबारचे व दुसरीकडचे प्रख्यात ज्योतिषी बोलावून त्या मुलाची पत्रिका करविली. तीवरून तो मोठा शूर, धार्मिक, कीर्तिमान् व दीर्घायुषी होऊन समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य करील असें दिसून आलें. यावरून तर बादशहाचे अंतःकरणांत केवळ आनंदोद्भवाचा सागरच उचंबळूं लागला ! त्यानें सतत एक महिनाभर साऱ्या शहरांत या आनंदानिमित्त रात्रंदिवस उत्सव सुरू ठेवण्याविषयीं हुकूम केला, व आपल्या या नवानवसांनीं झालेल्या पुत्राचें नांव शहाअल्ली बहराम असें ठेविलें. त्यानें या आनंदाचे प्रसंगीं, ज्ञात किंवा धर्म कांहींएक मनांत न आणितां फार मोठा दानधर्म व खैरखैरात केली.

इकडे बादशहाची पट्टराणी गरोदर झाल्यापासून सुमारें सहा महिने लोटले नाहींत तों वजीर दानीषमंद याची पत्नीही गरोदर राहिली, व ती योग्यकाळीं अत्यंत रूपसंपन्न असें कन्यारत्न प्रसवली. या मुलीच्या रूपाचें शब्दांनीं वर्णन करणें अशक्य आहे ! थोडक्यांत इतकेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं, हें अनुपम रत्न हातानें घडविलें असतां मनासारखें होणार नाहीं असें वाटून, विधात्यानें ती मनोमयच मूस ओतिली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं ! ह्या मुलीच्या जन्मोत्सवानिमित्त वजिरानेंही पुष्कळ खर्च करून आपल्या

भाग सहावा.

—:*:—

नीतिबोध.

रंजविती मोहिती बहु जनमानस बहुविधा कलाकुसरी।
नीत्युपदेशापरि परि दिसते न जगांत हितकथा दुसरी ॥

पुढें त्या मुलांना नीतिशिक्षण देण्याकरितां ह्मणून मुद्दाम एका पोक्त गुरूची योजना करण्यांत आली. त्यानें त्यांस जी नीति शिकविली ती थोडी विस्तारपूर्वक येथें सांगण्यासारखी आहे:—

‘ पहांटेस उठून परमेश्वराचें स्तवन करावें. मी मृत्यु-लोकचा प्राणी असून इतरांप्रमाणें मलाही एके दिवशीं हा लोक सोडून गेलें पाहिजे, असा विचार मनांत आणून दिन-चर्येस लागावें; ह्मणजे कुकर्माकडे मनाची प्रवृत्ति होणार नाहीं. परमेश्वरानें ज्या पदास आपणास चढविलें आहे त्याच्या योग्यतेप्रमाणें वागण्याविषयीं नेहमीं सावधगिरी ठेवावी. कोणी कांहीं तक्रार किंवा फिर्याद घेऊन आल्यास, मला आतां वेळ नाहीं, असें ह्मणूं नये; तर त्याचा सर्व वाका शांतपणें ऐकून, ईश्वरस्मरणपूर्वक योग्य इनसाफ द्यावा. कोणाला कसलेंही वचन देण्यापूर्वी फार विचार करीत जावा; व एकदा दिलें ह्मणजे तें पुरें करण्यांत बिलकुल अंतर पडूं देऊं नये. रोज कांहीं पायीं व कांहीं घोड्यावर बसून व्यायाम व फेरफटका करीत जावा. कसरत करण्यासही आळस करूं नये. भुकेपेक्षां घासानें कमी खावें. लहर फिरेल तसें कधींही वागूं नये; मनाची सदोदीत समता ठेवीत जावी. आपला मोठेपणा

मिरवून इतरांस कधींही तुच्छ मानूं नये. देशपर्यटन करावें व देशोदेशींच्या राजांचे व लोकांचे इतिहास व बखरी नेहमीं अवलोकन करीत जाव्या. हा केवळ अनुभवशास्त्राचा अभ्यास असल्यामुळें याच्या योगानें मनाचा फार चांगला विकास होऊन व्यवहारांत पदोपदीं येणाऱ्या अडचणी दूर करण्याचें सामर्थ्य अंगीं येतें.

'सत्संगतीची कास नेहमीं धरावी व दुःसंगतीचें वारेंही लागूं देऊं नये. सत्संगतीचा महिमा अगाध आहे. होतां होईल तों गोडीच्या पोटीं सर्वांकडून कामें करून घ्यावीं. दुसऱ्याचें मन आकर्षून घेणें हीच राजनीतीची मुख्य किल्ली होय. अपमानापेक्षां मृत्यु बरा ही गोष्ट सदोदीत ध्यानांत ठेवावी. जेथें तेथें आपला हेका चालवावयाचा व दुसऱ्याची बुद्धि ऐकावयाचीच नाहीं, असा दुराग्रह नसावा. मोठ्या लोकांना आपलें हित किंवा सत्यासत्य कळण्यास फारच थोडे मार्ग असतात; कारण जवळचे बहुतेक लोक स्तुतिपाठक असून निर्भिडपणानें खरी गोष्ट सांगणारा अगदीं विरळा ! जगांत स्तुतीला भुलणारे लोक फार, व मोठ्या लोकांना तर तिच्या मोहांत पडण्याचे प्रसंग हरघडी येतात. तेव्हां त्यांनीं हे प्रसंग होईल तितकें करून टाळण्याचा प्रयत्न करीत जावा. कारण स्तुति ही बहुधा खोटी असते, यामुळें तिचे योगानें सत्यावर पटल पडून मनुष्य डोळस असून अंध बनतो. पदरचे विश्वासू लोक–मग ते कोणत्याही दर्ज्याचे असोत–त्यांचा सल्ला ऐकत जावा. त्यांत कमीपणा मानू नये. तरी पण 'ऐकावें जनाचें आणि करावें मनाचें' या न्यायानें

होतां होईल तों सर्वांचें ऐकून घेऊन स्वतःला योग्य दिसेल तेंच करीत जावें.

' बिकट प्रसंग धैर्यानें पार पाडून न्यावे. अशा प्रसंगीं चित्त स्थिर ठेवून योग्य ते उपाय योजावे; आणि मग जें होणार तें होवो असें म्हणून ईश्वरावर भार टाकून बेफिकीर रहावें. परमेश्वराची भक्ति, त्याजवर पूर्ण भरंवसा आणि त्याचें नित्य स्मरण ह्या गोष्टी इहलोकीं मनुष्याचें कल्याण करून त्याला परलोकाची प्राप्ति करून देणाऱ्या आहेत, या अबाधित नियमाचा सदोदीत अवलंब करावा. कोणाच्याही बाह्य वर्तनावरून त्याची परीक्षा करूं नये; अंतरंग कसें आहे तें पहात जावें. तरवारीची खरी किंमत तिच्या सोनेरी बुट्टीदार मुठींत किंवा मखमाली रंगाच्या म्यानांत नसते, तर तिची खरी योग्यता तिच्या पोलादी पानांत असते. योजलेली मसलत फसली किंवा लंगडी पडली तरी त्या गोष्टीचा खेद करीत बसूं नये. धीर धरून तिचा पाठलाग केल्यानें ती तडीस जाईल, असा भरंवसा ठेवून वागावें. आपण काय करतों, काय बोलतों याकडे जवळच्या लोकांचें नेहमीं लक्ष असतें, व ते त्याचे भलभलते अर्थ करून लोकांत उगीच कांहीं तरी कंड्या पिकवितात. याकरितां कोणतीही महत्त्वाची गोष्ट करणें किंवा बोलणें तें एकांतीं करीत जावें. काटकसरीनें वागण्याची संवय ठेवावी; परंतु योग्य प्रसंगीं लागेल तो खर्च केलाच पाहिजे हें ध्यानांत ठेवावें. कोणत्याही व्यसनाच्या आधीन होऊं नये. विद्या, कलाकौशल्य, कारागिरी ह्यांस उत्तेजन

द्यावें. केवळ अंधपरंपरा चालत आलेल्या रुढीप्रमाणें न चालतां कालदेशवर्तमानाकडे लक्ष देऊन योग्य दिसेल तें करीत जावें. गांवशिवांच्या तंट्यांचे निकाल होतां होईल तों तेथील संभावित पंचांच्या मार्फतच होतील अशी व्यवस्था ठेवावी. इमारतीस जसे खांब तसे राज्यास मंत्री होत. ते राजनिष्ठ असून विद्या, विनय, सौजन्य, निर्लोभता, धर्मश्रद्धा, दूरदृष्टि, राजकार्यधुरंधरता इत्यादि गुणांनीं युक्त असावे. त्यांच्या मसलतीनें राज्यकारभार चालविणें श्रेयस्कर होय. पण त्यांवर आपली छाप राहील अशी हातोटी राज्य चालविणाराला साधली तरच त्याचा बोज राहतो. आपल्याकरितां सेवकानें कांहीं अचाट कृत्य केलें, तर त्याला चांगलें इनाम देऊन संतुष्ट करीत जावें. एकालाच सर्व कामांवर देखरेख ठेवतां येणें शक्य नाहीं, तरी पण मधून मधून सहजगत्या प्रत्येक खात्याची अचानक तपासणी करीत जावी, म्हणजे तो तो अधिकारी गाफील किंवा बेबंद न होऊन सर्व कामें सुरळीत चालतील.

'न्याय, दया, क्षमा, शांति, गुणग्राहकता या गोष्टी प्रभुत्वास अत्यंत शोभा देणाऱ्या आहेत. याकरितां त्यांचें अवलंबन सदोदीत करीत असावें. काम, क्रोध, लोभ हे जबरदस्त शत्रु आहेत. यांचा विटाळही न झाला तर फार चांगलें. पण मनुष्याच्या स्वभावाची व शरिराची दुर्बलता ही या कामीं फार आड येते, व त्यांचें कांहीं चालूं देत नाहीं. तथापि मनुष्यानें अभ्यासानें व मनो-

निग्रहानें या शत्रूंस निदान मर्यादित ठेवण्याचा तरी अवश्य यत्न करीत असावें ! '

भाग सातवा.

—:*:—

बहराम व जोहरा यांची ताडातोड.

दैवी विचित्रा गतिः ।

याप्रमाणें त्या पंडितानें जी नीति सांगितली, ती अर्थात् विशेषतः राजपुत्रास उद्देशून सांगितली. परंतु वजिराची कन्या ही एकसारखी त्याच्या जवळच असल्यामुळें, तिलाही ती चांगली ऐकावयास सांपडली; आणि शहाजाद्याप्रमाणेंच तीही मोठी तीव्र बुद्धीची असल्यामुळें, तिनें इतकी उत्तम प्रकारें ती ग्रहण केली कीं, तीं उभयतां त्या संबंधानें एकमेकांत ऊहापोह करूं लागलीं इतकेंच नाहीं, तर त्या बाबतींत अनेक शंका व उपशंका घेऊन त्या पंडितास ह्मणजे आपल्या गुरूस त्यांनीं जे प्रश्न केले, त्यांचीं समाधानपूर्वक उत्तरें देतांना त्याला पुष्कळ वेळां विचार करावा लागला ! त्यांतून जोहरा ही केवळ लहान मुलगी असून तिच्या कुशाग्रबुद्धीचा प्रभाव जो त्याच्या दृष्टीस पडला, तो पाहून तर त्यानें तोंडांत बोट घातलें ! तसेंच त्या उभयतांचें सर्व प्रकारें ऐक्य पाहूनही तो पराकाष्ठेचा चकित झाला !

पण दैवाची गति कशी विचित्र आहे पहा ! त्या मुलांचें एकमेकांविषयीं निस्सीम प्रेम हेंच त्यांजवर महत्संकटें येण्यास

कारण झालें ! त्या पंडिताच्या मनानें असें घेतलें कीं, या उभयतां मुलांचा जो आज बारा तेरा वर्षे सहवास घडलेला आहे, तो यापुढें तसाच चालू ठेवणें दोघांसही हितकर होणार नाहीं. तेव्हां आतां यांची फाटाफूट करणें हेंच श्रेयस्कर होणार आहे. असें मनांत आणून त्यानें या संबंधानें थोडकासा अनुभव घेऊन पाहिला. तो असा कीं, दोन घटकांपर्यंत त्या परस्परांची दृष्टादृष्ट न होईल अशा रीतीनें त्यांच्यामध्यें पडदा उभा करून आपण त्यांना गोष्टी सांगत बसला. तों तेवढ्या अवधींत त्यांच्या मनाची इतकी कांहीं चलबिचल होऊन गेली, व त्यांना या अल्पकाल वियोगाचें इतकें कांहीं पराकाष्ठेचें दुःख झालें, कीं तें कांहीं सांगतां पुरवत नाहीं ! या वेळीं पंडितानें सांगितलेल्या गोष्टी त्यांना बिलकुल न रुचून त्याचा त्यांना अतिशय संताप आला; आणि त्यांच्या चेहऱ्यावरची नेहमींची टवटवी नाहींशी होऊन तीं फिकट व गरम झाल्यासारखीं दिसूं लागलीं ! सारांश, त्यांना तो वियोग अगदींच असह्य होऊन गेला ! पुढें पडदा दूर करून पाहिला तों, जशी एखाद्याला अतिशय तहानभूक लागलेली असून ती एकदम हरण झाली असतां त्याला अत्यंत आल्हाद व समाधान वाटतें, त्याप्रमाणेंच येथला सर्व प्रकार दिसला ! हें पाहून तर त्या पंडिताच्या मनांत आलेल्या विचारांचें अधिकच दृढीकरण झालें.

मग तो पंडित बादशहाकडे येऊन, आपण आपलें काम कसकसें बजाविलें त्या संबंधाची हकीकत, व त्या मुलांची एकंदर दिनचर्या आणि स्थिति या गोष्टींचा

सविस्तर पाढा त्यानें बादशहास वाचून दाखविला; आणि येथवर झालें तें सर्व योग्यच झालें, त्यांत कांहींएक वावगें झालें नाहीं, पण यापुढें मात्र त्या मुलांना एकत्र राहूं देणें वाजवी होणार नाहीं, असें आपलें मत त्यानें दर्शविलें. तेव्हां बादशहाचीही मर्जी तशीच फिरून, त्यानें वजिरास तत्काळ बोलावूं पाठविलें; आणि आपला मानस त्याला समजावून, तुह्मी आपले मुलीस आतांचे आतां घरीं घेऊन यावें, असा हुकूम फर्माविला. वजिरानें हात जोडून म्हटलें, ‘ खुदावंत, झालेला हुकूम दासाला शिरसा मान्य आहे. पण परवानगी असेल तर बोलतों कीं, शहाजादे सरकार व जोहरा यांना एकत्र ठेवण्याची व्यवस्था मला प्रथमपासूनच पसंत नव्हती. पण महाराजांचा दिल नाखुष होईल असें जाणून मीं त्याविरुद्ध चकारशब्द काढला नाहीं. असो; आतां हुकूम बजावण्यास लवमात्र वेळ लावीत नाहीं. ’

इतकें बोलून, बादशहाची आज्ञा घेऊन वजीर तडक दौलतबागाकडे चालता झाला, व एकदम तेथून मुलीस आपल्या वाड्यांत घेऊन आला. या योगानें, जणू काय आपणांवर हा प्रळयकाळच गुदरला असें शहाजादा व जोहरा या उभयतांसही वाटून त्यांच्या नेत्रांतून खळखळखळ अश्रुधारा चालल्या!

भाग आठवा.

—:•:—

देशांतर.

झाला क्षीण बहु क्षुधेस्तव जरी कीं व्यापिला वार्धकें ।
आली कष्टदशा घडो मरणही कीं तेज गेलें निकें ॥
ऐसाही मृगराज जीर्ण तृण तें खाईल कीं काय हा ।
शौर्यें भेदुनि हस्तिमस्तक शुभग्रासींच ज्याला स्पृहा ॥

वामनपंडित.

त्या उभयतां मुलांचा एकसारखा बारा तेरा वर्षांचा सहवास असल्यामुळें त्या परस्परांचीं मनें इतकी मिळून गेलीं होतीं कीं, त्यांचीं शरीरें मात्र भिन्न, पण आत्मा एकच होता असें ह्मटलें तरी चालेल! असें असतां त्यांच्या त्या निर्मळ प्रेमरूपी इमारतीवर दुर्दैवाची वीज एकदम कडाडून पडली, तेव्हां त्यांची स्थिति कशी झाली त्याचें यथातथ्य वर्णन करणें अशक्य आहे! जोहरा हिच्या मनाला एकसारखी हुरहुर लागून तिला कांहींच गोड वाटेनासें झालें. तिला जेवण जाईना, व झोंप मुळींच येईनाशी होऊन तिची मुद्रा अतिशय खिन्न, फिकट व कावरीबावरी दिसूं लागली! तिला वाटे कीं, शहाजादा दिवसांतून एकदा तरी सहजगत्या माझ्या घरावरून फेरफटका करून जात जाईल, तर तेवढ्या अवधांत त्याची माझी क्षणभर नजरानजर होऊन माझा आत्मा कांहींसा थंड होईल! त्याचप्रमाणें इकडे बहरामाच्या मनाचीही अत्यंत कष्टमय स्थिति झाली.

ती इतकी कीं, त्याचें काळीज जणू काय कांचेच्या भट्टींत पोळल्याप्रमाणें करपून गेलें ! खाणेंपिणें व झोंप हींच त्याचीं केवळ नाहींशीं होऊन राहिलीं नाहींत, तर तो अहोरात्रांत कोणाशीं एक शब्दही बोलेनासा झाला ! त्यानें प्रहरांचे प्रहर एकसारख्या घिरट्या घालीत सुटावें, प्रहरांचे प्रहर गुडघ्यांत मान घालून बसावें, व भलत्याच गोष्टी मनांत आणीत असावें; सारांश, अशी एकंदरीनें त्याच्या मनाची अगदीं निकृष्ट अवस्था होऊन गेली !

राखेखालीं विस्तव असूनही जिकडे तिकडे निवांत असल्यामुळें जसें त्याचें तेज बाहेर दिसत नाहीं, परंतु तोच थोडा वारा सुटला कीं जसा लख्कन फुलून जातो, तशी एकदम एके दिवशीं बहरामाची स्थिति झाली. त्याच्या मनाची दुर्बलता एकाएकीं अगदीं नाहींशी होऊन त्यानें झट्दिशीं पोषाख चढविला, आणि ढालतरवारीनिशीं आपल्या आवडत्या घोड्यावर बसून, दहा पांच स्वार बरोबर घेऊन भरधांव तो शहरांत आला. त्यानें असा विचार केला कीं, जोहरा हीस मजकडे येतां येणार नाहीं, पण मला शहरांत जाण्यास काय प्रत्यवाय आहे ? आणि असा मी गेलों असतां, सहज वजिराचे वाड्यावरून जातांयेतांना कदाचित् तिची माझी निदान नजरानजर तरी एखादे वेळेस होईल ! आणि कर्मधर्मसंयोगानें त्या दोघांच्याही मनाप्रमाणें गोष्ट घडून आली. ती अशी कीं, ह्याची ही छोटी स्वारी वजिराचे वाड्याचे पिछाडीचे रस्त्यानें चालली असतां घोड्यांचे टापांचा आवाज ऐकून जोहरा ही पटकन् माडीवर गेली; तों झरोक्यां-

तून शहाजादीची व तिची अनायासें एकदम दृष्टादृष्ट झाली! त्या वेळीं, दिवसभर जशा फुलाच्या कळ्या मिटलेल्या असून तिनीसांजा झाल्या कीं उमलतात, त्याप्रमाणें या उभयतांचे चेहरे एकदम टवटवीत होऊन, दोघांचेही अंतःकरणांत आनंदाचें भरतें आलें! आणि अत्यंत क्षुधित व तृषित मनुष्यास थोडेंसें खायाला मिळून पंचपात्रीभरच पाणी प्यायाला मिळालें असतां तेवढ्यानें त्याला जसें थोडें समाधान वाटून आवांका येतो, त्याप्रमाणें या उभयतांना, आज आपली नजरभेट झाली हाच शुभशकुन वाटून, पुढें सुदैवानें आपल्या वियोगाचा संयोगही होऊं शकेल, अशी आशा उत्पन्न झाली.

प्रेम हें अंधळें आहे असें जें ह्मणतात तें अक्षरशः खरें आहे. मनुष्य एकदा प्रेमपाशांत बद्ध झाला, ह्मणजे पुढील परिणामाकडे त्याची नजर बिलकुल पोहोंचत नाहीं. बहरामानें असा क्रम ठेविला कीं, वेष पालटून व बहुतेक सर्व अंग आच्छादून भरदोनप्रहरीं जें निघावें, तें वजिराच्या वाड्याच्या पिछाडीस पूर्वी सांगितलेल्या ठिकाणीं येऊन त्या झरोक्याकडे एकसारखी टक लावून उभें रहावें. जोहरा हिलाही रात्रंदिवस तोच नाद! तेव्हां तीही तशीच नित्य झरोक्याशीं येऊन बहरामाची वाट पहात राहूं लागली, व अशा प्रकारें त्या उभयतांना रोजच्या रोज नजरभेटीचा लाभ होऊं लागला. तशांतूनही तें शहर मोठें संपन्न असून सर्व लोक ऐषआरामामध्यें निमग्न असल्यामुळें, दुपारीं भोजन झाल्यावर तिसऱ्या प्रहरापर्यंत क्वचितच कोणी बाहेर पडत

असत. सबब त्या उभयतां मुलांच्या या चोरभेटीचा बभ्रा न होतां कांहीं दिवस त्यांचा तो क्रम सुरळीत चालू राहिला.

पण असें किती दिवस चालणार? एके दिवशीं ती गोष्ट वजिराचे नजरेस आली. त्याबरोबर राजवाड्यांत जाऊन त्यानें त्याबद्दल बादशहास वर्दी दिली. त्यावरून बादशहा मनांत फार खिन्न झाला. या गोष्टीकडे कानाडोळा करणें, किंवा तिचा बंदोबस्त तडकाफडकी करणें, हीं दोन्ही हानिकारक आहेत, असें समजून त्यानें एक चमत्कारिक मसलत योजिली. त्यानें मुदपाकाकडील कामगारास असा हुकूम केला कीं, उद्यां शहाजाद्यापुढें भोजनसमयीं पक्वान्नांनीं भरलेलीं तीन ताटें ठेवण्याची व्यवस्था करावी. त्यांत दोन राजशाई थाटाचीं असून एक त्यांहून अंमळ कमी दर्ज्याचें असावें. तसेंच त्यानें मुख्य हुजऱ्यास आज्ञा केली कीं, शहाजाद्यापुढें भोजनानंतर विड्याचीं तीन तबकें ठेवण्यांत यावीं; त्यांपैकीं दोन उंची मगदुराचीं असून तिसरें प्रवासी थाटाचें असावें. याप्रमाणें दुसरे दिवशीं सर्व प्रकार घडून येतांच, राजपुत्र मनांत समजून गेला कीं, आम्हीं आतां देशपार होण्याचा पंथ स्वीकारावा अशी वडिलांची इच्छा दिसते. आजपर्यंत दोन ताटें व दोन तबकें असून त्यांपैकीं दुसऱ्या जोडीचा अलीकडे उपयोग होत नसल्यामुळें आम्ही अगोदरच खेद करीत राहिलों होतों; आणि आतां त्यांत आणखी तिसरा मुशाफरी बाण्याचा मासला आपलेपुढें आला. तेव्हां येथें न रहातां आपण परागंदा व्हावें असा यांतला गर्भित

अर्थ खास आहे असें त्याचे मनानें घेतलें, व त्यावरून त्याला परमावधीचें दुःख झालें !

मग राजपुत्रानें, आपणावर लहानपणापासून आईप्रमाणें ममता करणाऱ्या आपल्या दाईकडे जाऊन तिचे गळ्यास घट्ट मिठी घातली; आणि स्फुंदत स्फुंदत, झालेला सर्व प्रकार तिला सांगून ह्मणाला, 'आतां यापुढें माझा व जोहरा हिचा कदाचित् जन्माचा वियोग होईल अशी मला भीति पडल्यामुळें मी असा हैवान होऊन गेलों आहें.' तिनें त्याचे डोळे पुसून व तोंड कुरवाळून डोकें आपल्या मांडीवर ठेविलें, आणि जरा थोपटून त्याला स्वस्थ केलें. मग त्याची खातरजमा करून ती ह्मणाली, 'या बाबतींत तूं जें सांगशील तें मी करण्यास तयार आहें !' तो मोठ्या उत्सुकतेनें ह्मणतो, 'असें जर आहे, तर आई, तूं आतांचे आतां वजिराचे घरीं जाऊन जोहरा हिची एकांतीं भेट घे, आणि तिला सर्व हकीकत कळवून ती काय ह्मणते तें मला येऊन सांग.'

त्याबरोबर दाई उठून वजिराचे घरीं आली. तेथल्या माणसांच्या व तिच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर जोहरा ही तिला नजरबागेंत घेऊन गेली. बराच वेळ गेल्यावर, आसपास कोणी नाहीं असें पाहून तिनें जोहरा हीस शहाजाद्याकडील सर्व वृत्तांत कळविला; आणि शेवटीं त्याच्याच तोंडचे शब्द तिला सांगितले. ते हे कीं, 'वडिलांच्या मनाचा झोंक ओळखून मी तर येथून निघून जाणार. परंतु तुझ्या वियोगानें मी झुरत जाऊन थोडक्याच दिवसांत प्राणास मुकेन, असें माझी मनदेवता मला सांगत

आहे!' यावर जोहरा हिनें मोठ्या दिलदारपणानें, कळवळ्यानें व आवेशानें जबाब दिला कीं, 'असें आहे काय? तर जा, शहाजाद्याची खातरजमा करून त्यास सांग कीं, आज मध्यरात्रीं वाटेल तें करून उत्तरेकडील चोरदरवाज्यानें बाहेर पडून मी तुझी वाट पहात राहतें; मग पुढें नशिबीं असेल तसें होईल! कदाचित् गांठ नच पडली तर हाच तुला माझा शेवटचा निरोप—मी हें जग सोडून गेलें—असें समज!'

जोहरा हिच्या तोंडचे शेवटचे शब्द ऐकतांच दाई तेथून निघून शहाजाद्याकडे आली, आणि झालेलें सर्व वर्तमान तिनें त्यास कळविलें. त्या वेळीं, आज इतके दिवस तळहातावरच्या फोडाप्रमाणें जतन केलेल्या या बाळांची पुढें कशी गत होणार हा विचार मनांत येऊन त्या दाईचें काळीज दुभंग झालें! तिच्या तोंडांतून पुढें शब्दही निघेना. तेव्हां शेवटीं, 'आतां तुमचा पाठिराखा ईश्वर आहे, तो तुमचा सांभाळ करून कल्याण करील,' इतकें बोलून ती तेथून निघून गेली.

असो, त्याच वेळीं शहाजाद्यानें प्रवासास जाण्याचा आपला निश्चय बापास कळविला. बादशहानें त्यास आपल्या योग्यतेप्रमाणें लवाजमा व वाटेल तितकें द्रव्य घेऊन जाण्याविषयीं परवानगी दिली. परंतु त्यानें तसें न करितां फक्त जामदारखान्यांतून कांहीं नक्त पैसा व बहुमोल जवाहीर तेवढें घेतलें; व जोडा, घोडा, भाला, बंदूक, ढाल, तरवार, कट्यार, तीरकमठा, बाणांचा भाता, आणि पोषाख वगैरे हीं

दुहेरी घेतलीं. इतकें होत आहे तों दोन प्रहर रात्र झाली. मग, उद्यां सकाळीं आपण लवाजम्यासह जाणार असें वाह्यात्कारीं दाखवून, तो किंचित् निद्रिस्त झाला. नंतर थोड्या वेळानें, जिकडे तिकडे सामसूम होतांच तें दुहेरी सामान घेऊन कोणास न कळत वजिराचे हवेलीपाशीं संकेतस्थळीं तो आला. जोहराही त्याची वाट पाहातच राहिली असून तिनें अगोदरच समयास योग्य अशी आपली सर्व तयारी केलेली होती. तिनें मर्दानी पोषाख चढविला असून ती हत्यार-बंदही असल्यामुळें, एखादा तरुण हिम्मतदार वीर रणांगणीं जाण्यासच सिद्ध झाला आहे कीं काय अशी दिसत होती ! शहाजाद्यानें तिला पटकन् दुसऱ्या घोड्यावर बसवून घेतलें, व तावडतोब तीं दोघें दौड करीत निघालीं. थोड्या वेळानें बहराम यानें बरोबर घेतलेल्या दुहेरी हत्यारांपैकीं जीं जोहरा हिजपाशीं नव्हतीं तीं त्यानें तिला देऊन आपल्याप्रमाणेंच अगदीं सज्ज केलें. नंतर फिरून त्यांनीं घोड्यांस टांच मारिली, व मध्यें क्षणभरही न थांबतां तीं उजाडायाला वीस पंचवीस कोस मजल मारून गेलीं !

भाग नववा.

—:*:—

संकटांस आरंभ—फाटाफूट.

सिंहाचाही बाल तोही चपेटा।
मारी त्याला जो करी मत्त मोठा॥
तेजस्वी जे वृत्ति ऐशी तयांची।
तेथें कांहीं चाड नाहीं वयाची!॥

वामनपंडित.

प्रातःकाळ झाला आहे; मंद सुगंध वायूची झुळूक चालली आहे; सभोंवतीं वनश्रीची शोभा दृष्टीस आनंद देत आहे; कोकिलादि पक्ष्यांचे मधुर स्वर कानीं पडत आहेत; अशा आल्हादकारक समयीं तीं उभयतां मुलें, आतांपर्यंत दौड करितांना थकून गेल्यामुळें, आपल्या घोड्यांचे लगाम जरा सैल सोडून चाललीं. सारी रात्र त्यांना ताटकळ पडली असून त्यांच्या मनांतील भीतिही थोडी गेल्यामुळें, त्या गार हवेंत त्यांच्या डोळ्यांवर झोंप येऊं लागली. त्यांतूनही शहाजाद्याचे तर वारंवार झोकांडे जाऊं लागले. तेव्हां जोहरा ह्मणते, 'हें पहा, आतां आपल्यामागें सध्या तरी कोणाचा ससेमेरा नाहीं; आणि तुह्मांला रात्रींचे जागरणामुळें झोंपेशिवाय दुसरें कांहींच सुचत नाहींसें दिसतें. माझीही बहुतेक तशीच स्थिति झाली आहे. याकरितां आपण थोडी विश्रांति घेऊं या. त्याखेरीज पुढें मजल कंठतां येणें अशक्य आहे.' राजपुत्र ह्मणतो, 'तूं अगदीं खरें बोललीस! वास्तविक पुसशील तर मला एकदा केव्हां अंग धरणीला

टाकीन असें झालें आहे. पण तुझा रुकार पडेल की नाही या संशयांत मी होतों. आतां तूंच गोष्ट काढलीस, तर मी तुझ्या ह्मणण्याप्रमाणें करण्यास एका पायावर तयार आहें!' इतकें झाल्यावर, जवळच एक झाडी होती तींत त्यांनीं आपले घोडे घातले, आणि त्या निवांत स्थळीं घोड्यांना झाडांशीं बांधून मऊ गवतावर तीं दोघें आपापल्या घोड्या-शेजारीं गाशा टाकून स्वस्थ पडून राहिलीं.

इकडे सकाळच्या प्रहरीं वजिराचे वाड्यांत जोहरा नाहीं-शी झाल्याबद्दल पुकारा होऊन मोठी गडबड उडाली. वजिरास याबद्दल अत्यंत दुःख होऊन संतापही झाला; आणि तो तसाच राजवाड्यांत जाऊन बादशहास हें वर्त-मान कळविणार, तों बहरामही निघून गेल्याची हूल त्याच्या कानीं आली! मग तो तसाच बादशहाचे हुजूर गेला असतां खासास्वारी, बहराम खरोखरच अपरात्रीचा निघून गेल्यामुळें अत्यंत चिंताग्रस्त होऊन राहिल्याचें त्याला दिसलें. मग उभयतांनीं अंमळ विचार केल्यावर त्यांचा असा अंदाज झाला कीं, बहराम व जोहरा यांनीं संगनमत करून एकच वाट धरली असावी. या घडलेल्या प्रकाराबद्दल बाद-शहास फार पश्चात्ताप झाला. तो ह्मणाला, 'आपण करा-याला गेलों काय, आणि त्याचा परिणाम झाला काय! परंतु कर्माप्रमाणें बुद्धि होणार, व होणारापुढें इलाज नाहीं, हेंच खरें! असो. आतां पुढील उद्योगास विलंब लावून उपयोग नाहीं.' मग वजिरास ह्मणतो, 'हं, उठा, बक्षीला बोलावा; आणि दहा हजार निवडक हत्यारबंद घोडेस्वार दशदिशा

पिटाळा. प्रत्येक टोळीला सक्त हुकूम करा कीं, दोन प्रहरांचे आंत त्या दोघां आपढंगी पोरांचा तलास लावून त्यांस हुजूर घेऊन या. मात्र कडक हुकूम झाला म्हणून त्या आवेशांत त्यांच्या जिवाला कोणत्याहीं प्रकारची इजा पोहोंचेल असें मात्र करूं नका!'

यांप्रमाणें बादशहाचा हुकूम होतांच अर्ध्या घटकेच्या आंत दहा हजार जय्यत फौजेच्या दहा टोळ्या करून बक्षीनें त्या चोहोंकडे फेंकल्या. त्यांपैकीं एकीवर तो स्वतः मुख्य झाला, व बाकीच्यांवर त्यानें मोठ्या हुशार, अनुभवी व राजनिष्ठ अशा सरदारांची योजना केली. या सैन्याच्या टोळ्या ज्या टाकोटाक निघाल्या त्या सुमारें प्रहर दीड प्रहरांत वीस पंचवीस कोसांची मजल ठोकून गेल्या. कर्मधर्मसंयोगानें असें झालें कीं, बहराम व जोहरा हीं ज्या झाडींत विश्रांति घेत राहिलीं होतीं, तिच्या नजीकच एक टोळी येऊन थडकली. तिजपैकीं कांहीं लोकांनीं, ' या झाडींत शिरून पाहूं या बरें ? ' असें आपआपसांत ह्मटलें. दुसरे कांहीं ह्मणाले, ' येथें कशाचा त्यांचा तलास लागतो आहे ? ' इतक्यांत घोड्यांचें खिंखाळणें त्यांना ऐकूं आलें. त्यावरून प्रथम बोललेल्या लोकांचा कयास कदाचित् खरा ठरेल असें समजून ती फौज झाडींत शिरली.

बहराम यास गाढ निद्रा लागली होती. परंतु जोहरा हीस फक्त दोन घटकाच काय ती स्वस्थ झोंप लागून पुढें बहुतेक ती जांभया देत व डोळे चोळीतच पडली होती.

आपण निघून आलों तेव्हां मागें काय झालें असेल, व आपणांला पकडण्यास इतक्यांत कोणी येतील कीं काय, हे विचार एकसारखे तिच्या मनांत घोळत होते. इतक्यांत तिला घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं आला. त्याबरोबर ती एकदम खडबडून उठली, आणि ‘ मनीं असे तेंच स्वप्नीं दिसे’ असें होऊं पहात आहे कीं काय ! असें ह्मणून तिनें बहरामास लागलीच जागा केला. मग हीं दोघें लगबगीनें उठून घोड्यांवर स्वार होत आहेत तों त्यांच्या नजीक ती फौज येऊन भिडली, व तिनें त्यांस वेरा घातला. मग काय विचारतां ? लागलाच तरवारींच्या खलखाटांत बंदुकींची सरबत्ती सुरू झाली ! बादशहाचे हुकुमाप्रमाणें त्या लोकांनीं हे बायबारच केले; पण त्यांचा धूमधडाका ऐकून तशा भयंकर कचाटयांत सांपडलेल्या मोठ्या वीर पुरुषांचीही गाळण झाल्यावांचून राहतीना ! पण या आणीबाणीच्या प्रसंगीं या सिंहाच्या बच्चांनीं बिलकुल न कचरतां आपले तीरकमठे सज्ज करून त्या गराडा घातलेल्या लोकांवर अशी कांहीं बाणांची जबरदस्त वृष्टि केली कीं, त्यांचा तो पराक्रम पाहून, येवढ्या मोठ्या कसलेल्या त्या शिपायांनीं क्षणभर तोंडांत बोटें घातलीं ! पण थोडक्याच वेळानें त्यांचे भाते रिते होऊन, त्या सारख्या चाललेल्या शरधारा बंद पडल्या. तेव्हां ते दोघे बाळवीर–जोहरा हीसही या प्रसंगीं आम्ही वीरच ह्मणतों– किंचित् स्तब्ध राहिले, व आतां कांहीं हिकमतीनें या फौजेची फळी फोडून गेल्यावांचून गत्यंतर नाहीं असें समजून

त्यांनीं ती खटपट चालविली. प्रथम त्यांनीं गराडा घातलेल्या लोकांत घुसून एकाच बाजूनें निघून जातोंसें दाखविलें; आणि नंतर एका क्षणांत दोघांनींही आपआपला मोहरा फिरवून विरुद्ध दिशांनीं चाल केली. त्यांपैकीं जोहरा ही जी गेली ती अजीबात पार पडून गेली. बहरामाला मात्र चार पांचशे कदमांचे आंतच त्या लोकांनीं गांठण्याचा रंग आणला. तेव्हां तो आपल्या घोड्यास टांच मारून वायु-वेगानें चालला असतां, लवकरच त्यांच्या आटोक्याबाहेर पडेल असा सुमार दिसत होता. इतक्यांत त्याला वाटेंत एक कुवा लागला. त्यावरून एकदम उडी मारून जाण्याचा त्यानें प्रयत्न केला, तो तर सिद्धीस गेलाच. पण पली-कडील कांठावर घोड्याचा मागील पाय निसरून तो वरील स्वारासह त्या कुव्यांत कोसळला!

पाठलाग करणारी मंडळी तत्काळ कुव्यापाशीं येऊन भिडली. त्यांपैकीं दहा पंधरा जवानांनीं धडाधड आंत उड्या टाकल्या, व आधीं बहरामास काढण्याचे उद्योगास ते लागले. पण तो जो एकदा खालीं गेला तो फिरून मुळींच दृष्टीस पडला नाहीं! त्यावरून आणखी दहा बारा जवान आंत उतरले, आणि तो सर्व कुवा त्यांनीं तळापर्यंत शो-धिला. पण बहरामाचा ठिकाण ह्मणून त्यांना लागला नाहीं. शेवटीं निराश होऊन त्यांनीं त्याचा घोडा तेवढा बाहेर काढला, आणि ते खिन्न होत्साते दिल्लीस परत आले.

ही टोळी प्रहररात्रीचे सुमारास राजधानीस येऊन दाखल झाली. तिजवरील सरदार अगदीं म्लानमुख होऊन

जाऊन, आतां कोणत्या तोंडानें हा वृत्तांत बादशहास सांगावा असें मनांत ह्मणूं लागला. इतक्यांत, सकाळीं गेलेल्या फौजेपैकीं कोणी परत आल्यास ताबडतोब हुजूर घेऊन येण्याविषयीं बादशहाचा वजिरास हुकूम झाला असल्यामुळें, त्यानें त्या पैरवीवर चोहों बाजूंस जे स्वार ठेविले होते त्यांपैकीं एकाच्या नजरेस ही वरील मंडळी पडली. तेव्हां त्यानें विलंब न लावतां तिजवरील मुख्यास राजवाड्यांत नेलें. त्याच्या तोंडून तो घडलेला सर्व वृत्तांत ऐकतांच बादशहा व वजीर यांची जी कांय स्थिति झाली तिची कल्पनाच केली पाहिजे! तिचें शब्दांनीं वर्णन करणें अशक्य आहे! दोन्ही वाड्यांतील माणसांनीं व विशेषतः स्त्रीसमुदायानें जो आकांत मांडला, त्याच्या योगानें सभोंवतालचे कित्येक महले दणाणून गेले; आणि ही बातमी वाऱ्यासारखी चोहोंकडे पसरून साऱ्या शहरभर एकच हाहाकार उडून गेला!

भाग दहावा.

—:※:—

बहराम व सौंदर्यवल्ली यांची गांठ.

पद्माचा जो तंतु तो वारणाला
वारायाला पैं म्हणे सिद्ध झाला!
वामनपंडित.

बहराम घोड्यासुद्धां कुव्यांत पडल्याबरोबर त्याचे पाय रिकिबींतून निसटून व हातचा लगामही सुटून तो एकदम तळाशीं गेला, व लागलाच गटांगळी खाऊन पाण्याच्या

प्रृष्ठभागीं येतो तों कुव्याच्या एका कडेस खोलसें कांहीं त्याला लागलें. तेव्हां पाठलाग करणाऱ्यांच्या भीतीनें तो त्यांत शिरला असतां एक दार त्याच्या हातास लागलें. त्या दाराला त्याच्या हाताचा स्पर्श होतांच तें फटकन् उघडलें, व तो तसाच त्यांतून जाणाऱ्या पाण्याच्या प्रवाहांतून चारपांचशें कदम निघून गेला. तों त्याला एक विस्तीर्ण मैदान लागलें. तेथें थोडा वेळ बसून त्यानें विश्रांति घेतली, आणि आपले कपडे वगैरे वाळवून फिरून पोषाख चढवून तो पुढें चालला. तो तें मैदान ओलांडून गेल्यावर पाहतो तों पुढें झाडी असून तींत वस्तीचें कांहीं चिन्ह त्यास दिसलें. त्याबरोबर तो झाडींत शिरला. तों त्याला एक मोठा उंच चतुष्कोणाकृति कोट आढळला. त्याला भला मोठा दरवाजा असून उभ्यानें आंत जाण्यासारखी दिंडी होती. तींतून तो आंत शिरला, तों एक मोठा अलौकिक व रमणीय बाग त्याच्या दृष्टीस पडला. त्या बागांतील फुलझाडांचे ताटवे सर्व फुलून गेलेले असल्यामुळें अप्रतिम शोभा देत असून त्या फुलांच्या सुगंधानें सारा बाग दरवळून गेलेला होता. या झाडांपैकीं कित्येकांत विशेष चमत्कार हा होता कीं, एकाच झाडास निरनिराळ्या रंगांचीं पानें असलेल्या फांद्या असून त्यांस निरनिराळ्या रंगांचीं फुलें होतीं इतकेंच नव्हे, तर त्या फुलांच्या पाकळ्याही निरनिराळ्या रंगांच्या होत्या! तसेंच तेथील सर्व फलवृक्षही फलांनीं भरून गेलेले असून त्यांतही आणखी असा चमत्कार होता कीं, एकाच वृक्षाच्या निरनिराळ्या शाखांना निरनिराळ्या रंगांचीं फळें आलेलीं होतीं!

असो; या फळांच्या आणि फुलांच्या सुवासाच्या मिश्रणानें, आणि त्यांतही आणखी मंद वायु वहात असल्यामुळें एकंदर हवेचा जो मिलाफ बनला होता, त्याची खरी खरी खुमाशी लेखणीनें उतरतां येणें शक्यच नाहीं! तशांत त्या वेळचे सूर्याचे कोमल किरण त्या बागावर पडून त्यांतील फळें व फुलें—कित्येक सोन्यारुप्याचीं व बाकीचीं नानारंगांच्या रत्नांचींच जणू काय आहेत अशी भासत होतीं! शिवाय त्या बागांतील सुंदर पाटांचे चहूंकडे खेळत असलेलें पाणी, आणि जागोजाग उडत असलेलीं कारंजीं, ह्यांच्या योगानें त्या एकंदर स्थळाच्या रमणीयतेंत आणखी भर पडून तें शांतिसौख्याचें केवळ आगरच बनून राहिलें होतें! तेव्हां स्वर्गीचें नंदनवन ह्मणतात त्यांत तर आपण येऊन पडलों नाहींना, असें बहरामास वाटून, तो सारा दिवस थकलेला होता तरी ह्या अपूर्व देखाव्यानें त्याचे श्रम व चिंता हीं क्षणभर हरून गेलीं यांत काय नवल आहे?

त्या बागाची शोभा पहात तो चालला असतां, त्याला पराकाष्टेची भूक लागलेली असल्यामुळें तेथलीं तीं अमृता-सारखीं गोड फळें खाऊन त्यानें आपल्या भुकेचें थोडें शांतवन केलें. इतक्यांत समोरून एक स्त्री येतांना त्याच्या दृष्टीस पडली. तिच्या अंगीं तारुण्य अगदीं रसरसलेलें असून तिची कांति केतकीच्या पानाप्रमाणें होती; आणि ती इतकी सुरेख होती कीं, प्रत्यक्ष देवलोकची अप्सराच ही ह्या लोकीं कांहीं कारणानें आली आहे कीं काय असें

बहरामास वाटलें! तिनें जे नानाप्रकारचे बहुमोल अलंकार अंगावर घातले होते, त्यांच्या योगानें तिच्या सौंदर्यास विशेष शोभा आली होती असें ह्मणण्यापेक्षां, तिच्या सौंदर्यानें ते अलंकारच विशेष शोभायमान दिसत होते असें म्हटलें पाहिजे! असो; तिला पाहून बहराम क्षणभर स्तब्ध उभा राहिला. तेव्हां ती किंचित् हास्य करून त्यास म्हणते, 'महाराज, आपण साशंक होण्याचें कारण नाहीं. हा बाग आपलाच आहे, आणि मीही आपलीच आहें!'

हें त्या स्त्रीचें भाषण ऐकून बहराम अगदीं गोंधळून गेला! काय करावें आणि काय बोलावें हें त्यास कांहींच सुचेना! परंतु तूर्त आपल्या असलेल्या स्थितींत आपण थोडें-बहुत हिच्या नादानेंच वागलें पाहिजे असें जाणून तो तिला ह्मणतो, 'मी परदेशी मुशाफर असून माझें नांव बहराम असें आहे, व मी कांहीं विशेष प्रसंगामुळें येथें येऊन पडलों आहें. आज आपल्या दर्शनाचा आणि कृपेचा लाभ झाल्यानें मी आपल्याला धन्य समजतों!' ती ह्मणते, 'आपण इतकें बोलतां ही आपली थोरवी आहे. पण खरें पुसाल तर मीच आपल्या दर्शनानें कृतकृत्य झालें आहें! मी ह्या बागाची व नजीकचे मंदिराची मालकीण असून मी अगदीं स्वतंत्र आहें. माझें नांव सौंदर्यवल्ली. आपण मजबरोबर येऊन माझ्या महालांत आपली पायधूळ झाडाल तर मजवर आपले अनंत उपकार होतील!'

असें ह्मणून बहरामाच्या तोंडून काय उत्तर निघतें याची वाट न पाहतां त्या स्त्रीनें आपला तो गोंडस आणि मृदु हात

त्याचे हातांत घालून त्याला आपले मंदिराकडे ती घेऊन चालली. तें मंदिर फारच सुंदर होतें. त्याच्या भिंती, दारें वगैरे ही सर्व, शोभा व सोई यांच्या बेतानें स्फटिक, हस्तिदंत, सोनें व रुपें यांचीं केलेलीं होतीं, व त्यांवर नानाप्रकारच्या व नाना रंगांच्या रत्नांच्या जडावाचें अप्रतिम काम केलेलें होतें; आणि त्या जडावांत यक्षांच्या राजाच्या पराक्रमाच्या वर्णनाचीं चित्रें जिकडे तिकडे दाखविलेलीं होतीं. या मंदिराजवळ हीं दोघें जातात तों अंधार गुडुप पडून गेला. तेव्हां त्या स्त्रीनें दरवाज्याशीं जाऊन टाळी वाजविली. त्याबरोबर खाडकन् तो दरवाजा उघडला, व एका क्षणांत त्या सर्व मंदिरभर दिव्यांचा लखलखाट होऊन गेला! त्या स्त्रीनें फिरून टाळी वाजवितांच दहा बारा परम रूपवती तरुण स्त्रिया आंतून बाहेर येऊन, काय आज्ञा आहे, ह्मणून तिला नम्रतापूर्वक विचारूं लागल्या. तिनें त्यांस तोंडानें कांहींएक न सांगतां नुसता नेत्रसंकेत केला. त्यासरशा त्या मोठ्या लगबगीनें मुख्य महालांत गेल्या, व दहा पांच पळांतच परत येऊन, सर्व तयारी आहे असें त्यांनीं तिला कळविलें.

हें ऐकून सौंदर्यवल्ली बहरामास त्या मुख्य महालांत घेऊन गेली. त्या महालाची शोभा काय वर्णावी! त्याच्या भिंती वगैरेवरील जडावाचें काम इतकें ठासून केलेलें होतें कीं, तो सर्व रत्नमयच भासत होता! आणि या जडावांत जिकडे तिकडे मदन व रति यांच्या क्रीडाकौतुकाचीं व विलासाचीं मनोहर चित्रें दाखविलेलीं होतीं; आणि अनेक

प्रकारच्या चित्रविचित्र रंगांच्या मोत्यांची झालर असलेल्या छतानें तर तो विशेषच खुललेला होता. त्यांत बहुमोल रत्न-जडित प्रशस्त असा पलंग ठेविलेला असून त्यावर उत्तम प्रकारची शय्या घातलेली होती. त्या महालांत गेल्यावर तर बहराम अगदींच भांबावून गेला! परंतु त्या स्त्रीनें मोठ्या चातुर्यानें, अत्यंत सौम्यतेनें व नम्रतेनें त्याशीं भाषण करून त्याची अशी खातरजमा केली कीं, आपल्याला येथें झाला तर फायदाच होईल, अपकार कांहीं होणार नाहीं. तिनें आपल्या दासींकडून त्याच्या अंगास उत्तम प्रकारचीं सुगंधी तेलें व उटणीं लावून उष्णोदकानें न्हाऊ घातलें, आणि बहुमोल वस्त्रें परिधान करण्यास देऊन लागलीच भोजनाची तयारी करविली. त्याला सारा दिवस उपास पडल्यामुळें, आणि त्यांतून तेथलीं तीं नानाविध पक्वान्नें अत्यंत रुचिकर असल्यामुळें, त्याचें भोजन यथेच्छ व यथास्थित झालें.

साऱ्या दिवसाचा उपास आणि थकवा, तेव्हां त्यावर वर सांगितलेल्या उपचारांसह यथेच्छ भोजन झाल्याबरोबर बहरामास साहजिकच झोंपेची गुंगी आली. तें पाहून सौंदर्य-वल्लीनें त्यास लागलीच त्रयोदशगुणी विडा खावयास देऊन, वर वर्णन केलेल्या त्या पलंगावरील सुखशय्येवर निजावयास सांगितलें. ती मोठी चतुर असल्यामुळें तिनें मनांत विचार केला कीं, याजपासून आपला इष्ट हेतु साध्य करून घ्यावयाचा तो सावकाश याच्या तब्यतीप्रमाणेंच घेतल्यास आपल्या सुखांत विशेष भर पडणार आहे. आतां हा आपल्या हातीं आला आहे—जातो कोठें?

बहरामास चांगली सडकून झोंप लागली, व तो पहांट-पर्यंत जागा झाला नाहीं. सौंदर्यवल्लीनेंही, मागें सांगितल्या-प्रमाणें, त्याच्या झोंपेचा मोड न करितां आपल्या हितगुजा-ची गोष्ट त्याजपाशीं काढावयाची ती तो जागा होई तोंपर्यंत काढण्याचें तहकूब ठेविलें होतें. मग तो जागा झाल्यावर ती त्याजपाशीं जाऊन बोलणार, इतक्यांत आदले दिवशीं घड-लेल्या सर्व गोष्टी, व त्यांतही विशेषतः जोहरा हिची व आपली फाटाफूट झाली तो प्रसंग मूर्तिमंत त्याच्या डोळ्यां-पुढें उभा राहून त्यानें 'हाय जोहरा!' 'हाय जोहरा!' असें म्हणून मोठा सुस्कारा टाकिला. त्यावरून सौंदर्यवल्ली पराकाष्ठेची चकित व कांहीं अंशीं निराश झाली. ती मनांत म्हणते, 'याची प्रियकरीण जोहरा हिच्या याला एवढ्या लहरा येत आहेत, तर तिचा चेहरा काय माझ्याहून सुरेख असेल?' मग उघडपणें त्यास ह्मणते, 'प्रियकरा, मीं आतांपर्यंत तुमच्याशीं जें परमादराचें व सामोपचाराचें वर्तन केलें, त्यावरून माझ्या मनांतील हेतु ओळखून त्यास तुम्ही राजी व्हाल अशी मी मनांत फार आशा बाळगून होतें. पण तुमचा हा प्रकार पाहून माझें अंतःकरण फार कष्टी होत आहे!'

सौंदर्यवल्ली पुढें बोलते, 'मी आतां एकच गोष्ट तुम्हांस सांगतें; ती ही कीं, तुह्मी येथें राहून माझ्या हेतूस अनुसराल तरच तुमची ठीक गत आहे. मी कोण आहें हें तुमच्याशीं चोरीत नाहीं. मी यक्षांच्या राजाची एकुलती एक कन्या असून, ह्या बाकीच्या मुली माझ्या दासी आहेत.

माझ्या मनांत मनुष्ययोनींतील पति करावा असें फार असल्यामुळें, माझ्या बापानें मजकरितां हें स्वर्गभुवन नांवाचें सुंदर स्थळ निर्माण करून येथें मला ठेवून दिलें, व मला हवा तसा पति पसंत करून घेण्यास परवानगी दिली आहे. आजपर्यंत तुह्मां मानवांपैकीं पुष्कळ पुरुष मला भेटले, पण त्यांजवर माझें प्रेम बसलें नाहीं. तुह्मांस पाहतांच मात्र माझी तुमच्यावर पराकाष्ठेची आसक्ति बसली. तर आतां थोडक्यांत इतकेंच सांगतें कीं, तुह्मी बऱ्या बोलानें ऐकाल तर ठीक आहे, नाहीं तर पुढील परिणाम मोठा दारुण होणार आहे हें खचीत समजा! आह्मां यक्षिणींची शक्ति अचाट असल्यामुळें आम्हांस वाटेल तसें कोणाचेंही बरेंवाईट करतां येतें!'

यात्रमाणें सौंदर्यवल्ली बहरामाशीं बोलत असतां रात्र संपून जाऊन दिवस देखील उगवला. तेव्हां याला आतां येथून उठवून जरा बागांत इकडे तिकडे हिंडवावा, म्हणजे हवा वगैरे लागून याचें डोकें मठ्ठ झालें आहे तें कदाचित् ताळ्यावर येईल, असें वाटून ती त्यास हातीं धरून बागांत घेऊन आली. फिरतां फिरतां बागाचे कडेनें वहात असलेल्या नदीच्या डोहापाशीं तीं दोघें येऊन पोहोंचलीं. इतकें झालें तरी बहराम तिजशीं एक शब्दही बोलला नाहीं! त्याला आतां जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं जोहराच काय ती दिसत होती! तेव्हां त्या डोहांतील स्वच्छ पाण्यांत तो पाहूं लागला असतां तेथें खरोखरच जोहरा उभी आहे असें त्यास भासलें, आणि तिला जाऊन भेटण्याकरितांच जणू काय त्यानें त्या डोहांत एकदम उडी घातली!

भाग अकरावा.

—:*:—

बहरामाचीं पुढील सुखदुःखें.

सुखदुःखें हीं चक्रन्यायें येती हें अवलोकीं !

कृष्णशास्त्री चिपळूणकर.

बहराम डोहांत पडतांच त्यास एका भल्या मोठ्या माशानें आपल्या पोटांत घेतलें, आणि तो त्या नदीच्या प्रवाहांतून जो निघाला तो अफाट दर्यांत जाऊन पडला! त्या ठिकाणीं कित्येक कोळी मासमार होड्यांत बसून मासे धरीत चालले असतां, हा वहात आलेला जंगी मासा एकाचे हातीं लागून त्यानें तो पटकन् होडीवर घेतला. एवढा मोठा मासा हातीं लागल्यामुळें, आज आतां आपल्याला आणखी दग-दग करीत बसण्याचें कारण नाहीं असें म्हणून कोळ्यानें होडी किनाऱ्याकडे नेली. नंतर तो कोळी व त्याचे मदत-नीस यांनीं तो मासा किनाऱ्यावर नेला असतां त्याचा प्राण जाऊन त्याचें पोट ताडकन् फाटलें. तों आंतून कांहीं खडबड होत असल्याचें त्यांच्या नजरेस आल्यावरून, हें काय असावें म्हणून ते पाहतात तों आंत कोणी माणूस आहे व तो सुखरूप आहे असें त्यांस आढळल्यावरून ते पराकाष्टेचे आश्चर्यचकित झाले!

हा या माशाच्या पोटांतून निघालेला माणूस बहराम होता हें वाचकांस सांगावयास नकोच. त्या राजबिंड्यास पाहून होडीचे मालकास मोठा आनंद झाला, व याला एखाद्या श्रीमानास गुलाम ह्मणून विकलें असतां आपलें

जन्माचें दारिद्य जाईल असें त्याला वाटलें. पण फिरून त्याच्या मनांत असा विचार आला कीं, आपल्या सुलतान साहेबांस पुत्र नाहीं, तर त्यांना आपण हा नजर केला असतां ती गोष्ट आपल्याला विशेष हितकर होणार आहे. मग विलंब न लावतां तो बहरामास सुलतानाकडे घेऊन गेला, आणि त्याचे चरणांवर त्यास घालून, ' खुदावंतांनीं गरिबाच्या ह्या नजराण्याचा स्वीकार करावा ' अशी त्यानें हात जोडून त्यास प्रार्थना केली.

जेथली ही गोष्ट चालली आहे तो मिसर नामक देश असून, त्याची राजधानी जें केरो शहर तेथील सुलतानास वर सांगितल्याप्रमाणें शहाजादा बहराम हा प्राप्त झाला. असो. त्या सुलतानानें बहरामास पाहतांच हा आपल्याला केवळ अलभ्य लाभ झाला असें समजून, त्या कोळ्यास त्यानें वंशपरंपरा इनाम करून दिलें. त्यानें बहरामास लागलीच आपले स्वतःचे पुत्राचे ठिकाणीं मानून सर्व प्रकारें त्याची तशी बरदास्त राहील अशी व्यवस्था केली. बहरामावर त्याचें जें एकदा प्रेम बसलें, तें वृद्धिंगत होतां होतां त्याला अगदीं सीमाच नाहींशी झाली ! त्याच्यावांचून त्याला कांहींएक सुचेनासें होऊन, दरबारचें कामकाज देखील तो बिलकुल पाहीनासा झाला ! त्या सुलतानाचा वजीर मोठा दूरदृष्टि होता. या मुलावर सुलतान प्रेम करितो यांत कांहीं वावगें नाहीं, पण कोणत्याही गोष्टीस मर्यादा पाहिजे, ती सुटली असतां परिणामीं दुःख झाल्यावांचून रहावयाचें नाहीं,

असें मनांत आणून अत्यंत नम्रतापूर्वक त्यानें सुलतानाची कानउघाडणी केली. वजीर सुलतानास म्हणतो, 'राजाधिराज, आपणांस पुत्र नसल्यामुळें आपल्याला अकल्पित प्राप्त झालेल्या ह्या रूपगुणसंपन्न मुलाचा लळा लागावा हें साहाजिकच आहे. पण आपण एकसारखे अहोरात्र त्याच्याच नादांत राहून आपल्या कर्तव्यासही विसरत चालला आहां, हें मोठें दिलगिरीनें मला आपले नजरेस आणावें लागत आहे. आम्ही आपले बंदे, पूर्ण विश्वासांतले, आणि जिवास जीव देणारे खरे,पण जी कांहीं आपली बरीवाईट सेवा आमचे हातून घडत आहे तिचें योग्य स्वरूप, आमच्यावर आपली नजर असल्याखेरीज होणें केवळ अशक्य आहे! शिवाय दुसरें असें कीं, कोणत्याही गोष्टीचा छंद मर्यादेबाहेर गेला असतां मनुष्याला तो जिवांत जीव असेपर्यंतच नव्हे, तर मरणोत्तरही तापदायक होतो, व त्या तापरूपी समुद्रांत त्याला गटांगळ्या खात रहावें लागतें. याविषयीं एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, ती हुजूरची परवानगी असल्यास सांगतों.'

सुलतान वजिरास ह्मणतो, 'कांहीं चिंता नाहीं, तुम्हांस काय बोलावयाचें असेल तें बोला.' त्यावरून वजिरानें पुढील चमत्कारिक गोष्ट बादशहास सांगितली. तो ह्मणाला, 'फरुखशियर नांवाचा एक बादशहा होऊन गेला. त्याच्या जिवाचा कलिदा असा दुसरा एक बादशहा होता. ते उभयतां अनेक वेळां एकमेकांच्या येथें स्नेहाखातर जात येत असत, व एकमेकांच्या हितगुजाच्या गोष्टी एकमेकांस अगदीं पडदा न

ठेवतां सांगत असत. एकदां फरुखशियर याचा दोस्त बादशहा त्याचे येथें येऊन त्यानें फरुखशियर यास एक जहाल विषाची कुपी देऊन ह्मटलें, ' ह्या कुपींतील विष इतकें जालीम आहे कीं, ही कुपी उघडली असतां तिजवरून माशी नुसती फिरकली तरी मरून जाईल ! आमचे येथें असल्या दोन कुप्या होत्या, त्यांपैकीं ही एक कुपी तुमचे संग्रहीं असावी ह्मणून मीं मुद्दाम आणिली आहे. राजकारणांत नाहीं नाहीं तसल्या भानगडी उत्पन्न होतात, तेव्हां अशा वस्तूचीही केव्हां केव्हां गरज लागते; तर ही कुपी तुमचेजवळ असूं द्या.' फरुखशियर यानें ती विषाची कुपी आपल्या एका विश्वासू हुजऱ्यापाशीं देऊन ती जामदारखान्यांत अगदीं गुप्त ठिकाणीं ठेवण्यास सांगितलें. परंतु हुजऱ्याचें मन ठिकाणावर नसल्यामुळें त्यानें ती तशीच आपले खिशांत ठेवून दिली. हुजऱ्याचें मन ठिकाणावर कां नव्हतें तें सांगतों. त्याचा धनी म्हणजे फरुखशियर बादशहा यानें नुकतीच एक परम रूपवती दासी विकत घेतली होती, व तिजवर या बेट्या हुजऱ्याचें मन गेलें होतें ! होतां होतां तिजविषयीं त्याचा आषक इतका बेसुमार झाला कीं, तिच्यावांचून त्याला दुसरें कांहींच सुचेनासें झालें ! ती आपणाला प्राप्त व्हावी ह्मणून त्यानें पुष्कळ उपाय केले, पण ते सर्व फुकट गेल्यामुळें त्याला वेड लागण्याची वेळ आली ! तेव्हां या यातना सोसण्यापेक्षां मरून जावें हें बरें, असें ह्मणून तो त्या कुपींतलें विष पिऊन गेला ! पण सांगावयाची गोष्ट ही कीं, त्या विषानें त्यास मरण आलें नाहीं ! आतां खरोखर

पाहतां त्याचा जीव गेला होताच, पण त्या दासीचा ध्यास हेंच कोणी पिशाच त्याच्या शरिरांत शिरून तो जिवंत असल्यासारखा राहिला होता, व त्याचे त्या दासीकरितां वेडेवेडे चार तसेच चालले होते. हा हुजऱ्या चांगला शहाणा-सुरता असून बादशहाच्या मर्जीतला असल्यामुळें कांहीं दिवस त्यानें त्याच्या ह्या वेडेचारांकडे कानाडोळा केला. पण ते फारच वाढले असें पाहून त्यानें त्या गोष्टीचे कारणाची चौकशी चालविली. तेव्हां तत्काळ त्या प्रकरणाचा त्याला छडा लागला. त्यावरून त्यानें त्या हुजऱ्याच्या जिवा-करितां म्हणून ती दासी जी त्यास दिली, तिची प्राप्ति झाल्याबरोबर तो हुजऱ्या प्रेत होऊन पडला!'

वजीर पुढें बोलतो, ' तेव्हां सरकार, यांतलें तात्पर्य इतकेंच ध्यावयाचें कीं, छांदिष्टपणा हा मनुष्याला जिवंत-पणीं वेडा करितो इतकेंच नव्हे, तर मेल्यावरही त्यास वेडांत ठेवितो ! महाराज, इतकें निस्पृहतेचें भाषण करून या चरणांची या दासानें बेअदबी केली ती या चरणां-करितांच केवळ केली आहे. असें न केल्यानें निमक-हरामपणा पदरीं येईल, करितां हा शेवटचा अर्ज गुदरला आहे. बेअदबीची माफी करून विचारपूर्वक काय तें करणार हुजूर समर्थ आहेत ! '

मिसर देशच्या सुलतानानें हें वजिराचें म्हणणें ऐकून घेऊन शांतपणें त्यास उत्तर केलें. तो वजिरास ह्मणतो, ' तुम्ही जें बोललां त्यांत कांहींएक वावगें नसून तुमच्या सर्व गोष्टी मला पटून गेल्या. पण माझी आतां वास्तविक

काय स्थिति झाली आहे ती सांगतों. आज वर्ष झालें, राणी वारली तेव्हांपासून माझें मन उद्विग्न झालेलें आहे हें तुह्मांस माहीत आहेच. मला मूलबाळ नसल्यामुळें हें वैभव व राज्य शून्यवत् भासत आहे. परंतु इतक्यांत ह्या मुलाचा मला लाभ झाल्यामुळें मला मोठा विरंगोळा होऊन माझे दिवस आनंदानें जाऊं लागले आहेत. तेव्हां ह्यावरचा हा माझा प्रेमा जिवांत जीव आहे तोंपर्यंत कमी न होतां उलट कोठपर्यंत वाढत जाणार तें माझें मलाच समजत नाहीं! थोडक्यांत येवढेंच सांगतों कीं, माझें हें तारूं आतां अमर्याद समुद्रामध्यें लोटलें गेलें आहे; तें आतां परत फिरावयाचें नाहीं; लागेल तर पैलतीरास सुखरूप लागेल, नाहींपेक्षां जसें त्याचें व्हावयाचें असेल तसें होईल!' सुलतान पुढें बोलतो, 'आतां हें प्रकरण निघालेंच आहे, तेव्हां यासंबंधानें आणखी शेवटची गोष्ट तुह्मांस सांगतों. ती येवढीच कीं, आतां तुम्ही स्वतःला माझे ठिकाणीं समजून हा सर्व राज्यकारभार होईल तितका चांगल्या रीतीनें चालवा, आणि माझें जें काय हित करणें तें ह्याच मार्गानें करा, ह्मणजे झालें!'

भाग बारावा.

—:❋:—

बहरामावर महत्संकट व जोहरा हिच्या शोधार्थ त्याचें पर्यटन.

कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें ।
तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें ! ॥

वामनपंडित.

याप्रमाणें वजिराच्या बोलण्याचा सुलतानाच्या मनावर कांहींच परिणाम न होतां तो यापुढें बहरामाच्या प्रेमपाशांत पुराच सांपडला. एके दिवशीं तो राजवाड्याच्या गच्चीवर बहरामास घेऊन बुद्धिबळें खेळत असतां, एकाएकीं एक मोठा राक्षसी पक्षी येऊन त्यानें आपल्या चोंचींत बहरामाची मुंडी धरली, व अशा रीतीनें तो त्यास घेऊन जात असतां सुलतान त्याचे पाय धरून त्याला खालीं ओढूं लागला. तरी तो पक्षी बहरामास सोडीना, आणि सुलतानही बहरामास सोडीना ! याप्रमाणें त्या दोघांनाही तो पक्षी घेऊन चालला, हें पाहून सुलतानाच्या जिवास जीव देणारा त्याचा खिजमतगार तेथें होता तो सुलतानास खालीं ओढूं लागला; तेव्हां त्या जबरदस्त पक्ष्यानें त्या तिघांच्या लटांबरासुद्धां भरकन् आकाशांत उड्डाण केलें ! परंतु कांहीं वेळानें सुलतानाच्या सर्वांगाचा थरकांप होऊन, बहरामापासून त्याचे हात सुटले. त्याबरोबर तो खिजमतगारासुद्धां खालीं कोसळून धाडकन् जमिनीवर आपटला, व अशा प्रकारें ते दोघेही प्राणास मुकले ! सुलतानाचा असा हा अत्यंत दुःखदायक परिणाम

झाल्यामुळें शहरांत जिकडे तिकडे एकच आकांत उडून गेला! मग दरबारी व इतर लोक मिळून त्यांनीं त्याच्या दर्ज्याप्रमाणें व तेथील रिवाजास अनुसरून मोठ्या समारंभानें राजघराण्याच्या कबरस्थानांत त्यास आणून पुरलें, व त्यावर उत्कृष्ट कबर बांधिली. पुढें चमत्कार असा झाला कीं, त्या कबरींतून ' हाय बहराम! ' ' हाय बहराम! ' असा ध्वनि लोकांस ऐकूं येऊं लागला! त्यावरून, वजिरानें फरुखशियर याच्या हुजऱ्याची गोष्ट सांगतांना जें तात्पर्य ध्वनित केलें होतें, त्याचा प्रत्यय खरोखरच येऊन चुकला!

असो; इकडे तो पक्षी बहरामास आकाशपंथानें वाऱ्याप्रमाणें भराऱ्या मारीत घेऊन चालला असतां त्या बिचाऱ्याची काय स्थिति झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी! मग पुष्कळ वेळ गेल्यावर पक्ष्यानें त्यास एका मोठ्या निबिड अरण्यांत नेऊन सोडून दिलें. यांत सांगण्यासारखा चमत्कार हा कीं, त्या पक्ष्यानें त्याला कोणत्याही प्रकारें उपद्रव केला नाहीं—जणू काय ईश्वरी संकेताप्रमाणें त्यानें आपलें काम होतां होईल तों त्या बिचाऱ्या राजपुत्राला कमी त्रास होईल अशा बेतानें मुद्दामच मोठ्या सौम्यपणानें केलें! वर सांगितलेलें अरण्य फार भयंकर होतें. जिकडे तिकडे किर्र झाडी असून तींत वनपशु व अपरिचित पक्षी विहार करीत आहेत; जणू काय आकाशाला टेंकलेले असे प्रचंड पर्वत आसमंतात्भाग बहुतेक वेष्टून उभे आहेत; त्यांच्या भयंकर कड्यांवरून पाण्याचे शेंकडों मोठमोठे झोत धों धों खालीं पडत आहेत; त्यांचे नद्या नाले बनून वहात

चालले असल्यामुळें सारा प्रदेश सदोदीत थंडीचें केवळ माहेरघरच होऊन राहिला आहे; अशा निर्जन अरण्यांत बहराम जाऊन पडला !

मिसर देशच्या सुलतानाच्या येथें बहरामाचा जो काळ गेला, तो सुखाचा गेला असें आपणास साहजिकच वाटेल. पण वास्तविक तशी गोष्ट नव्हती; कारण त्यास रात्रंदिवस जोहरा हिचा ध्यास लागलेला असल्यामुळें तेथें त्याला जे सर्व प्रकारचे राजोपचार मिळत होते, त्यांच्या योगानें त्याच्या मनाला मुळींच समाधान वाटत नसून, संधी सांपडल्याबरोबर जोहरा हिच्या शोधासाठीं आपण मुशाफरी पेषा पतकरावयाचा असा त्याचा निश्चय झालेला होता; आणि त्या निश्चयाचें फळच कीं काय, ह्मणून त्या पक्ष्यानें त्यास केरो येथील राजवाड्यांतून काढून या ठिकाणीं आणिलें, असा तर्क करतां येण्यासारखा आहे ! असो, या ठिकाणीं बहरामाला आसपास पशुपक्षी, झाडेंझुडें, नाले-खोले, हींच काय तीं दिसत असून माणसाचा वाराही तेथें नसल्याकारणानें, जोहरा हिजविषयींचा त्याच्या मनाचा ध्यास इतका कांहीं वाढून गेला कीं, तो केवळ जोहरामयच बनून गेला असें ह्मटलें असतां चालेल ! त्यानें झाड पाहिलें कीं त्यावर जोहरा बसलेली आहे कीं काय; एखाद्या पक्ष्याचा मधुर शब्द ऐकला कीं, ही जोहराच गाणें ह्मणत आहे कीं काय; हरिणाचे काळे डोळे पाहून, यानें जोहरा हिच्या डोळ्यांची कांति चोरून आणिली कीं काय; एखादा रानघोडा पाहिला कीं, हा जोहरा हिचाच घोडा

असून यानें आपलें डौलदार व सौम्य स्वरूप कां टाकिलें बरें ? अशा प्रकारचे उद्गार, प्रत्येक वस्तु पाहून तिच्याशीं जोहरा हिचा कांहीं तरी संबंध जुळवून एकसारखे काढीत बसावें !

याप्रमाणें शहाअली बहराम पुरा वनवासी झाला. मनुष्यावर कोणतेंही संकट आलें असतां त्याचे मनाची जी एकदम विलक्षण चलबिचल होते, तिला कालावधीची मात्रा मिळाली ह्मणजे ती पुष्कळच कमी होऊन, आतां पुढें करायाचें काय, याची तो योजना करीत असतो ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. बहराम याच्याही मनांत याप्रमाणें विचार येऊन, तो ह्या आलेल्या संकटास न जुमानतां, देशोदेशीं हिंडून जोहरा हिचा शोध लावावयाचा या कृतसंकल्पानें देशपर्यटनास निघाला !

भाग तेरावा.

—:०:—

जोहरा हिजवर कठीण प्रसंग. (पहिली रात्र.)

कामांध भूमिपति दुष्कृति आचरीती ।
येते तयांस अति कष्टदशाच अंतीं ! ॥

नवव्या भागांत बहराम व जोहरा यांची फाटाफूट झाल्याची हकीकत दिलेली वाचकांचे स्मरणांत असेलच. त्या वेळीं जोहरा हिनें फारच मोठा पराक्रम केला; तो असा कीं, ती जी एकदा आपला पाठलाग करणारांच्या कचाट्यांतून निसटली, ती फिरून त्यांच्या हातीं लागली नाहीं !

त्यांच्यापैकीं कांहीं लोक जसा बहरामाचा पाठलाग करीत सुटले, तसेच कांहींजण हिच्याही मागें भरधांव घोडे टाकीत चालले. पण हिनें आपला घोडा जो वाऱ्यासारखा दामटला, त्याच्यांत व ह्या मागील मंडळींत थोडक्याच वेळांत मोठें अंतर पडून गेलें! तरी पण त्या पाठलाग करणाऱ्या टोळींतील जवानांनीं मोठी शिकस्त करून, जोहरा हिला गांठण्याचा एकवार आव घातलाच. परंतु तिनें अशी शिताफी लढविली कीं, आपण अमुक दिशेनें चाललों असा रोंख त्या लोकांस बराच वेळ दाखवून, ते सर्व एकजुटीनें ती दिशा धरून तिच्यामागें सारखी तंद्री लावून घोडे फेकीत चालले असतां, त्या अल्पवयी शूर मुलीनें एकदम त्यांना हुलकावणी देऊन निराळ्या दिशेनें जी मोठ्या जोराची दौड केली, तीमुळें त्या लोकांचें अनुसंधान चुकून त्यांच्यांत घोटाळा होऊन गेला, व अशा तऱ्हेनें त्यांचा प्रयत्न शिथिल होऊन जोहरा तेव्हांच त्यांच्या दृष्टीच्या आड निघून गेली!

बहरामाचा जसा जोहरा हिच्या ठिकाणीं तसाच जोहरा हिचाही बहरामाच्या ठिकाणीं किती जीव लागून राहिला होता, त्याचें निराळें वर्णन करण्याची अवश्यकता नाहीं; कारण आतांपर्यंतच्या हकीकतीवरून ती गोष्ट वाचकांच्या ध्यानांत पुरतेपणीं येऊन चुकलीच आहे. असो; त्या उभयतांच्या फाटाफुटीच्या प्रसंगीं त्यांनीं वाट फुटेल तिकडे आपापला रस्ता सुधारला; परंतु संधी सांपडतांच व पारतंत्र्याच्या तडाक्यांतून सुटतांच बहरामानें जसा जोहरा हिच्या शोधासाठीं

देशपर्यटन करण्याचा निर्धार केला, तसाच पाठलाग करणारांच्या हातून सुटतांच जोहरानेंही पण केला. आतां त्यांना एकमेकांचा शोध लागण्यासंबंधानें कांहीं आगापिछा जरी सांपडलेला नव्हता, तरी खरें व निर्मळ प्रेम ज्यांच्या ठायीं आहे त्यांचा वाली ईश्वर आहे असा पक्का भरंवसा ठेवून, त्या उभयतांनीं अशा महत्संकटांतही आपला उद्योग नेटानें चालविला. अशा प्रकारचा दृढ निश्चय आणि त्या निश्चयाला अशा प्रकारचें साहित्य असल्यावर, कालांतरानें कां होईना, पण मनुष्याला आपल्या उद्योगांत यश येणार नाहीं असें कालत्रयीं तरी होऊं शकेल काय ?

असो; जोहरा ही आपला पाठलाग करणारांच्या हातून सुटून निर्भय झाल्यावर, आपल्या मनांतील निश्चयाप्रमाणें, मोठ्या सावधगिरीनें धीरे धीरे मुशाफरी करीत करीत केवढी मोठी मजल मारून कोठकोठें निघून गेली, याची सविस्तर हकीकत दिली असतां ती कदाचित् कंटाळवाणी होईल. ह्मणून त्यासंबंधानें विशेष महत्त्वाच्या गोष्टी ज्या घडल्या, तेवढ्याच सांगाव्या हें बरें दिसतें. ती जी निघाली ती वायव्य दिशेनें अनेक ओसाड रानांतून, जंगलांतून, डोंगरांतून, बर्फमय व रानटी लोकांच्या वस्तीच्या प्रदेशांतून बहुत काळ प्रवास करून, मोठ्या कष्टानें तुर्कस्थानांतील खोतान शहरीं जाऊन पोहोंचली. तेथील अधिकाऱ्यास खान असें ह्मणत, व वरील शहर ही त्याची राजधानीच होती. या खानाचे वाडवडील मोठे पराक्रमी होते, व

त्यांचे वेळीं हें राज्य अतिशय भरभराटींत असून त्यांचा लौकिक दिगंतरीं गाजलेला होता. त्यांनीं आपल्या राज्यांत स्मरणीय अशीं अनेक कृत्यें केलेलीं होतीं. परंतु ज्या वेळची ही गोष्ट चालली आहे, त्या वेळीं त्या राज्यास अगदीं उतरती कळा लागलेली असून तेव्हांचा तेथील खान हा नुसता आयत्या पिठावर रेघा ओढून राहिला होता इतकेंच नव्हे,तर तो बदमाष लोकांच्या नादीं लागल्यामुळें त्याचें वैभव व इभ्रत फारच कमी झाली होती. त्याची उमर ऐन पंचविशींत असून, तो त्या लोकांच्या संगतींत राहून ऐषआराम व ख्यालीखुशाली यांतच आपला सारा वेळ घालवीत असे !

राजधानीपासून जवळच एका मोठ्या आंबराईंत एक उत्तम सराई या खानाच्या पूर्वजांनीं बांधलेली होती. तिला सराई ह्मणण्यापेक्षां राजशाई आरामस्थळ असें ह्मटल्यास जास्त शोभेल. या ठिकाणीं मुशाफर लोकांना उतरण्याकरितां चांगली सोईची प्रशस्त जागा होतीच, पण त्याखेरीज राजघराण्यांतल्यासारख्या थोर माणसांसही एकादे वेळीं मजेनें सहल करण्याकरितां येण्यालायकही तें स्थळ होतें. तेथें मोठ्या लोकांकरितां एक उत्कृष्ट बंगला बांधिला असून, संगमरवरी पाषाणांचें फारच उत्तम व रम्य असें एक सरोवर बांधिलेलें होतें. त्या सरोवराची शोभा किती तरी वर्णावी! अगोदरच तें आम्रवृक्षांचे छायेंत असून, त्यांत निरनिराळ्या रंगांचीं कमळें प्रफुल्लित झालेलीं असल्यामुळें तो एकंदर सुटलेला सुगंध, कशाही स्थितींतल्या मनुष्याच्या आत्म्यास

आराम करून सोडणारा होता. शिवाय त्या सरोवरांत मोठमोठे मासे वगैरे जलचरेंही पुष्कळ असल्यामुळें, त्याचें पाणी अगदीं निर्मळ असून स्फटिकाप्रमाणें स्वच्छ होतें.

जोहरा ही येतां येतां या आंबराईत आली. तेथला तो एकंदर देखावा पाहून तिच्या मनाला मोठें समाधान वाटलें; व तिचा घोडाही फार थकून गेला होता, याकरितां दोन दिवस येथें राहून विसांवा घेतला असतां बरें होईल, असा विचार करून ती घोड्यावरून उतरली; व घोडा झाडाशीं बांधून सराईमध्यें तिनें गाशा टाकिला. नंतर हातपाय धुऊन व सरोवराचें तें मधुर पाणी पिऊन ती विश्रांति घेत पडली. इतक्यांत, तेथील राजदरबारासंबंधानें तिनें प्रतिकूल लौकिक ऐकिला होता ती गोष्ट तिच्या मनांत येऊन, आपल्याला येथून लवकरच गाशा गुंडाळला पाहिजे असें ती मनांत ह्मणाली.

कर्मधर्मसंयोगानें असें झालें कीं, त्याच वेळीं खान-साहेबांची स्वारी आपल्या दोस्तांसह सहल करण्याकरितां येऊन तेथील बंगल्यांत उतरली होती. ही मंडळी खाऊन-पिऊन चैन केल्यानंतर आंबराईत इकडे तिकडे फिरत असतां, या वेषधारी तरुण प्रवाशाची व त्यांची नजरानजर झाली. तेव्हां, जोहरा ही जरी इतक्या दिवसांच्या कष्टमय प्रवासानें थकून गेलेली असून तिचा चेहराही गोरामोरा होऊन गेला होता, तरी तिचें नैसर्गिक सौंदर्य व तेज हीं बिलकुल कमी झालेलीं नव्हतीं. फार काय सांगावें, त्या वेषधारी जवानास पाहतांच त्या साऱ्या मंडळीचे डोळे

अगदीं दिपून गेले! मग ते सर्वजण तसेच फिरून बंगल्यांत गेले, आणि त्यांनीं खिजमतगारास सांगून जोहरा हिला आपलेकडे बोलावून नेलें. तिनें थोडासा अनमान केलाच, पण या वेळीं आपण यांचे ताब्यांत आहों, व हे लोक कांहीं सुधे नाहींत, असा विचार करून समयाला सादर झालें पाहिजे आणि यांचे हद्दीचे बाहेर कसें तरी लवकर पडून गेलें पाहिजे, असें ह्मणून ती खिजमतगाराबरोबर बंगल्यांत गेली.

या वेषधारी तरुणास पहिल्यापासूनच त्याचा नूर आणि इभ्रत यांचा ठसा त्या मंडळीच्या मनावर इतका कांहीं बसून गेला होता कीं, आपल्या हलकटपणाच्या नादांत त्याची टवाळी किंवा अपमान करण्याचें त्यांच्या मनांतही आलें नाहीं; आणि वास्तविक पाहतां जोहरा हिचे अंगीं विलक्षण तेजस्विता, भारदस्तपणा, चातुर्य, दिलदारपणा, धैर्य व समयसूचकता हे गुण वास करीत होते ह्मणूनच ती ह्या आलेल्या व पुढील महत्संकटांतून पार पडली. हे तिच्या अंगचे असामान्य गुण या प्रसंगीं पूर्ण कसास लागले. यांपैकीं एखाद्या गुणाचा जर अभाव किंवा कमीपणा असता, तर हे बदमाष लोक खचीत तिची राळ करून सोडते! असो, ती बंगल्यांत येतांच खानानें तिला मोठा मान देऊन आपल्यासमोर कोचावर बसविलें. नंतर तुम्ही कोण, कोठले वगैरे विचारपूस त्यानें चालविली असतां जोहरा हिनें घेतलेल्या सोंगाची इतकी नामी बतावणी केली कीं, ती ऐकून मोठा विचारी, धोरणी,

अनुभवी व धैर्यवान् पुरुषही तोंडांत बोट घातल्यावांचून खचीत राहणार नाहीं !

जोहरा खानास ह्मणते, ' सरकार, मी एका सौदागराचा मुलगा आहें. माझे वडील व मी असे आपला काफला घेऊन व्यापाराकरितां परदेशीं चाललों असतां, आमचा काल रात्रीं जेथें तळ पडला तेथून जवळच या रानांत मी आज पहांटेच्या प्रहरीं एक दोन सोबती घेऊन घटका-भर शिकार करण्याकरितां गेलों, तों एका हरिणाचे मागें लागून वाट चुकलों. तो हरिणही निघून गेला व माझे सोबतीही कोणीकडे मागें राहिले. अशा स्थितींत ते सोबती व आपला काफला यांचा शोध करीत करीत मी आतांपर्यंत एकसारखा भटकत राहिलों असतां, येथें दोन घटका विसांवा घेण्याकरितां आलों. आतां मला माझ्या कामाकरितां येथून होईल तितकें लवकर निघून गेलें पाहिजे. '

यावर खानानें उत्तर केलें, ' छी ! छी ! तुम्ही जाण्याची इतकी घाई करूं नका. तुमचा काफला कोठें दुनिया सोडून जातो आहे ! त्याची तुमची गांठ घालून देणें आमचेकडे लागलें. पण तुम्ही कसेंही करून दोन दिवस आमचे येथें राहून पाहुणचार घ्यावा अशी आमची फार इच्छा आहे.' हें खानाचें भाषण ऐकून जोहरा हीस मोठें संकट पडलें. ती मनांत ह्मणते, ' याला नाहीं ह्मणण्याची तर सोय नाहींच; बरें, याचे म्हणण्याप्रमाणें करावें तर हे एकंदर लोक पडले उल्लू, आपल्याला कोणते वेळेस कसे फाशांत पाडतील याचा काय नेम सांगावा ! ' शेवटीं थोडा विचार करून व पर-

मेश्वरावर भार टाकून तिनें त्यास जबाब दिला कीं, ' महाराज, आपल्यासारख्या थोरांनीं मजसारख्या यःकश्चित् माणसास येवढा मान देऊन आपले घरीं पाहुणचारास बोलाविलें असतां मीं नाहीं ह्मणावें हें मला उचित दिसत नाहीं. पण दोन दिवस होतांच मला निरोप देण्याची मात्र जरूर मेहेरबानी व्हावी ! '

खान खुषींत येऊन म्हणतो, ' कांहीं चिंता नाहीं. अहो, दोन दिवस काय आणि चार दिवस काय, तुमचें आमचें मन मिळाल्यावर तुम्ही आणखी पंधरा दिवस कां राहणार नाहीं? ' हे खानाच्या तोंडचे धरसोडीचे शब्द जोहरा हीस केवळ विषतुल्य वाटले, व यावर ती त्यास चरचरीत उत्तर देणार होती; पण तिनें आपली जीभ चावली! ती इतकें मात्र ह्मणाली कीं, ' थोरांनीं आपलें वचन पाळावें यांतच त्यांना भूषण आहे ! '

इतकें झाल्यावर खान व त्याचे बरोबरची मंडळी जोहरा हिजसह उठून आपआपले घोड्यावर बसली. जोहरा हिचा तो जामानिमा व घोड्यावर बसण्याची ऐट वगैरे पाहून सर्वांस मोठें कौतुक वाटलें. पण याहूनही, त्या सर्वांनीं तिच्या घोड्यास मध्यभागीं घालून चालविलें असतां त्या घोड्याची प्रसंगास शोभेल अशी ती चाल, व वरील स्वाराच्या अंगचा व्यवस्थितपणा व जोम, आणि तोंडावरचें विलक्षण तेज, हीं पाहून प्रत्येकानें ' वाहवा ! वाहवा! ' असें मोठ्यानें म्हटलें.आणि खरोखर पाहिलें असतां त्यांना तरी तसें म्हटल्यावांचून राहवणार कसें? कारण तो वेषधारी सौदागरबच्चा

त्या समुदायामध्यें तारागणांनीं वेष्टिलेल्या चंद्राप्रमाणें केवळ भासत होता! असो, याप्रमाणें ही एकंदर स्वारी शहरास जाऊन पोहोंचली. तेव्हां खानानें आपल्याबरोबर आणलेल्या या तरुण सौदागरास राजवाड्याच्या समोरील नजरबागेंत स्वतंत्र बंगल्यामध्यें जागा दिली, व त्याच्या दिमतीस चाकर-माणसें वगैरे देऊन त्याची बरदास्त चांगली राहील अशी सर्वप्रकारें व्यवस्था केली.

रात्र होतांच राजवाड्यांत व नजरबागेंत जिकडे तिकडे दिव्यांचा लखलखाट झाला. इकडे खानाचें व तिकडे त्या वेषधारी तरुण सौदागराचें जेवणखाण झाल्यावर, खान हा आपल्या महालांतील खिडकींत बसून नजरबागेकडे पहात असतां त्या सौदागराकडे एकसारखें त्याचें लक्ष लागलेलें होतें. त्यांतून हा सौदागरही सहज इकडे तिकडे हवा खात हिंडत असल्यामुळें त्याची हालचाल खानाच्या चांगलीच नजरेस पडली. तेव्हां, त्याला सराईत पाहिल्यापासून, हा पुरुष नसावा, तर पुरुषाचा वेष घेतलेली स्त्री असावी, असा त्याला संशय आलेला होता, व तो संशय या वेळीं पुष्कळच दृढ झाला; आणि ही खरोखरच स्त्री आहे कीं काय, व असेल तर ती आपणाला कशी प्राप्त होईल या-विषयींचा विचार त्याच्या मनांत एकसारखा घोळूं लागला! पुढें बरीच रात्र झाल्यावर हा वेषधारी सौदागर बंगल्यांत जाऊन निजला. तसाच खानही उठून निजावयास गेला. परंतु सारी रात्र खानाला झोंप ह्मणून कशी ती आली नाहीं. त्याला ती रात्र केवळ वैऱ्यासारखी वाटली!

शेवटीं एकदांची पहांट झाली. त्याबरोबर खान हा, आपणास ल्हानपणापासून पाळलेल्या दाईकडे गेला, आणि तिच्या मांडीवर डोकें ठेवून मुसमुसून रडूं लागला. दाई त्याच्या तोंडावरून हात फिरवून त्यास विचारिते, 'बेटा, तूं आज इतका कष्टी होण्याचें कारण काय बरें? इतका बेदिल झालेला आणि नूर उतरलेला असा मीं तुला कधींच पाहिला नाहीं! आणि तुझे डोळेही गुंजेप्रमाणें लाल झाले आहेत, यावरून तुला रात्रीं झोंप लागली नसून तुझ्या डोक्यांत कांहीं विलक्षण विचार चाललेले असावे असें मला वाटतें!'

खान उत्तर करितो, 'आई, माझ्या डोक्यांत विलक्षण विचार आले आहेत हें तर खरेंच. काय सांगूं! काल आंबराईत दोस्तमंडळी बरोबर घेऊन सहल करावयास गेलों असतां तेथील सराईत एक तरणा सोळा वर्षांचा सौदागर आढळला; त्याचें तेज, रूप, जोम, वागण्याची पद्धत आणि बोलण्याचा दिमाख हीं इतकीं कांहीं अलौकिक दिसून आलीं कीं, त्यास आपले येथें दोन दिवस राहून घेण्याकरितां मी मुद्दाम घेऊन आलों आहें. आतां माझ्या मनांत आलेली गोष्ट खरी असो वा खोटी असो, तिजबद्दल तूं माझी थट्टा कर किंवा हेळणा कर, ती तुला सांगितल्याबांचून मला रहावत नाहीं. हें पहा, त्या पोराची एकंदर चर्या जी एकसारखी तीन चार प्रहर माझ्या पाहण्यांत आली, तीवरून पुरुषाचा वेष घेतलेली ती खपसुरत पोर असावी असें मला वाटतें. त्याचा तो गुलजार चेहरा, पोंवळ्यासारखे ओठ, डाळिंबाच्या बियां-

प्रमाणें दांत, चांपेकळीसारखें सरळ नाक, हरिणा-सारखे डोळे, विशाळ भाळ, लांब लांब कुरळ केश, यांचें किती तरी वर्णन करावें ! सारांश, ही स्त्री असून इष्काचे नादीं लागून कोणा पुरुषावर फिदा झाली असावी व त्याचा हात धरून घराबाहेर निघाली असावी, असें पक्कें माझ्या मनानें घेतलें आहे. तो पोर ह्मणतो, मी सौदा-गराचा मुलगा आहें. पण खरोखर ती स्त्रीच असेल तर, कांहीं आकस्मिक कारणानें तिची व तिच्या प्रिय-कराची फाटाफूट झाली असल्यामुळें ती हा कांहीं तरी बाहणा सांगत असून, लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्या-करितां तिनें हा पुरुषवेष घेतला असावा असें खास दिसतें. अग आई ! त्या पोराचें बोलणें किती तरी मधुर ह्मणून सांगूं ? पण त्यांत अशी कांहीं मर्दानी ऐट तो दाखवितो कीं, ही स्त्री आहे असा भास कोणासही होऊं नये ! '

खान पुढें दाईस म्हणतो, ' तर आतां आई, हा मी येथें आणलेला विलक्षण तरुण सौदागर जर पुरुषच असेल, तर तो आला तसा आपला जाईल. पण जर स्त्री असेल, तर मात्र ती हस्तगत न झाल्यास माझ्या जिवाची आशा तूं धरूं नको—इतका कांहीं मी या प्रसंगीं आपकाच्या जाळ्यांत सांपडून पराकाष्टेचा ताप पावत आहें ! आतां तूं म्हणशील कीं, या संबंधांत एवढा त्रास व विचार करण्याचें कारण काय ? तो पुरुष आहे का स्त्री आहे याचा छडा लावण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य आहे; कां कीं, तो पूर्ण-पणें आपल्या हातांत सांपडला आहे. पण आई, या

गोष्टीचा विचार मी केला नाहीं असें नाहीं. पण हें पहा, त्याचें तें एकंदर अवसान, बोलण्यांतला तिखटपणा व करारीपणा, आणि चेहऱ्यांतील भारदस्तपणा हीं पाहून, त्याशीं भलता-सलता प्रसंग करण्याचें अगोदर कोणास धैर्यच होणार नाहीं; आणि अविचारानें असलें कांहीं धाडस किंवा आचरट-पणा करण्याचा प्रयत्न केलाच, तर तो खचीत माझी गर्दन काटील अशी मला भीति वाटते ! '

दाई खानास ह्मणते, ' बेटा, तूं जें काय येवढा वेळ बोललास त्यावरून हें प्रकरण मोठें नाजूक व जोखमीचें दिसतें. तरी पण तूं कांहीं काळजी करूं नको. मी तुला एक युक्ति सांगतें. आज रात्रीं तूं असें कर कीं, त्या खपसुरत पोरास एकांतीं भोजनास बोलाव, व या भोजन-समयीं पुष्कळसे आंबट पदार्थ आणि फारच थोडे गोड पदार्थ वाढण्यांत येतील अशी तजवीज कर. मग जेवण चाललें असतां तो पोर आंबट पदार्थ कितपत आवडीनें खातो व गोड पदार्थांवर त्याचें किती लक्ष जातें, याकडे चांगली नजर ठेव. जर तो आंबट पदार्थांवर सपाटून ताव मारील, व गोडाकड फारसें लक्ष देणार नाहीं, तर तो पुरुष नसून स्त्री आहे हें खास समज. पण जर का आंबट टाकून गोडाकडेच ध्यान ठेवितोसें दिसेल, तर तो पुरुष आहे असें समजून त्याचा नाद सोडून दे ! '

दाईचे सांगण्याप्रमाणें खानानें सर्व व्यवस्था केली; पण झालें काय कीं, जेवणास सुरुवात होऊन थोडा वेळ झाला नाहीं तोंच हा खानाचा कावा जोहरा हिच्या लक्षांत

येऊन चुकला; आणि ती खानाची कांहीं भीडभाड न धरितां त्यास ह्मणते, ' कायहो साहेब ! आपण पुरुषासारखे पुरुष असून हें बायकांचें खाणें आपणांला कसें आवडतें ? सरकार, बेअदबीची माफी असावी. हा सर्व प्रकार पाहून, मला आपल्याविषयीं थोडी शंका येते कीं, आपल्या मर्दानीपणांत कांहीं तरी उणीव असावी ! बरें, तें कांहीं असो. पण आपल्या येथें मुद्दाम पाहुणचारास बोलावलेला गृहस्थ आपल्याला काय ह्मणेल ही तरी शंका मनांत आणून आपण ह्या आंबट जनानी पदार्थांची या प्रसंगीं योजना करावयाची नव्हती ! आपण असल्या पदार्थांची येथें जी रगाडी करून दिली, तीवरून आपल्याला यांत कमीपणा कसा येतो हें मीं सांगितलेंच; शिवाय मी जरी यःकश्चित् मनुष्य आहें, तरी ज्या अर्थी आपण आपल्या पंक्तीस बोलावण्याचा मान मला दिला, त्या अर्थीं मी एवढ्या वेळापुरता तरी आपला बरोबरीचा दोस्तच नव्हे काय ? आणि असें आहे तर, आपल्या दोस्ताचा अशा प्रकारें हा अपमान करणेंच होय ! ज्याला म्हणून कांहीं आपल्या इभ्रतीची चाड आहे, तो कधींही असा अपमान सहन करणार नाहीं ! महाराज, मला याउपर येथें राहण्याची बिलकुल इच्छा नाहीं. उदईक मला जाण्याची कृपा करून परवानगी द्याल तर बरें होईल ! ' असें ह्मणून जोहरा तशीच उठून गेली. याप्रमाणें भोजनाचा तर विरस झालाच; पण खान हा फार लज्जित होऊन फिरून आशा व निराशा ह्या नद्यांच्या

भोंवऱ्यांत सांपडून, मरतो कीं जगतो अशी त्याची अवस्था झाली !

दाई खानाची वाट पहातच बसली होती. तो तिजकडे गेल्याबरोबर त्याचा चेहरा उतरलेला पाहून ती त्यास ह्मणते, 'कसें काय बेटा ? काय झालें ?' तो कष्टी होऊन तिला सांगतो, 'आई, आजचेसारखी आमची फजिती कधींच उडाली नाहीं ! तो पोरगा असो का पोरगी असो—फारच नाठाळ यांत संशय नाहीं ! त्यानें तो जेवणाचा प्रकार पाहून आमचीच उलटी परीक्षा केली, आणि असा कांहीं तोंडाचा पट्टा सोडला कीं, तो सांगतां पुरवत नाहीं ! थोडक्यांत सांगतों कीं, त्यानें मलाच नेभळा ठरवून आपलीच उलटी छाप मजवर बसविली, आणि उद्यांच मला निरोप द्यावा ह्मणून सांगून उठून गेला !'

भाग चौदावा.

—:*:—

जोहरा हिजवर कठीण प्रसंग (दुसरी रात्र).

जरि उकिरड्यांत पडला मळला न हिरा तथापि सामान्य !

मोरोपंत.

हे खानाच्या तोंडचे शब्द ऐकून दाई त्यास ह्मणते, 'बेटा, असें जर आहे तर तूं या गोष्टीचा नाद सोडून दे; कारण, तो सौदागराचा पोर पुरुष आहे का स्त्री आहे याची परीक्षा करण्याची आणखी खटपट करण्यांत कांहीं हंशील नाहीं. झालेल्या प्रकारावरून माझी तर खात्री होते

कीं, तो पुरुषच आहे. शिवाय आजपर्यंत मी तुला सांगत आलें आहें व आज आणखी सांगतें कीं, बाबारे, हा स्त्रियांचा नाद तूं होईल तितका सोडून दे. हें पहा, या छंदाच्या पायीं आजपर्यंत शेंकडों–हजारों–लाखों–पुरुषांनीं आपल्या शरिराचें, अन्नूचें आणि संपत्तीचें मातेरें करून घेऊन ते धुळीस मिळाले आहेत. तुला अद्याप जगाचा चांगलासा अनुभव नसून तुझे मित्र व मंत्री हे बहुतेक हलकट, तोंडपुजे व व्यसनी असल्यामुळें, ते तुला योग्य सल्ला न देतां आपलेच पोळीवर तूप ओढून घेण्याकरितां बाहुल्याप्रमाणें तुला नाचवितात; आणि तूंही आपल्या पदवीचा कांहींएक विचार न करितां ते सांगतील तसा नाचतोस ! तुला गादीवर बसून नुकतींच कोठें पांच वर्षें झालीं नाहींत तों तुझें अर्धें राज्य शत्रूंनीं बळकाविलें याचा कांहीं तरी विचार कर ! शिवाय तुझें शरीर केवळ तांब्याचा तुकडा होतें, तें तूं या वाईट नादानें किती तरी खराबीस आणिलें आहेस बरें ! '

हें दाईचें हितकर भाषण खानसाहेबांस बिलकुल रुचलें नाहीं ! ठीकच आहे ! स्त्री, मद्यपान, द्यूत इत्यादि दुष्ट व्यसनांच्या आधीन जे झाले, त्यांची अशीच स्थिति असावयाची ! तो कोडग्यासारखा फिरून दाईच्या पोटांत डोकें घालून मोठ्या काकळुतीनें तिला म्हणतो, ' आई, तूं कांहीं म्हण, पण त्या पोराविषयीं मला अद्याप संशय आहे, व आणखी एकवार त्याची चांगली चांचणी बघितल्यावांचून मला चैन पडावयाचें नाहीं. तर आई, तूं आणखी अशी

कांहीं एक युक्ति मला सांग कीं, तिच्या योगानें माझा हा संशय कोणत्या तरी रीतीनें एकदांचा फिटून जाईल!' दाई उत्तर करिते, 'बेटा, तूं मला फारच गळ घालतोस, म्हणून मी तुला याबद्दलची आणखी एक तोड सांगतें. पण ही आतां शेवटचीच हो! फिरून मी या बाबतींत तुझा एक शब्दही ऐकणार नाहीं! मी आतां जी काय तुला युक्ति सांगणार, ती तरी कांहीं अंशीं जिवावरची व पुष्कळ अंशीं तुझी अब्रू खालीं करण्यासारखीच आहे. पण पहा तिचा उपयोग करून—साध्य झाली तर ठीकच आहे, नाहींपेक्षां काय तमाशा होईल तो दिसेलच!' दाई पुढें बोलते, 'मी आतां युक्ति सांगणार ती ही: तूं आज रात्रीं, आपल्या महालांत दोन पुष्पशय्या दहा बारा हातांचे अंतरावर तयार ठेवण्याची तजवीज करून एका शय्येवर तो पोर व दुसरीवर तूं असे निजून रहा. सुमारें प्रहर दीडप्रहर गेल्यावर त्याची शय्या तूं जाऊन नीट निरखून पहा; आणि ती जर तुझ्यापेक्षां जास्त कोमेजलेली दिसेल, तर ती स्त्री आहे असें समज, नाहींपेक्षां पुरुष आहे असें समजून गुपचिप रहा. आतां हा एकंदर योग कसा घडवून आणावयाचा तो तुझा तूं पहा. मला त्यांत कांहीं सुचत नाहीं!'

दाईच्या तोंडचे शेवटचे शब्द ऐकून खान मोठा खूप झाला, व त्या तरुणास कोणत्या रीतीनें आपल्या संनिध पुष्पशय्येवर आज रात्रीं निजावयास आणण्याचा घाट घालावा याचा विचार करूं लागला. असल्या गोष्टींत तो निष्णातच होता, यामुळें त्याला ती घडवून आणण्यास

फारसे आयास पडले नाहींत. त्यानें दोन प्रहरचें भोजन होऊन वामकुक्षी केल्यावर, नजरबागेंत जोहरा हिचे भेटीस जाऊन प्रथम तिच्याशीं नुसत्या इकडच्या तिकडच्या गोड गोड लंब्या लंब्या बाता केल्या. त्याच्या गुळचट गप्पा संपल्यावर त्यानें आपल्या मुख्य विषयास हलकेच सूत-उवाच केलें. तो ह्मणतो, 'साहेब, काल रात्रीं तुमचा भोजनाचा बेत नीटसा बसला नाहीं ही गोष्ट माझ्या मनाला फार लागून राहिली आहे. याकरितां माझ्या मनांत आज रात्रीं तुह्मांस फिरून भोजनास बोलावून, तुमची योग्य बरदास्त राहील व चार घटका तुमच्या आमच्या गप्पागोष्टी सावकाश होतील, अशी व्यवस्था करावयाचें आलें आहे.' जोहरा हिनें, यांत या गुलामाचा कांहीं तरी मोठा कावा आहे असें तेव्हांच ताडलें; व प्रसंग पडेल तसा त्याजवर आपला सवाई कावा लढविण्याची तजवीज चालविली. तिनें आपण स्त्री आहों ही खानाच्या मनांत आलेली कल्पना होईल तितकी नाहींशी होण्याकरितां, आपला शिपाईबाण्याचा डौल मुद्दाम त्याच्या दृष्टीस पाडण्यासाठीं आपलीं हत्यारें ह्मणजे बंदूक, तरवार, तमंचा, जंबिया वगैरे बाहेर काढून, त्यांची साफसुफी करतांकरतांच त्याच्याशीं बोलणें चालविलें.

जोहरा खानास ह्मणते, 'सरकार, मला इकडे आड आणि इकडे विहीर असें झालें आहे. इकडे आपला शब्द मोडणें ठीक दिसत नाहीं, व तिकडे वडिलांचा काफला, मी याप्रमाणें येथें पाहुणचार घेत बसल्यामुळें कोणीकडचा कोणीकडे जाईल व त्याची माझी गांठ पडण्यास अधिकच

आयास लागतील, अशी मला भीति वाटत आहे.' तरी पण, आपण बलिष्ठाच्या कचाट्यांत सांपडलों आहों, तेव्हां कांठयावर धड घालण्यांत कांहीं जीव नसून सामोपचारानेंच कशी तरी आपली सुटका करून घेतली पाहिजे ही गोष्ट ती विसरली नव्हती. सबब, आपल्या मर्जीखातर आपला शब्द मी मोडीत नाहीं, पण उद्यां मात्र मला जाण्यास परवानगी मिळावी, असें तिनें खानास आग्रहपूर्वक पण विनयपूर्वक सांगितलें. जोहरा हिची ही मान्यता पाहून खानास मोठा आनंद झाला, व तिचे आभार मानल्यासारखें दाखवून तो आपल्या पुढील उद्योगास चालता झाला. प्रहर रात्रीचे सुमारास भोजनाची तयारी होऊन जोहरा हीस खानाचें बोलावणें गेलें. तेव्हां, 'परमेश्वरा! तूंच माझा आतां सांभाळ करणार आहेस!' असें मोठ्या सद्गदित अंतःकरणानें आपल्याशीं ह्मणून ती राजवाड्यांत आली. या वेळच्या भोजनाच्या थाटांत कोणताही कपटभाव केलेला नसून, खानाचे पंक्तीस बसून ती समाधानपूर्वक जेवली. पुढें पानसुपारी, अत्तरगुलाब वगैरे होऊन थोडा वेळ इकडचें तिकडचें बोलणें झाल्यावर, जोहरा हिनें परत आपले बिऱ्हाडीं जाण्यास परवानगी मागितली. तेव्हां खान ह्मणतो, 'साहेब, आतां जाण्याची तसदी कशाला घेतां? येथेंच का रात्रचीरात्र पडून रहाना?' हें ऐकून जोहरा हीस महत्संकट पडलें. जर ना नू करावें, तर याचा संशय दृढ होऊन आपण होऊनच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतल्यासारखें होईल; न करावें तरीही पंचाईतच! शेवटीं, आतांपर्यंत ईश्वरानें अब्रू राखिली

तशीच पुढेंही राखील असा भरंवसा ठेवून तिनें खान, ह्मणण्यास रुकार दिला.

इतकें होतांच खान पराकाष्ठेच्या खुषींत येऊन जोहरा हीस ह्मणाला, ' चला तर मग, आतां बरीच रात्र झाली, झोंपेचा तरी मोड कशाला करितां ? ' हे शब्द त्याचे तोंडांतून निघतांच, संकेताप्रमाणें एक खोजा येऊन त्यानें जोहरा हीस महालांत शय्यास्थानीं नेलें, व खानही जाऊन आपल्या बिछान्यावर निजला. पूर्वी ठरल्याप्रमाणें ह्या दोन्ही उत्तम प्रकारें श्रृंगारलेल्या पुष्पशय्या होत्या हें सांगावयास नकोच. ह्या शय्येचा थाट पाहून जोहरा हिचें काळीज चर्र झालें ! ती मनांत म्हणते, ' तोबा ! तोबा ! काय हा मजवर प्रसंग ! मी या ठिकाणीं एकटी अबला ह्या चांडाळाच्या हातीं सांपडलें असून, याजपासून माझा सांभाळ करण्यास येथें कोणीच माझा वाली नाहीं ! आतां मी करूं तरी काय ? खरोखर, या वेळेस ही जमीन जर दुभंग होईल, तर भूमातेच्या पोटांत खुशाल मी गपकन् जाऊन बसेन ! मग मला कळिकाळाचीही भीति नाहीं ! पण छीः, असे नामर्दपणाचे विचार या प्रसंगीं काय उपयोगाचे ? भय धरावयाचें तें एका अल्लाचें. या मुरकुटाचें भय कशाला धरावें ? जर मी कोणत्याही दुर्मार्गाचें अवलंबन न करितां सर्वस्वी त्या जगच्चालकावर भार टाकून राहिलें आहें, तर तो माझी उपेक्षा कधींही करावयाचा नाहीं ! ' असें ह्मणून, व परमेश्वराची मनोभावें स्तव करून ती त्या पुष्पशय्येवर, तोंडावरून पांघरूण घेऊन निजून राहिली. तिला ती शय्या बाह्यात्कारीं,

सुखकर होती, पण वास्तविक इंगळ्यांच्या अंथरुणापासून जशा वेदना व्हाव्या तशा तिला अंतःकरणांत होत होत्या! तथापि मुद्दामच जागी असल्याचें चिन्ह न दाखवितां तिनें गाढ निद्रा लागल्याचें मिष केलें इतकेंच नव्हे, तर चांगली मोठमोठ्यानें घोरत राहिली!

इकडे खान नित्याप्रमाणें शराब पिऊन निजला. पण त्यापूर्वी त्यानें पहारेकऱ्यास अशी ताकीद दिली कीं, ' मध्यरात्रीं तुझा पहारा संपतांच पुढें जो पहारेकरी येईल त्यास, एका घंटेनें मला जागें करण्यास सांगून जा. विसरलास तर खबरदार ! ' हें बोलणें जोहरा हिनें ऐकिलेंच होतें. मग मध्यरात्र होतांच पहारा बदलण्याचे वेळीं, पूर्वीच्या पहारेकऱ्यानें नव्या पहारेकऱ्यास खानाचा हुकूम सांगून तो निघून चालला असतां हा वेषधारी सौदागर लघवीचें निमित्त करून त्या पहारेकऱ्याबरोबर महालाचे बाहेर आला, व त्या जात असलेल्या पहारेकऱ्याच्या हातावर दोन बहुमोल हिरे ठेवून त्यास ह्मणाला, ' तूं आतांचे आतां फुलमाळ्याकडे जाऊन अगदीं ताज्या फुलांची एक शेज तयार करून आण—होईल तितकी लवकर आण—आणि माझ्या बिछान्यावरची असलेली शेज काढून तिचे ठिकाणीं ही नवी शेज घाल. हें काम अगदीं बेमालूम झालें पाहिजे. याकरितां फुलवाल्यास त्याच्या मेहनतीबद्दल यांतला एक हिरा दे, व दुसरा तूं घे. तुला मी एवढ्यावरच बोळविणार नाहीं. तूं हें काम केल्यावर तुला मी आणखी एक हिरा देईन, व तुझा दोस्त नवा पहारेकरी यानेंही गडबड न करावी ह्मणून

त्याला देण्याकरितां मी आणखी चौथा हिरा देईन. मग कांहीं हरकत नाहीं ना?' याप्रमाणें त्या पहारेकऱ्यास आ कामास लावून जोहरा ही परत महालांत येऊन बिछा वर पडून राहिली. थोडक्याच वेळांत त्या पहारेक आपलें काम उत्तम प्रकारें बजावून जोहरा हिची श अगदीं टवटवीत फुलांनीं थाटून दिली, व जोहरा बोलल्याप्रमाणें त्यास पारितोषिक देऊन वाटेस लाविलें. काय न करील असें जें म्हणतात त्याला कोण हरताळ लावील

असो. इकडे हुकुमाप्रमाणें तो दुसरा पहारेकरी खानसाहे जागें करण्याकरितां तेथील ठरीव पद्धतीप्रमाणें हलके ह त्यांचे पाय रगडूं लागला. त्याबरोबर खासास्वारी ज होऊन हळूच जोहरा हिचे बिछान्याशीं गेली. त्यानें पा तों तिची शेज मुळींच कोमेजलेली नसून आपली त्या मानानें पुष्कळच सुकलेली असल्याचें त्याला आ आलें! तेव्हां तो अगदीं खिन्न व शरमिंदा होऊन परत आपले बिछान्यावर जाऊन हुक्का पीत बसला. ही अर्थात् जागी असून तिनें हें सर्व चरित्र पाहिलेंच पण खान परत जाऊन बिछान्यावर बसेपर्यंत तिनें जागी झाल्याचें मुळींच दर्शविलें नाहीं. नंतर ती खडबडून उठून डोळे चोळीत राहिली; व खान इतकें सवरून पुनः निलाजऱ्यासारखा खुशाल हुक्का ओढी तेव्हां याला फजीत करण्यास ही चांगली संधी अ पाहून तिनें त्याजवर घेतां येण्यासारखें होतें तेवढें घेतलें! ती खानास ह्मणते, 'सरकार, आपण थोर तर

ण एखाद्या परदेशी माणसास आपले येथें मुद्दाम आग्रह-
िक पाहुणचाराकरितां ह्मणून ठेवून घेऊन त्याचा भलताच
पमान करावा हें आपणांसारख्याला शोभतें काय ?' खान
या वेषधारी सौदागरास जरा बरें वाटण्याकरितां आपल्या
तांतील हुक्का त्याचे हातीं देऊन ह्मणतो, ' साहेब, मीं
चा कोणता अपमान केला हें मला समजत नाहीं ! '
रा हिनें जरासा तो हुक्का तोंडाशीं लाविलासें करून
स खोंचून उत्तर केलें, ' हो, बरोबरच आहे ! असल्या
नापमानाचें आपल्यासारख्याला कांहींच वाटावयाचें नाहीं
साहजिकच आहे ! कारण, आपल्याला तो सरावच
ञा ! ' खान ह्मणतो, ' तुम्ही काय ह्मणतां यांतलें एक
रही मला समजलें नाहीं ! ' जोहरा त्याला जास्तच
न बोलते, ' ठीकच आहे ! निद्रिस्ताला कोणी जागें
ल; जाग्याला कोणीं जागें करावें ! अहो, धडधडीत तुम्हीं
आपल्या प्रियकरणीस घेऊन ख्यालीखुशाली केली
काय ह्मणावें ! ' तो आश्चर्यचकित होऊन जरा
ह्मणतो, ' तुम्ही हें काय बोलतां ? अल्लाशपथ
हलकट काम माझ्या हातून झालेलें नाहीं ! ' जोहरा
' याची साक्ष ही तुमची शय्याच पहा ! ही अशी
कां बरें ? माझी शय्या तशी झाली नाहीं—पहिल्या-
टवटवीत आहे कीं नाहीं पहा बरें ! अहो,
रून नाहीं ह्मणण्यांत कांहीं अर्थ आहे ? '

णें खानाचा डाव बिलकुल न साधून, कांहीं न
सवरतां त्याच्याच तंगड्या त्याच्या गळ्यांत या पाहु-

ण्यानें घालून त्याची चांगली पूजा केली, यामुळें निराशा, खेद व संताप ह्या नद्यांच्या त्रिवेणिसंगमांत तो बुडून जाऊन त्याला वर तोंड काढून कांहींच बोलतां येईना! मग राहिलेली रात्र कशीबशी काढल्यावर त्यानें त्या वेषधारी सौदागरास आपल्या बिऱ्हाडीं जाण्यास परवानगी देऊन आपण लागलीच दाईची भेट घेण्याकरितां निघून गेला. दाई त्यास ह्मणते, 'कसें काय झालें बाबा! तुझा एकदांचा संशय फिटला का?' तो खालीं मान घालून उत्तर करितो, 'आई, तें कसें काय झालें तें विचारूंच नको. त्या अट्टल सोद्या पोरानें मोठ्या शिताफीनें माझीच उलटी विनाकारण अशी कांहीं भंबेरी उडवून दिली कीं, त्याच्यापुढें मला एक चकारशब्द सुद्धां काढण्यास जागा राहिली नाहीं! तरी पण तूं कांहीं ह्मण, त्याची परीक्षा व्हावी तशी माझ्याकडून अद्याप झाली नाहीं; कारण, त्यानें मला तशी संधीच येऊं दिली नाहीं. ही मोठी खुमखूम माझ्या मनांत राहिली असून, एकदा शेवटचा निकराचा उपाय करण्याची माझी इच्छा आहे. इतकें झाल्यावर जर तो पुरुषच ठरेल, तर त्याला मी लागलाच येथून लावून देईन. पण जर का माझ्या अंदाजाप्रमाणें तो स्त्री आहे असें उघडकीस येईल, तर मग आज दोन दिवस माझ्याशीं जे त्यानें लपंडाव खेळून मला इतका त्रास दिला, त्याबद्दल त्याचा पुरता सूड घेतल्यांचून मी कधीं राहणार नाहीं!'

भाग पंधरावा.

—:*:—

जोहरा हिजवर कठीण प्रसंग. (तिसरी रात्र.)

हिरा ठेवितां ऐरणी । वांचे मारितां जो घणीं ॥
तोचि मोल पावे खरा । ऐरणीचा होय चुरा ! ॥

तुकाराम.

दाई खानास ह्मणते, ‘ अजून नाहींच का बाबा तुझी खुमखुम जिरली? अरे, मीं तुला कालच सांगितलेंना कीं तूं आतां यापुढें या गोष्टीच्या भरीस पडूं नको म्हणून? बरें, आतां झालें तें झालें. पण येथून पुढें तरी सावध हो, आणि हे वेडेचार व हेकेखोरपणा सोडून दे कसा? नाहीं तर मला खचीत वाटतें कीं, तूं म्हणतोस त्याप्रमाणें जर का त्या पोराचा पिच्छा पुरवलास, तर तो तुझें नाक कापून तुझ्या हातांत देईल हें खूब समज!! मला आतां यापुढें या बाबतींत कांहींएक सल्ला विचारूं नको, व माझ्यापाशींही ती तुला देण्यास उरली नाहीं ! ’ हें दाईचें भाषण ऐकून खान शुद्धीवर न येतां उलटा त्याला अधिकच चेव व संताप आला. तो त्या भिरिरीसरसा उठून आपले एकांताचे खोलींत गेला. तो आपल्याशीं ह्मणतो, ‘ दाईचें बोलणें कुचकामाचें आहे. स्त्रिया किती झाल्या तरी अबलाच! खऱ्या विचाराच्या, अवसानाच्या व छातीच्या कामांत त्या कमकुवतच ! आपण आतां आपल्या जिवलग दोस्तमंडळीच्याच विचारानें व मदतीनें या कामाची एकदांची लवकर शहानिशा करून सोडिली पाहिजे. ’ मग प्रथम त्यानें जोहरा

हीस झालेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी दर्शवून मोठ्या मिनतवारीनें तिला त्या दिवशीं राहून घेतलें, व उद्यां तुम्हीं खुशाल निघून जावें असें कायमचें सांगून टाकिलें. नंतर चपराशास हांक मारून ह्मणतो, ' जारे, आपले अमीरखां, दौलतखां, इनायतखां वगैरे दोस्तमंडळीस तावडतोब घेऊन ये पाहूं ? ' हुकुमाप्रमाणें तो चपराशी लागलाच जाऊन खानसाहेबांचे कित्येक जिवश्चकंठश्च मित्र होते त्यांस घेऊन आला. असे ते कित्येक खां व भाई तेथें जमल्यावर खानसाहेबांनीं त्यांस दोन दिवसांची घडलेली हकीकत इत्थंभूत कळवून म्हटलें, ' मित्रहो, मला तर या बाबतींत आतां कांहीं सुचत नाहीं. तर तुम्ही या प्रकरणाचा विचार करून कांहीं एखादी नामी तोड काढाल या भरंवशानें मीं तुम्हांस बोलावून आणिलें आहे. हं, बोला चटपट ! ऐकूं द्या मला तुमच्या तोंडांतून कशी काय मसलत निघते ती ? या कामीं मला विलंब अगदीं नको आहे ! ' यावरून त्या आलेल्या मंडळीपैकीं एकजण ह्मणतो, ' सरकार, परवां सराईतून आपण त्या मुशाफरास घेऊन आलों तेव्हां आमच्याही मनांत आपल्याप्रमाणेंच अंदेशा आला होता. पण असल्या नाजूक कामांत आम्हीं होऊन आपणांशीं कांहीं एखादी गोष्ट काढावी हें आह्मांस बरोबर वाटलें नाहीं. ' दुसरा ह्मणतो, ' महाराज, त्यांत काय आहे ? त्या पोराची गचांडी धरून येथें आणावा, आणि चार चमचमीत छड्या लगावाव्या ह्मणजे आतांच तो काय खरें असेल तें पटापट सांगतो आहे पहा ! चौदाव्या रत्नापुढें कोणी कसाही असला

तरी वंगतो! ' तिसरा एकजण ह्मणतो, ' अंः, यांत अवघड तें काय आहे? आणि याला चौदावें रत्न तें कशाला? माझ्यासारखा तर सहज बोलतां बोलतां कधींच या गोष्टीचा छडा काढता! पण सरकारचें अलीकडे आमच्याकडचें लक्ष कमी झालें आहे. ते आपण होऊनच सर्व कांहीं कारभार करायाला पाहतात, आणि उगीच एखाद्या गोष्टीचें स्तोम माजवून बसतात! '

हें ऐकून खान उतावळा होऊन संतापानें ह्मणतो, ' बस बस, ह्या फुकटया लंब्या लंब्या बाता मला नको आहेत. कोणांत काय करामत असेंल ती त्यानें प्रत्यक्ष करून दाखविली पाहिजे. बद्रुद्दीनभाई, तुम्ही आह्मां सर्वांमध्यें पोक्त, विचारी व अनुभवी आहां; तर हें सारें प्रकरण मी तुह्मांवर सोंपवितों. तुम्ही तिसरे प्रहराचे आंत हें सर्व शिजवून टाकून मला पुढील कार्यक्रम येऊन कळवा. तुमच्याशिवाय या कामाचा जम कोणाकडूनही बसेलसें मला वाटत नाहीं. हे बाकीचे सारे जेवतेगण आहेत!'

हे बद्रुद्दीनभाई कोण होते यासंबंधानें थोडें सांगितलें पाहिजे. हे या आलेल्या छाकटयांपैकींच एक असून कोणत्याही पाजीपणाचे कामांत यांचा हातखंडा असे. ही असामी चाळिशीच्या उमरींत असून, कोणाचे घरावर कसा पाटावरवंटा फिरवावा हें काम करण्यांत फारच वस्ताद होती! बोलणें अतिशय मिष्ट व खमंग असून दुसऱ्याचें मन कसें आकर्षण करून घ्यावें ही विद्या त्याला उत्तम साधली होती. तेव्हां खानाच्या सभोंवतालच्या चांडाळचौकडींत त्याला

साहजिकच अग्रेसरत्व होतें; आणि हा खान गादीवर बसल्यापासून त्याला वाईट छंदास लावण्यास आणि त्याचें अर्धें राज्य गमावण्यास हीच स्वारी बहुतांशीं कारण झाली होती. असो. बहुद्दीन मानभावीपणानें सुस्कारा टाकून खानास म्हणतो, ' सरकारांनीं आतांपर्यंत उगीच शीण करून घेतला. बायाबापड्या आणि बारवर्षे सोळवर्षे तरणे बांड यांचीं हीं असलीं कामें नव्हत. काय ह्मणे फुलांची शेज करा. अहो, असल्या प्रकारच्या उपायांनीं का अशा गोष्टीचा थांग लागणार आहे ! हे झाले केवळ सौम्य उपाय ! आणखी काय ह्मणे चौदावें रत्न दाखवा ! पण तेंही खरोखर कामाचें नाहीं. या बाबतींत सौम्यच पण परिणामीं काळजाशीं गांठ घालणाऱ्या युक्तीची योजना झाली पाहिजे. ती कशी, त्याचें मी आतां मनन करून सरकारचे आज्ञेप्रमाणें तिसरे प्रहरीं याचा एक खर्डा लिहून तयार करून आणतों !' हें ऐकून खानाचा चेहरा खुलला, व त्यानें त्या बहुद्दीनप्रभृत्ति मंडळीस रजा दिली.

तो पक्का बस्ताद बिलंदर बहुद्दीन घरीं जाऊन त्यानें थोडक्यांत आपल्या मसलतीचें एक टांचण करून ठेविलें. नंतर जेवणखाण झाल्यावर त्यानें त्या टांचणाची सुरेखशी नक्कल करून ती आपल्या धनीसाहेबांच्या चरणीं सादर केली. तिच्यांत पुढील मजकूर होताः—

" खावंदांचा हुकूम झाल्याअन्वयें सौदागर जवानाचे विनाखीचे बाबतींत सर्व गोष्टींचा तालामाला पाहून कशी काय तजवीज करावयाची त्यासंबंधी गोषवारा खावंदांचे हुजूर खालीलप्रमाणें कलमवार दाखल केला आहे.

" १. आज रात्रौ खाजगी मजलशीचे महालांत सरकारचे जिवाचे निवडक दोस्त बारा असामी बोलावून त्यांतच सदहू सौदागर यास हजर राहण्याविषयीं ताकीद द्यावी.

" २. याप्रमाणें ही सर्व मंडळी जमल्यावर सरकारचे पदरची बहुत रंगेल व उमदा गाणारीण खुदाबक्ष नायकीण इची बैठक सुरू करण्याची तजवीज ठेवावी. हा तमासा चालला असतां पानतमाखू, अत्तरगुलाब मधून मधून देण्यांत येऊन खुषमस्करीची बहार सतत सारखी चालू ठेवावी.

" ३. असा हा साधा रंग मध्यरात्रीपर्यंत चालू ठेवून नंतर नायकिणीला रजा द्यावी; आणि मग पुढें शराबबाजी सुरू करावी; आणि आग्रहानें प्याल्यावर प्याला प्रत्येकास देऊन सर्वांबरोबर त्या चेहरेदार सौदागरास मनसोक्त शराब पाजून तर्र करावा; आणि अशा रीतीनें तो बेहोष झाला कीं, घालावा त्याचे कमरबंदास हात, आणि करावा एकदम नंगा! मग ती खपसुरत नारच असेल, तर बिशाद आहे काय करील दंगा? बेधडक बगलेस मारून न्यावी महालांत अंगसंगा!

" येणेंप्रमाणें सुचलेली युगुत सरकारचे चरणीं सादर केली आहे. अनुभव घेऊन पाहिल्यावर कांहीं तरी फाड पडून सरकारचा दिल कदाचित् खूप न झाला तरी निदान साफ खचीत होईल अशी

सरकारचा बंदा गुलाम बहुद्दीन

यास फार फार उमेद वाटत आहे."

हा कागद वाचून खानास फार संतोष झाला, व त्यानें बहुद्दीन याची पाठ थोपटली. मग त्या क्षौरी सोद्यानें लिहून आणलेल्या कार्यक्रमाप्रमाणें व्यवस्था अगदीं बरोबर होऊन मध्यरात्रीचे वेळीं गाण्याबजावण्याच्या रंगांत मंडळी दंग

होऊन गेल्यावर खुदाबक्ष नायकिणीस रजा देण्यांत आली, व लागलीच शराबबाजीला सुरुवात झाली. तेव्हां आतां हें प्रकरण कोणत्या थरास नेण्याचा या बदमाषांचा विचार आहे हें जोहरा हिच्या पक्कें लक्षांत येऊन, तिनें या महत्संकटांतून आपल्याला पार पाडण्याविषयीं अंतःकरणापासून परमेश्वराची करुणा भाकिली; आणि धैर्य धरून व मोठ्या सावधगिरीनें पुढील कार्यभाग उरकण्याचा निश्चय केला. असो. तऱ्हतऱ्हेच्या मद्याच्या सुरया ज्या मेजावर भरून लेश तयार ठेविल्या होत्या, त्यांपैकीं एकींतून एक रत्नजडित सोन्याचा प्याला भरून घेऊन खिजमतगारानें खानापुढें ठेविला. खान अगोदरच उल्लु झालेला होता, तेव्हां या खपसुरताच्या हाताला हात कोणत्या तरी निमित्तानें केव्हां लागेल असें त्यास होऊन जाऊन तो त्या वेषधारी सौदागरास ह्मणतो, 'साहेब, आपण आमचे पाहुणे, तेव्हां पहिला प्याला घेण्याचा मान आपला आहे.' असें ह्मणून त्यानें आपल्यापुढचा प्याला घेऊन सौदगराकडे केला. तेव्हां तो उठून खानास लवून मुजरा करून म्हणतो, 'नाहीं सरकार, आपणच पहिल्यानें ध्यावा.' खानानें व इतर मंडळींनींही त्याला फिरून पहिल्याप्रमाणेंच मोठा मान दिल्यासारखें दाखवून, तुम्हींच पहिल्यानें प्याला घेतला पाहिजे असा फार फार आग्रह केला. याच बाष्कळपणांत बराच वेळ गेला, तेव्हां जोहरा हीस त्या गोष्टीचा कंटाळा येऊन, एकदाचें हें प्रकरण होईल तितकें लवकर तडीस लागावें ह्मणून तिनें बाह्यात्कारीं मोठ्या अदबीनें तो प्याला

घेतला, आणि ओठास लावून मोठ्या शिताफीनें त्यांतील मद्य गळ्यापाशीं असलेल्या आंगरख्याच्या मार्येतून आंत ओतून दिलें; आणि हें प्राशन केल्यापासून आपल्याला तरतरी व कैफ आला असें दाखवून ह्मणते, 'मी यःकश्चित् मनुष्य असून माझा जो आपण आज एवढा मान केला, त्याबद्दल मी आपला फार ऋणी आहें. हें आपलें ऋण मजकडून कधींही फिटणार नाहीं. तरी पण आतां माझ्या हातच्या एक एक प्याल्याचा आपण सर्वांनीं स्वीकार केला असतां मला मोठें समाधान वाटणार आहे!' तिनें या संबंधांत आणखी आग्रहपूर्वक चतुराईचें असें कांहीं भाषण केलें कीं, ती सर्व मंडळी त्या खुषीच्या भरांत आपला मुद्दा विसरून जाऊन त्यांनीं तिचे म्हणण्यास तत्काळ रुकार दिला. मग तिनें खानापासून सुरुवात करून प्रत्येक असामीस इतकें सडकून मद्य पाजिलें कीं, ते बेटे पितां पितां बेहोष होऊन खालीं बिछाइतीवर लोळावयास लागले! त्या धुमश्चक्रींत जोहरा हिनें तेथील खिजमतगार व शिपाई-प्यादे यांसही त्या सुरादेवीचा यथेच्छ प्रसाद देऊन त्यांना-ही आपल्या शरिराची शुद्ध नाहींशी करून टाकिली!

याप्रमाणें यजमानापासून तों हुजऱ्यापर्यंत प्रत्येक असामी निशेंत मेल्यासारखा होऊन पडल्यावर जोहरा हिनें आपले खिशांतला तीक्ष्ण धारेचा चाकू काढिला, आणि खान व त्याची शेलकी दोस्तमंडळी यांच्या नाकांवरून त्याची पात सपासप फिरवून, त्या बिचाऱ्या दाईनें भविष्य केल्याप्रमाणें खरोखरच करून दाखविलें! आणि

मशालजींच्या दिवळ्या भिंतीशीं पाजळत पडल्या होत्या त्यांच्या काजळानें त्या सर्वांचीं तोंडें माखलीं, आणि एका कागदावर पुढील मजकूर लिहून ठेवून ती तेथून चालती झाली. तो मजकूर असा:—

"आजपर्यंत आपल्या दर्ज्यास न शोभणारे असे हलकट व कपटाचे डाव खेळून, मला फांसांत अडकविण्याचा प्रयत्न करून जो माझा छळ केला, त्याचें हें फळ नुसत्या नाकावरच गेलें, व तोंड काळें झालें. यापुढें आणखी माझा पिच्छा पुरवाल तर मात्र खचीत महाल सोडाल आणि कबरस्थान जोडाल!"

नंतर जोहरा लागलीच नजरबागेंतील आपल्या बिन्हाडीं येऊन जाम्यानिम्यानिशीं तत्काळ घोड्यावर स्वार झाली, आणि घोड्यास टांच देऊन उजाडायाला खोतानच्या सर-हद्दीपार निघून गेली!

भाग सोळावा.

—:*:—

जोहरा इचा इस्तंबूल शहरांत प्रवेश आणि बादशहाचे दरबारीं सन्मान.

समयोचित वचन जना शोभे बहु गुण तयांत जरि नसती!

इकडे खान व त्याची दोस्तमंडळी दुसरे दिवशीं सकाळीं निशा उतरल्यावर पाहतात तों आपलीं तोंडें काळीं झालीं असून नाकें छाटलीं गेल्यामुळें रक्तबंबाळ झालेलीं आहेत असें त्यांना दिसून आलें. तसेंच जोहरा हिनें लिहून ठेविलेला कागद पाहून, त्या सौदागराच्या पोरानें आप

णांला कसें फसविलें व या कामांत आपली कशी पुरी फजिती उडाली, हे विचार त्यांच्या मनांत येऊन त्या सर्वांस पराकाष्ठेचें वाईट वाटलें. पण आतां यापुढें त्यांच्याशी आम्हांस कांहींएक कर्तव्य उरलें नाहीं; तेव्हां त्यांना केल्या कृत्याचा पश्चात्ताप करण्यास, त्याचप्रमाणें आपली काळीं तोंडें उजळ करण्यास व नाकें दुरुस्त करण्यास लावून आपण आपल्या चरित्रनायिकेच्या पुढील हकीकतीस सुरुवात करावी हेंच बरें दिसतें.

जोहरा ही खोतानची सरहद्द ओलांडून निघाल्या दिवसापासून तिला बहुतेक अनुकूळ ग्रहच येत चालले. तिनें इस्तंबूलच्या राज्याचा इतिहास वाचलेला होता, त्यावरून तो मुल्ख मोठा आबादानीचा असून तेथील राज्यरीति कित्ता घेण्यासारखी आहे व तेथें राज्य करीत असलेला बादशहा तर सद्गुणांचा केवळ पुतळा आहे, अशी ख्याति असलेली तिच्या स्मरणांत होती. तेव्हां अशा चांगल्या ठिकाणीं जाऊन चार दिवस राहिल्यानें अनेक प्रकारच्या, अनेक ठिकाणच्या आणि अनेक धंद्यांच्या लोकांच्या गांठी पडून, बहरामाचा शोध लावण्याचा जो आपला मुख्य हेतु, तो साधण्याच्या कामीं आपल्याला कांहीं साहाय्य मिळण्याचा संभव आहे असें तिला वाटलें. तेव्हां कसें तरी करून इस्तंबूल आधीं गांठावयाचें हा मुख्य उद्देश तिनें मनांत धरिला.

आतां या प्रवासांत जोहरा हिला ह्मणजे हालवनवास व संकटें कांहींच भोगावीं लागलीं नाहींत असें नाहीं. पण पूर्वीच्या मानानें तीं पुष्कळच सौम्य प्रकारचीं असून,

त्यांतून ती झराझर पार पडून थोडक्याच दिवसांत इस्तंबूल शहरास जाऊन पोहोंचली. याच्यासारखीं भव्य व सुंदर नगरें पृथ्वीच्या पाठीवर हाताच्या बोटांइतकींही नाहींत असें जोहरा हिला ऐकून माहीत होतें. पण प्रत्यक्ष पाहण्यांत व ऐकण्यांत महदंतर असतें याविषयीं जोहरा हिची या प्रसंगीं बालंबाल खात्री झाली ! तें शहर पाहून ती अगदीं चकित होऊन गेली. फार काय सांगावें ? काळोखाच्या खोलींतून बाहेर येऊन सूर्याकडे पाहिलें असतां जसे डोळे दिपून जातात, त्याचप्रमाणें जोहरा हिची क्षणभर स्थिति होऊन गेली ! असो. या ठिकाणीं केवळ मुशाफर लोकांच्या उपयोगाकरितां ह्मणून मुद्दाम दहा वीस इमारती सरकारानें निरनिराळ्या महल्यांत बांधिलेल्या असून त्यांच्या व्यवस्थेचा सर्व खर्च सरकारी तिजोरींतूनच होत असे. अशा एका इमारतींत ह्मणजे सराईत हा वेषधारी मुशाफर जाऊन उतरला. कर्मधर्मसंयोगानें असें झालें कीं, त्या दिवशीं वरील सराईत या मुशाफराखेरीज दुसरा कोणी उतरला नसल्यामुळें, तेथील नोकरचाकर लोकांचे याच्याकडेच सहजीं लक्ष लागून राहिलें. त्या लोकांनीं आजपर्यंत सरकारी हुकुमाप्रमाणें अनेक मुशाफरांची सरबराई ठेविली होती. पण अशा प्रकारचा उमदा मुशाफर पूर्वी कधींही त्यांच्या पाहण्यांत आलेला नव्हता. याला पाहून, हा कोणी मोठ्या कुळांतला राजबिंडा शहर पाहण्याच्या उद्देशानें साधा मुशाफरी वेष घेऊन आलेला आहे, असें त्यांस वाटलें. त्यांतूनही त्याचा तो अत्यंत सुंदर गौरवर्ण, उदार व

देखणा चेहरा, बोलण्याचालण्यांतील खुबी व भारदस्तपणा, आणि सौम्य, साधी व सभ्यपणाची वागणूक पाहून तर, याला कोठें ठेवूं आणि कोठें न ठेवूं असें त्यांना होऊन गेलें! शिवाय त्या लोकांची आपले ठिकाणीं विशेष आस्था पाहून, या मुशाफरानें त्या नोकरांपैकीं प्रत्येकास चिरीमिरीकरितां म्हणून एक एक होन त्यांच्या अंगावर टाकून दिला. तेव्हां तर ते इतके पराकाष्ठेचे खूष होऊन गेले कीं, 'यजमान मिळावा तर जन्मोजन्मीं असा मिळावा; नाहीं तर रोजच्या रोज येथें शेंकडों भुक्कड लोक येऊन जातात—त्यांची हवी तशी सरबराई करा, खाण्यापिण्याची कितीही व्यवस्था ठेवा—पण आम्हां गरीब नोकरांना बक्षिशी म्हणून एक कपर्दिक देतील तर हराम!' असे उद्गार त्या सर्वांच्या तोंडांतून निघाले.

ज्या सराईत हा वेषधारी मुशाफर उतरला होता, ती चमेली नांवाच्या चौकामध्यें असून राजवाडयानजीक असल्यामुळें, तीवरून दरबारचे अमीरउमराव व लहानमोठे सरकारी कामगार यांची जाण्यायेण्याची एकसारखी मोठी रहदारी असे. तेव्हां या तरुण प्रवाशाच्या अलौकिक गुणांचें वर्णन जें वरीलप्रमाणें तेथील नोकरचाकरांनीं चालविलें होतें, त्याची वार्ता चोहोंकडे पसरून, हा लोकोत्तर पुरुष आहे तरी कसा तो एकवार पहावा म्हणून त्याजकडे लोकांच्या झुंडींच्या झुंडी जाऊं लागल्या; व हें प्रकरण इतकें माजलें कीं, एखाद्या देवाचा उत्सव चालला असतां त्याच्या दर्शनास ज्याप्रमाणें कोणीही गेल्यावांचून रहात

नाहीं, त्याप्रमाणें अगदीं गरीबगुरिबापासून तों मुख्य वजिरापर्यंत प्रत्येकजण तेथें गेल्यावांचून राहिला नाहीं ! यांत आणखी सांगण्यासारखी गोष्ट अशी झाली कीं, ह्या कारणामुळें बादशहाचा दरबार नेमल्या वेळीं भरावयाचा तो देखील त्या दिवशीं तसा भरला नाहीं ! याच्या कारणाची चौकशी करितां, हा सर्व प्रकार वजिराचे तोंडूनच बादशहाच्या कानीं गेला. त्यावरून त्यालाही मोठें आश्चर्य वाटून, तो मुशाफर आह्मांस तरी एकदा पाहूं द्या, असें त्यानें वजिरास म्हटलें. वजिरानें, फार उत्तम आहे, हुकूम होईल तर आतांच त्याला आणवितों, असें बादशहास ह्मटलें. तेव्हां बादशहा अंमळ विचार करून म्हणतो, ' हो, पण मला वाटतें आतां संध्याकाळ झाली आहे, तर हें काम उद्यांवर टाकावें हें बरें. येवढें ज्याच्याकडे लोकांचें लक्ष लागलें तो विलक्षण माणूस कसा आहे तो पाहण्याची संधी राणी लोकांसही दिली पाहिजे. करितां पडद्याआड जनानखाना बसवितां येईल, अशी उद्यांचे दरबाराची व्यवस्था ठेवा. '

वजिरानें बादशहाच्या हुकुमाप्रमाणें दुसरे दिवशीं सर्व तजवीज केली. तेथें अशी चाल होती कीं, जे कोणी मुशाफर येत त्यांची नुसती सरबराईच ठेवण्यांत येत असे असें नाहीं; तर ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें प्रत्येकास पोषाखही मिळत असे. तेव्हां वजिराचे हुकुमावरून जो कामगार या वेषधारी मुशाफरास उद्यांचें आपणांस दरबारचें बोलावणें आहे ह्मणून सांगण्यास गेला, तो मोठा चतुर असल्यामुळें त्यानें एकंदर परिस्थिति लक्षांत आणून या

मुशाफरास बहुमोल पोषाख देण्याची अगोदरच तजवीज केली. उद्यां आपल्याला दरबारचें बोलावणें असल्याचें त्या कामगाराच्या तोंडून ऐकिल्यावरून जोहरा हिच्या मनांत नानाप्रकारचे तरंग आले. ती आपल्याशीं ह्मणते, 'अगोदर आपल्याला दरबारचें बोलावणें येण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. बरें, तें आलें आहे त्याअर्थी आपल्याला गेलें हें पाहिजेच! पण गेल्यावर तेथें कोणता नवीन प्रकार होतो भगवान् जाणे! कांहीं होवो, पण खोतानच्यासारखें येथें कांहीं विलक्षण संकट आपणावर येण्याचा संभव दिसत नाहीं. कसेंही असो, कोणीकडून तरी बहरामाचा शोध लावण्याचा जो आपला प्रवास करण्याचा हेतु, त्यास व्यत्यय न येवो ह्मणजे झालें!'

दुसरे दिवशीं तिसरे प्रहरीं जोहरा हीस दरबारास घेऊन जाण्याकरितां अदले दिवशींचाच कामगार वाजिरानें पाठवून दिला. त्यानें दोनप्रहरींच तिजकडे पोषाख रवाना केला असून तो पोषाख—मंदील, झगा, तुमान वगैरे—तिनें मोठ्या ठाकठिकीनें व ऐटीनें चढवून शिवाय कमरेस आपली तरवारही लटकावून दिली होती. याप्रमाणें आपण आल्याबरोबर हा तरुण मुशाफर अगदीं तयार असलेला पाहून कामगारास मोठें कौतुक वाटलें. त्याचा घोडा धरण्याकरितां दोन शिपाई तयार होते. पण त्यांची त्यास अर्थातच गरज लागली नाहीं. असो; तो कामगार या मुशाफरास घेऊन राजवाड्याच्या दरवाज्यापाशीं पोहोंचतो तों तेथें दुसरे दोन कामगार उभे होते,

त्यांनीं तो घोडयावरून उतरतांच त्याच्या दोहों बाजूंस होऊन दरबारचे दिवाणखान्यांत त्यास नेलें. आंत शिरतांना हातांत नंग्या समशेरी लख् लख् लख् करीत असलेले शिपाई दोहों बाजूंस पाहून या तरुण मुशाफराची गाळण होते कीं काय, असें दरबारच्या मंडळीस वाटलें. पण तसें कांहींएक न होतां याचा शिपाईबाणा व दिलदार आणि खुलास चेहरा पाहून त्यांनीं त्याचें मोठें अभिनंदन केलें. मग वजिरानें त्याला नेमल्या जागीं बसविल्यावर दहा पांच पळांतच बादशहाची स्वारी आली; त्याबरोबर खडी ताजीम झाली, व सर्वांचे मुजरे घेत घेत खासास्वारी सिंहासनावर जाऊन बसली.

बादशहा सुमारें साठीच्या उमरींत असून मोठा धिप्पाड, भव्य व तेजस्वी पुरुष होता. त्याची बोलण्याचालण्याची ढब फार मनोहर असून मुद्रा गंभीर पण आनंदी होती. आजच्या दरबारचे कामकाजाचा मुख्य विषय हा ह्या मुशाफराच्या संबंधाचाच असल्यामुळें बादशहानें प्रथमच वजिरास म्हटलें, ' काल ज्यांची एवढी तारीफ चालली होती तेच का हे छोटे मुशाफर ?' हे बादशहाच्या तोंडचे शब्द ऐकतांच या वेषधारी मुशाफरानें पुनः बादशहास तीन वेळ लवून मुजरा करून, बिलकुल न कचरतां मोठ्या अदबीनें उत्तर केलें, ' जी सरकार, हाच आपला बंदा गुलाम आपल्या चरणधुळीचा स्पर्श करण्यास हुकुमाप्रमाणें हजर झाला आहे.' हें ऐकून बादशहानें किंचित् हास्य करून म्हटलें, ' ठीक; तुमचा देश, पेष वगैरेची हकीकत

आह्मांस थोडक्यांत सांगा पाहूं ? ' मुशाफर फिरून एकवार लवून मुजरा करून उभा राहून उत्तर करितो, ' राजाधिराज, हा आपला दास बगदाद शहरचा रहाणवाला आहे. आमचे घरीं जवाहिराचा व्यापार आहे. तेथें हा व्यापार करणारे अनेक धनाढ्य व्यापारी आहेत. त्यांपैकीं माझा बाप व त्याचे तिघे स्नेही यांच्या मनांत कित्येक मोठमोठ्या शहरीं पेढ्या स्थापन कराव्या असें आल्यावरून, माझ्या बापानें मला व त्या तिघांनीं आपआपल्या एक एक मुलास असे चौघांस थोडथोडें द्रव्य बरोबर देऊन, कित्येक नामांकित शहरांची हालहवाल पाहून माहिती मिळविण्याकरितां देशावरावर पाठवून दिलें. आम्ही कांहीं दिवस चौघेजण एकत्र फिरलों. पुढें एकजण डमास्कस येथें व दुसरा बसरा येथें राहिला. नंतर बाकीचे आम्ही दोघेजण केरो शहरीं गेलों. तेथें आह्मी कांहीं दिवस राहिल्यावर, सरकारच्या या राजधानीचा मोठा लौकिक ऐकून येथें येण्याची मला फार उत्कंठा लागली; व माझ्या सोबत्याचें मन केरो येथें फार रमल्यामुळें तो तेथें राहून गेला, आणि मी इकडे एकटाच आलों. आतां चार आठ दिवस येथें राहून केरोस फिरून जाण्याचा माझा बेत आहे. येथें आल्यापासून मला फारच आनंद झाला. पण त्यांतही विशेषतः महाराज सरकारच्या चरणदर्शनाचा जो अकल्पित अलभ्य लाभ झाला, त्याच्या योगानें तर माझ्या आनंदास पारावार नाहींसा झाला आहे!'

याप्रमाणें जोहरा हिनें आपल्याकडून आपण घेतलेल्या सोंगाची अगदीं बेमालूम बतावणी केली

खरी, परंतु तिनें सांगितलेली हकीकत ऐकून बादशहाचें नीटसें समाधान झालें नाही. सबब त्यानें तिला उलटसुलट प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. बादशहा ह्मणतो, 'पण कायहो साहेब, तुमचें वय तर अगदीं थोडें—सोळा सतरा वर्षांचें—दिसतें. असें असतां तुम्ही अगदीं एकटे इतक्या दूर कसे आलां याचें आम्हांस मोठें नवल वाटतें.!' हा वेषधारी मुशाफर उत्तर करितो, 'राजाधिराज, मजसारख्या अल्पवयी मुलानें आपल्यासमोर याचें समर्पक उत्तर दिलें असतां 'लहान तोंडीं मोठा घास' घेतल्यासारखें होणार आहे. पण गोष्ट निघालीच त्याअर्थी सुचलेले दोन शब्द बोलणें जरूर आहे. सरकार, घरची संपन्न स्थिति असली तरी आयत्या पिठावर रेघा ओढीत बसून ऐषआराम भोगणें हें पुढील अवनतीचें लक्षण होय. वाडवडिलांनीं कष्ट करून जी संपत्ति मिळविलेली असते, तसेच कष्ट मुलांनींही सोसून ती वृद्धिंगत केली तरच त्यांत पुरुषार्थ असून कुलाचीही उन्नति पिढ्यानपिढ्या होत जाणारी आहे. मुलगा लहान, सुकुमार, म्हणून त्याला योग्य शिक्षण न देतां, तसेंच योग्य वेळीं व्यायाम, प्रवासादिकांचे वाजवी कष्ट करावयास न लावतां, त्यांना एकसारखें चांगलेंचुगलें खायाला मात्र घालून व गाद्यातक्यांशीं लोळूं देऊन, पोशे, आळशी व अशक्त करून ठेवणें यासारखा आईबापांचा दुसरा कोणताच वेडेपणा नाहीं! शिवाय मुलांनींही पण समजूं लागल्यापासून, चार लोक कसे वागतात, कोणाला कशानें सुस्थिति किंवा दुःस्थिति आली, याचा विचार

करून, आईबापांनीं जरी लाडिकपणा केला तरी त्याच्या मोहांत न पडतां स्वतःचे बुद्धीचा अंकुर चालवून आपली शारीरिक व मानसिक उन्नति करून घेतली पाहिजे, आणि सर्व प्रकारची व्यवहारदक्षता संपादन केली पाहिजे. मी अल्पवयी असून घरच्या स्थितीच्या मानानें पहातां मला बाहेर जाऊन उन्हाचा कवडसाही घेण्याची गरज नाहीं. पण असें आहे ह्मणून माझ्या आईबापांनीं माझे भिकार लाड न करितां मला योग्य शिक्षण देऊन प्रवास वगैरेच्या कष्टांतही घातलें, हें मी आपलें मोठेंच भाग्य समजतों; आणि मला स्वतःलाही खरोखर या गोष्टीचा किती आनंद वाटतो तें माझें मलाच माहीत ! संपन्न स्थितींतल्या इतर कित्येक लोकांच्या फाजील लाडक्या मुलांच्या स्थितींत व यांत केवढें महदंतर आहे ह्मणून सांगूं!'

ह्या वेषधारी मुशाफराचें या संबंधानें आणखी पुढें व्याख्यान चालणार होतें, पण झालें तेवढेंच ऐकून दरबारची मंडळी चकित होऊन, आश्चर्य प्रदर्शित करण्याकरितां एकमेकांचे कानाशीं लागूं लागली. त्याचप्रमाणें ह्या मुलगा जसा दिसण्यांत सुघड तसाच बोलण्याचालण्यांतही मोठा सुगर असून त्याची समयसूचकता व सभाधीटपणा विशेषच आहे, अशी बादशहाचीही खातरी झाली. तेव्हां त्यानें त्यास, 'ठीक! ठीक!' 'शाबास!' असें म्हणून तो विषय तितकाच ठेवून पुढें त्यास म्हटलें, 'बरें, आतां मी तुम्हांस असें विचारतों कीं, तुम्ही येथें राहणार किती दिवस ? व येथें असाल तोंपर्यंत रोज थोडा वेळ

आमच्या दरबारीं येऊन आम्हांला करमणूक करीत ज[illegible] कीं नाहीं?' हें ऐकून या मुशाफरानें फिरून एकवार अत्यं[illegible] नम्रतापूर्वक मुजरा करून बादशहास म्हटलें, 'महाराज, हे काय विचारावें! आपल्या चरणदर्शनाचा लाभ मजसारख्यास केवळ अपूर्व असून, तो आज होऊन फिरूनही मी सात आठ दिवस राहणार तोंपर्यंत आणखी रोजच्या रोज होणार, हें पाहून मला किती आनंद होत आहे तें बोलून दाखविण्याची मला वास्तविक शक्ति नाहीं!' हें ऐकून बादशहास हसूं आलें, व वजिराकडे वळून तो म्हणतो, 'ओहो! लडका बहुत हुशार आणि बोलण्यांत तरी किती मिठ्ठा हो!' वजिरानें मान डोलवून उत्तर केलें, 'खरेंच, खावंद! हा एक अजब प्रकारच आज आपल्या दृष्टीस पडला यांत संशय नाहीं!'

आतां हा मुलगा भाटासारखा मोठमोठ्या गोष्टी बोलतो, पण याची कुवत आणि धैर्य कितपत आहे याची चांचणी पहावी ह्मणून बादशहानें त्यास ह्मटलें, 'साहेब, वास्तविक पुसाल तर तुमच्यावर आमचा लोभ जडला आहे, तेव्हां तुम्ही आमचा हुकूम होईपर्यंत येथून जातां कामा नये.' यावर हा वेषधारी मुशाफर उत्तर करितो, 'सरकारचा मज गरिबावर लोभ जडला हें माझें परमभाग्य होय. तसेंच सरकारचे हुकुमावांचून मला येथून जातां येत नाहीं हेंही उघड आहे. असें जरी आहे, तरी बेअदबीची माफी मागून स्पष्ट सांगतों कीं, मला माझ्या कर्तव्याची किंमत सर्वांहून अधिक आहे. तेव्हां या ठिकाणीं

राहणें जरी मला मोठ्या संतोषाचें, सुखाचें, व सन्मानाचें आहे, तरी जरूर असल्यापेक्षां उगीच परपिंडपुष्ट होऊन माशा मारीत राहणें मला बिलकुल पसंत नाहीं! यासाठीं माझ्या ठरल्या दिवसांपेक्षां मी येथें पळभरही राहणार नाहीं, व सरकारही मला वाटेल त्या वेळेस मेहेरनजरेनें परवानगी देण्यास अनमान करणार नाहींत अशी मला उमेद आहे. त्यांतूनही मी कांहीं वास्तविक या सरकारचा बंदा नाहीं—मी स्वतंत्र आहें—हीही गोष्ट सरकारांनीं ध्यानीं आणली पाहिजे!' हें नम्र पण निस्पृहतेचें भाषण ऐकून बादशहास राग तर आला नाहींच, पण तो आश्चर्यचकित फार झाला. तो हळूच ह्मणतो, 'वाहवा! याच्या बोलण्यांत मिठास बहुत हें खरें, पण त्यांतल्या त्यांत तें आणखी मिरचीसारखें तिखटही आहे!' मग आणखी एकवार त्याची कसोटी पाहण्याकरितां ह्मणतो, 'पण कायहो, तुम्ही खरोखर स्वतंत्र आहां तरी एका दृष्टीनें परतंत्रही आहां. समजा कीं, आमचे दरवाज्यावरील समशेरवाले जवान अरब तुम्हांस येथूनचं जाऊं न देतील तर तुम्ही काय कराल?' मुशाफर उत्तर करितो, 'सत्तेपुढें शहाणपण नसून जबरदस्तीनें अटकाव केल्यास माझें काय चालणार आहे?' मग मोठा आविर्भाव आणून व तरवारीच्या मुठीवर थाप मारून आवेशयुक्त स्वरानें ह्मणतो, 'पण कांहीं झालें तरी मला अटकाव करण्याची आधीं कोणाची मगदूर नाहीं; आणि तसाच प्रसंग आला तर मी कोणाच्या जिवंत हातीं लागणार नाहीं! अटकाव करण्याला जे कोणी सरसावतील, त्यांपैकीं पांच चार

जणांस तर अगोदर या समशेरीनें ठंबे करून सोडीन—मग पुढें अल्लाचे मनांत काय असेल तसें होईल!

हें विलक्षण व पराकाष्ठेचें आवेशयुक्त भाषण ऐकून बादशहा व सर्व सभाजन स्तब्ध होऊन गेले; व आपण उगाचि या मुलाची एवढी कसोटी लावून याला शिणविलें, असें बादशहास वाटलें; आणि त्याच्या अंगचे अलौकिक गुण पाहून त्याचे नेत्र आनंदाश्रूंनीं भरून गेले! जनानखान्यांतील आबालवृद्ध स्त्रीसमुदाय पडद्याआड बसून हें सर्व चरित्र अवलोकन करीत होता, त्या स्त्रियांनीं तर या वेषधारी तरुण मुशाफराचें असामान्य स्वरूप, चातुर्य, व धैर्य पाहून, आणि शेवटचें केवळ वीरास योग्य असें तें मोठ्या अवसानाचें भाषण ऐकून, त्याजवरून लिंबलोण केलें! शेवटीं बादशहानें स्वहस्तें त्यास विडा देऊन दरबार बरखास्त केला.

भाग सतरावा.

—:*:—

जोहरा हिजवर विचित्र प्रसंग—राजकन्येशीं लग्न!

चातुर्य ही देणगि त्या प्रभूची ।
अत्यंत कीं होय अमोल साची ॥
योगें तिच्या या जगतांत कांहीं ।
दुर्वार ऐसें मनुजास नाहीं ! ॥

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें त्या वेषधारी मुशाफरास बादशहानें स्वतः विडा दिला हें पाहून दरबारच्या व इतर लोकांत त्या गोष्टीची फार चर्चा सुरू झाली. याचें

कारण असें कीं, अशा प्रकारचा मान बादशहाकडून क्वचितच कोणास मिळणारा असून तो ज्याअर्थी ह्या तरुण रूपसंपन्न व चलाख बुद्धीच्या पोरानें सहज पटकावला, त्याअर्थी ही लवंगी मिरची कोठें कोठें उधळेल व कोणा कोणाला त्राहि त्राहि करून सोडील याचा नेम नाहीं, असें सर्वांना वाटलें. त्यांना भय पडलें कीं, बादशहाची याजवर बहाल मर्जी झाली आहे, तेव्हां याचा दरबारांत शिरकाव झाल्यास हा आपल्या अचाट बुद्धीनें सहज एखाद्याची पथारी वर करील किंवा कदाचित् कोणाला वैभवासही चढवूं शकेल. पण यांपैकीं दुसरी गोष्ट बहुधा होण्याचा कमी संभव—पहिलीचा मात्र संभव जास्त—असें जगाच्या रहाटीच्या अनुभवावरून अनुमान करण्यास हरकत नाहीं. तेव्हां या वाघाच्या पिलाचा उपद्रव आपल्याला होऊं नये म्हणून पुढें कशी काय तजवीज करावयाची याचा त्या लोकांनीं आपसांत विचार चालविला. पण हा विचार फारसा करण्याचें त्यांना कारणच पडलें नाहीं; कां कीं, त्या तरुण मुशाफराची अगदीं विलक्षण व निराळ्याच रीतीनें व्यवस्था लागली !

बादशहास नूरमहाल नांवाची एकुलती एक कन्या होती. 'नूरमहाल' या शब्दाचा अर्थ 'प्रासाददीपीका' असा असून ती आपल्या नांवाप्रमाणें खरोखरच केवळ सौंदर्याची पुतळी होती. अदले दिवशीं दरबारांत झालेला सर्व प्रकार पडद्याआड बसून जनानखान्यांतील एकंदर स्त्रिया पहात होत्या, त्यांत ही रूपसुंदरी नूरमहालही अर्थात् होतीच. ती

चौदा पंधरा वर्षांची असून बापाची फार लाडकी होती. तिचें लग्न व्हावयाचें असून तिला जो वर योजावयाचा तो तिला अनुरूप असावा अशी तर बादशहाची इच्छा होतीच, पण तिला स्वतःलाही तो पसंत करण्याची संधी मिळाल्यास फार बरें, अशीही आणखी त्याची इच्छा होती. तथापि त्या लोकांतील रिवाजाप्रमाणें लग्नापूर्वी नवरानवरीची दृष्टादृष्ट होण्यास मार्ग नसल्यामुळें, वर सांगितलेली पसंतीची गोष्ट कशी घडून यावी हा मोठा प्रश्नच होता. अशा स्थितींत, नूरमहाल हिनें अदले दिवशीं त्या वेषधारी तरुण मुशाफराचें स्वरूप व एकंदर चरित्र पाहिल्यापासून त्याजवर तिचें इतकें मन बसून गेलें कीं, पति असावा तर असाच असावा—नव्हे, हाच असावा—नाहींपेक्षां मुळींच नको, असें तिच्या मनानें पक्कें घेतलें. पण ही गोष्ट घडून येणें दुरापास्त आहे हेंही ती जाणून होती; कारण हा मुशाफर किती झाला तरी सामान्य मनुष्य असल्यामुळें, राजघराण्याशीं त्याचा शरीरसंबंध होण्याचे बाबतींत मोठ्या बलवत्तर अडचणी चोहोंकडून येण्याचा संभव आहे, हें तिला ठाऊक होतें. तेव्हां आपल्या मनांतील गोष्ट कोणापाशीं काढली असतां तिचा कांहींएक उपयोग होणार नाहीं असें पाहून, ती राजकन्या त्या वेळेपासून मनांतल्या मनांत झुरत राहिली होती. त्या रात्रीं ती जेवली नाहीं, व तिचें अंगही मोडून आलें; आणि सारी रात्र तिला ताटकळ पडली. दुसरे दिवशीं सकाळपासून तर तिची प्रकृति फारच बिघडली. तेव्हां असा एकाएकीं अनिष्ट

प्रकार कां घडला, याची अर्थातच चौकशी सुरू झाली. बायामीणसांनीं नूरमहाल हिला विचारपूस केली, पण आपल्या मनांतील गोष्ट यांना सांगून काय उपयोग ? असें समजून तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. शेवटीं खुद्द तिच्या आईनें तिला परोपरी आळवून विचारिलें असतां तिनें इतकेंच ह्मटलें कीं, 'आई ग, तूं मला इतकें खोदून खोदून विचारतेस, तर मी तुला एकच सांगतें कीं, याचें उत्तर जें काय सांगणें तें एकांतीं बाबांच्या समक्ष मी तुझ्या कानांत सांगेन; कारण याची निरनिराळी वाच्यता करण्यापासून कांहीं उपयोग नाहीं. तुझ्या तोंडून बाबांचे कानावर ती गोष्ट जाऊन, त्याच वेळीं सर्व प्रकार लक्षांत घेऊन बाबाच जर मनावर घेतील तर या कामीं कांहीं उपयोग झाला तर होईल; नाहींपेक्षां माझ्या जिवाची आशा तूं सोडून दे !'

हें मुलीचें संदिग्ध व निर्वाणीचें भाषण ऐकून राणी फार घाबरून गेली, व तिनें लागलीच बादशहास बोलावणें पाठविलें. त्याला मुलीचे आजाराची कांहींच माहिती नसल्यामुळें, एकाएकीं तिची अशी अवस्था झालेली पाहून तोही घाबरून गेला. त्यानें मुलीचे तोंडावरून हात फिरवून मोठ्या उत्सुकतेनें तिला विचारिलें, 'बेटा, तुला असें काय झालें ? तुला काय पाहिजे ? लवकर बोल—अगदीं संकोच करूं नको !' त्यावरून नूरमहाल आईचे कानाशीं लागून हळूच म्हणते, ' दुसरें कांहीं नाहीं. या गोष्टीच्या मुळाशीं तो कालचा मुशाफर आहे. त्यास

पाहिल्यापासून त्याजवर माझें पराकाष्ठेचें प्रेम बसलें असल्यामुळें, माझ्या विवाहाची जी तुम्हांस काळजी लागून राहिली आहे, ती कोणत्या ना कोणत्या प्रकारें तुम्हांस सोडून देण्याचा प्रसंग आला आहे. एवढेंच सांगतें कीं, माझ्या जन्माचें धडभलें करण्याच्या हेतूनें जर तुम्हांस यत्न करावयाचा असेल, तर तो आतांच्या आतां व येथल्या येथेंच करा म्हणजे झालें. मला माझ्या मनासारखा पति मिळावा अशी तुमची इच्छा आहे, तर तो मुशाफरच मला मानवला असून त्याव्यतिरिक्त—विशेष तें काय सांगूं—मी आपली अविवाहितच राहीन तें मला पुरवलें, हीच शेवटली खूणगांठ समजा !'

नूरमहाल ही मर्यादेस्तव हे वरील शब्द आईचे कानाशीं लागून बोलली, तरी पण बादशहाचें तिकडे पूर्ण लक्ष असल्यामुळें त्यांतील मुद्दा त्याच्या स्पष्ट लक्षांत आला. तो दुःखाचा सुस्कारा टाकून मनांत ह्मणतो, 'ही तर मोठी विचाराची व अडचणीची गोष्ट आहे. तो मुशाफर कितीही शहाणासुरता असला तरी त्याची व आपली पदवी समान नसल्यामुळें, आम्ही त्याला जांवई कसा करावा ! बरें, न करावा तर हिचा हट्ट पडला जबरदस्त ! पण तसें नको, तो मुशाफर मोठा विलक्षण माणूस आहे. तेव्हां तो अगोदर या गोष्टीस कबूल होईल कीं नाहीं याचा वानवा आहे. कबूल न झाला तर सर्वच आटपलें. मग मुलीची आपण समजूत करून तिच्या मनांत भरलेला हा विचार सहज काढून टाकूं.' नंतर मुलीस म्हणतो, 'बेटा, कांहीं

चिंता नाहीं. तूं काळजी करूं नको. मी आतांच वजिराला त्या मुशाफराकडे पाठवितों, आणि त्याचा जबाब आणवितों.' असें ह्मणून बादशहा उठून गेला. त्यानें मुलीस सांगितल्याप्रमाणें वजिरास मुशाफराकडे पाठविलें. पण आपल्या अडचणी त्यास सांगून, होतां होईल तों हें प्रकरण ढांसळून पडेल असेंच करण्याविषयीं त्याला आंतून त्यानें बजावून ठेविलें.

बादशहाच्या हुकुमाप्रमाणें वजिरानें मुशाफराकडे जाऊन त्याला आपल्या धन्याचा मनोदय कळविला. त्याला वाटलें होतें कीं, अभाग्याच्या घरीं कामधेनु आपण होऊन आली असतां तो जसा अत्यंत उत्सुकतेनें तिचा स्वीकार करीलच करील, तद्वतच हा प्रकार होणार आहे. पण ही त्याची समजूत अर्थातच खोटी ठरली. मुशाफरानें त्यास साफ नकार दिला इतकेंच नव्हे, तर आणखी अशी एक बाब झोंकून दिली कीं, हा योग जुळून येण्यास त्या योगानें बळवत्तर अडचण यावी! तो वजिरास ह्मणतो, ' साहेब, माझा या ठिकाणीं येण्याचा उद्देश कोणता हें आपणांस काल दरबारांत विदित झालेंच आहे. त्या उद्देशाप्रमाणें मला आपलें काम बजावून लवकर परत निघून गेलें पाहिजे. शिवाय अनायासें मजसारख्यास बादशहाची कन्या प्राप्त होणें म्हणजे खरोखर एखाद्या भिकाऱ्यास कल्पवृक्षच भेटल्याप्रमाणें जरी आहे, तरी या मोहांत पडून मी आपल्या वडिलांचे संमतीवांचून या बाबतींत कांहींएक करूं शकत नाहीं. खेरीज आणखी एक मोठी मुद्याची गोष्ट या प्रसंगीं आपणांस उघडपणें

मला सांगितली पाहिजे. ती ही कीं, आमचा आज कित्येक पिढ्या जरी जवाहिराचा व्यापार आहे, तरी मूळचे आम्ही तांबोळी आहों, ही गोष्ट अगोदर आपण सरकारचे कानावर घालावी; ह्मणजे या शरीरसंबंधाचे बाबतींत पुढें बोलायालाच नको, असें त्यांच्या लक्षांत तेव्हांच येऊन चुकेल !' हें त्या वेषधारी मुशाफराचें भाषण ऐकून वजीर पुढें कांहीं एक न बोलतां तसाच परत बादशहाकडे येऊन झालेला वृत्तांत त्यानें त्यास निवेदन केला. बादशहानें तो ऐकून घेऊन, बरें झालें, औषधावांचून खोकला गेला, असें मनांत ह्मटलें; व अशा स्थितींत ही गोष्ट घडून येणें शक्य नाहीं अशी मुलीची समजूत घालण्याकरितां तो तिजकडे निघून गेला.

इकडे या वेषधारी मुशाफरासही वाटलें कीं, इतक्यावर आतां आलेलें विघ्न बहुधा टळेल अशी आपण आपल्याकडून तर खूब शक्कल लढविली आहे. याउपर आपल्या नशिबाचे काय ताले आहेत कोणाला ठाऊक! बादशहानें आपली मुलगी नूरमहाल हिची समजूत घालून तिनें मनांत आणलेल्या गोष्टीपासून तिचें मन फिरविण्याविषयीं होता तितका यत्न केला. तो तिला ह्मणाला, ' कांहीं असलें तरी आपली पदवी व कुलशील यांचा आपण विचार केलाच पाहिजे. तो न करितां आपण भलताच हट्ट घेऊन एखाद्या कामास प्रवृत्त होणें चांगलें नाहीं. यांत आपल्यासारख्याला फार कमीपणा असून, अशा प्रकारें हट्टास पेटून अविचारानें केलेल्या कृत्याचा परिणामही बहुधा चांगला होत नाहीं, अशीं शेंकडों

उदाहरणें दृष्टीस पडतात. तर बेटा, तूं या गोष्टीचा नाद अगदीं सोडून दे कसा पाहूं? तूं शहाणी आहेस, विचारी आहेस, तुला बरें वाईट सर्व समजतें. तेव्हां याहून जास्त तुला सांगण्याची जरूर आहे असें मला मुळींच वाटत नाहीं!' हें ऐकून नूरमहाल ही बादशहास कांहींएक उत्तर न करितां दुःखाचा मोठा सुस्कारा टाकून व तोंडावरून पांघरूण घेऊन निजून राहिली. हें पाहून बादशहास वाईट तर वाटलेंच, पण मुलीच्या एकंदर चर्येवरून, आमचा या कामीं उपाय खुंटला असें समजून ती खिन्न झाली असावी एवढेंच तो समजला, व आपुल्या मनांत होतें त्याप्रमाणें हें प्रकरण तर मिटलें, असें घेऊन तो चालला; आणि त्याच्या योगानें त्याच्या मनाला एके प्रकारें समाधानही वाटलें. तथापि मुलीची तब्यत अस्वस्थ आहे, याकरितां तिजपासून आज मुळींच हालवयाचें नाहीं, असें राणीस मुद्दाम बजावून सांगून मग तो तेथून उठून गेला. पुढें मध्यरात्रीपर्यंत कांहींएक गडबड त्याच्या कानीं आली नाहीं.

परंतु मध्यरात्र उलटते न उलटते इतक्यांत, बादशहा महालांत निद्रिस्त असतां त्याजकडे धावऱ्या धावऱ्या एक खोजा आला, व त्यास हलकेच जागें करून ह्मणाला, 'सरकार, राणीसाहेबांनीं आतांचे आतां आपणांस बोलाविलें आहे.' बादशहा त्यास विचारतो, 'अरे, एवढ्या जरूरीनें बोलवायाला आलास, तर झालें तरी काय तें सांगशील कीं नाहीं?' तो अत्यंत नम्रतेनें उत्तर करितो, 'महाराज, मला वेळ घालविण्यास बिलकुल परवानगी नाहीं. आज शहाजा-

दीच्या तब्यतीचें ठीक चिन्ह नाहीं.' हें ऐकून बादशहा तसाच उठून नूरमहाल व राणी ह्या जेथें होत्या त्या महालांत गेला. तों मुलीची प्रकृति फारच अस्वस्थ असल्याच त्यास दिसून आलें. त्या दिवशीं तिनें अन्नपाण्याला स्पर्श केला नसून बिछान्यावर एकसारखी पडून राहिली होती, त्यामुळें तिचें डोळे थिजल्यासारखे होऊन शब्द अगदीं खोल गेला होता; आणि अंगांत ताप भरला असून मधून मधून घाम येत असे, तरी ताप मुळींच कमी होत नव्हता; आणि या सर्व कारणांमुळें तिच्या तोंडावरचें तेज अगदींच कमी झालें होतें. तेथें पुष्कळ पोक्त बाया जमल्या असून त्या तिला अनेक उपचार करीत होत्या. पण ते सर्व फुकट जाऊन सर्वांची चिंता एकसारखी वाढतच जाण्यासारखी स्थिति येऊन पोहोंचली होती !

बादशहा मोठा चाणाक्ष व विचारी पुरुष असल्यामुळें, या गोष्टीचें कारण त्याच्या तेव्हांच लक्षांत आलें. त्यानें मुलीचें डोकें आपल्या मांडीवर ठेवून व तोंड कुरवाळून तिला ह्मटलें, ' बेटा, तुझ्या जिवाला जे हे कष्ट होत आहेत ते कां ह्मणून, हें माझ्या सर्व लक्षांत येऊन चुकलें, व मी आतां या संबंधानें तुला खात्रीपूर्वक सांगतों कीं, कांहीं होवो, तुझ्या मनांतील हेतु मी पूर्ण केल्यावांचून राहणार नाहीं, हें माझें वचन घेऊन तूं आतां उठून दोन घास खा कसे पाहूं ? म्हणजे तुला हुशारी वाटून हा आगंतुक आलेला शीण नाहींसा होईल.' नूरमहालही मोठी चतुर व शहाणीच होती. बादशहाच्या बोलण्याचा झोंक पाहून तिनें आपले

मनांत खूणगांठ बांधिली कीं, आतां आपला इष्ट हेतु खचीत साध्य झाल्यावांचून रहात नाहीं. मग किंचित् हास्य करून ती हलकेच उठून बसली, आणि तिनें थोडें पाणी मागितलें. पण बादशहा व राणी यांनीं, थोडें खाल्ल्या-वांचून पाणी पिऊं नको असें ह्मटल्यावरून, तिनें चार घास खाल्ले व पाणी प्याली. त्याबरोबर तिला तकवा येऊन तिची प्रकृति बहुतेक ताळ्यावर आल्यासारखी दिसली, व सर्वांची काळजी दूर झाली. नंतर बादशहा मुलीस ह्मणतो, 'बेटा, उद्यां दुपारच्या आंत तुझ्या मनाप्रमाणें कार्यभाग होण्याची मी तजवीज् लावतों बरें! तूं सर्व काळ-जी सोडून दे.' इतकें बोलून शेवटीं 'मी जाऊं तर आतां?' असें त्यानें तिला विचारिलें असतां, तिनें मर्यादेस्तव उघड न बोलतां मान हालवून त्याला जाण्यास सांगितलें.

राहिलेली सारी रात्र बादशहाची विचारांत गेली. तो मनांत म्हणतो, 'आपण पानावर पान घालून हें प्रकरण जास्त धसास न लागेल असें करूं पहात होतों, पण तसें कांहींच न होतां उलटें तें आतां गळ्याशीं लागलें खरें. असो. होणारापुढें उपाय नाहीं. मुलीच्या मनांत आलेला विचार निवळ वेडेपणाचा असून कदाचित् पुढें मागें घातकही होण्याचा संभव आहे. त्यांतही आणखी तिच्या मर्जीप्रमाणें वागल्यानें मुख्यतः आपल्या दर्ज्यास कमी-पणा येणार आहे, याला काय तोड करावी? दुसऱ्या पक्षीं, तसें न करावें तर मुलगी हातची जाते. तर या प्रसंगीं दर्जाबिर्जा एके बाजूस ठेवून मुलीचा जीव वांचविणेंच

श्रेयस्कर दिसतें. पण लोकाचाराकरितां तरी निदान आपण होऊन आपखुषीनें या गोष्टीस प्रवृत्त झाल्यासारखें बाहेरून दाखवूं नये. चार शहाणे ह्मणविणारे लोकांपुढें सर्व साधक बाधक गोष्टी मांडून, आपल्याला हवें तसें त्यांच्या तोंडून वदवून घ्यावें हाच शहाणपणाचा मार्ग होय.'

मग सकाळीं उठल्याबरोबर त्यानें मुख्य वजीर, मोठमोठे अमीरउमराव व काजी वगैरे निवडक मंडळींची सभा भरवून, त्यांत या प्रकरणाचा खल केला. पुष्कळशी भवतिनभवति होऊन शेवटीं असें ठरलें कीं, मुलगी जर हातची जात आहे, तर आपल्या पदवीचा वगैरे विचार न करितां त्या मुशाफराशीं तिचें लग्न लावून देणें हा कांहीं दोष घडत नाहीं. यास मुख्यतः काजी आडवा येईल म्हणून वाटत होतें. पण त्यानें आपली संमति दिली इतकेंच नव्हे, तर तिच्या पुष्टीकरणार्थ कित्येक दाखलेही दिले. तो म्हणाला, 'अशा गोष्टी आजपर्यंत शेंकडों मोठमोठ्या लोकांनीं केलेल्या असून, त्यांपैकीं एकीस तर आपल्या पुरातन ग्रंथाचा स्पष्ट आधार आहे. सरकार, लैली ही बादशहाची कन्या नव्हती काय ? असें असून मजनू ह्या सामान्य मनुष्याला तिनें वरिलें हें सर्वप्रसिद्धच आहे. हें ग्रंथांतरीं वाचून याला आपण कोठें नांवें ठेवितों ? तशांतलाच हा प्रकार होणार आहे. महाराज, खरें प्रेम ज्याला म्हणतात तें अगदीं अंध असून त्याच्या बाजारांत बादशहाचा मुकुट व फकिराची टोपी यांचा दर सारखाच लागतो ! तेव्हां आपण या संबंधांत किंचित्‌ही खंती न बाळगितां प्रसंगास

सादर व्हावें हेंच उचित आहे. राजाधिराज, हा एकंदर योग मोठा विचित्र रीतीनें घडून येत आहे. याचा परिणाम आपणांला हल्लीं दिसतो आहे त्याहून फारच निराळ्या प्रकारचा—अत्यंत आनंददायक—होणार नाहीं असें तरी कशावरून? अल्लाचे करणीचा कोणाला अंत लागणार आहे!'

हें त्या हुशार काजीचें भाषण ऐकून बादशहास मोठा संतोष वाटला, व लग्नाचा सर्व विधि रीतीप्रमाणें उद्यांचे उद्यांच होईल अशी तजवीज करून माझी काळजी एकदांची दूर करा, असें त्यानें काजीस सांगितलें. इतकें झाल्यावर बादशहानें मुख्य वजिरास हुकूम केला कीं, 'तुम्ही आतांचे आतां त्या मुशाफराकडे जाऊन त्याला सांगा कीं, आतां तुमचे मनांत असो कीं नसो, तुम्हांस मुलगी देण्याचा आमचा निश्चय झाला असून उद्यांचे उद्यां लग्नविधि उरकून टाकण्याचें ठरलें आहे. तुम्ही तयार असावें.' हुकुमाप्रमाणें वजिरानें त्या वेषधारी मुशाफराकडे जाऊन त्यास बादशहाचा हुकूम कळविला. तो त्यास ह्मणाला, 'ही सर्व वस्तुस्थिति लक्षांत आणून, तुम्ही आलेल्या ह्या सुप्रसंगास सादर व्हावें हेंच तुह्मांस उचित असून त्यांत तुमचें मोठें कल्याण आहे, हें तुम्हांस सांगायाला पाहिजे असें नाहीं. इतक्याउपर तुम्ही आपला स्वतंत्रतेचा बाणाच कायम ठेवून वागण्याचा हेका धराल, तर विनाकारण तुम्ही आपल्यावर संकट ओढवून घ्याल, हें खचीत समजा!' शेवटीं वजीर आणखी असेंही ह्मणाला कीं, 'परवां तुम्ही दरबारांत एके प्रकारें बोलण्यामध्यें अधिकप्रसंगच केला; पण सरकारस्वारी

त्या वेळेस मोठी खुषींत असल्यामुळें व तुमच्याविषयीं त्यांचे अंतःकरणांत तात्पुरतें वात्सल्य उत्पन्न झाल्यामुळें तो प्रसंग मोठ्या मजेनें निभावून गेला. पण आतां तसली कांहीं गडबड चालणार नाहींहो! आमचे सरकार वळले तर मेणाहूनही मऊ आहेत, नाहींपेक्षां समशेरीहूनही खडतर आहेत! ' इतकें सांगून मुशाफराच्या तोंडून काय उत्तर निघतें याची वाट न पहातां वजीर परत निघून गेला.

हा विचित्र प्रसंग आलेला पाहून जोहरा हिच्या मनाची जी कष्टमय स्थिति झाली तिचें काय वर्णन करावें! ती आपल्याशीं म्हणते, ' अहाहा! केवढा विलक्षण प्रकार तरी हा होऊं पहात आहे! जें काय आपल्याला नको तें कपाळास येत आहे! खोतानास असतां मी स्त्री आहें हें छपविण्याकरितां केवढा तरी मला अट्टहास करावा लागला! आतां त्याच्या उलट सर्व प्रकार येथें घडत आहे! कदाचित् मी स्त्री आहें हें जरी येथें प्रकट झालें असतें तरी बरें होतें, पण तोही एके प्रकारचा बोजवारच झाला असता!' असें म्हणून ती अगदीं रडकुंडीस आली, आणि म्हणते, ' हाय बहराम! तुझ्या माझ्या पाकदोस्तीचा असा परिणाम व्हावा काय, कीं तूं कोणीकडे देशोधडीं जावास आणि मी वनवासी होऊन अशीं दारुण संकटें भोगण्याची मला पाळी यावी! आतां मात्र या संकटांची परमावधि होऊं पाहत असून पुढील चिन्ह मला ठीक दिसत नाहीं!' इतक्यांत तिच्या डोळ्यांवर अंधेरी आल्यासारखें होऊन तिला किंचित् डुलकी आली, आणि तित-

क्यांत तिला स्वप्न पडलें. त्यांत कोणी मोठा तेजस्वी पुरुष फकिराच्या वेषानें तिजकडे येऊन म्हणतो, ' पोरी, घाबरूं नको. दोन वर्षे काढलींस तसे आणखी सहा महिने युक्तीनें काढ. अल्ला तुझे पाठीशीं आहे. अतीतअभ्यागतांचा सत्कार करण्याचा येथून पुढें क्रम ठेव. बहराम तुजकडे आपोआप चालत येईल!' इतकें ऐकून जोहरा जागी झाली. या स्वप्नाचा जों जों ती विचार करूं लागली, तों तों तिला मोठी हिंमत वाटायाला लागून तिच्या निराशेची प्रबळ आशा झाली. ती मनांत ह्मणते, ' परमेश्वर सर्व-साक्षी आहे, परमदयाळू व न्यायी आहे, सत्याचा पाठिराखा आहे. त्याच्या इच्छामात्रेंकरून सर्व गोष्टी घडणाऱ्या आहेत; आणि त्याची इच्छा तर सदोदीत मनुष्यमात्राचें कल्याण करण्याची असते. तेव्हां तो आमचेंच अकल्याण काय म्हणून करील ? छी! छी! ही कल्पनाच मनांत आणणें नको! इतक्यांत स्वप्नांत फकीर बोलला नाहीं का, कीं बहराम तुजकडे चालत येईल ह्मणून ? तें अल्ला-शिवाय कोण बोलला असावा ? तोच—तोच खचीत बोलला —यांत संशय नाहीं! हं, आतां मला दुप्पट बळ आलं. लागूं दे कीं शहाजादीशीं लग्न! फकिरानें सांगितल्याप्रमाणें अल्ला माझे पाठीशीं आहे. तो प्रसंगीं युक्ति सुचवून सर्व कांहीं पार पाडील. मी या वेळेपासून उगीच जिवाला त्रास देणारी ही सारी काळजी सोडून देऊन, सगळा भार त्या देवावरच टाकतें! अहाहा! देवाच्या चिंतनांत केवढें सुख, काय समाधान, आणि किती तरी निर्भयता आहे!'

असो; इकडे दुसरे दिवशीं काजी व दरबारची आणि इतर निवडक मंडळी येऊन लग्नविधि उरकण्याची सर्व तयारी झाली, व त्या वेषधारी मुशाफरास घेऊन येण्याकरितां मुख्य वजीर गेला. मुशाफरानें पूर्वी दरबारांत जातेवेळीं पोषाख केला होता तसाच यावेळींही केला असून कमरेस तरवार लटकाविली होती, व कमरपट्टयांत कट्यार खोविली होती. समारंभाचे ठिकाणीं आल्यावर जे काय किरकोळ विधि व्हावयाचे ते झाल्यानंतर शेवटीं नवरानवरीचे हात एकमेकांच्या हातांत घालण्याची वेळ आली. तेव्हां जोहरा हीस एक मोठी नामी युक्ति सुचली. ती मनांत म्हणाली, 'ही आपल्याजंवळची कटयार बहरामाची आहे. तेव्हां नूरमहाल हिनें उगीच आपल्या हाताला हात लावावा त्यापेक्षां ह्या कटयारीशीं तो सलग्न झाल्यांत कांहीं तरी अर्थ असून, पुढें मागें झाला तर याचाच उपयोग होणार आहे.' असें मनांत आणून ती काजीस म्हणते, 'काजीसाहेब, एक विनंति आहे. आमच्यांत लग्नाचा मुख्य विधि व्हावयाचा तो प्रत्यक्ष वराशीं न होतां त्याच्या कटयारीशीं करतात. हा आमचा कुलाचार असून याचें उल्लंघन केलें असतां तें उभयतांनाही कल्याणप्रद होत नाहीं.' हें ऐकून काजीनें बादशहाकडे पाहिलें. त्यानें, 'हा तुमचाच विचार आहे, तो तुमचा तुम्हीच पहा, मजकडून कांहीं हरकत नाहीं,' असें म्हटलें. त्यावरून काजीनेंही कांहीं हरकत न घेतां तशाच रीतीनें तो लग्नविधि पुरा केला.

याप्रमाणें हें लग्न उरकून गेलें. या संबंधाच्या एकंदर हकीकतीचा विचार करितां, बादशहाचे मनांत हा योग

घडवून आणण्याचें नव्हतें इतकेंच नव्हे, तर तो होईल तितका टाळावा असें असून, केवळ निरुपाय झाल्यामुळें त्याला या गोष्टीस रुकार द्यावा लागला, असें सहज दिसून येईल. सारांश, या कारणामुळें त्यानें तो संस्कार, मुलगी हातची जात होती ती न जावी ह्मणूनच केवळ कसा तरी पुरा करून घेतला, व त्या निमित्तानें आनंदप्रदर्शक उत्सव वगैरे विशेष रीतीनें कांहींएक केला नाहीं. तथापि मुलीवर त्याचें अत्यंत प्रेम असल्यामुळें, तिचे स्वतःचे सुखांत अंतर न पडावें या हेतूनें जवाहीर व नक्त पैसा मिळून लाखों रुपयांची मत्ता तिच्या हवाली करून, खेरीज शेंकडों दासदासी तिचे तैनातीस दिल्या. याशिवाय नवऱ्यास आंदण म्हणून मोठा ऐवज दिला तो निराळाच. खेरीज 'दर्यादौलतमहाल' या नांवाची अत्यंत सुंदर व भव्य इमारत त्या उभयतांच्या उपयोगाकरितां कायमची देऊन, सायंकाळीं मोठ्या समारंभानें त्यांची तेथें रवानगी करून दिली.

शेवटीं रात्रीचे वेळीं नवरानवरी सलग्न होण्याचा प्रसंग येऊन ठेपला! नूरमहाल हिचा नवरा बनलेला तो वेषधारी मुशाफर पलंगावर स्वस्थ निजून राहिला, व त्याला अगदीं गाढ झोंप लागली. हें पाहून नूरमहाल हिला मोठी तळमळ लागून राहिली! याप्रमाणें एक सबंध प्रहर निघून गेला. तेव्हां राजकन्येनें त्याला जागें करण्याच्या हेतूनें मोठ्या प्रेमानें त्याच्या मुखाचें चुंबन केलें. त्यासरसा तो जागा होऊन खडबडून उठला, व तिला ह्मणतो, 'प्रिये, येथवर झाली ती गोष्ट ठीकच

झाली, व तिजपासून मला केवढा आनंद झाला आहे तो मी या मुखानें काय बोलून दाखवूं! खरोखर, हा जो मला येवढा मान मिळाला व अलभ्य लाभ झाला, यास कारण सर्वस्वी तूं आहेस. तुझी योग्यता कोणीकडे आणि माझी कोणीकडे? असें असतां तूं मजवर प्रेमरूपी अमृताचा वर्षाव करून, मध्यें शेंकडों अंतराय आले असतांही आपला निश्चय कायम ठेऊन मला केवळ देवाचे स्थितीस आणून पोहोंचविलेंस व या नंदनवनांत सुखानें यथेच्छ विहार करण्यास सोडून दिलेंस, याबद्दल मीं तुझे खरोखर किती उपकार मानावे हें मला बोलून दाखवितां येत नाहीं!' हें अत्यंत प्रेमळ, मुद्देसूद व मधुर भाषण ऐकून नूरमहाल हिच्या अंतःकरणांत आनंदोदकाचा केवळ सागरच उचंबळूं लागला, व असा परमरूपगुणसंपन्न पति आपणास मिळाला ह्मणून तिनें मनांत परमेश्वराचे फार आभार मानले! ती लज्जायुक्त किंचित् हास्य करून ह्मणते, 'महाराज, मला आपण येवढा मोठा मान दिला ही केवळ आपली थोरवी आहे. मी आपल्या प्रेमपाशांत बद्ध झालें ह्मणूनच आपल्याला वरण्याविषयीं एवढा अट्टहास केला. तेव्हां यांत वास्तविक पहातां माझा मोठेपणा तो काय? खरोखर, ईश्वरी सूत्रानें जें घडावयाचें तें घडून मी या चरणांची आतां दासी झालें आहें; तर इतःपर आपण मला हा वास्तविक नसता मोठेपणा न देतां जो काय हुकूम असेल तोच करीत जावा, असें माझें अंतःकरणपूर्वक या चरणांपाशीं मागणें आहे.' यावर हा बनलेला तिचा नवरा उत्तर करितो, 'ठीक! ठीक! खान-

दानीच्या पतिव्रता स्त्रीस हेंच योग्य आहे. पण प्रिये, काय सांगूं! मला अशा प्रकारें वरण्यांत तूं आपल्यावर कांहीं अंशीं एक संकट ओढवून घेतलें आहेस!' नूरमहाल चपापून ह्मणते, 'काय! संकट? कसलें संकट? आतां संकटाची वेळा तर निघून गेली. यापुढें त्याची वार्ता कशाला पाहिजे? आतां फक्त काय तो तुमच्या जिवास सतत आराम राहून तुमचा दिल खुलास असावा एवढेंच अल्लापाशीं मागणें आहे. दुसरें काय?' हा बनलेला नवरा उत्तर करितो, 'प्रिये, तूं इतक्यांत शेवटीं जें बोललीस तसाच कांहीं भाग ह्या प्रकरणांत आहे. कोणता तो आतां सांगतोंच. हें पहा, कच्यारीशीं लग्न लावण्याचा जसा आमच्यांत कुलाचार आहे, तसाच आणखी एक असा आहे कीं, लग्न लागल्यावर नवऱ्यानें आपल्या आयुरारोग्यासाठीं सहा महिनेपर्यंत व्रतस्थ राहून त्या अवधींत जे कोणी अतीतअभ्यागत येतील त्यांस खैरखैरात व खाणेंपिणें घालून त्या मार्गानें अल्लाची सेवा केली पाहिजे. हें सत्कृत्य जितक्या जास्त प्रमाणानें होईल तितकें नवऱ्यास व नवरीसही तें सुखप्रद व कल्याणप्रद होणारें आहे; आणि उलट पक्षीं, यांत जर कसूर किंवा कमीपणा झाला, तर तितक्याच प्रमाणानें तें उभयतांसही बाधक होणारें आहे. शिवाय हेंही सांगतों कीं, कोणीं जर नास्तिक बुद्धीनें, यांत काय आहे, त्यांत काय आहे, असें म्हणून लंडभंडपणा केला तर त्यापासून विशेषतः नवऱ्याच्या जिवाशीं गांठ येऊन पडणारी आहे. सारांश, प्रिये, तुला इतकेंच सांगायाचें कीं, जर तुला जन्मभर पतिसमागम सुखानें व्हावा

अशी इच्छा असेल, तर तुला हें व्रत कडकडीत रीतीनें पाळलें पाहिजे ! ' मग आषकाचा आविर्भाव आणून म्हणतो, ' नाहीं-पेक्षां पहा ! माझें कांहीं जात नाहीं—हा मी प्रसंगास सादर आहें ! ' असें ह्मणून नूरमहाल हिला आलिंगन देण्यास सरसावल्यासारखें त्यानें केलें. तें पाहून नूरमहाल ही पटकन् एकीकडे झाली, आणि म्हणते, ' हां ! हां ! असला काय अविचार ! सहा महिन्यांच्या ठिकाणीं आणखी वर्षभर कां दिवस जाईनात ! बचनाग तात्पुरता गोड लागला तरी तो परिणामीं जर घातक आहे, तर त्याचें सेवन शहाणा कधीं करणार नाहीं ! याहून जास्त तें मीं आपणांला काय सांगावें ? '

हें अत्यंत विचारी, मधुर व दिलदारपणाचें भाषण ऐकून जोहरा हीस पराकाष्ठेचें समाधान वाटलें, व रचूं घातलेल्या इमारतीचा पाया तर छान बसला, पुढें अल्ला आहे, असें मनांत म्हणून ती पुढें बोलते, ' तर मग प्रिये, आतां सहा महिनेपर्यंत आपल्या उभयतांचे वर्तनाचा संकल्प तर निश्चित झालाच. पण आतां राहिलें सदावर्ताचें काम- त्यांतही तुजकडून होण्यासारखें सर्व साहाय्य तूं मला केलें पाहिजेस. ' आपल्या बनलेल्या नवऱ्यास पुढें बोलूं न देतां नूरमहाल ह्मणते, ' महाराज, पाहिजे ह्मणजे काय ? मला साहाय्य केलेंच पाहिजे ! तें माझें कर्तव्यच आहे ! हेंचसें काय, पण भगवंतानें ज्याअर्थी आपल्या जन्माच्या गांठी घालून दिल्या आहेत, त्याअर्थी हरएक बाबतींत आपला एक विचार असून आपणांला मीं व आपणही मला सर्व प्रकारें साहाय्य करीत जावें हेंच उभयतांस सुखप्रद व

भूषणप्रद होणार आहे!' यावर जोहरा हिला कांहींच बोलावयाचें राहिलें नाहीं, सबब तीं दोघें झोंपीं गेलीं.

भाग अठरावा.

—:※:—

सदावर्त.

होतें सद्धर्मांच्या कासिला लागतां सदा शिव हो ॥

मोरोपंत.

दुसरे दिवशीं सकाळीं रिवाजाप्रमाणें नूरमहाल हीस आईनें रात्रीची हालहवाल कशी काय ह्मणून विचारिलें असतां, तिनें सर्व कांहीं यथास्थित व आनंददायक असल्याचें सांगितल्यावरून राणीस फार संतोष वाटला; व क्रमाक्रमानें ती वार्ता बादशहाच्याही कानीं जाऊन त्यालाही त्यांतल्यात्यांत समाधानच वाटलें, हें सांगावयास नकोच. आतां वास्तविक पाहतां यांत नूरमहाल हिचा विचारीपणा व आत्मसंयमनशक्ति हीं विशेष रीतीनें व्यक्त होतात हें तर खरेंच, पण दुसऱ्या बाजूनें विचार केला असतां, खरा प्रकार काय होता तो प्रकट करणेंही तिला अडचणीचेंच होतें; कारण हा ह्या लग्नाच्या संबंधांत आपण एके प्रकारें आपढंगीपणाच केला असून, वडील माणसांस—विशेषतः बादशहास—ही गोष्ट संमत नव्हती हें ती जाणून होती. तेव्हां आपणच होऊन पसंत केलेल्या नवऱ्याविरुद्ध कागाळी सांगण्यास तिला तोंड नव्हतें, हेंही आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. असो; सांगतां सांगतां नूरमहाल हिनें आपल्या

पतीचा मनोदय सहा महिनेपर्यंत सदावर्त घालण्याचा असून तो त्यांच्यांतील कुलाचार असल्याचीही हकीकत आईस सांगून टाकिली; व आपणही या सत्कृत्याचे कामीं होईल तितकी मदत करण्यास तयार असल्याचें कळविलें. या बाबतींत राणी व बादशहा किंवा दुसरें कोणीही विरुद्ध असण्याचें अर्थातच कारण नव्हतें.

इकडे जोहरा हिनें ठरल्याप्रमाणें सदावर्त सुरू केलें. तिनें विचार केला कीं, आतां सहा महिनेपर्यंत आपल्याला कसलीही काळजी राहिली नाहीं हें खरें, पण एवढ्या अवधींतच आपला काय तो सोक्षमोक्ष व्हावयाचा आहे, तेव्हां पांच साडेपांच महिनेपर्यंत हा उद्योग चालवून शेवटीं आपण पंधरा तीन वार कडकडीत उपासही केले पाहिजेत; कारण इतकें करूनही शेवटीं बहरामाची भेट मुदतींतच झाली तर मग आपल्या फजितीस पारावार नाहीं असें होणार आहे! तर मग पुढें होणाऱ्या बिटंबना सोसून जिवंत राहण्यापेक्षां अन्नत्याग करून आबादाबांतच मरून जावें हें बरें! तथापि असले वाईट विचार मनांत आणण्याचें कारण काय? अल्ला आपल्या पाठीशीं आहे, त्याअर्थी तो आपलें सत्त्व खचीत जाऊं देणार नाहीं, हें शेवटीं तिच्या मनांत येऊन तिला धैर्य आलें; आणि तिनें आपला उद्योग नेटानें चालविला. तिच्या सदावर्तांचा लौकिक चार पांच महिन्यांत पुष्कळच दूरवर पसरला, व एवढा थोर व उदार दाता कोण व कसा आहे हें एकवार पाहिलें पाहिजे, अशा हेतूनें हजारों कोसांवरून अतीतअभ्यागतच

केवळ नव्हत, तर मजेखातर व पेशाखातर हिंडणारे चांगले चांगले हजारों मुशाफरही तेथें येऊन गेले. त्यांतून हें सदावर्त, ज्ञात किंवा धर्म हा भेद न ठेवितां सर्वांस सारखें उघडें ठेविलें असल्यामुळें तर त्याचा लौकिक फारच वाढला. खेरीज तेथें जो माणसांचा परामर्श होत असे, तो फक्त पुरुषांनाच लागू नव्हता, तर बायका व मुलें यांचाही पुरुषांप्रमाणेंच फार चांगला समाचार घेतला जात असे. पुरुषमंडळींची व्यवस्था पाहण्याचें काम जोहरा हिनें आपल्याकडे घेतलें असून बायकामुलांची व्यवस्था नूरमहाल पहात असे. सारांश, याप्रमाणें हें धर्मौदार्याचें महत्कृत्य त्या उभयतांनीं अगदीं कायावाचामनेंकरून चालविलें होतें.

पांच साडेपांच महिने झाले तरी येऊन गेलेल्या लक्षावधि लोकांत जोहरा हीस बहराम आढळला नाहीं इतकेंच नव्हे, तर त्याच्यासारखा दिसण्यांतही कोणी इसम तिच्या नजरेस पडला नाहीं ! यावरून जोहरा हिची बहुतेक निराशा होऊन, तिनें पूर्वी विचार केल्याप्रमाणें उपवासव्रत आरंभिलें. तिनें आज दोन अडीच वर्षांत कष्ट व हाल पुष्कळ सोसले होते, पण उपास कधींच काढले नव्हते. ती पाळी आतां दुर्दैवानें तिजवर आल्यामुळें ती दिवसेंदिवस फारच क्षीण होत चालली. उपोषणाचें प्रकरण जोहरा हिनें मोठ्या युक्तीनें नूरमहाल हिजपासून गुप्त ठेवलें होतें; पण आपल्याला येत चाललेली क्षीणता तिला कशी छपवितां येणार ? ती दिवसेंदिवस अशक्त व निस्तेज होत चाललेली पाहून नूरमहाल हिचा जीव तिळतिळ

तुटूं लागला ! इकडे जोहरा हिची निराशा विशेष बलवत्तर होत जाऊन तिच्या मनांत नाहीं नाहीं तसले तरंग येत चालले. ती मनांत ह्मणाली, ' अशा रीतीनें मीं आपला प्राणान्त करून घेतला तरी एवढ्यानेंच कांहीं हें प्रकरण भागत नाहीं! हा मोठा घोर अनर्थ होणार आहे, हें आतां माझ्या लक्षांत आलें ! कारण यांत तीन खून होत आहेत ! स्वतः आत्महत्या करून घेणें हें धर्मशास्त्रांत मोठें पापच गणलें आहे, तेव्हां त्यालाही मी खूनच ह्मणतें. बरें, कधीं-काळीं बहरामालाही माझ्या मृत्यूची वार्ता कळणारच; तर ती कळल्यावर तोही आपला जीव ठेवणार नाहीं हें मला पक्कें ठाऊक आहे—हा होणार दुसरा खून ! आतां राहिली बिचारी नूरमहाल. हिनें आपढंगीपणानें हा लग्नाचा योग आणिला, आणि त्यांतही मीं तिला चांगलीच फसवून आणखी इतके दिवस हे कष्ट सोसण्यास लाविलें व पुढच्या सुखाची आशा दाखवीत बसलें; तर आतां तिचा नवरा—कट्यारीचा मालक बहराम—याची व तिची गांठ घालून देण्याचा जो माझा हेतु तो निष्फळ झाल्यानें तिला ' इकडे आड व इकडे विहीर ' असें होऊन जाणार हें अगदीं उघड आहे; आणि मग याचा परिणाम, ज्या कट्यारीशीं तिचें लग्न लागलें आहे ती कट्यारच ती आपल्या पोटांत खुपसून घेईल हें कशाला सांगायाला पाहिजे ?—हा होणार तिसरा खून ! अशा स्थितींत आपाखी विश्वासघाताचेंही भयंकर पाप माझ्या माथीं येणार आहे ! भगवंता ! आतां तूं माझा अंत किती पहाणार ! अहाहा ! एवढा वेळ माझ्या

मनांत जे हे सैतानी विचार आले त्याहून ' भगवंता ' हा जो एकच शब्द मुखांतून निघाला त्याचा किती तरी महिमा आहे ! ठीकच ! कोणीकडे विष आणि कोणीकडे अमृत ! हें भगवन्नामरूपी अमृत मी आतां प्यालें, त्याअर्थी मला कळिकाळाचीही भीति नाहीं असें माझी मनदेवता तर मला सांगते. बरें, आतां घोडामैदान जवळच आहे. एक तर घोडा शर्यत जिंकील, नाहींपेक्षां त्याची जी गति होणार असेल ती होईल ! मी कदाचित् हतभागी असलें, तरी या प्रकरणांत मजखेरीज दुसरीं दोन अत्यंत थोर व पवित्र माणसें गुंतलीं आहेत, त्यांची पुण्याई तरी उपयोगीं पडो, आणि त्यांचें कल्याण होवो ! तें झालें म्हणजे माझेंही होणारच आहे ! अल्ला हें सर्व कांहीं करण्यास समर्थ आहे ! ' याप्रमाणें जोहरा ही अगदीं निर्वाणीच्या स्थितीस येऊन पोहोंचली.

भाग एकोणिसावा.

—:*:—

बहरामाचा वाघाशीं सामना !

क्षत्रिय तेज विमल जें पंचानन काय त्यास मारील ।
त्यांतहि कृपा प्रभूची ज्यावर तो त्यास कां न तारील ॥

आतां इकडे बहरामाची हकीकत काय झाली ती कळण्याविषयीं आमच्या प्रिय वाचकांना साहजिकच उत्कंठा लागली असेल. याकरितां जोहरा हिला आहे तशीच तूर्त साशंक ठेवून त्या राजपुत्राचें वृत्त पुढें चालवूं. शहाअली

बहराम हा मागें बाराव्या भागांत सांगितल्याप्रमाणें निर्जन अरण्यांत जाऊन पडल्यावर, कांहीं वेळानें त्याचें मन थाऱ्यावर येऊन तो जोहरा हिच्या शोधार्थ देशपर्यटनास निघाला असतां, मार्गांत त्याजवर अनेक संकटें आलीं. परंतु, केरो येथें सुलतानाच्या घरीं तो बाह्यात्कारीं सुखांत असतांनाच जोहरा हिच्या शोधार्थ संधी सांपडतांच निघून जाण्याचा त्याचा बेत असल्यामुळें, प्रवासाची मुख्य सामुग्री त्यानें नेहमीं आपल्या कमरेशीं बाळगून ठेविली होती, तिचा त्याला या प्रसंगीं फार उपयोग झाला. ती सामुग्री ह्मणजे कांहीं बहुमोल जवाहीर व छोटीं छोटीं हत्यारें. हीं, तो सुलतानाच्या केवळ गळ्यांतला ताईत असल्यामुळें, त्याला मिळण्यास अर्थात् कांहींएक अडचण नव्हती. असो. तो त्या झाडींतून बाहेर पडतो न पडतो इतक्यांत दुरून एक मोठा वाघ आपल्या अंगावर चालून येत आहेसें त्याला दिसलें. त्याबरोबर त्यानें आपल्याजवळचा सुरा काढून एक भरींव बांबू खसकन् तोडला, आणि त्याचें दांडकें तयार करून हातांत घेतलें. इतक्यांत वाघ त्याच्या जवळ येऊन भिडला. पण त्याचें धैर्य व शौर्य विलक्षणच! वाघ अंगावर आल्याबरोबर त्यानें आपला सोटा इतक्या जोरानें त्यास मारिला कीं, तो त्यास वर्मी लागून तो व्याकुळ होऊन गेला! परंतु पुनः अवसान धरून तो आणखी चाल करून आला. तेव्हां बहरामानें त्यास पहिल्याप्रमाणेंच रट्टा लगावला असतां त्याच्या सोट्याचे दोन तुकडे झाले! त्यावरून वाघास फारच आवेश आला, व त्यानें जास्त अवसानानें

बहरामावर उडी घातली. इतक्यांत बहरामानें प्रसंगावधान राखून आपली कटयार त्या वाघाच्या छातींत इतक्या कांहीं जोरानें खुपसली कीं, ती विशेषच वर्मी लागून तो वाघ घायाळ होऊन जमिनीवर जो लोळत पडला, तो फिरून उठलाच नाहीं! पण शेवटीं वाघ बहरामाच्या अंगाशीं भिडला असतां त्याचा पंजा बहरामाच्या डाव्या खांद्यास लागून त्यास भयंकर जखम झाली, व तीमुळें तो मूर्छित पडला! पण मूर्छेत देखील, 'हाय जोहरा!' असे शब्द त्याच्या तोंडांतून निघत होते! आतां या ठिकाणीं बहरामाची स्थिति काय व्हावी म्हणून आपण अटकळ करूं बरें? मरणाखेरीज दुसरा याचा कोणताच परिणाम संभवनीय नव्हता! पण ईश्वर त्याचा पुरा पाठिराखा असल्यामुळें, त्यानें तितक्यांत एक बावा तेथें पाठवून दिला! त्यानें येऊन पटकन् त्याच्या डोळ्यांस पाणी लावून त्यास सावध केलें, व कांहीं झाडपाल्याचें औषध त्याच्या जखमेस लावून ती बांधून टाकिली.

बहराम सावध होऊन बावास नमन करून म्हणतो, 'बावाजी, आज आपणच येथें होतां ह्मणून मी बांचलों, नाहींपेक्षां माझी गच्छंतीच व्हावयाची!' बावा त्यास ह्मणतो, 'खरेंच बेटा, काळ आला होताच, पण वेळ आली नव्हती! बरें, तूं आतां कांहीं भिऊं नको. येथून जवळच माझी झोंपडी आहे, तेथें चल व खुशाल आराम पडेपर्यंत रहा. मग पुढची बात पुढें.' ही त्या बावाची अमृतवाणी ऐकून बहरामास जो आनंद झाला तो किती म्हणून सांगावा!

त्यानें त्याचे व त्यास आपल्या साहाय्यास येण्याविषयीं प्रेरणा करणाऱ्या परमदयाळू भगवंताचे मनोभावेंकरून आभार मानले, व बावाबरोबर तो झोंपडींत गेला. ती झोंपडी बोलूनचालून जंगलांतली—तेथें सामान तें काय असावयाचें ! पण निर्वाहापुरत्या अन्नाच्छादनास तेथें कांहीं कमी नव्हतें. बावानें बहरामास मऊ गवत पसरून व त्यावर व्याघ्रांबर टाकून निजावयाची सोय करून दिली, आणि कांहीं कंद भाजून त्यांतील मगज त्यास खावयास दिला. बहरामास हें भोजन मिष्टान्नापेक्षांही गोड लागून, पाणीबिणी प्याल्यावर तो चांगला ताजातवाना झाला. पुढें त्यास लवकरच डुलक्या येऊं लागल्या. तेव्हां, ' नीज तर बेटा, ' असें बावानें सांगितल्यावरून तो जो निजला, तो दुसरे दिवशीं सकाळपर्यंत जागा झाला नाहीं !

बावानें लावलेल्या वनस्पतीचा एवढा प्रभाव कीं, बहराम दुसरे दिवशीं उठून पाहतो तों आपली जखम अगदीं बरी झाली असें त्यास दिसून आलें ! फक्त त्या ठिकाणीं थोडी लाल जागा तेवढी राहिली होती. असो; बहराम हा बावाच्या सांगण्यावरून त्या दिवशींही तेथेंच राहिला. दुसरे दिवशीं तो त्या बावाचा निरोप घेऊन जाऊं लागला असतां, आपल्याजवळचे दोन बहुमोल हिरे त्यास देऊं लागला. तेव्हां बावा त्यास ह्मणतो, ' बेटा, आम्ही जंगलांत राहणारे; कंदमुळें खाऊन व ह्या जवळच्या झऱ्याचें स्वच्छ पाणी पिऊन निर्वाह करतों; तें देवानें आह्मांला फुकट मुबलक दिलें आहे. तेव्हां आम्हीं द्रव्याची आशा कशाला करावी ? खरें

पुसशील तर, हे जमिनीवरचे खडे आणि हिरे आम्हांला सारखेच आहेत! हे तुझे तूं आपले ठेव. तुला वाटखर्चीला उपयोगीं पडतील.' हें ऐकून बहरामानें वाईट तोंड केलें. तेव्हां बावा ह्मणतो, 'असा दिलगीर कां झालास? तुला इतकें वाईट कां वाटलें?' बहराम उत्तर करितो, 'बावाजी, मी आतां आपल्या मनांतली गोष्ट तुह्मांला सांगतों. हें पहा, मी जरी आज अशा विपन्न स्थितींत आहें, तरी खरें पुसाल तर जन्मापासून मीं कोणाचे—विशेषतः आपल्यासारख्या गरीब साधुजनाचे—उपकार कधींही फुकट घेतले नाहींत. कालपासून आपण मजकरितां जे एवढे श्रम केले—फार काय, पण मला आपण केवळ जीवदानच दिलें—त्याबद्दल यत्किंचित् तरी आपला उतराई झाल्यावांचून राहणें मला बरें वाटत नाहीं!' बावा किंचित् रागावल्यासारखें करून ह्मणतो, 'अरे पुरे रे! तूं बादशहाचा लेंक आहेस हें मला ठाऊक आहे—तेव्हां तूं कोणाचें उपकार फुकट न घ्यावेस हें रास्तच आहे! परंतु ध्यानांत ठेव कीं, मनुष्याचे उपकार न घेण्याचा आपला नियम कदाचित् चालूं शकेल; पण ईश्वराचे उपकार फेडीन असें म्हणण्याची कोणाची प्राज्ञा आहे? अरे बाबा! कालच्या प्रसंगांतून तुला वांचविलें तें केवळ ईश्वरानें. आमच्यासारखे जे कोणी अशा कामीं साधनीभूत होतात, ते केवळ त्याच्याच प्रेरणेनें होतात. एरव्हीं आम्ही होऊन कांहीं करीत नाहीं. आम्ही सदोदीत त्याच्या चिंतनांत राहून त्याचा हुकूम तेवढा पाळतों. यांत काय तें समज!' हे बावाच्या तोंडचे शब्द ऐकून बहरामास मोठा

गहिंवर आला, व त्यानें त्याच्या पायांवर डोकी ठेविली. तेव्हां बावानें त्याच्या मस्तकीं हात ठेवून, ' जा, तुझा मनोरथ पूर्ण होईल !' असा त्यास आशीर्वाद देऊन वाटेस लाविलें.

भाग विसावा.

—:*:—

बहराम व दिलनवाज.

करिल कसें मांजर जें दुष्कर हरिहननकाज वाघास ।
न शकति अग्नि विधु कसा दिनमणिचा करिल काजवा घास ॥
मोरोपंत.

हा त्या बावाच्या तोंडचा आशीर्वाद आपल्याला शुभ शकुनच झाला असें समजून बहरामास मोठा आनंद व हुशारी वाटली, आणि तो आपला मार्ग पुढें क्रमीत चालला. तो जातां जातां अख्राखान शहरीं गेला. तेथें त्यास असें वर्तमान समजलें कीं, येथें आज वर्ष सहा महिने कोणी मोठी सधन तरुण स्त्री येऊन राहिली असून तिनें असें प्रसिद्ध केलें आहे कीं, माझा जिवलग दोस्त कोणीकडे नाहींसा झाला आहे त्याचा जो कोणी शोध लावून देईल त्याचें मी जन्माचें कल्याण करीन. बहरामास अशा प्रकारें आपलें जन्माचें कल्याण होण्याची कांहीं अपेक्षा नव्हती, व वर सांगितलेली स्त्री बहुधा जोहरा नसावीच असें त्यास वाटत होतें. तथापि काय नेम सांगावा ? ही जोहरा नसली तरी यांतूनच जोहराचे शोधाचा कांहीं सुगावा लागणार नाहीं ह्मणून कशावरून ? असें ह्मणून त्यानें या प्रकरणांत

मन घातलें; व सकाळचे प्रहरीं उठून पोषाख करून तो त्या स्त्रीचें ह्मणणें ऐकून घेण्याकरितां ह्मणून तिच्या भेटीस गेला. तिची भेट होण्यास त्याला कांहींच अडचण पडली नाहीं. ती पडद्याआडूनच प्रथम त्याशीं जे चार शब्द बोलली, त्यांत त्याजकडून तिला जीं उत्तरें मिळालीं त्यावरून आजपर्यंत ज्यांच्या ज्यांच्याशीं आपला थोडाबहुत परिचय झाला त्यांमध्यें बोलण्यांत इतकें माधुर्य, चातुर्य, मुद्देसूदपणा व समयसूचकता हीं याच्याइतकीं लोकोत्तर अशीं कोणाच्याही अंगीं दिसून आलीं नाहींत, असें तेव्हांच तिच्या प्रत्यास आलें. त्याबरोबर, असा लोकविलक्षण पुरुष कसा असावा तें पाहण्याची तिला मोठी उत्सुकता होऊन, तिनें दासीकडून एकदम पडदा वर करविला. तेव्हां त्याच्या वरील गुणांस आणखी अप्रतिम रूपसंपन्नतेचीही अनुकुलता असलेली पाहून ती स्त्री त्याजवर फारच खूष झाली.

ती स्त्री बहरामास ह्मणते, ' तुमचें नांवगांव, ठावठिकाण वगैरे कळण्याची मला फार इच्छा आहे. ' बहरामानें घेतलेल्या वेषास अनुसरूनच अर्थात् तीस उत्तर दिलें. तो ह्मणतो, ' बाईसाहेब, मी बुखारा येथील एका साधारण सुखवस्तु गृहस्थाचा मुलगा आहें. मला देशावरावर फिरून ठिकठिकाणच्या लोकांचे रीतरिवाज वगैरे पाहण्याची इच्छा असल्यामुळें मीं ही मुशाफरी पतकरली आहे, व ही करून त्यांतल्या त्यांत कांहीं रोजगारधंदा मिळाल्यास तोही करण्याचा माझा इरादा आहे. मला मिय्यासाहेब असें म्हणतात.' हें ऐकून, आपल्याला हवा तसा हा मनुष्य आहे असें त्या

स्त्रीस वाटून ती त्यास ह्मणते, 'साहेबजी, आपला रोजगार-धंदा करण्याचा जर हेतु आहे, तर माझ्या येथें आपली सोय सहजीं होण्यासारखी आहे; कारण मला तुमच्यासारखा एक हुशार मनुष्य पाहिजेच आहे.' परंतु बहरामाचा येथें येण्याचा उद्देश, जोहरा हिचा कांहीं थांग लागला तर पहावा असा असून तो साधण्याचें या ठिकाणीं कांहींच साधन दिसत नसल्यामुळें तो त्या स्त्रीस म्हणतो, 'रोजगारधंदा पाहण्याचा माझा इरादा असल्याचें मी प्रथम बोललों खरें, पण इतक्यांतच तो पतकरण्याचें माझ्या मनांत नाहीं.' त्यावरून त्या स्त्रीनें कपाळास आंठ्या घातल्या, आणि ह्मणते, 'तर मग आतां तुम्ही आलां तसे परत जाणार ना?' हें ऐकून, ती 'पडत्या फळाची परवानगीच' असें समजून बहराम 'होय' म्हणून उठून जाऊं लागला. त्याबरोबर दारावरील संत्र्यानें आपला तमंचा त्याचे उरावर रोंखून ह्मटलें, 'साहेबजी, चाललां कोठें? या ठिकाणीं येण्याला परवानगी लागत नाहीं; पण येथून परत जाण्याचें काम फार कठीण आहे!' त्यावरून बहराम मागें सरला, व ती स्त्री खदखदां हसूं लागली!

ही स्त्री कोण व कशा प्रकारची होती हें येथें थोडेंसें सांगितलें पाहिजे. ही हिरातच्या सुभेदाराची एकुलती एक मुलगी असून बापाची फार लाडकी होती. तिची आई ती लहान असतांच वारली होती. तिच्या बापाजवळ अपरिमित द्रव्य होतें. तो एकाएकीं मरण पावल्यामुळें त्याच्या संपत्तीची ही एकटीच मालकीण होऊन बसली.

तिचें वय अठरा वीस वर्षांचें असून तिचा वर्ण जरी काळा-सांवळा होता, तरी बांध्यांत ती फार निटस होती, आणि तिच्या चेहऱ्यावर कांहीं विलक्षण नूर होता. तसेंच तिच्या डोळ्यांकडे पाहिलें तर ती मोठी जाज्वल्य व पाताळयंत्री असावी असें दिसत होतें. तिचें नांव दिलनवाज. तिच्याशीं लग्न लावण्याचा तेथील नव्या तरुण सुभेदाराचा हेतु असून त्यानें आपली इच्छा तिला कळविली होती. परंतु बापाच्या लाडिकपणामुळें तिला स्वच्छंदानें राहण्याची संवय लागल्या कारणानें, जनानखान्यांत कोंडून राहणें तिला बिलकुल पसंत नव्हतें. सबब तिनें त्यास नकार दिला. त्यावरून जबरदस्तीनें तिच्याशीं लग्न लावण्याचा त्या सुभेदारानें घाट घातला. तेव्हां तिला द्रव्यसाहाय्य चांगलें असल्यामुळें तिनें आपली तेथून सहज सुटका करून घेतली. त्या प्रसंगीं तेथील एका वेश्येचा मुलगा खुषरू या नांवाचा होता तो तिच्या फार उपयोगीं पडला. खुषरू हा ऐन पंचविशींत असून रूपानें जरी मोठा मनांत भरण्यासारखा नव्हता, तरी त्याच्या बोलण्यांत व वागण्यांत कांहीं विलक्षणच मोहकपणा होता. खुषरू यानें मोठ्या हुशारीनें दिलनवाज हीस तिच्या सर्व संपत्तीसह तेथून जी पळविली, ती अस्त्राखान येथें आणून सोडून दिली, आणि तिचें तेथें चांगलें बस्तान बसवून दिलें. खुषरू हा तरुण व रंगेल असून दिलनवाज हिच्या अतिशय उपयोगीं पडला, सबब त्याजवर तिचें प्रेम बसलें होतें.

असो. इकडे बहराम यास दारावर मज्जाव झाल्याबरोबर

दिलनवाज ही हंसल्याचें वर सांगितलेंच आहे. मग ती बहरामास म्हणते, ' साहेबजी, माझी जाहिरात ऐकून तुम्ही येथें आलां व रोजगारधंदा पाहण्याचाही आपला हेतु असल्याचें मला तुम्हीं सांगितलें. त्याप्रमाणें मी तुह्मांस आपल्याजवळ ठेवून घेत असतां तुम्ही आतां इतक्यांत ' या बोटावरची थुंकी त्या बोटावर ' चाळवून, सध्या माझ्या मनांत नोकरी करावयाची नाहीं असें कांहीं तरी सांगून येथून निसटून जाऊं पाहतां काय? आम्ही स्त्रिया तर बोलूनचालूनच अबला, पण तुम्हीं पुरुषासारख्या पुरुषांनीं कांहीं तरी बोलांत बोल राहील असें वर्तन ठेविलें पाहिजे कीं नाहीं ?' असें बोलून दिलनवाज हिनें त्यास आपली त्रोटक हकीकत मोघम रीतीनें सांगून शेवटीं ह्मटलें, ' बरें असो; साहेबजी, तुह्मांस नोकरी करावयाची नसली तर दुसरें काम मजपाशीं आहे. मीं आपल्या जाहिरातींत, माझ्या जिवलग दोस्ताचा शोध लावण्यासंबंधानें म्हटलें आहे, तें काम तुम्ही करा. तें काम तरी आतां अर्धेंच उरलें आहे. कारण माझा दोस्त खुषरू याचा नुकताच शोध लागला असून तो येथें आलाही आहे. पण त्या संबंधानें आणखी राहिलेलें काम करावयाचें आहे. तेवढें तुम्ही करा ह्मणजे झालें.' दिलनवाज पुढें बोलते, ' साहेबजी, पुरुषांच्या वागपुकींत सयुक्तिकपणा व बोलांत बोल पुष्कळ वेळ आढळत नाहीं, याचें उदाहरण हें खुषरूचेंच सांगतें. ह्या मेल्या दासीपुत्राला मी परोपरी आळवीत असतां व आपली अर्धी संपत्ति बक्षीस करीत असतां, मला आजपर्यंत थापा देऊन

शेवटीं पोबारा करून निघून गेला ! त्याचें मन मजसारख्या श्रीमान् तरुणीवर लुब्ध न होतां एका दासीवर तो फिदा झाला आहे ! ती दासी वर्णानें किंवा रूपानें तरी चांगली आहे काय ? छे हो ! अगदीं काळीकुट्ट आणि हिडिस् ! पण त्याला काय आकाबाई आठवली कोण जाणे, त्यानें तिजवरून आपला देह जणू काय ओवाळून टाकिला आहे ! तिला घेऊन तो फरारी झाला होता, पण मीं त्याला पकडून आणून अंधारकोठडींत ठेविलें आहे. तेव्हां आतां साहेबजी, एक तर तुम्ही खुषरूचें मन वळवून तो माझ्या मनाप्रमाणें वागेल असें करा, नाहींपेक्षां तुम्ही त्याचें चंदन उडवून स्वतःच माझे मनोरथ पूर्ण करा. याखेरीज तुह्मांला आतां सुटका नाहीं. तो माझ्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यास कबूल झाला तरी महिना दोन महिने मी त्याची चांचणी पाहीन, व तेवढ्या वेळांत माझ्याशीं त्याचें समाधानकारक वर्तन झालें तर बरें, नाहींपेक्षां त्याची जागा तुम्हांसच मिळणार आहे. हें पहा, मीं द्रव्यसामर्थ्यानें आज हें अर्धे शहर आपल्या मुठींत ठेविलें असून, पांचशें मनुष्यें तर जय्यत माझ्या हुकुमास ओ देणारीं आहेत. माझ्या या घरांतून बाहेर जाण्याचेच केवळ नव्हत, तर त्याच्या आसमंतात्भागचे सर्व रस्ते माझ्या हत्यारबंद हेरांनीं रोखून टाकिले आहेत. तेव्हां साहिबजी, सांगण्याचें तात्पर्य हें कीं, येथें येण्याचें तुह्मांला सोपें वाटलें, पण येथून जाण्याचें काम फार अवघड आहे. तर याचा काय तो विचार करून तुम्ही वर्तन करा. सुखाचे व दुःखाचे असे दोन्ही मार्ग तुम्हांला खुले आहेत !'

हें दिलनवाज हिचें खोंचदार, निष्ठुर, कांहीं अंशीं विसंगत आणि एकंदरीनें कालकूट भरलेलें भाषण ऐकून बहराम फार घाबरून गेला. त्यांतून खुषरूचें चंदन उडविण्याची गोष्ट ऐकून तर त्याच्या अंगावर शहारे आले! तो मनांत ह्मणतो, ' किती विचित्र तरी ही दैवगति! मी आपण होऊन कींहो ह्या कृत्येच्या जाळ्यांत येऊन पडलों! बरें,पण आतां या गोष्टीबद्दल नुसतें दुःख करीत बसण्यांत फायदा काय? कांब्यावर पडलेलें चिरगूट हलकेंच सोडवून काढलें पाहिजे!' मग बाह्यात्कारीं दिलनवाज हिचें काम करण्याविषयीं आपली उत्सुकता दाखवून तो तिला ह्मणतो, ' बाईसाहिब, आपण माझ्या बोलण्यांतला विसंगतपणा पदरांत घालून माझ्या नफ्याची गोष्ट मला सांगितली, ती मला बरोबर पटली; व आपल्या हुकुमाप्रमाणें काम करण्यास मी तयार आहें. पण हें काम निवांतपणीं मध्यरात्रीचे सुमारासच केलें पाहिजे. ' ती खुषींत येऊन ह्मणते, ' शाबास! तुम्ही विचारी व युक्तिवान् आहां, हें मीं प्रथमच ताडलें; आणि ह्मणूनच ही महत्त्वाची व नाजूक गोष्ट तुम्हांपाशीं काढिली. हं, ठीक आहे. तुम्ही आतां परत आपल्या बिन्हाडीं वगैरे जाण्याच्या खटपटींत पडूं नका. येथेंच जेवा, खा, आणि वेळेवर आपलें काम बजावा ह्मणजे झालें. ' हिला नाहीं होय ह्मणण्याची कांहीं सोय नाहीं असें पाहून बहरामानें तें सर्व कबूल केलें. दिलनवाज हिनें त्याच्या दोन्ही वेळची जेवणाखाणाची बरदास्त खुद्द आपल्या नजरेखालीं ठेवून, तो एकंदरीनें खूष राहील अशी आपल्याकडून व्यवस्था केली;

पण त्या बिचाऱ्याच्या अंतःकरणास इंगळ्या टोंचत असल्याप्रमाणें त्रास होत होता! असो. मध्यरात्रीच्या सुमारास दिलनवाज हिनें बहरामास आणखी एकवार नीट पढवून, हत्यारें वगैरेच्या जय्यत तयारीनिशी खुषरू याजकडे अंधारकोठडींत पाठवून दिलें, व दोन तासांत परत आलें पाहिजे ह्मणून बजावून सांगितलें.

बहरामास पाहून खुषरूस मोठा विस्मय व दुःख वाटलें. तो मनांत म्हणतो, ' ही नवी सुरेखशी शिकार त्या चांडाळणीला कोठून सांपडली? काय! माझ्यासारखे खुळे वेडेपीर एकूण जगांत बरेच आहेत तर!' मग बहरामास ह्मणतो, 'काय, साहेब, आपलें येणें बहुधा आमच्या समाचाराकरितां झालें असेल!' बहराम उत्तर करितो, ' तुमच्या बोलण्यांतला अर्थ नीटसा माझ्या लक्षांत आला नाहीं. तरी पण बाईसाहेबांचा तुमच्यावर अद्याप कांहीं विशेषसा रोष झाल्याचें दिसत नाहीं. तुम्ही अजून त्यांच्या मनाप्रमाणें वर्तन करण्यास तयार असल्यास पूर्ववत् तुमच्यावर त्या प्रेम करण्यास तयार आहेत. तसें घडत नसेल तर मात्र—' खुषरू त्यास पुढें न बोलूं देतां म्हणतो, ' तर मात्र काय? माझी गर्दन काटण्याचा तुह्मांला हुकूम झाला असेल हेंच कीं नाहीं? अहो, ही मीं आपली गर्दन पुढें केली—काटा पाहूं चटकन् कशी ती? त्या महामायेच्या प्रेमरूपी काळकुटाच्या वातावरणांत राहून झुरून झुरून मरण्यापेक्षां एकदम जीव गेलेला चांगला! अहो, त्या कुल्येनें अलीकडे असें आरंभिलें आहे कीं, एक एक तरणा ज्वान सुंदर पुरुष दोन तीन

महिने ठेवून पुढें तो नकोसा झाला म्हणजे त्याला जिवंत लावून न देतां कंठस्नान घालून आवारांत गाडून टाकाव-याचा ! असे आज वर्ष दीड वर्षांत त्या राक्षसिणीनें दहा बारा मुडदे कींहो पाडले ! याप्रमाणें माझीही गत कर-ण्याचा तिचा विचार असून तुमच्यावरही तीच पाळी पुढें मगें खास येणार असें समजा ! '

बहराम मनांत म्हणतो, ' हो—तिच्या बोलण्यांत ' दोन महिने ' असें कांहीं आलें खरें. ' मग उघडपणें खुषरूस म्हणतो, ' साहेब, तुम्हीं जशी आपली मान माझ्यापुढें केली, तशी मीही पण आपली तुमच्या स्वाधीन करतों; कारण, आपण समदुःखी आहों असेंच समजा. तुमची जी वाट तीच माझी पुढें होणार हें खास ! वास्तविक पुसाल तर मी अगदीं अकल्पित ह्या बाईच्या जाळ्यांत सांपडलों असून निरुपायामुळें तिचा संदेश घेऊन तुमच्याकडे आलों आहें. तर, आतां तुमच्या व माझ्याही सुटकेचा कांहीं विचार निघेल तर पहा ! ' खुषरू आनंदानें पण उतावळीनें त्यास म्हणतो, ' वाहवा ! तुम्ही मला आज ईश्वरच भेटलां ! हें पहा, त्या सटवीनें माझ्या पुष्कळ कागाळ्या तुमच्याजवळ सांगितल्या असतील. पण त्यांत सत्याचा अंश फार थोडा आहे हें मी शपथपूर्वक तुम्हांला सांगतों. असो, त्या गोष्टी काढण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आतां आपल्या पुढच्या उद्यो-गाचा लवकर विचार केला पाहिजे. ' बहराम म्हणतो, ' हो हो—तेंच खरें. मला तिनें फक्त दोन तासांची पर-वानगी दिली आहे. त्यांतला एक तास तर गेलाच. आतां

राहिलेल्या एका तासांत सारा कार्यक्रम पुरा केला पाहिजे.' खुषरू म्हणतो, 'तुमच्यासारखा रोज कोणी तरी माणूस ती मजकडे पाठवीत असते. पण तुमच्या आजच्या येण्यांत कांहीं निर्वाणीचा प्रकार होता खरा ना?' बहराम म्हणतो, 'तिची तशी मला सांगी होती यांत कांहीं खोटें नाहीं. याची साक्ष तिनें मजपाशीं दिलेलीं हत्यारेंच आहेत! पण मीं वरवर हुकार देऊन आपल्या सुटकेशीं मुख्य ध्यान ठेविलें होतें, याविषयीं तुमची आतां खात्री झालीच असेल.' खुषरू म्हणतो, 'तुमच्याविषयीं मला आतां कांहीं शंका राहिली नाहीं. असो.- तुम्ही 'सुटका' 'सुटका' ह्मणून ह्मणतां, ती कांहीं फारशी अवघड नाहीं. त्या विजवटीनें द्रव्याच्या साहाय्यानें हा बाजार माजविला आहे, तशीच त्याच द्रव्याची मात्रा चालवून आपणांला हां हां ह्मणतां आपली सुटका करून घेतां येण्यासारखी आहे. पण मजपाशीं तेवढें साधन या वेळेस नाहीं, याला काय करूं हो!' हें ऐकून बहरामास मोठी हुशारी येऊन तो ह्मणतो, 'त्याची तुह्मांला काळजी नको. तें मजपाशीं विपुल आहे; व आतांपर्यंत त्याचाच मी उपयोग करीत आलों आहें; आणि ह्मणूनच एवढा वेळ तुमचें माझें जें बोलणें झालें त्यास कोणताही अडथळा आला नाहीं!'

हें ऐकून खुषरूस फारच आनंद झाला, व ते दोघे पुढील उद्योगास लागले. बहरामाजवळ हत्यारें सर्व होतीं, पण खुषरूपाशीं कांहीं नव्हतें. तेव्हां न जाणों प्रसंगीं जरूर लागल्यास याजपाशींही एखाददुसरें हत्यार असावें ह्मणून

बहरामानें एक तमंचा व जंबिया असे त्यास दिले. बहरामानें प्रथमतः त्या अंधारकोठडीच्या दारावरील पहारेकऱ्यांच्या हातांवर एकएक बहुमोल हिरा ठेविला. त्याबरोबर तेथून पटकन् त्यांची सुटका झाली. पुढें जेथें जेथें ह्या पैशाच्या नोकरांकडून त्यांना अडथळा होण्याचा प्रसंग आला, तेथें तेथें बहराम हा पूर्वीप्रमाणेंच आपल्याजवळचें जवाहीर पेरीत चालला. अशा प्रकारें येत येत ते शहरच्या वेशीपाशीं येऊन ठेपले. त्या ठिकाणीं मात्र हा द्रव्याचा मंत्र मुळींच लागू पडला नाहीं ! तेथें एक अरब तितक्याचे तितक्यांत हत्तीवर बसून गस्त घालीत होता. ही जात मोठी कडवी व इमानाला जागणारी म्हणून प्रसिद्धि असून त्याप्रमाणेंच या दोघांना तेथें अनुभव आला. हे वेशीच्या दरवाज्यांतून बाहेर पडूं लागले तों तो गस्तवाला अरब वाटेंत त्यांना आडवा आला. त्याबरोबर बहराम त्याच्या हातावर एक हिरा ठेवूं लागला. पण तो झिडकारून देऊन तो आपली तरवार उपसतो आहे, इतक्या अवसरांत खुपरूनें आपल्याजवळचा तमंचा त्याच्या उरावर रोंखून झाडला. त्याबरोबर तो अरब तर पडलाच, पण हत्ती त्यांच्याशीं गडबड करूं लागला. त्यासरसा बहरामानें आपला जंबिया खुबसून हत्तीची सोंड चिरली. तेव्हां तो ची ची करीत एकीकडे सरला, व हे दोघे निघून गेले.

भाग एकविसावा.

—:*:—

बहरामाची शेवटची कसोटी.

आली जरी कष्टदशा अपार ।
न टाकिती धैर्य तथापि थोर ॥

वामनपंडित.

याप्रमाणें बहराम खुषरूस व खुषरू बहरामास उपयोगीं पडून त्या दोघांनींही त्या विवशीच्या हातून आपली सुटका करून घेतल्यावर, आपल्याला तिच्या लोकांकडून आणखी अडथळा होऊं नये म्हणून त्यांनीं जंगलांतून आपला मार्ग काढिला. अशा प्रकारें रानावनांतून अनेक प्रकारच्या हाल-अपेष्टा भोगीत भोगीत कित्येक दिवसांनीं ते ओडिसा नामक शहरास जाऊन पोहोंचले, व निर्भय झाले. तेथें थोडे दिवस राहिल्यावर त्या प्रत्येकजणास आपआपल्या मनांतील उद्देश सिद्धीस नेण्याचा विचार करण्यास निवांतपणा सांपडला. खुषरूचा उद्देश त्या कृत्येचा ह्मणजे दिलनवाज हिचा सूड घेण्याचा होता. त्याप्रमाणें त्यानें तयारी करून बहरामाचा निरोप घेतला, व परत अस्त्राखानकडे आपला मोर्चा फिरविला. बहरामाचा उद्देश जोहरा हिचा शोध लावण्याचा होता, त्या संबंधानें त्याला इस्तंबूलच्या सदावर्ताची खबर लागल्यावरून तिकडे जाण्याचा विचार त्यानें मनांत आणला; कां कीं, तेथें चोहोंकडून लक्षावधि लोक येत आहेत, तेव्हां जोहरा हिचा तलास लागण्यास तें एक शेवटचें साधन आहे, त्याचा उपयोग करून घ्यावा अशी त्याला इच्छा

झाली. पण त्याजवळची खर्ची आतां अगदीं संपून गेली. तेव्हां प्रवासाकरितां दोन पैसे गांठीशीं ठेवण्यासाठीं त्यानें त्या शहरांतील एका रोटीवाल्याच्या येथें नोकरी धरली. त्या बिचाऱ्याला नोकरी करण्याचा कधीं प्रसंग! पण आली वेळ मारून नेण्याकरितां ती करणें त्याला भाग पडलें. मालकानें त्याला प्रथम विक्रीच्या कामावर ठेविलें; व दोन महिन्यांत त्याची विक्री चांगलीच वाढून त्याला पुष्कळ किफायत झाली; तेव्हां अर्थात् मालकाची त्याजवर बहाल मर्जी झाली. ती इतर नोकरांना सहन होईना! त्यांनीं कांहीं खुसपट काढून दुकानावरून त्याची बदली रोट्या भाजण्याच्या कामावर करविली. तें काम बहरामाला फारच अवघड पडूं लागलें. शिवाय जोहरा हिजविषयींच्या विचारांमुळें त्याचें मन व्यग्र असल्याकारणानें तें काम त्याजकडून नीटही होईना. शेवटीं एके दिवशीं तर एक सबंध घाणा बिघडून करपून त्याची अगदीं राख झाली! हें पाहून मालक फार संतापला, व त्यानें त्याजवर नाहीं नाहीं तसल्या शिव्यांचा वर्षाव केला!

या घडलेल्या प्रकारावरून बहरामास पराकाष्ठेचें दुःख झालें. त्या साऱ्या दिवसांत त्यानें अन्नग्रहण मुळींच केलें नाहीं. नुसतें पाणी पिऊनच निजून राहिला. पण त्याला झोंप कसची येते? तो आपल्याशीं ह्मणतो, ' काय ही माझी अवस्था! माझें ' युवराज शहाअह्ली बहराम ' असें भपकेदार नांव असून मी समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य करीन असें ज्योतिष्यांनीं भविष्य वर्तविलें आहे ना? तें भविष्य आतां प्रत्ययास कसें येणार हें मला समजत नाहीं! कसलें भविष्य

आणि कसलें काय! उगीच हांजी हांजी करणारे लोक आपलें तोंडापुरतें कांहीं तरी सांगतात, झालें! हाय जोहरा! तुझ्या माझ्या पाकदोस्तीचा असा परिणाम व्हावा ना?' असें ह्मणून तो अगदीं रडकुंडीस येऊन गेला. अशा प्रकारचे निराशेचे विचार त्याच्या मनांत एकसारखे घोळूं लागल्या-कारणानें त्याचा पहांटपर्यंत डोळा म्हणून कसा तो लागला नाहीं. उजाडतां उजाडतां मात्र त्याला थोडीशी झोंप लागली. तितक्यांत त्याला एक स्वप्न पडलें. त्यांत, वाघानें त्यास केलेली जखम ज्या बावानें बरी केली होती तोच त्याच्या स्वप्नांत येऊन त्याला म्हणतो, 'बेटा, घाबरूं नको. विश्वास सोडूं नको. आतां थोडे दिवस राहिले आहेत! धीर धर! तो मख्यारी रागें भरला ह्मणून कष्टी कशाला होतोस? त्याचा आतां संबंध सोडून दे, म्हणजे झालें! झाल्या नोकरीचा मुशारा मागून घे, व इस्तंबुलास चालता हो. तूं बादशहाचा लेंक आहेस म्हणून तेथें फुकटचा पाहुणचार कसा घेऊं ही शंका मात्र मनांत आणूं नको हो! जें कांहीं कोणी करील, जें कांहीं कोणी देईल, तें तुझेंच आहे असें समजून खुशाल घे. सौख्यसमुद्रांत आतां पोहत राहशील बरें!'

बहराम जागा होऊन या स्वप्नाचा विचार करूं लागला, तेव्हां पूर्वी ज्यानें आपणाला झालेली वाघनखांची जखम वनस्पति लावून तत्काळ बरी केली व आपणास धीर देऊन आशीर्वादरूपी प्रसाद दिला, त्यानेंच स्वप्नांत येऊन हा दृष्टांत दिला अशी त्याची खात्री झाल्यावरून त्याला मोठी हुशारी आली.

मग तोच शुभ शकून समजून त्यानें इस्तंबुलास जाण्याची लागलीच तयारी केली. तो आपल्या झाल्या नोकरीचा मुशारा मागून आपल्या यजमानाची रजा घेऊं लागला असतां, तो अदले दिवशीं बहरामास जे कठोर शब्द बोलला होता त्याची त्याला आठवण होऊन फार वाईट वाटलें. त्यानें बहरामास राहण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला. तुला तुझी पूर्वीची दुकानावरची कामगिरी देतों, पगार वाढवितों, असेंही त्यानें सांगितलें. पण बहरामाचा निश्चय ढळत नाहीं असें पाहून त्यानें त्याला दोन महिन्यांचा पगार दरमहा पंधरा मोहरांप्रमाणें तीस मोहरा देऊन आणखी बक्षिशी ह्मणून वीस मोहरा, अशा पन्नास मोहरा दिल्या. हा ऐवज इस्तंबूल येथें जाईपर्यंत त्यास वाटखर्चीला फार उपयोगीं पडला इतकेंच नव्हे, तर तेवढ्यांत त्याला मग ददात म्हणून कसलीच पडली नाहीं.

भाग बाविसावा.

—:*:—

बहराम आणि जोहरा ह्यांची भेट व लग्नाचा उलगडा.

चणे खावे लोखंडाचे । मग ब्रह्मपदीं नाचे ॥

ज्ञानेश्वर.

बहराम इस्तंबूल येथें पोहोंचला त्या वेळेस नुकतेच बारा वाजून गेले असून शेंकडों जातींचे व धर्माचे हजारों लोक, कोणी रोटी खाऊन येत आहेत, कोणी शिधा घेऊन

चालले आहेत, असें बहरामाच्या दृष्टीस पडलें. हा सदावर्त घालणारा कोणी परदेशी तरुण मनुष्य असून तो बादशहाचा जांवई झालेला आहे, व आज पांच सहा महिने त्यानें हें विलक्षण धर्मौदार्याचें कृत्य चालविलें आहे, असें त्याला चौकशीअंतीं समजलें.

कांहीं दिवसांपूर्वी जोहरा हिच्याही स्वप्नांत एक बावा येऊन, त्यानें ती अत्यंत कष्टी झाली असतां तिला धीर देऊन बहराम तुजकडे चालत येईल असें सांगितलें होतें, तें वाचकांस स्मरतच असेल. त्यापूर्वी जोहरा ही अंतस्थ रीतीनें बहरामाच्या शोधांत अर्थात् होतीच; पण त्या दिवसापासून, सदावर्तीत येणाऱ्या लोकांमध्यें कोणी सतरा अठरा वर्षांच्या वयाचा उमदा पुरुष आढळला कीं मला कळवा असें तिनें आपल्या कारभारी लोकांस आणखी बजावून सांगून ठेविलें होतें. कर्मधर्मसंयोगानें तिच्या फार विश्वासांतला एक कामगार होता त्यालाच हा वरील वर्णनाचा पुरुष ह्मणजे बहराम त्या दिवशीं प्रथम आढळला. त्याबरोबर त्यानें जोहरा हीस ह्मणजे बादशहाच्या बनलेल्या जांवईबोवांस ती गोष्ट जाऊन कळविली. बहराम हा इतक्या दिवसांच्या कष्टमय प्रवासानें बराच काळवंडून जाऊन त्याच्या चेहऱ्यामोहऱ्यांतही कांहीं फरक झाला होता, तरी जोहरा हीस त्याला ओळखण्यास फारसा उशीर लागला नाहीं. हा बहराम खचीत आहे अशी तिची खात्री झाल्यावर तिच्या आनंदास पारावार नाहींसा झाला ! पण तो आनंद तिनें त्या वेळीं प्रकट न करितां व बहरामास ओळख यांवयाची तीही न देतां, आणखी बारा

तासांनीं या प्रकरणाचा सुधारस बनविण्याचा घाट घालून, या नाटकाचा हा अंक विलक्षण आनंदपर्यवसायी करून सोडण्याचा विचार केला, व तो तिनें मोठ्या धूर्ततेनें व चातुर्यानें अमलांत आणिला. तिच्या सांगण्यावरून तिचे दोघे कारभारी बहरामाकडे आले, व ' आपणांस आमच्या यजमानांनीं आपल्या दर्यादौलतमहाल नामक वाड्यांत बोला-विलें आहे, चलावें, ' असें त्यांनीं मोठ्या आदरानें त्यास ह्मटलें. बहराम यास अशा प्रकारें कोणाचे येथें जाणें आव-डत नसे, सबब प्रथम तर त्यानें त्या लोकांस नकार दिलाच. पण त्यांनीं फारच आग्रह केला, व इतक्यांत त्याला स्वप्नांत बावा जें म्हणाला होता त्याचीही आठवण झाली. तेव्हां तो फारसे आढेवेढे न घेतां त्यांजबरोबर दर्यादौलतमहालांत गेला. तेथें त्या लोकांनीं प्रथम त्यास थोडें फराळास देण्याची तजवीज केली. तो फराळ करून व पाणी पिऊन ताजा-तवाना झाल्यावर त्यांनीं त्यास ह्मटलें, ' आपणांस जरा पडावयाचें आहे काय ? ' बहरामास विसांवा पाहिजेच होता. सबब त्यानें ' होय ' म्हटल्यावरून त्यांनीं त्यास एका खोलींत बिछाना दाखवून दिला. तेथें तो जाऊन निजला, व त्याला चार घटका सडकून झोंप लागली.

त्याची झोंप झाल्यावर चार गुलाम त्याजकडे आले, व ' आपणांस स्नान घालण्याचा आम्हांस हुकूम झाला आहे, हमामखान्यांत चलावें, ' असें त्यास ह्मणाले. हें ऐकून तो बराच बुचकळ्यांत पडला; व मनांत ह्मणतो, ' बहरामजी ! आज तुमचा येथें काय समाचार होणार याचा कांहींच

अंदाज लागत नाहीं ! कोणी आग्रह करून येथें आणून फराळ घालतात, व निजण्याची तजवीज करून जातात. निजून उठतों तों हे चार असामी येऊन हमामखान्यांत चला ह्मणतात, आणि आपल्या यजमानाचा असा हुकूम आहे ह्मणून सांगतात ! हे यजमान कोण, भगवान् जाणे ! आणि ते प्रत्यक्षच मला कां भेटत नाहींत तेंही तोच जाणे ! मला हें मोठें गौडबंगाल दिसत आहे ! ' मग फिरून विचार करून ह्मणतो, ' बावानें मला ह्मटलें आहे कीं, ' विश्वास ठेव, त्याप्रमाणें मी भगवंतावर विश्वास ठेवून त्याच्या कृपासमुद्राची लाट जिकडे नेईल तिकडेच जाणार ! त्या जगदीशाचा करणी अगाध आहे ! तो माझें कल्याण करील हा मला पक्का भरंवसा आहे. ' मग त्या गुलामांस तो ह्मणतो, ' काय ह्मणतां बाबांनो ! हमामखान्यांत येऊं ?—चला ! ' हें ऐकून त्यांनीं त्याला हमामखान्यांत नेलें. तेथें त्यांनीं त्याच्या अंगास नानाप्रकारचीं सुगंधी तेलें व उटणीं लावून उष्णोदकाचें स्नान घातलें. स्नान होतांच एका दासीनें त्यास सफेत उंची मलमल नेसावयास दिली व नंतर भरजरी पोषाख घालावयास दिला. इतक्यांत दुसरी एक दासी आली, व त्या दोघी त्याच्या दोहों बाजूंस होऊन त्यांनीं त्यास तो भव्य व सुंदर महाल सर्व दाखविला— त्यांत ज्या अनेक बैठकींच्या जागा होत्या त्यांत जिकडे तिकडे हिर माणकें लागून गेलेलीं असून नानाप्रकारच्या विलोरी सामानाची रेलचेल केलेली होती. तसेंच खुर्च्या, चौरंग, पलंग वगैरे नामांकित कारागिरांनीं केलेलें शेंकडों

प्रकारचें सामान बहुमोल चादरी घालून ठिकठिकाणीं ठेविलेलें होतें. हें सर्व पाहून झाल्यावर त्या दासी त्याला नजीकच्या अत्यंत रमणीय बागांत घेऊन गेल्या, व तो सर्व त्यास दाखवीत फिरल्या. बहराम यानें जें जें पाहिलें त्याची मोठ्या चातुर्यानें योग्य तारीफ केली. इतक्यांत भोजनाची तयारी झाली ह्मणून एक नोकर सांगावयास आला. त्या-वरून त्या दासी त्यास भोजनास घेऊन गेल्या. भोजनाचें ताट सोन्याचें असून तें रुप्याच्या चौरंगावर मांडलेलें होतें. त्या भोजनाचा थाट काय विचारावा! सौंदर्यवल्लीच्या येथें ज्याप्रमाणें नानाविध रुचिकर पकान्नांचें भोजन करून बह-रामास संतोष झाला, तसाच—किंबहुना त्याहूनही जास्त—येथें झाला! भोजनानंतर उत्कृष्ट प्रकारचें पेय व फळफळा-वळ त्या दासींनीं बहरामापुढें ठेविलीं. बहरामानें पेय मुळींच घेतलें नाहीं, पण फळफळावळ थोडीशी खाल्ली.

इतकें होत आहे तों दोन घटका रात्र झाली. तेंव्हां त्या दासी बहरामास तेथील जलमंदिरांत घेऊन गेल्या. येथेंच नूरमहाल हिचा मुख्य ऐनेमहाल असून तो त्या दिवशीं फारच उत्तम रीतीनें सजविलेला होता. हा महाल पाहून सौंदर्य-वल्लीच्या स्वर्गभुवनांतील मुख्य महालाची बहरामास आठवण झाली. असो, तेथील उत्तम प्रकारें शृंगारलेल्या सुखशय्येवर बहराम यास निजावयास सांगून त्या दासी तेथून निघून गेल्या. बहराम हा सर्व प्रकार पाहून साहजिकच अगदीं गोंधळून गेला! पण त्या संबंधानें विशेष विचार न करितां त्यानें डोळ्यां-वरून पांघरून घेतलें, व बहुत दिवसांनीं त्याला यथेच्छ

भोजनानंतर असा हा निद्रेचा योग आल्यामुळें त्याचा लवकरच डोळा लागला, आणि तब्बल एक प्रहरपर्यंत तो एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर झाला नाहीं !

वरील दोघी दासींपैकीं एकीचें नांव मैमुना व दुसरीचें अमीना असें होतें. त्या दोघीही मोठ्या चतुर, इमानी, मधुभाषणी व सुंदर असून नूरमहाल व जोहरा या उभयतांच्या प्रीतीस पात्र झालेल्या होत्या. सबब आतां हें जें गूढ उकलावयाचें त्या कामीं यांचा फार उपयोग होईल असें जाणून, जोहरा हिनें पुढें नूरमहाल हीस आपली गुप्त गोष्ट सांगण्याच्या वेळीं त्या दोघींना आपल्यांत घेण्याचा विचार केला. त्या दिवशीं नित्याप्रमाणें फारशी रात्र न करितां लवकरच आटपाआटप करून जोहरा ही आपल्या महालांत गेली. नूरमहालही लवकरच तिच्या मागून आली. ती येतांच जोहरा हिनें तिला कडकडून आलिंगन दिलें! त्याबरोबर नूरमहाल ही पटकन् एकीकडे होऊन ह्मणते, ' हां हां ! हें काय ? इतके दिवस व्रतस्थ राहून थोड्याकरितां उतावळी करणें याला काय ह्मणावें ? ' जोहरा ह्मणते, ' बाईसाहेब—' तिला पुढें बोलूं न देतां नूरमहाल ह्मणते, ' वाहवा ! ' बाईसाहेब ' कोणाला ह्मणावयाचें ? आज अशी शुद्धबुद्ध कां जाऊं पहाते ! नशीब माझें ! पुढें काय काय कपाळीं आहे समजत नाहीं ! ' हे नूरमहाल हिचे अत्यंत खेदयुक्त उद्गार ऐकून, हिला आतां यापुढें संशयांत ठेवून विनाकारण ताप देणें अगदीं वाजवी नाहीं, असें समजून जोहरा हिनें तिला आपली खरी हकीकत सांगण्यास

विलंब लावला नाहीं. प्रथम तिनें मैमुना व अमीना यांस बोलावून घेतलें, आणि नंतर नूरमहाल हिला ज़वळ घेऊन व तिला कुरवाळून बोलण्यास सुरुवात केली. ह्या दासी जवळ असतां इतकी उभयतांची सलगी बरी दिसत नाहीं, असें नूरमहाल हिनें जोहरा हीस सुचविलें. तेव्हां जोहरा ह्मणते, ' कांहीं हरकत नाहीं. थोडक्याच वेळानें सर्व गोष्टींचा उलगडा पडेल. मैमुना, अमीना, तुमचेंही पण माझ्या बोलण्याकडे चांगलें लक्ष असूं द्या. ' असें म्हणून तिनें आपली खरी खरी हकीकत—कट्यारीशीं लग्न लावण्याच्या कारणासुद्धां—इत्थंभूत सांगितली. ती ऐकून नूरमहाल हिला जें काय आश्चर्य वाटलें त्याचें किती वर्णन करावें ! तसेंच त्या दोघी दासींनाही ती हकीकत ऐकून पराकाष्ठेचें नवल वाटून त्या खदाखदां हसूं लागल्या. तेव्हां नूरमहाल ही त्यांस रागें भरून ह्मणते, ' पुरे ग, किती हसतां ? कांहीं लाजलज्जा आहे कीं नाहीं ? ' अमीना हंसून म्हणते, ' काय ग मैमुना, बाईसाहेबांना आतां येथें लाजलज्जा बाळगण्याचें काय कारण राहिलें आहे ? ' मैमुना उत्तर करिते, ' अग हें पहा, वास्तविक पुसशील तर ह्या जोहराबाई आपला खरा वेष घेऊन जर आतांचे आतां येतील, तरच बाईसाहेबांच्या मनांतील दुग्धा अगदीं नाहींसा होऊन त्यांचा आत्मा थंड होईल. एरव्हीं कध्धीं होणार नाहीं ! ' नूरमहाल ह्मणते, ' शाबास मैमुना ! तूं अगदीं माझ्या मनांतली गोष्ट बोललीस ! ' हें ऐकतांच जोहरा तेथून उठून गेली, व आपला खरा वेष—स्त्रीवेष—

घेऊन लागलीच तेथें आली. हें पाहून बाकीच्या तिघीजणींस फिरून मोठें नवल वाटलें. मैमुना ह्मणते,'आतां बरीक येथें लाज बाळगण्याचें कारण खरोखर संपलें !' अमीना ह्मणते, 'अग, आतां लाजलज्जेची पायरी पुढें गेली असें ह्मण!' नूरमहाल म्हणते, 'पण कायहो जोहराबाई !—अजूनही मला यांना बाई असें ह्मणण्याचा संकोच वाटतो, पण तो आतां मी अगदीं सोडून देतें ! बरें, पण काय हो, खोतानच्या तिन्ही रात्रींचा तुमच्यावरचा प्रसंग तुम्हीं कसा शर्थीनें टाळला त्याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें ! त्यांतली शेवटल्या रात्रीची हकीकत तर फारच विचित्र! बाई जिवावर-चीच गोणी! तो सारा प्रकार फिरून एकवार मला सांगा पाहूं?' जोहरा ह्मणते, 'अहो, थांबा जरा, त्या सगळ्याच गोष्टींची आतां अनेक वेळां पुनरावृत्ति व्हावयाची आहे ! सध्या आ-पला मुख्य कार्यभाग उरकण्याकडे लक्ष द्यावें हें बरें; कारण अकरा वाजायाला आले—आतां राहिलेल्या एका तासांत पु-ष्कळ सोंगें आणावयाचीं आहेत !'

असें ह्मणून जोहरा हिनें त्या दोघी चतुर दासींस जें काय पुढें करावयास सांगावयाचें तें नीट सांगून देऊन, जळमंदिरांतील ऐनेमहालांत बहराम निजला होता तेथें पाठवून दिलें; व नूरमहाल हिजसह ती त्याच महालाला लागून असणाऱ्या एका खोलींत गेली आणि पुढील मनोरंजक व गम-तीचा प्रकार त्या दोघी दाराच्या फटीशीं कान देऊन ऐकत बसल्या. त्या दोघी दासी ऐनेमहालांत गेल्या, तों बहराम झोंपेंतून नुकताच जागा होऊन पलंगावर जांभया देत व

विचार करीत पडला होता. इतक्यांत अमीना ही एक पाण्यानें भरलेली सोन्याची झारी घेऊन त्याजवळ गेली, आणि मोठ्या अदबीनें लवून ह्मणते, ' थोडा गुळणा करावयाचा असल्यास हें पाणी आणिलें आहे.' तितक्यांत मैमुना त्यास विंझण्यानें वारा घालूं लागली. हें पाहून बहराम गोंधळून तर गेलाच, पण होत असलेल्या प्रकाराबद्दल त्याला मोठ्यानें हंसूं आलें! तो त्या दासींस ह्मणतो, ' अगे, तुम्ही एवढ्या अपरात्रीं येथें कशाकरितां आलां ? ' अमीना ह्मणते, ' महाराज, आम्ही आपण होऊन कशाला येऊं ? बाईसाहेबांचा हुकूम झाल्यावरून आपल्या सरबराईकरितां आलों ! ' बहराम जास्तच गोंधळून जाऊन म्हणतो, ' कोठल्या बाईसाहेब ? त्यांचा माझ्याशीं संबंध काय ? ' तुमच्या सरकारच्या जांवईबोवांच्या हुकुमावरून काल दुपारपासून मी येथें रात्रीं येऊन निजेपर्यंत माझा जो पाहुणचार झाला, त्यावरून तुमच्या कोणी बाईसाहेब असतील त्यांचा येथें संबंध पोहोंचत नाहीं. जांवईबोवांच्या हुकुमावरून आलों असें ह्मणाल तर त्यांत कांहीं तरी अर्थ आहे ! ' मैमुना ह्मणते, ' काय ? बाईसाहेबांचा आपला कांहीं संबंध नाहीं ह्मणतां ! मोठीच अचंब्याची गोष्ट ! ' अमीना म्हणते, ' अग मैमुना, तूं असें काय करतेस ? हे अजून झोंपेंतच आहेत—जागे कोठें झाले आहेत ? जागे झाले म्हणजे आपल्याशीं नीट बोलतील ! ' हें ऐकून बहराम जरा रागावून ह्मणतो, ' वाहवा ! मला तुम्ही वेडा ठरवूं पाहतां काय ? धडधडीत मी जागा असून तुमच्याशीं सयुक्तिक रीतीनें

बोलत आहें, आणि तुम्ही मला आपल्या झोंपेंतच आहे ह्मणून ह्मणतां ! उगीच आपली एकाद्याची टवाळी करावी यांत काय अर्थ आहे ? त्यांतून माझी तुमची तशी सलगी असती तर गोष्ट निराळी. तुम्ही आपल्या आतां येथून निघून जा कशा ! मला तुमचें पाणीबिणी कांहींएक नको आहे ! ' इतकें बोलल्यावर ह्या खजील होतील असें बहरामास वाटलें होतें. पण त्या दोघीही उलट हंसूं लागल्या. मग मैमुना ह्मणते, ' महाराज, आपण आम्हांला चार खेटरें मारलीं तरी तीं सोसलीं पाहिजेत; म्हणतातना, कोणाचें होऊं नये चाकर आणि कोणाची होऊं नये बाईल—तें अगदीं खरें ! त्यांतूनही आह्मां चाकरांना रोज जोडे खाण्याची संवयच आहे, तेव्हां त्याची आह्मांला मुळींच खंती वाटत नाहीं. पण वास्तविक पाहतां बायकोची योग्यता फार मोठी आहे. तिचा असा धिक्कार करणें आपणांला योग्य नाहीं. तशांत ती खुद्द बादशहाची मुलगी—एकुलती एक—प्राणाहून प्यारी—सौंदर्याची केवळ पुतळी—तुमच्यावर अकृत्रिम प्रेम ठेवून तुमची धर्मपत्नी झाली—असें असतां आमच्या त्या बाईसाहेबांना आपण ओळखीत नाहीं ह्मणतां !—केवढी नवलाची गोष्ट ! ' अमीना म्हणते, ' अग बाई, तूं कशाला इतका कंठशोष करतेस ! त्यांची यांची गांठ पडली ह्मणजे ते आपलें काय तें पाहून घेतील. आपल्यासारखीं गरीब माणसें कितीही कळकळीनें बोललीं—त्यांनीं आपली मानही कापून ठेविली—तरी आपलें ज्याचें नांव तें कोणाला पटावयाचें ह्मणून नाहीं, अशी या

जगाची रहाटीच आहे!' हें ऐकून बहराम दहा पांच पळें स्तब्ध राहिला. मग जरा स्वर हलका करून ह्मणतो, 'बायांनो, तुमची यजमानीण ती माझी धर्मपत्नी असल्याचें तुह्मी सुचवितां, पण अल्लाची शपथ वाहून मी सांगतों कीं—' मैमुना पुढें हात करून ह्मणते, 'हाँ, हाँ, महाराज, शपथ वाहून फुकट पापांत पडूं नका!' तिला पुढें बोलूं न देतां बहराम त्रासून म्हणतो, 'बस बस, मला तुम्ही पुरतें बोलूं देत नाहीं, आणि आपलेंच घोडें पुढें ढकलतां याला काय ह्मणावें! खरोखर, असलें गौडबंगाल कधींही कोणीं पाहिलें नसेल!' इतक्यांत तिकडून दाराच्या आडून नूरमहाल हलकेच ह्मणते, 'खुद्द आपणच गौडबंगालचे, आणि ह्या गौडबंगालच्या बाईनींच हें येथें दुसरें गौडबंगाल उत्पन्न केलें असून, गौडबंगालची आपल्याला मुळींच माहिती नसल्याचें हे दाखवितात, केवढें तरी नवल बाई!' असें ह्मणून नूरमहाल व जोहरा ह्या दोघीही हंसूं लागल्या. हें सर्व बहरामास स्पष्ट ऐकूं आलें. तेव्हां तो ह्मणतो, 'ही तिसरी बाई कोण बोलत आहे? आणि चौथीही कोणी तेथें आहेशी वाटते! कारण तेथें कोणी तरी दोघीजणी फिदीफिदी हंसल्याचें मीं स्पष्ट ऐकिलें!' हें ऐकतांच जोहरा दाराशीं येऊन हंसत हंसतच म्हणाली, 'युवराज, ही चौथी दुसरी कोणी नव्हे, तुमची बालमैत्रीण जोहरा आहे बरें!' 'जोहरा' हे शब्द ऐकतांच बहराम ताडकन् पलंगावरून उठून एकदम दाराशीं गेला, आणि अत्यंत उत्सुकतेनें ह्मणतो, 'कोण? जोहरा!—' इतकें बोलतांच त्याचा कंठ भरून आला, व

त्याला पुढें बोलवेना व उभेंही राहवेना—तो मटकन् खाली बसला! जोहरा हिनें लागलीच दार उघडलें, आणि थोडें पाणी त्याच्या डोळ्यांस लावून हलकेच त्यास उठविलें, आणि पलंगावर नेऊन बसविलें. त्याला अशा प्रकारें एकदम जोहरा भेटल्यामुळें, बाळपणापासूनच्या प्रेमाच्या गोष्टी, मध्यंतरीं भोगिलेलीं दारुण संकटें, आणि या वेळीं झालेला अमर्याद हर्ष, हीं एकदम एकवटून त्याच्या अंगाला दरदरून घाम सुटला! पण जोहरा हिनें आपल्या मधुर भाषणानें आणि त्या दोघी दासींनीं आपल्या कौशल्याच्या उपचारांनीं थोडक्यांतच त्याला स्थिरस्थावर केलें. मग तो जोहरा हीस म्हणतो, 'तूं खरोखरच या आपल्या गौडबंगालच्या जादूचा प्रयोग मजवर करून मला हर्षवायूनें अगदीं बेशुद्ध करून टाकण्याची पाळी आणिली होतीस!' जोहरा किंचित् हंसून म्हणते, 'तुम्ही बेशुद्ध झालां असतां तरी कांहीं मला काळजी नव्हती; आणि अजूनही नाहीं! ही पहा मजपाशीं चालती बोलती अमृतवल्ली तयार आहे. हिच्या नुसत्या प्रेमकटाक्षांनींच तुमच्या आत्म्यास परम सुख, शांति, आराम, आणि आरोग्य यांचा लाभ होणार आहे!' नंतर, नूरमहाल ही दाराच्या आड्न हा सर्व प्रकार पहात उभी होती, तिचा हात धरून जोहरा इकडे पलंगाच्या बाजूस तिला आणूं लागली असतां तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले, आणि लज्जायमान होऊन तिनें खालीं मान घातली—ती कांहीं केल्या अलीकडे येईना! तिला हें सर्व लग्नाचें गूढ कळलें होतें, पण तें बहरामाला कळून त्याची खात्री पटल्यावांचून आपण

पुढें जाणें चांगलें नाहीं असें तिला वाटलें; आणि तें बरोबरच होतें. जोहरा हिच्याही लक्षांत ही गोष्ट चटकन् आली. तेव्हां तिनें बृहस्पतीसारखें भाषण करून, येथपर्यंत घडलेला सर्व वृत्तांत बहरामास नीट समजावून दिला व राजकन्या आपली धर्मपत्नी कशी झाली हा त्याचा संशय दूर केला; व किंचित् हास्य करून, त्यानें आपला हात थोडा पुढें केल्याबरोबर नूरमहालचा हात त्याच्या हातांत घालून पलंगाकडे बोट केलें; आणि लागलीच मैमुना व अमीना यांस घेऊन निराळ्या महालांत निजावयास गेली.

भाग तेविसावा.

—:*:—

आनंदोत्सव व महत्त्वाचीं संभाषणें.

ज्याचे पल्लव मंगलप्रद, शिणा छाया जयाची हरी।
गंधें युक्त फुलें, फळेंहि असती ज्याचीं सुधेच्या परी॥
वाटे जो रमणीय भूषण वनश्रीचे मुलींचें मला।
आम्रा त्या पिक सेवितीं समक्षमां संयोग की जाहला! ॥

कृष्णशास्त्री चिपळूणकर.

दुसरे दिवशीं उजाडलें नाहीं तों अमीना दासी राजवाड्यांत येऊन तिनें अगोदर राणीला उठविलें. तिच्या मागोमागच मैमुना आली. ती अमीना हीस ह्मणते, 'काय ग, तुला एवढी घाई कशाची झाली होती? मला येऊं तर द्यावयाचें होतेंस!' अमीना हंसून ह्मणते, 'हो हो! तुला मी आज बरोबर आणून आपल्या बक्षिसाला वांटेकरीण

काय म्हणून करूं ? ' मैमुना म्हणते, ' पण तूं काय ती एक दोन पावलेंच पुढें आलीस ना ? एवढ्यावरून तुला एकटी-लाच बक्षीस पटकावयाला सांपडेल असें समजूं नको ! माझाही त्यांत तुझ्या बरोबरीनें हक्क आहे—काडीमात्र कमी नाहीं, समजलीस ?' अमीना म्हणते, ' पण अगोदर कोण आलें ? ' मैमुना ह्मणते, ' येथें अगोदर आणि मागून येण्या-चा प्रश्न नाहीं. सरकारच्या कानावर ज्याच्याकडून ही बातमी आधीं जाईल, त्या माणसाचा बक्षिसावर हक्क खरा !' अमीना ह्मणते, ' होय ना ? तर मींच बाईसाहेबांना प्रथम उठविलें आहे, आणि ही पहा तुझ्या अगोदरच त्यांना आनंदाची बातमी सांगून टाकतें ह्मणजे झालें ! ' असें ह्मणून, राणी उठून गुळणा वगैरे करून टाकीत होती तों अमीना पुढें होऊन तिला तोंड पुसायाला रुमाल देऊन हंसत हंसत ह्मणते, ' महाराज !—बाईसाहेब !—मी आधीं बरें का ? बक्षिसाचा हक्क माझा लागू झाला ! ' राणी जरा रागावून ह्मणते, ' काय गं ढालगज पोरींनो ! तुम्हांला दुसरा उद्योगच नाहीं का ? सकाळच्या प्रहरीं माणसाची झोंपमोड करण्याचा तुमचा अगदीं हक्क ! आणि असला अधोचरपणा करूनसवरून, आपल्याला कोण काय म्हणेल याची मनांत दहशत न बाळगितां उलट आणखी बक्षिसा-च्या गोष्टी चालवितां याची तुम्हांला लाज नाहीं का ग वाटत ? थांबा—मला आज कटकट करून तुम्हीं त्रास दिला, या-बद्दल तुह्मांला मी चांगलें चौदाव्या रत्नाचें बक्षीस देतें ! ' मैमुना हात जोडून म्हणते, ' सरकार, आज खरोखर आम्ही

आपल्याकडून रत्नाचें बक्षीस घेतल्यावांचून सोडणार नाहीं !' अमीना राणीच्या पायांवर हात ठेवून म्हणते, ' बाईसाहेब, तें रत्नाचें बक्षीस मिळण्याचा हिला मुळींच हक्क नाहीं बरें ! मींच प्रथम आपली झोंप मोडून आपणांस त्रास दिला आहे. तेव्हां मीच तें आपणांपासून हक्कानें मागून घेणार !' हें ऐकून राणीला हंसल्यावांचून राहवेना. ती म्हणते, ' पुरे ग तुमचा हा चटोरपणा ! आतां येथें माझ्यापाशीं छडी नाहीं; नाहीं तर खरोखर तुम्हांला चौदावें रत्न दाखविलेंच असतें !'

इतकें झाल्यावर मैमुना हिनें अमीना हिला नेत्रसंकेतानें खुणावून गप राहण्यास सुचविलें; आणि राणीस म्हणते, ' बाईसाहेब ! आतां हा विनोदाचा प्रकार सोडून देऊन आम्ही आपणांस जी गोष्ट सांगणार आहों, ती आपण ऐकिली ह्मणजे मला किंवा अमीना हिलाच काय, पण आपल्या चरणांची सेवा करणाऱ्या सर्व दासदासींना, लहान-मोठ्या कामगारांना, व शहरांतल्याही सर्व लोकांना हजारों—लाखों—रुपयांचीं बक्षिसें द्याल ! एवढ्यानेंच काय होणार आहे ? राज्यांतल्या इतर हजारों लोकांनाही बक्षिसें—इनामें—द्याल;—इतका कांहीं आपणांला त्या गोष्टीपासून पराकाष्ठेचा आनंद होणार आहे ! ' हें ऐकून राणी मैमुना हिच्या तोंडाकडे पहात जरा स्तब्ध राहिली. मग असली गोष्ट तरी काय आहे ती लवकर समजण्याची तिला उतावळी होऊन ती म्हणते, ' मैमुना, ही अमीना उगीच पाल्हाळ फार लावते. तिला ही नेहमींची संवय आहे.' मग अमीना हिला म्हणते ' जरा चप् बस ग तूं ! मैमुनालाच सांगूं दे काय तें. ' त्यावरून

मैमुना ह्मणते, ' बाईसाहेब, मी थोडक्यांत आपणांला त्या गोष्टीचा मुख्य भाग तेवढा सांगतें. ' असें ह्मणून मैमुना बोलूं लागली—' बाईसाहेब, आज सहा महिने होत आले, शहाजादी नूरमहालबाई यांच्या लग्नाच्या संबंधानें जी गोष्ट प्रसिद्ध झालेली आहे कीं त्यांचे पति जातीचे तांबोळी असून हा झालेला शरीरसंबंध आपल्या बादशाही घराण्याला कमीपणा आणणारा आहे, ती निवळ खोटी आहे. महाराज, त्यांचे यजमान म्हणजे असे तसे नाहींत—ते खुद्द दिल्लीच्या बादशहाचे एकुलते एक चिरंजीव—युवराज शहाअली बहरामखान—हे असून ते कालच येथें आले. ' राणी ह्मणते, ' या पोरीला खास वेड लागलें! नूरमहालचे यजमान अमुक अमुक आहेत ह्मणून जें ही म्हणते तें एकपरी संभवेल; पण ते कालच येथें आले ह्मणून जें ही सांगते, त्यावरून हिला शुद्धीवर आहे असें कोण ह्मणेल ? ' हें ऐकून अमीना बोलूं लागली—' हें पहा बाईसाहेब, ही शुद्धीवर नाहीं असें मात्र नाहीं. पक्की शुद्धीवर आहे ! पण ही अगदीं अर्धघट आहे. मुद्यास धरून व्यवस्थेशीर एखादी गोष्ट कशी सांगावी हें हिला मुळींच समजत नाहीं ! मी आतां थोडक्यांत त्या गोष्टीचा खुलासा करतें. नूरमहालबाईचे यजमान कालच येथें आले ही गोष्ट अगदीं खरी असून काल तिसऱ्या प्रहरापासून मध्यरात्रीपर्यंत आम्ही दोघी त्यांची सरबराई ठेवण्याच्या कामावर होतों. महाराज, शहाजादीचे यजमान जे तांबोळी जातीचे मुशाफर ह्मणून म्हणण्यांत येत आहे, ती वास्त-

विक दिल्लीच्या बादशहाच्या वजिराची कन्या असून पुरुषाचा वेष घेऊन येथें आली, आणि पुढें हा लग्नाचा योग कसकसा घडून आला हें आपणां सर्वांस माहीतच आहे. युवराज शहाअल्ली बहरामखान व ही वजिराची कन्या या उभयतांची बाळपणापासून पाकदोस्ती असून सुमारें दोन अडीच वर्षांपूर्वी त्या दोस्तीचा विघात होऊन उभयतांची फाटाफूट झाली, तेव्हांपासून आजपर्यंत त्यांनीं एकमेकांच्या शोधाकरितां नानाप्रकारचीं संकटें भोगून व हाल सोसून हजारों कोसांचा प्रवास केला, व शेवटीं काल त्या उभयतांची गांठ पडली!' राणी ह्मणते, 'तुझी गोष्ट मला कांहीं समजली आणि कांहीं समजली नाहीं.' इतक्यांत तेवढेंच उचलून घेऊन मैमुना बोलूं लागली—'बाईसाहेब, आपण म्हणालां त्याप्रमाणें हिच्या बोलण्यांत पाल्हाळाशिवाय कांहीं नसतें! मुद्दा म्हणतां म्हणतां मुद्दाच सोडून देऊन कोणीकडच्या कोणीकडे आपली वहावत जाते! असो. मींच आतां ही गोष्ट आरंभिली तशी पुरी करतें. अग मैमुना, तुझ्या सांगण्यांत मुख्य मुद्दा हा राहिला कीं, त्या वजिराच्या कन्येचें नांव जोहरा असून, हा इतके दिवसांचा एकंदर प्रवास तिनें मोठ्या शिताफीनें पुरुषवेषानें केला असून त्यांत तिजवर जीं महत्संकटें आलीं तीं टाळण्यांत तिच्या अकलेची आणि साहसाची तारीफ आमच्यासारख्यांनीं काय करावी! त्या गोष्टीचा अनुभव येथें सर्वांस आलाच असून तो एकंदर इतिहास इतका मोठा व चमत्कारिक आहे कीं, तो ज्याचा त्याच्या तोंडून ऐकिल्यावांचून नीट समजावयाचा नाहीं! तूर्त मुख्य

मुद्याची राहिलेली गोष्ट सांगतें. ह्या बाईला आपल्या वेषाप्रमाणें शहाजादीस वरण्याचा प्रसंग जेव्हां आला, तेव्हां तिनें मोठें प्रसंगावधान राखून आपला दोस्त शहाअल्ली बहराम याची कटयार जी तिजजवळ होती तिशी लग्नाचा मुख्य संस्कार करविला, व आज सहा महिनेपर्यंत मोठ्या हिकमतीनें शहाजादीस कांहीं विलक्षण थापा देऊन व्रतस्थ ठेविलें; आणि काल दुपारीं ते युवराज येथें आल्यावर मध्यरात्रीपर्यंत त्यांना आपण येथें असल्याचा बिलकुल सुगावा लागूं न देतां, एकदम जलमंदिरांतील ऐनेमहालांत आपली ओळख देऊन चकित केलें! आणि नंतर नूरमहालबाईसाहेब यांचें त्यांच्याकडून प्रत्यक्ष पाणिग्रहण व्हावयाचें राहिलें होतें, तें मोठ्या प्रेमानें करविलें, आणि आम्हांस घेऊन दुसऱ्या महालांत निजावयास गेली. त्यापूर्वीच तिनें आपला खरा वेष घेऊन शहाजादीस आम्हांसमक्ष हें सर्व गूढ उकलून सांगितलें होतें, व पुढें आणखी युवराजांसही सर्व हकीकत सांगून त्यांची खात्री केली, आणि सर्व प्रकरणाचा शेवट गोड केला. मध्यंतरीं युवराजांस पुरें चकित करून सोडण्याकरितां आमच्या द्वारें जोहराबाईनीं जी व्यवस्था केली, तींत आम्ही अशा कांहीं छटा उडवून दिल्या कीं, तसले मजेचे प्रसंग कधीं कोणाच्या—'

हा सर्व प्रकार त्या दासींच्या तोंडून ऐकिल्यावर राणीस जें काय आश्चर्य वाटलें तें किती ह्मणून सांगावें! मुलीनें हेका धरून मुशाफ़रास वरिलें असें समजून तिनें मनांत जी खंती घेतली होती ती अर्थात् आतां नाहींशी होऊन,

आपली मुलगी बादशाही पदास चढली याबद्दल तिला पराकाष्ठेचा आनंद व हर्ष वाटला हें सांगावयास नकोच ! नंतर, बादशहास आतां ही गोष्ट केव्हां कळेल व मुलगी आपणास केव्हां भेटेल याबद्दल राणीला मोठी उतावळी होऊन तिनें त्या दासीस पुढें बोलूं न देतां नूरमहाल, जांवईबोवा, व जोहरा ह्या तिघांसही घेऊन येण्यास तांबड-तोब दोघींना पाठविलें, व इकडे खोजास धाडून बाद-शहास बोलावून आणविलें. नूरमहाल ही येत आहे इतक्या अवकाशांत राणीनें हा सर्व घडलेला वृत्तांत बादशहास निवेदन केला. तो ऐकून तो परमचकित झाला व त्याच्या नेत्रांतून आनंदाश्रूंच्या धारा चालल्या! तो राणीस म्हणतो, ' अगे, आतां माझ्यानें कांहींच बोलवत नाहीं. पण सध्या इतकें बोलल्यावांचून राहवत नाहीं कीं, आपल्या समजुती-प्रमाणें मुलीच्या बाबतींत आपणांला जो एके प्रकारें काळिमा लागून राहिला होता, तो नाहींसा होऊन गेला, व तिचेंही जन्माचें कल्याण होऊन तिचा सुखसोहळा पाहण्याची आपणांस संधी आली, याबद्दल आपण अल्लाचे किती आभार मानावे ! ईश्वरी लीला खरोखर अगाध आहे ! या-पेक्षां आणखी काय ह्मणावें ! '

इतकें झाल्यावर, ती अलौकिक स्त्री (जोहरा), आपली बेटी नूरमहाल व जांवईबोवा या तिघांस लवकर इकडे आणवा असें बादशहानें राणीस ह्मटलें. परंतु आपण ती तजवीज अगोदरच केल्याचें राणीनें सांगितलें. असो. त्या दोघी दासी दर्यादौलतमहालांत गेल्या, त्यावेळीं नूरमहाल

ही नुकतीच उठून जोहरा हिच्या खोलीत जाऊन बसली होती, व त्या दोघींच्या आनंदांत गोष्टी चालल्या होत्या. इतक्यांत त्या दासी तेथें जाऊन त्यांनीं त्यांस आपल्या धनिणीचा हुकूम कळविला. तेव्हां जोहरा ह्मणते, ' आतां तिकडे येण्याचें माझें काय काम! ही मुलगी, आणि ते जांवईबोवा, आपले घेऊन जा कसे ? ' परंतु नूरमहाल ही जोहरा हिला घेतल्यावांचून मुळींच उठेना. शेवटीं थोडा वेळ होय नाहीं चाह्मन त्या चौघीजणी ऐनेमहालांत बहराम अद्यापि निजलेलाच होता त्याजकडे गेल्या. त्यांनी त्याला उठवून बादशहाचा हेतु कळविला. पण त्यालाही असें एकदम बादशहासमोर जाणें संकोचास्तव ठीक वाटेना. ह्मणून तोही अळंटळं करूं लागला. हें पाहून जोहरा नूरमहाल हीस ह्मणते, ' बाईसाहेब, आतां माझें ऐकाल तर सध्या तुम्ही अमीना हीस घेऊन एकट्याच पुढें जा. आम्ही तिघेंही लवकरच तुमच्या मागून येतों. असें करण्यांत कांहीं मुद्दा आहे. मी सांगतें तें तुह्मी ऐकाच. ' त्यावरून नूरमहाल ही आग्रह न धरितां अमीना हीस घेऊन मेण्यांत बसून राजवाड्यांत गेली.

नूरमहाल ही आल्याबरोबर राणीजवळ जाऊन मोठ्या लडिवाळपणानें तिच्या अगदीं सरशी पण थोडी खालीं मान घालून बसली. तिचा चेहरा नेहमींपेक्षां विशेष प्रफुल्लित व लज्जायमान दिसत असून, तिला राणीनें नित्याप्रमाणें कुशल विचारिलें असतां तिच्या त्या वेळच्या तात्पुरत्या मुग्धावस्थेनें तर तो फारच खुलत होता. शेवटीं बादशहास राहवेना,

तेव्हां तो म्हणतो, ' बेटा, आज आमच्याशीं बोलण्याची तब्यत लागत नाहीं वाटतें ? ' हें ऐकून तर नूरमहाल हिनें आईच्या पोटांत डोकीं घालून अगदींच मौन धरिलें ! तेव्हां बादशहा सर्व उमजून जाऊन त्यानें तिला पुढें कांहींएक न विचारितां त्या आनंदाच्या भरांत तिला उचलून घेऊन, रिवाजाप्रमाणें दोन भिवयांच्यामध्यें तिचें चुंबन केलें. मग तो म्हणतो, ' पण तीं दोघें कोठें आहेत ? तीं कां नाहीं आलीं ? ' नूरमहाल उत्तर करिते, ' जोहराबाईनीं मला म्हटलें, तुम्ही एकट्याच सभ्या जा, ह्मणून मी तशीच आलें. ' त्यावरून बादशहानें खोजाकडून तावडतोब रथ सिद्ध करण्याची तजवीज करविली, आणि राणी, मुलगी व अमीना दासी यांसह रथांत बसून तो दर्यादौलतमहालांत लागलाच गेला. तेथें मुख्य ऐनेमहालांत बहराम व जोहरा यांच्या गोष्टी चालल्या असून मैमुना दासी उभी होती. जोहरा हिनें कांहीं मोठासा ठाकठिकीचा पोषाख केलेला नसून दागदागिनेही फारसे घातले नव्हते. ती जांभळा शालू नेसली होती, आणि तिनें गळ्यांत एक मोत्यांचें पेंडें घातलें होतें. पण ती मूळचीच अत्यंत सुंदर असल्यामुळें तेवढ्यांतच केवळ परीसारखी शोभत होती ! असो. बादशहा व राणी आलेलीं आहेत असें मैमुना दासीनें सुचविल्यावरून जोहरा व बहराम हीं उठून उभीं राहिलीं. जोहरा हिला पाहून राणी अगदीं दिपून गेली, व तिच्या पोटांत तिजविषयीं अत्यंत प्रेम, पूज्यभाव व वात्सल्य हीं एकवटून जाऊन ती क्षणभर देहभान विसरली ! जोहरा तिला नमन करण्या-

करितां लवत होती, पण तिला तसें करूं न देतां राणीनें तिला घट्ट पोटाशीं धरून आनंदाश्रूंनीं न्हाणिलें! इकडे बादशहानेंही बहरामाचें रूप, तेजस्विता व चेहऱ्यावरून दिसून येणारी बुद्धिमत्ता वगैरे पाहिल्याबरोबर त्याची खानदानी व थोरवी त्याच्या अंतःकरणांत पूर्णपणें बाणून गेली. बहरामही त्याच्या पायांवर डोकी ठेवण्याकरितां खालीं मान करीत होता, पण बादशहानें त्याला तसें करूं न देतां अत्यंत प्रेमानें गाढ आलिंगन दिलें. तिकडे बादशहासमोर उभें राहण्याचा जोहरा हीस संकोच वाटून, पलीकडच्या खोलींत चलावें म्हणून ती राणीस खुणांनीं सुचवीत होती. तें बादशहाच्या लक्षांत येऊन तो प्रेमयुक्त आवेशानें व सद्गदित अंतःकरणानें तिला म्हणतो, 'जोहराबाई!—बेटा!—येथें कोणी परकी आहे काय? संकोच कशाला धरतेस? अग मुली, त्या दिवशीं भरदरबारांत एखाद्या धीट वक्त्यासही लाज आणील असें आमच्यासमोर छातीचा कोट करून तूं जें भाषण केलेंस, तें अद्यापि आमच्या कानांत गुणगुणत असून, शेवटीं तरवारीच्या मुठीवर थाप मारून तूं आमच्या देवडीवरील पांच चार जवान अरबांना लवे करून टाकण्याचा जो आविर्भाव दाखविलास, त्याचा तर आह्मांस जन्मांत विसर पडावयाचा नाहीं!' हें ऐकून जोहरा हिनें किंचित् हास्य केलें व लाजेनें खालीं पाहूं लागली. तें पाहून बादशहास फारच कौतुक वाटलें, व तिची समयसूचकता, प्रसंगावधान आणि चातुर्य यांची ओतप्रोत स्तुति करून तो शेवटीं म्हणाला, 'मी आतां जास्त काय बोलूं? तुझ्या-

सारखी एक तूंच या दुनियेंत पैदा झालीस. तुझें एकंदर चरित्र, आणि त्यांतही विशेषतः तुह्मां दोघांची पाकदोस्ती हीं केवळ अपूर्व आहेत! तुझी धन्यता आम्हीं काय वर्णावी! पण तूं आह्मां सर्वांस धन्य केलेंस एवढें मात्र आमच्यानें बोलल्यावांचून राहवत नाहीं! चला तर आतां सर्वजण वाड्यांत जाऊं.' असें ह्मणून बादशहानें मैमुना दासीस खुणविलें. त्याबरोबर तिनें जाऊन लागलाच आणखी एक रथ आणविला. मग एका रथांत जांवयास घेऊन बादशहा बसला, व दुसऱ्या रथांत त्या तिघी बसल्या, आणि एकंदर मंडळी राजवाड्यांत आली. नंतर सर्वजण जनानखान्यांत एके ठिकाणीं बसून त्यांनीं फराळ केला. त्याच वेळीं बादशहानें जोहरा व बहराम यांस सांगितलें कीं, 'तुम्ही दोघेंही मला अत्यंत प्रिय आहां. जोहराबाई, जशी माझी बेटी नूरमहाल त्याचप्रमाणें तूं मला आहेस. तेव्हां मजसमोर संकोचानें वागण्याचें तुला कारण नाहीं. तसेंच जांवईबोवा, तुम्हांलाही मजबरोबर केव्हां व कोठेंही असण्याबद्दल व बोलण्याचालण्याबद्दल संकोच बाळगण्याचें कारण नाहीं.'

बादशहा पुढें बोलतो, 'तुह्मां दोघांची त्रोटक हकीकत मला सर्व जरी यापूर्वीं कळली आहे, तरी ती अथपासून इतीपर्यंत प्रत्यक्ष तुमच्या तोंडून ऐकण्याची मला फार इच्छा आहे. तसेंच राणी लोकांसही ती ऐकल्यापासून मोठी करमणूक होणार आहे. याकरितां आतां भोजनाची वेळ होईपर्यंत दुसरें कांहींच करावयाचें नाहीं. हं, जोहराबाई, आधीं तूं सुरुवात कर कशी!' त्यावरून जोहरा हिनें आप-

ण्याला समजूं लागल्यापासून बहरामाची व आपली फाटाफूट होईपर्यंत दौलतबागांतील आपली दिनचर्या, शिक्षण वगैरे- सुद्धां दोघांचा साग्र इतिहास सांगून, पुढें इस्तंबुलास येईपर्यंत आपली एकटीची सर्व हकीकत तपशीलवार सांगितली; आणि म्हणाली, ' यापुढचा आतांपर्यंत घडलेला वृत्तांत सर्वांस विदि- तच आहे.' ही जोहरा हिच्या तोंडची हकीकत ऐकून त्या त्या प्रसंगासंबंधानें सर्वांना पराकाष्ठेचें नवल वाटलें. त्यांतूनही खो- तान येथील तीन रात्रींचा इतिहास ऐकून तर सर्वांच्या मनाची फारच विलक्षण स्थिति झाली ! ही जोहरा हिची एकंदर गोष्ट संपण्यास चरचरीत दोन तास लागले. नंतर बहरामावर पाळी आली. तेव्हां त्यानें जोहरा हिची व आपली फाटाफूट होईपर्यंतच्या आपल्या हकीकतीस जोहरा हिचा हवाला देऊन पुढचा आपला वृत्तांत सांगितला. त्यांपैकीं, सौंदर्यवल्ली व दिलनवाज यांच्या येथील प्रसंग ऐकून त्याच्या सद्गुणांची व मानसिक धैर्याची सर्वांनीं फारच तारीफ केली. तसेंच माशाच्या पोटांतून त्याचें केरो येथें जाणें, पुढें पक्ष्यानें अरण्यांत नेऊन टाकणें व वाघानें केलेला हल्ला वगैरे अत्यंत कठीण प्रसंगांची हकीकत ऐकून सर्वांच्या हृदयास अत्यंत कळवळा आला ! शेवटीं त्या सत्पुरुषानें प्रत्यक्ष दर्शन देऊन व स्वप्नांत येऊन त्याला व जोहरा हिला एक दोन वेळां जें साहाय्य केलें हा यांच्यावर केवढा ईश्वरी प्रसाद, असें म्हणून सर्व थक्क झालीं ! दोन्ही हकीकती ऐकिल्यानंतर बादशहा म्हणाला, ' हा सर्व इतिहास मोठा विचित्र, अत्यंत मनोरंजक, व तसाच बोधपर असल्यामुळें तो अकबरनाविसाकडून लिह-

वून त्याच्या प्रती मोठमोठ्या ग्रंथसंग्रहांत ठेवणें जरूर आहे. असो. मला आणखी यासंबंधानें कांहीं खुलासा पाहिजे आहे, तो आतां मी फुरसुतीअंतीं यांना विचारून घेईन. तूर्त इतकेंच पुरे.'

ही हकीकत इकडे चालली असतां सर्वांचीं मनें तींत इतकीं गढून गेलीं होतीं कीं, किती वेळ झाला याचें कोणास भानही राहिलें नाहीं. वजिरासुद्धां मोठमोठे कामगार मुजऱ्याकरितां येऊन बसून बसून कंटाळले, तरी खासास्वारी जनानखान्यांतून अद्याप बाहेरच येत नाहीं हें पाहून त्या सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें ! मग वजिरानें या संबंधानें चौकशी केली असतां, स्वारी आज सकाळच्याच प्रहरीं दर्यादौलतमहालांत जाऊन तेथून कांहीं मंडळी घेऊन परत आली, व तेव्हांपासून जनानखान्यांत एकसारख्या गोष्टी चालल्या आहेत असें त्यास वर्तमान समजलें. तेव्हां हें प्रकरण आहे तरी काय, हें समजण्याविषयीं वजिरास उत्कंठा होऊन, त्यानें आपण आल्याची वर्दी बादशहाकडे पोंचविली. तेव्हां कोठें बादशहाला दोन प्रहर उलटून गेल्याचें समजलें ! मग लगेच उठून त्यानें वजिराची गांठ घेतली, व येथपर्यंत झालेला वृत्तांत वजिरास कळविला; आणि म्हणाला, 'आज दरबारचें काम बंद असल्याचें चोहोंकडे जाहीर करा, आणि नूरमहाल हिचें लग्न झालें त्या दिवशीं काजीसाहेब वगैरे जी निवडक मंडळी हजर होती त्या सर्वांस आतांच्या आतां भोजनास बोलावण्याची तजवीज करा.'

यात्रमाणें ही सर्व मंडळी हजर झाल्यावर बहरामासह

बादशहा त्यांच्या पंक्तीस भोजनास बसला. भोजन चाललें असतां बहराम व जोहरा यांचा सर्व वृत्तांत स्वमुखानें त्या मंडळीस बादशहानें सांगितला. तेव्हां शेवटीं नूरमहाल हिच्या लग्नाच्या घडलेल्या विचित्र प्रकाराचा असा हा अतिशय गोड परिणाम झालेला ऐकून सर्वांस मोठें आश्चर्य व अत्यंत समाधान वाटलें. त्यांतही काजीला मोठाच हर्ष वाटून तो ह्मणतो, ' मी त्याच वेळीं बोललों नव्हतों का, कीं हा जरी आज तुह्मांला विचित्र प्रकार दिसत आहे, तरी याचा पुढें अतिशय गोड परिणाम कशावरून व्हावयाचा नाहीं ह्मणून ? ' हें ऐकून सर्वांनीं माना डोलविल्या. बादशहा वजिरास ह्मणतो, ' आतां आजच्या आज एक दोन मुख्य गोष्टी करावयाच्या आहेत त्या सांगतों. जेवून उठल्याबरोबर अकबरनविसास बोलावून ही ' बहराम-जोहरा यांची कैफियत ' लिहून काढण्यास सांगा. तसेंच जोहरा हिनें सुरू केलेलें सहा महिन्यांच्या मुदतीचें तें सदावर्त एक दोन दिवसांत संपावयाचें आहे, तें यापुढें निरंतर चालू ठेवण्याची व्यवस्था करा; आणि आजपासून दोन महिनेपर्यंत राजधानींतच केवळ नव्हे, तर साऱ्या राज्यांत या आनंदानिमित्त जिकडे तिकडे उत्सव सुरू ठेवण्याविषयीं हुकूम फर्मावा. '

मग तेथें काय उशीर ? वजिरानें तावडतोब शहरांत व बाहेरगांवीं हा बादशहाचा हुकूम जाहीर करण्याची तजवीज केली. इकडे शहरांत या उत्सवासंबंधानें एकच गर्दी उडून गेली. प्रथम किल्ल्याच्या तटावरून एक हजार एक तोफांची सरबत्ती सुरू झाली. हा धूमधडाका दुसरे दिवशीं पहांटेपर्यंत

चालला होता ! सायंकाळ होतांच चोहोंकडे रोषनाई होऊन सारी रात्र आबालवृद्ध सर्व लोक ख्यालीखुशालीच्या रंगांत दंग होऊन गेले ! सरकारांतून लक्षावधि रुपये बक्षिसें, इनामें देण्याकरितां व खैरखैरातीकरितां मंजूर झाले असल्यामुळें या दिवसापासून पुढें कित्येक दिवसपर्यंत तो देकार सारखा सुरू होता ! याशिवाय या आनंदाच्या प्रसंगीं हजारों कैद्यांची व गुलामांची मुक्तता होऊन कित्येक खूनही माफ झाले ! सारांश, या प्रसंगीं जो हा आनंदोत्सव झाला व जितका खर्च झाला, तसा पूर्वी कधींही तेथें झालेला नसून ती गोष्ट कित्येक वर्षें लोकांच्या स्मरणांत राहिली होती !

या दोन महिन्यांच्या अवधींत बादशहा बहरामास बहुधा तीन चार दिवसांआड कोठें तरी स्वारीशिकारीस घेऊन जात असे. ते कधीं घोड्यावर, कधीं हत्तीच्या अंबारींत, कधीं रथांत असे बसून जात असत. त्यावेळीं बहरामास पाहून प्रत्येक प्रजाजन त्याची मोठी तारीफ करीत असून, ' बादशहाच्या मागें आम्हांस हा राजा मिळाल्यास किती चांगलें होईल ! ' असे उद्गार काढीत असे. हा स्वारीशिकारीचा कार्यक्रम दुपारपर्यंत चालत असे. संध्याकाळचे सुमारास बादशहा, बहराम, जोहरा, नूरमहाल व राणी हीं, मैमुना व अमीना या दोघी दासी व कांहीं खोजे यांस घेऊन सहल करण्याकरितां ' मोतीमहाल ' नामक आराममंदिरांत जात असत. तेथील गप्पागोष्टींचा मुख्य विषय ह्मटला ह्मणजे बहराम व जोहरा यांच्या प्रवासवृत्तासंबंधानें चर्चा व त्यावर सवालजवाब

हा असे. हा विषय, ज्या दिवशीं पुष्कळ निवांत वेळ सांपडे, त्या दिवशीं निघत असे.

मोतीमहाल हें आरामस्थळ शहराबाहेर मोकळ्या प्रशस्त मैदानांत असून त्याच्या सभोंवतीं एक अप्रतिम बगीचा बनविलेला होता. तेथें जगांतील बहुतेक सर्व प्रकारचीं फळझाडें व फुलझाडें लाविलेलीं होतीं. शिवाय त्या ठिकाणीं मुलांना व स्त्रियांना क्रीडा करतां येण्यासारखीं लहान लहान सरोवरें असून कारंज्यांचे जे कित्येक हौद होते, त्यांतील कारंजीं उडतांना पाहिलीं ह्मणजे तीं बांधणाऱ्या कारागिरांच्या कुशलतेची परमावधि झाली असे उद्गार निघण्याइतकी त्यांच्या उत्कृष्ट रचनेची पराकाष्ठा तेथें दृग्गोचर होत होती ! तसेंच तेथें लहानसा कृत्रिम डोंगर तयार केलेला असून त्यांतून एक कृत्रिम नदी वहात लाविली होती. सारांश, जनानखान्यांतल्यासारख्या सुकुमार स्त्रियांस व लहान मुलांमुलींस मजेनें व्यायाम घेण्यास व वनश्रीची शोभा पाहण्यास तें स्थळ फारच योग्य होतें. असो. ही खाशी मंडळी या बागेंत व डोंगरावर वगैरे कांहीं वेळ फिरून नंतर आराममंदिरांतील मुख्य दिवाणखान्यांत जाऊन बसत, व तेथें वर सांगितल्याप्रमाणें गोष्टी चालत. तो दिवाणखाना बादशहाच्या फार आवडीचा असल्यामुळें मोठा वर्णन करण्यासारखा होता. तेथील भिंतींवर जगांतील नामांकित चिताऱ्यांनीं ऐतिहासिक पुरुषांचीं व स्त्रियांचीं हुबेहूब चित्रें काढिलेलीं असून तीं माणसें आपल्याशीं बोलतीलच कीं काय असें पाहणारास वाटावें, इतकें विलक्षण कौशल्य त्यांत खर्च

केलेलें होतें; तसेंच सृष्टिसौंदर्याचे व मोठमोठ्या पवित्र स्थळांचे देखावेही इतके हुबेहूब दाखविले होते कीं, या अजब कारागिरांनीं येथें ही प्रतिसृष्टि आणण्याचा यत्न केला आहे कीं काय असें म्हणून प्रेक्षक जनांनीं तोंडांत बोटेंच घालावीं, असा कांहीं तेथें अलौकिक चमत्कार करून दाखविलेला होता! त्याचप्रमाणें नानारंगांच्या हंड्या-झुंबरांतून सुगंधी तेलांचे दिवे तेथें लावीत असत, त्यांच्या योगानें जो अत्यंत मनोरम सुवास सुटे व जी एकंदर अप्रतिम शोभा दृष्टीस पडे, तिचें वर्णन करण्यास लेखणी असमर्थ आहे! असो. येथें या मंडळीस बसण्याबोलण्याचा आडपडदा किंवा संकोच नसावा अशीच तजवीज बादशहानें केली होती. बादशहा बहरामास उजव्या हाताशीं घेऊन मध्यभागीं असलेल्या रत्नजडित सिंहासनावर विराजमान होत असे. त्याच्या उजव्या बाजूस मखमाली रंगाची बहुमोल चादर घातलेल्या कोंचावर राणी, व तिच्या समोर तशाच कोंचावर जोहरा व नूरमहाल अशा बसत असत; आणि त्यांच्यामागें मैमुना व अमीना ह्या दासी उभ्या असत. शिवाय बादशहाच्या पाठीमागच्या व समोरच्या बाजूस चार चार असे आठ खोजे उभे असत. अशा व्यवस्थेनें त्यांच्यांत संभाषणें चालत. या भाषणांपैकीं कित्येकांत मोठे महत्वाचे मुद्दे असत. ते ध्यानांत ठेवण्यासारखे असल्यामुळें, ज्या पांच सहा बैठकींत ते निघाले, त्यांचें सविस्तर वर्णन खालीं दिलें आहे:—

पहिल्या बैठकीच्या वेळीं बादशहा बहरामास म्हणाला,

'युवराज, तुम्ही आपल्या हकीकतींत प्रथम तुमची व जोहरा हिची ताडातोड झाल्याचें जें सांगितलें, त्याचें कारण नीटसें माझ्या लक्षांत आलें नाहीं. तुम्हांला नीतिशिक्षण देणारे तुमचे गुरुजी एवढे मोठे विद्वान्, पोक्त व अनुभवी असून त्यांनीं तुम्हांविषयीं कांहीं एखादी गोष्ट संदिग्ध रीतीनें तुमचे वडिलांपाशीं सांगण्यापूर्वी चांगला विचार करायाला पाहिजे होता; तसेंच त्यांनीं कांहीं सांगितलें असलें तरी तुमच्या वडिलांनींही पण एकाएकीं तशा थरास ती गोष्ट नेणें हें जरा चमत्कारिक दिसतें!' बहराम बोलतो, 'महाराज, आमचे वस्तादजी मोठे विद्वान् व एकंदरीनें थोर असून त्यांजविषयीं आमचा अत्यंत पूज्यभाव आहे, आणि आम्हांस जें कांहीं थोडेंबहुत ज्ञान प्राप्त झालें, व जी काय नीतिमत्ता, धैर्य, साहस इत्यादि गुण आमच्या अंगीं येऊन ज्यांचीं गोड फळें आज आम्ही चाखीत आहों त्यांस जरी बहुतांशीं तेच कारण आहेत, तरी पण त्यांचें डोकें जरा चमत्कारिक होतें हें मोठ्या दुःखानें सांगणें भाग आहे! एखादी गोष्ट त्यांच्या मनांत भरली कीं तिची शहानिशा करण्याकरितां पाताळापर्यंत खोल जावें लागलें तरी गेल्यावांचून सोडावयाचें नाहीं, असा त्यांचा हेकेखोर स्वभाव होता! इकडे उलट पक्षीं आमचे वडील जरी खरोखर सद्गुणांचे पुतळे खरे, तरी त्यांच्या पोटांत शिरून कोणती एखादी गोष्ट सांगितली कीं, त्यांना ती खरीच वाटून तिचा काय तो एकदा निकाल लावल्यावांचून सोडावयाचें नाहीं असा त्यांचाही स्वभाव

असल्यामुळें, माझें व जोहराचें एके ठिकाणीं राहणें ठीक नाहीं असें वस्तादजींचें मत पडल्याबरोबर आमच्या दोस्तीचे ‘ एक घाव दोन तुकडे ’ वडिलांनीं करून टाकिले—कांहीं-एक मागें पुढें पाहिलें नाहीं ! ’ जोहरा ह्मणते, ‘ सरकार, यांत यांच्या तसाच माझ्याही वडिलांचा संबंध पोहोंचतो. तेव्हां दोष देणें असेल तर तो थोडाथोडा दोघांच्याही वांटयास येतो. पण माझ्या मतें मनुष्यानें दोष हा कधींच कोणास देणें वाजवी नाहीं. जशी जशी वेळ पडते तशा तशा गोष्टी घडत असून त्यास मनुष्य हा केवळ कारणीभूत होय. वास्तविक त्या घडवून आणणारा एक परमेश्वरच आहे, आणि तो जें काय करितो तें मनुष्याच्या बऱ्याकरितांच करीत असतो. त्यांत कांहीं प्रसंगीं संकटें व दुःखें भोगावीं लागलीं ह्मणजे मनुष्य तळमळ करितो; पण शेवटीं परिणाम सुखावह झाला ह्मणजे, कार्यकारणभाव लक्षांत न आणितां, माझें सुदैव किंवा मी मोठा पराक्रमी, एवढा मात्र डौल मिरवितो, आणि पूर्वीचा धागा विसरून जातो ! ’ राणी म्हणते, ‘ जोहराबाई, तूं कांहीं चमत्कारिकच बोलतेस गडे ! कुराण तरी एखाद्याला बरें समजेल, पण तुझें बोलणें एखादे वेळेस असें कांहीं विलक्षण असतें कीं, त्यांतला अर्थ मुळींच लक्षांत येत नाहीं ! ’ जोहरा उत्तर करिते, ‘ बाईसाहेब, मीं आपणांपुढें काय बोलावें ! पण आपण ह्मटलेंच, त्याअर्थीं माझ्या बोलण्याचा भाव स्पष्ट सांगणें मला भाग आहे. असें पहा कीं, प्रत्येक गोष्ट ईश्वराच्या तंत्रानें चालते, आणि ती तो मनुष्याच्या कल्याणा-

करितांच करीत असतो, हें माझें ह्मणणें येथें कसें लागू पडतें तें पहाः आमच्यावर असे दुर्घट प्रसंग आले खरे, पण त्यापासून आमची पाकदोस्ती निदर्शनास येऊन आतां आह्मांस कोणी कांहीं ह्मणण्याची प्राज्ञा नाहीं एवढेंच नव्हे, तर येथल्याचप्रमाणें—किंबहुना जास्तंही—घरीं आमच्या वडिलांकडून आमचें अभिनंदन होणार आहे, हा याचा लहानसान परिणाम आहे काय !' बादशहा ह्मणतो, 'हो हो—खचीतच अशी गोष्ट !' राणी ह्मणते, 'पण असलीं संकटें व दुःखें भोगायाला किती तरी कठीण आहेत !' जोहरा बोलते, 'कठीण ह्मणजे !—केवळ तरवारीची धारच ती ! पण बाईसाहेब, दुःख सोसल्यावांचून सुख आणि कीर्ति यांचा लाभ होणें फार दुर्घट आहे. याला आपला नित्यांतलाच दाखला घ्या. जेवणाची गोडी लागण्यास अगोदर चांगली भूक लागायाला पाहिजे. त्या भुकेचा तो एक प्रकारचा त्रास आधीं सोसला ह्मणजे मग अन्नाला गोडी लागते ! असो, तर सर्वांच्या माझ्या बोलण्याचा रोंख मुख्यतः कशावर आहे तें सांगतें. पहा, एवढा खटाटोप होऊन येथें जर आम्ही आलों नसतों, तर ह्या आमच्या नूरमहाल बाईसाहेबांना मनासारखा पति मिळून त्यांच्या अंतःकरणाला उत्तम समाधान वाटण्यास व सरकारच्या आणि तुमच्याही डोईवरचें ओझें खालीं उतरून तुम्ही निष्काळजी होण्यास दुसरा कोणता मार्ग होता बरें ?' हें ऐकून सर्वांनाच हंसूं आलें. मग बादशहा ह्मणतो, 'जोहराबाई! एकंदरीनें तुह्मी धन्य आहे, असें पुनः पुनः

ह्मणावें लागतें. तुझ्या बोलण्यांतला पोंच, तात्पर्यार्थ, आणि त्यापासून घ्यावयाचा बोध फारच ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. इतकेंही असून त्यांतल्या त्यांत तूं सर्वांचें मन रंजवून त्यांना हंसवून सोडतेस ही तर तुझी मोठीच हातोटी! बरें, आतां आज पुरे. दुसरे एखादे वेळेस आणखी या विषयाची चर्चा करूं.'

मग फिरून अशीच एकदा बैठक झाली असतां बादशहा बहरामास ह्मणतो, 'युवराज, त्या स्वर्गभुवनांत सौंदर्यवल्लीची व तुमची गांठ पडून पुढें केवळ अद्भुत रीतीनें तुम्ही केरोस जाऊन पोहोंचलां, व तेथें कांहीं दिवस राहिल्यावर पुढें तशाच अद्भुत रीतीनें पक्ष्याच्या चोंचींतून घोर अरण्यांत जाऊन पडलां, या हकीकती कोणालाही विलक्षण व अमानुष वाटणार आहेत. परंतु त्याबद्दल मी शंका घेत नाहीं, व घेण्याचें कारणही नाहीं; आणि घेतली तरी शेवटीं जोहराबाई त्यास सर्व साधक बाधक प्रमाणें दाखवून, गेल्या खेपेप्रमाणेंच आह्मांला कुंठित करून टाकील यांत संशय नाहीं!' हें ऐकून जोहरा किंचित् हंसून ह्मणते, 'महाराज, मी तरी काय उगीच वितंडवाद घालतें?' बादशहा हंसून म्हणतो, 'छे ग बाई! मी तरी पण तसें कोठें म्हणतों आहें? खरोखरच तूं आपल्या ज्ञानानें व बुद्धिकौशल्यानें वाटेल त्याच्या शंकांचें निवारण करून त्याला गार करून टाकशील अशी माझी खात्री असल्याबद्दल मी बोलून गेलोंच आहें! असो, युवराज, सौंदर्यवल्लीसारखें अमोलिक स्त्रीरत्न अनायासें प्राप्त झालें असतां तिचा तुम्हीं त्याग केला ही

केवळ अपूर्व गोष्ट आहे. तसेंच केरो येथें सुलतान साहेबांचे घरीं तुमची बडेजाव चालली असतां तुमचें मन अस्थिर रहावें हीही अपूर्वच गोष्ट आहे !' बहराम ह्मणतो, 'वास्तविक ह्मटलें तर सौंदर्यवल्लीची मला अद्यापिही कींव येते. तसेंच केरोच्या सुलतानसाहेबांचे येथें मला कांहीं कमी नसतां व ते मजवर प्राणापेक्षांही अधिक प्रेम करीत असतां मी अतृप्त राहिलों, हा एक परी माझा दोषच होय. पण तो दोष सत्याचे बाजूनें होता हें कोणीही कबूल करील. महाराज, कांहीं झालें तरी जोहरा हिचा शोध लागल्यावांचून स्वस्थ रहावयाचें नाहीं असा जर माझा दृढ निश्चय होता, तर मी असल्या मोहांत पडून आपला सत्य-संकल्प सोडावा हें मला उचित होतें काय ?' राणी ह्मणते, 'तें कांहीं असलें तरी, पुढें तुम्ही परत हिंदुस्थानास जाल तेव्हां तुमच्यासाठीं प्राण टाकणाऱ्या त्या बिचाऱ्या यक्षकन्येची भेट घेऊन तिची वास्तपुस्त ही तुह्मांला केलीच पाहिजे !' नूरमहाल हळूच म्हणते, 'खरेंच गडे आई ! माझ्या मनांत तेंच आतां आलें होतें.' जोहरा तिला खिज-विण्याकरितां थट्टेनें ह्मणते, 'पण पहा हो बाई ! धर्म करितां एखादें कर्म उभें रहावयाचें !' नूरमहाल म्हणते, 'पुरे हो या चेष्टा ! मी कांहीं इतकी माणूसघाणी नाहीं !'

बादशहा पुढें बोलतो, 'तें असो. पण युवराज, तुम्ही जातांना केरोच्या सुलतानसाहेबांच्या थडग्याचें दर्शन घेत-ल्यावांचून जाऊं नका बरें ! खरोखर त्यांनीं केवळ तुमच्या प्रीत्यर्थ आपला जीव टाकला असें ह्मटलें पाहिजे ! कारण

त्या पक्ष्याच्या चोंचींतून पडून ते जिवंत राहिले असतील ही कल्पनाच नको!' बहराम म्हणतो, 'अलबत! येथून निघाल्यावर केरो येथें जाऊन तेथील हवाल काय झाली याची चौकशी करण्याचें तर माझें पहिलें काम असें मी समजतों.'

पुढें तिसऱ्या वेळीं ही मंडळी मजेशीर बसली असतां फिरून प्रश्नोत्तरें चाललीं. बादशहा ह्मणतो, 'युवराज, तुमचा तो वाघाशीं जो प्रसंग झाला त्यावरून तुमच्या शौर्याची आणि धैर्याची मला शर्थ वाटते!' राणी ह्मणते, 'खरेंच बाई! केवळ जिवावरचाच तो प्रसंग!' जोहरा ह्मणते, 'अशा प्रसंगीं न डगमगतां आलेल्या संकटाशीं सामना करणें हें छातीच्या पुरुषाचें कामच आहे!' बादशहा हंसून ह्मणतो, 'बरोबर आहे! तुम्हांला याचें फारसें कांहीं वाटावयाचें नाहीं; कारण तुम्हीं असा छातीचा कोट अनेक वेळां केलेला असून पुढेंही कराल याविषयीं आह्मांला बिलकुल शंका नाहीं!' हें ऐकून सर्वच हंसूं लागलीं, आणि जोहरा जराशी लाजल्यासारखी झाली. बहराम ह्मणतो, 'महाराज, तो वाघाच्या संबंधाचा प्रश्न बिकटच खरा, पण ईश्वर तारता असला ह्मणजे सर्व कांहीं ठीक होतें. ते जे बावा मला त्या वेळीं भेटले, ते परमेश्वराचे दूत—किंबहुना प्रत्यक्ष परमेश्वरच—होते असें म्हटलें पाहिजे. कोण कठीण प्रसंग तो! माझ्या अंगांतून भळभळां रक्त वाहूं लागून मला तिरीम आल्याबरोबर त्यांनीं जे मला उपचार केले व जो माझा ममतेनें समाचार घेतला,

त्याचें मी काय वर्णन करूं! पुढें माझ्या मस्तकीं हात ठेवून मला त्यांनीं अभय दिलें, व आणखी एकवार स्वप्नांत येऊन मला इकडे येण्याविषयीं आज्ञा केली, व तूं बादशहाचा लेक आहेस तरी मी सांगतों तसेंच वाग ह्मणून मला त्यांनीं जें बजावून सांगितलें, ते त्यांचे ममतेचे शब्द अद्यापि माझ्या कानांत गुणगुणत आहेत! अहाहा! काय तो सत्पुरुष!' हें ऐकून सर्वांचीं मनें तंद्री लागल्यासारखीं होऊन त्यांच्या मुद्रा गंभीर दिसूं लागल्या, व तीं सर्व क्षणभर स्तब्ध बसलीं. मग जोहरा बोलते, 'मलाही बाई दोनदां असेंच कोणी फकीरजी स्वप्नांत येऊन त्यांनीं मोठा धीर दिला! हे आणि ते एकच असतील कीं काय कोण जाणें! कारण त्यांनीं यांना व मला जें सांगितलें त्याचा अगदीं मेळ बसला!' राणी ह्मणते, 'हीं पुण्याईचीं कामें आहेत. [illegible] पुण्याई सबळ ह्मणूनच हे असे योग घडून आले!' बादशहा ह्मणतो, 'यांत काय संशय?' मग नूरमहाल हीस उद्देशून तो ह्मणतो, 'बेटा, तुझ्याही पण सुदैवानें हा सर्व जम बसला असेंही मी ह्मणतों!' हें ऐकून नूरमहाल हिच्या पोटांत आनंदाचें भरतें येऊन ती आईकडे उत्सुकतेनें पाहूं लागली. राणी ह्मणते, 'बेटा, या एकंदर गोष्टी मनांत येऊन मला इतका कांहीं हर्ष झाला आहे कीं, माझ्यानें आतां पुढें बोलवतच नाहीं!'

पुढें चौथ्या बैठकीच्या वेळीं बादशहा ह्मणतो, 'जोहराबाई, युवराज व तूं दिल्ली सोडून निघाल्यानंतर वीस पंचवीस कोसांवर तुमच्या भोंवतीं फौजेचा गराडा पडला

असतां तुम्ही फळी फोडून दोघें दोन दिशांनीं बाहेर पडलां, ही तुमच्या पराक्रमाची मोठीच तारीफ करण्यासारखी गोष्ट होय. पण या संबंधानें युवराजांच्यापेक्षां तुझेंच आम्हांला जास्त कौतुक वाटतें; कारण, युवराज किती झाले तरी पुरुष आहेत, त्यांची गोष्ट निराळी. पण तूं स्त्रीजाति—केवळ अल्पवयी मुलगी—असून एवढा जो पराक्रम केला, त्याचें आम्हांला राहून राहून नवल वाटतें !' राणी ह्मणते, 'हें तर खरेंच. आणखी त्यानंतर हजारों कोसांचा जो दुर्घट प्रवास हिनें केला, त्या बाबतींत हिच्या धैर्याची व सोशिकपणाची शिकस्त झाली असेंच ह्मटलें पाहिजे !' नूरमहाल हळूच ह्मणते, 'जोहराबाई ! मला यांपैकीं कशाचेंच एवढें नवल वाटत नाहीं. पण पुढें खोतानास जो तुमच्यावर प्रसंग गुजरला त्यांतून तुम्ही कशा पार पडलां तें मात्र तुमचें चरित्र अगाध आहे !' बादशहा ह्मणतो, 'खचीत खचीत! बेटा, तूं जें हें ध्यानांत ठेविलेंस तें खचीतच विलक्षण आहे !' जोहरा उत्तर करिते, 'यांत वस्तुतः माझा पराक्रम आणि गुण यांचे गोडवे गाइलेले ऐकण्याचा मला मोठा संकोच वाटतो. महाराज, हा सर्व प्रताप आमच्या वडिलांच्या पुण्याईचा व आम्हांस शिक्षण देणाऱ्या वस्तादांच्या परिश्रमाचा होय ! हेंही पण बोलणें केवळ व्यवहारापुरतेंच खरें; कारण या गोष्टींचा जों जों जास्त विचार करावा तों तों याचा संबंध थेट जगत्कर्त्यापर्यंत पोहोंचविल्याखेरीज समाधानच वाटत नाहीं ! हेंचसें काय, पण प्रत्येक क्षुल्लक गोष्टीपासून अत्यंत महत्वाच्या गोष्टीपर्यंत

हाच नियम लागू पडतो. महाराज, मी यःकश्चित् अल्पवयी अबला, माझ्या हातून का असल्या मोठमोठ्या पराक्रमाच्या व अद्भुत गोष्टी व्हावयाच्या ? छी ! छी ! त्या घडवून आणणारा निराळाच कोणी असून तो तुमच्या आमच्या चर्मचक्षूंस दिसत नाहीं ! तथापि तो हें सारें विश्व भरून उरला आहे ! सरकार, मी लहान—आपल्या नूरमहालसार-खीच—तोंडावरचा अजून जारही वाळला नाहीं—तेव्हां अशा गोष्टी आपल्यापुढें बोलण्याचा मला अधिकार पोहोंचत नाहीं. पण वेळ आली ह्मणून कांहीं तरी आपलें वेडेंवाकुडें बो-ललें ! ' बादशहा सद्गदित होऊन म्हणतो, ' बाई, तूं लहान खरी, पण ज्ञानानें फार वृद्ध आहेस. तुझी योग्यता लाख पन्नास हजारांतून एकाद्याला येईल कीं नाहीं याची मला शंका आहे ! जसें तुझें धैर्य आणि शौर्य तशीच पण तुझी सहनशीलता व अमानित्व केवळ अद्वितीय होय ! तुझ्या-सारखी सहनशीलता खरोखरच आमच्या अंगीं सुद्धां नाहीं ! हें पहा, बदमाष लोकांच्या नादीं लागून खराब बनलेल्या त्या खोतानच्या खानानें जो तुझा छळ करून तुला त्रास दिला, त्यावर फौज पाठवून त्याला येथें बांधून आणून तुझ्या पायां पडावयास लावावें असें माझ्या मनांत आलें आहे—इतका कांहीं मला त्याचा त्वेष येऊन गेला आहे !' राणी म्हणते, ' खरेंच ! त्याला शिक्षा होणें अगदीं जरूर आहे ! ' जोहरा ह्मणते, ' छी! छी! महाराज!—बाईसाहेब!—मला आपल्यासमोर बोलण्याची खरोखर लाज वाटते. पण बोलल्यावांचून राह-वत नाहीं ! अहो, कुत्रें माणसाला चावलें ह्मणून माणूस कधीं

कुत्र्याला चावलें आहे काय ! ' त्याच्या नाकाडावर काठी मारून त्याला भों भों करण्यास लावून सोडून द्यावें, तशां-तला हा त्या खानाचा प्रकार होऊन चुकलाच आहे ! त्याचें व त्याच्या साथीदारांचींही नाकें कापलीं गेलीं, आणखी काय पाहिजे ? मेल्याला आणखी मारायाचें तें काय ?' हें ऐकून जोहरा हिच्या शहाणपणासंबंधानें सर्वांनीं तोंडांत बोटं घातलीं. मग बादशहा आनंदभरांत येऊन ह्मणतो, ' बस बस ! जोहराबाई, तूं तर आज कमाल करून सोडलीस ! तूं खरोखर अलौकिक स्त्री या जगांत पैदा झाली आहेस ! याहून आणखी काय बोलावें तें मला सुचत नाहीं !'

पुढें पांचव्या बैठकीच्या वेळीं बादशहानें बहरामास प्रश्न केला, ' काय हो, अब्राखान येथें ती बेढंगी जहांबाज बायको— दिलनवाज—'दिलनवाज़ हें नांव ऐकतांच राणी, नूरमहाल, जोहरा व त्या दोघी दासी यांनीं नाकें मुरडून, त्या बिजवटीची गोष्ट मुळीं काढूं नये असें दर्शविलें. तें बादशहाच्या लक्षांत येऊन तो ह्मणतो, ' मी समजलों, पण त्यांत थोडासा मुद्दा आहे, तेवढ्यापुरतेंच मी यांना विचारतों. युवराज, दिलनवाज हिनें तुम्हांला अडकवून ठेवण्याचा प्रयत्न केला असतां तुम्ही उगीच बरे बसलां हो ?' बहराम उत्तर करितो, ' त्यांत विचाराचा भाग फार होता. एक तर, जोहरा हिचा कांहीं तलास लावावा ह्मणून मीच होऊन तेथें गेलों होतों;—तिनें कांहीं मला बोलावून नेऊन त्रास दिला असें ह्मणतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें तिनें आपल्या स्व-भावास व पतकरलेल्या वर्तनक्रमास अनुसरून जरी माझ्याशीं

न शोभण्यासारखें भाषण व वर्तन केलें, तरी घडलेल्या प्रकारापुरतेंच पाहिलें असतां तिनें माझ्याशीं आगळीक कांहीं केली नाहीं. तसा कांहीं प्रकार जर घडला असता, तर मात्र तिला शासन करणें शोभलें असतें. पण त्यांतही आणखी विचार होताच.' बादशहा ह्मणतो, 'तो कोणता?' बहराम उत्तर करितो, 'विचार हा कीं, स्त्रीजातीवर शस्त्र धरणें हा शूराचा धर्म नव्हे. तेव्हां कांहींही झालें असतें तरी मीं तिला शासन करून आपले हात विटाळले नसते!' हें ऐकून बहरामाच्या थोरवीविषयीं सर्वांच्या मनावर फार उत्तम परिणाम झाला, व बादशहानें 'शाबास!' 'शाबास!' ह्मणून त्याची पाठ थोपटली.

बादशहा आणखी विचारतो, 'पण काय हो युवराज, तुम्ही ओडिसाहून येथें आलां त्या दिवशीं मध्यरात्रीपर्यंत जसें जसें ज्यानें ज्यानें तुम्हांस करावयास सांगितलें, तसें तसें प्रत्येक अपरिचित मनुष्याचें तुम्ही ऐकत गेलां याचें आम्हांला नवल वाटतें!' बहराम ह्मणतो, 'ओडिसा येथून ज्या दिवशीं मी निघालों, त्या दिवशीं पहांटेसच मला जें स्वप्न पडलें त्याचा हा परिणाम होय. काय चमत्कार सांगावा! त्या स्वप्नांत, ज्यांनीं पूर्वीं वाघाच्या प्रसंगांतून माझा बचाव केला, त्याच फकीरजींनीं मला बजावून सांगितलें होतें कीं, तूं बादशहाचा लेक असलास तरी मी सांगतों असेंच तुला केलें पाहिजे. या वचनावर माझी पूर्ण निष्ठा असल्यामुळें मला तसें वागणें भाग पडलें; व त्या वागण्यापासून माझा इष्ट हेतु पूर्ण झाला इतकेंच नव्हे, तर आतां

आणखी काय बोलूं ? ' असें म्हणून संकोचानें तोंड दाबून बहराम खालीं पाहूं लागला. त्यावरून नूरमहाल लाजल्यासारखी होऊन गालांतल्या गालांत हसूं लागली, व जोहरा तिची थट्टा करूं लागली. त्या दोघी दासींनाही बोलल्यावांचून राहवेना. अमीना म्हणते, ' यांचें सगळें चांगलें झालें, आणि आम्हांला मधल्यामधें उगीच बोलणीं खावीं लागलीं ! ' मैमुना म्हणते, ' मला तर बाई हे आतां मारतात कीं काय असें भय पडलें होतें ! ' राणी म्हणते, ' हें सगळें जोहराबाईचें कृत्य ! हिनें तेवढ्यांतल्या तेवढ्यांत केवढें मोठें गौडबंगाल उभें केलें ! ' 'गौडबंगाल' हे शब्द ऐकतांच नूरमहाल व बहराम यांच्या डोळ्यांसमोर तो प्रसंग हुबेहूब उभा राहून दोघांनाही हंसें लोटलें. तेव्हां संकोचास्तव नूरमहाल हिनें जोहरा हिजकडे तोंड फिरवून आपलें हंसें दाबलें, व बहरामानेंही तोंडावरून रुमाल घेऊन तें बाहेर पडूं दिलें नाहीं. इतक्यांत जोहरा ह्मणते, ' बाईसाहेब, आपण म्हणतां पण मी आपली अगदीं गुपचिप बसलें होतें हो ! काय तें शेवटीं एवढेंच बोललें कीं, ही पहा तुमची बालमैत्रीण जोहरा येथें आहे ! ' बादशहा ह्मणतो, ' हं, हं ! आपणच सर्व मौजेचा घाट बनवून आणून शेवटीं आपली नामानिराळी ! ' हें ऐकून सर्वच हंसूं लागलीं, व त्या दिवशींची बैठक संपली.

भाग चोविसावा.

—:*:—

बहरामाची इस्तंबूलच्या गादीवर स्थापना.

देव उदार उदार । देतां न ह्मणे थोडें फार ॥

तुकाराम.

यानंतर सहाव्या बैठकीच्या वेळीं बादशहा ह्मणाला, 'यापूर्वी पांच वेळां आपण येथें तास तास दोन दोन तास बसून जें बोललोंचाललों, त्यापासून सर्वांना मोठा आनंद व करमणूक तर झालीच. पण त्यांत माझा स्वतःचा उद्देश फार निराळा होता. परमेश्वराच्या प्रसादानें जोहराबाई ही साध-नीभूत होऊन नूरमहाल हिला युवराज शहाअली बहराम-खान यांच्यासारखा रूपगुणसंपन्न व आमच्या पदवीस योग्य असा पति मिळाला; पण ही गोष्ट इतकी कांहीं चम-त्कारिक रीतीनें घडून आली कीं, तिला अद्भुत कादंबरीच कोणी ह्मणेल ! मला ही गोष्ट सर्वथैव सत्य वाटली, पण तिची आणखी बारीक रीतीनें ज्ञान केल्यावांचून मला राहवेना; ह्मणूनच अशा प्रकारें बायकामाणसांत व मुलांत मुद्दाम बसून अप्रत्यक्ष रीतीनें या गोष्टीची मीं आणखी खात्री करून घेतली. ती मला पुरी पटल्यावरून, माझ्या मनांत जी कांहीं महत्वाची गोष्ट आली होती, ती आतां बोलून दाखवितों. ती गोष्ट ही कीं, आपल्याला पुत्रसंतान नसल्यामुळें आपल्या गादीवर जांवई-बोवांची स्थापना करावी असें माझ्या मनांत आलें; पण राज्य करण्यासारखें अवघड काम कोणतेंच नाहीं, तें यांच्यानें

कसें झेंपेल हें मला पाहणें होतें. तें, आज इतके दिवसांच्या यांच्याशीं झालेल्या सहवासावरून व संभाषणावरून, हे फार उत्तम रीतीनें बजावून या राज्याची आजपर्यंत चालत आलेली इभ्रत कायम राखतील अशी माझी पूर्ण खात्री झाली आहे. तेव्हां हल्लीं चालू असलेला हा उत्सव पुरा होण्यास चार सहा दिवस उरले आहेत, तेवढ्यांत हा राज्यभार यांच्यावर टाकून मीं आपल्या देहाचें सार्थक करण्याचा विचार केला आहे. '

हे बादशहाच्या तोंडचे शब्द ऐकून राणीस गहिंवर आल्यासारखें दिसलें; नूरमहाल हिचा चेहरा प्रफुल्लित दिसूं लागला; जोहरा विचारांत पडली; व बहरामास संकट पडल्या-सारखें दिसलें. तो ह्मणाला, ' सरकार, आपण माझ्या वडिलांच्या ठिकाणीं आहां. तेव्हां आपली आज्ञा मला शिरसा वंद्य आहे. परंतु मी वडिलांचा एकुलता एक असल्यानें मी येथें राहून कसें चालेल, हा एक प्रश्नच आहे. तशांतूनही—' बादशहा त्यास पुढें बोलूं न देतां ह्मणतो, ' तुह्मी पुढें काय म्हणणार तें सर्व माझ्या लक्षांत येऊन चुकलें आहे, व तुमच्या सर्व अडचणी मनांत आणूनच मी आतां तुह्मांस काय तें सांगून टाकतों. तुम्ही एकुलते एक असलां ह्मणून काय झालें ? दोन्ही ठिकाणचीं राज्यें तुह्मांस चालवितां येण्यास कांहींच हरकत नाहीं ! आमचे वजीरसाहेब व एकंदर प्रधान-मंडळ मोठें राजकार्यधुरंधर असल्यामुळें तुह्मांस या बाबतींत कोणतीच अडचण पडणार नाहीं. सर्व कांहीं सुरळीत चा-लेल. तेव्हां तुह्मांस स्वदेशीं जाऊन तेथूनही कांहीं दिवस

आपल्या हुकमतीखालीं येथील राज्यकारभार चालवितां येईल. पुढें ईश्वरसत्तेनें आह्मांस नातू झाला तर त्याला या राज्यावर स्थापिलें असतां सर्व व्यवस्था उत्तम प्रकारें लागणारी आहे. याहून मी जास्त कांहीं सांगत नाहीं. 'सांगितली बुद्धि आणि बांधली शिदोरी' यांचा फारसा उपयोग होत नसतो. अंगावर भार पडला ह्मणजे ज्याचें त्याला सर्व कांहीं सुचतें!'

वरील बैठक ही या मंडळीची मोतीबागेंतील शेवटची बैठक होय. पुढें बादशहानें एक दोन दिवसांतच आपलें मंत्रिमंडळ व अमीरउमराव यांस आपला मनोदय कळवून बहरामाची उघड दरबारांत आपल्या गादीवर स्थापना करण्याचें ठरविलें. त्या दिवशीं धर्माधिकारी व दरबारी लोकांखेरीज आणखी शहरांतील व राज्यांतील इतर प्रमुख लोकांसही हजर राहण्याविषयीं निमंत्रणचिठ्ठ्या पाठविण्यांत आल्या होत्या. त्याप्रमाणें सर्व लोक येऊन तिसरे प्रहरीं दरबारच्या कामास सुरुवात झाली. त्या दिवशींचा तेथला थाट काय विचारावा! दरबारचा दिवाणखाना एवढा मोठा होता कीं, त्यांत दहा हजार माणूस सहज बसण्यास अडचण नव्हती. तथापि लोकांची इतकी खेंच होऊन गेली कीं, कित्येकांना दाटीमुळें उभें रहावें लागलें! एवढा मोठा दरबार तेथें पूर्वी कधींच भरला नव्हता. त्या दिवाणखान्यास रोषनाई अप्रतिम आलेली होती. भिंतींवर नानारंगांचें मिन्याचें काम व चित्रांचें सुंदर काम केलेलें असून छतास रंगीबेरंगी मोत्यांच्या व हिऱ्यांच्या झालरी लाविलेल्या होत्या. तसेंच तऱ्हेतऱ्हेच्या

बिलोरी सामानाची तर तेथें अगदीं रेलचेल करून सोडली होती! त्यांत एक एक झुंबर हजार हजार मेणबत्ती लावि- लेलें अशीं कित्येक होतीं! बादशाही दरबारच तो! त्याचें वर्णन करावें तितकें थोडेंच! सबब बादशहाचें उत्कृष्ट बहु- मोल सिंहासन व दरबारच्या लोकांच्या बैठकीची व्यवस्था यांचें वर्णन आणखी तपशीलवार करून आम्ही वाचकांचा वेळ घेत नाहीं. असो; अशा त्या बड्या दरबारांत बादशहा सिंहासनावर विराजमान झाल्यावर सर्व लोक तटस्थवृत्ति झाले. बादशहानें बहरामास आपल्या उजव्या हाताशीं रत्न- जडित सोन्याच्या खुर्चीवर बसविलें, व पुढीलप्रमाणें मोठ्या गंभीर मुद्रेनें अस्खलित व सर्वांस ऐकूं जाईसें भाषण केलें:-

"काजीसाहेब, वजीरसाहेब, अमीरउमराव व इतर सभासदहो,—आजचा दिवस आपणां सर्वांनाच फार मह- त्वाचा आहे. आमची एकुलती एक प्रिय कन्या नूरमहाल हिच्या विवाहासंबंधाची गोष्ट आजपर्यंत कर्णोपकर्णी सर्वांस विदित झालीच आहे. तथापि ती प्रसिद्धपणें उघड दर- बारांत सर्वांस महशूर करून, या ईश्वरदत्त राज्यासंबंधानें कांहीं विशेष व्यवस्था करण्याचा आमचा मानस आहे. येथें आमच्या शेजारीं बसलेले तरुण, रूपसंपन्न, विद्वान् व राज- कारणपटु गृहस्थ हे, आमचे सन्मान्य दोस्त दिल्लीचे नामां- कित बादशहा औरंगबक्षसाहेब बहादूर यांचे एकुलते एक चिरंजीव असून यांचें नांव युवराज शहाअल्ली बहरामखान बहादूर असें आहे. हे आमचे जामात कसे झाले ती हकी- कत येथें सांगण्याची जरूर दिसत नाहीं. तथापि पुरुषवेष घेऊन आज सहा महिने जिनें आपल्या असाधारण धैर्यानें,

धाडसानें, चातुर्यानें, शहाणपणानें व औदार्यानी. असो. हाल्वून सोडून आह्मांसुद्धां सर्वांस चकित केलें, एवढ्या व थोर मनाच्या मुलीच्या योगानेंच केवळ हें फार व व अत्यंत संतोषदायक कार्य घडून आलें हें येथें सांगणें इष्ट आहे. ही मुलगी—ओहराबाई—ही दिल्लीच्या वजीरसाहेबांची एकुलती एक कन्या आहे, व आमच्या ह्या जामातांची ती बालमैत्रीण असून तिचें ज्ञान खरोखर अगाध आहे! आणि त्या उभयतांची जी पाकदोस्ती आहे, तशी या मनुष्यलोकीं कधीं कोणीं पाहिली असेल असें वाटत नाहीं! असो. आह्मांस पुत्र नसल्यामुळें, आमच्या मनाप्रमाणें खानदानीचा व गुणसंपन्न जामात आपल्याला मिळाल्यास त्याच्या अंगावर हा राज्यकारभार टाकून आपण मोकळें व्हावें असा आमचा बहुत दिवसांचा हेतु होता, तो आज सफळ होण्याचा प्रसंग आल्याकारणानें आह्मांस इतका कांहीं आनंद झाला आहे कीं, त्याचें शब्दांनीं वर्णन करवत नाहीं! सबब आम्ही आज आमचे हे जामात शहाअल्ली बहरामखान बहादूर यांस हें ईश्वरदत्त राज्य अर्पण करून तख्तनशीन कारितों, व अशी आज्ञा व हुकूम करितों कीं, आमच्याप्रमाणें सर्वांनीं यांचा मान व दर्जा कायम ठेवून यांच्या हुकुमांत वागावें, आणि जेणेंकरून या राज्याची बढती सदोदीत होत जाईल असें सर्व प्रकारें वर्तन करावें. याहून ज्यास्त काय सांगावयाचें आहे!"

इतकें बोलून बादशहा उठून बहरामास तख्तावर बसवूं लागला असतां उभयतांनाही मोठा गहिंवर आला. बहरामानें

त्यांत पूर्वी सांगितलेल्या त्या दोघी चतुर दासी—मैमुना व अमीना—ह्याही होत्या. ही मंडळी इस्तंबूल येथून ज्या दिवशीं निघाली, त्या दिवशीं सर्वांना फार वाईट वाटलें. त्यांत विशेषतः राणीला मुलीच्या वियोगाचें साहजिकच परमावधीचें दुःख झालें. ती जोहरा हीस ह्मणाली, 'नूरमहाल ही तुमची बहीण आहे असें समजा बरें! ही अजून अल्लड आहे. पण तुमच्या संगतींत असल्यामुळें मला तिची काळजी नाहीं!' जोहरा राणीस ह्मणते, 'आपण कांहींएक काळजी करूं नये. आम्ही कांहीं कायमचींच येथून जातों असें थोडेंच आहे! फिरून लवकरच येऊन भेटूं.' राणी ह्मणते, 'आतां इतक्या लांबच्या पल्ल्यावरून तुह्मी सर्वजण मला परत येऊन भेटाल ही फार दूरची गोष्ट आहे! मुलीला संभाळा एवढेंच माझें सांगणें आहे!' जोहरा किंचित् हंसून म्हणते, 'आतां संभाळायाचें मजकडे काय आहे? संभाळणारे महासमर्थ प्रभु दाखवून देऊन मी आपल्या कन्येच्या ऋणांतून मुक्त झालें आहें!' हें समयास अत्यंत योग्य व मधुर भाषण ऐकून राणीस मोठें कौतुक वाटलें, व तिचा खेद नाहींसा होऊन तिनें प्रेमपूर्वक हास्यवदन केलें; आणि जोहरा व नूरमहाल या उभयतांसही कुरवाळून निरोप दिला.

ही स्वारी इस्तंबूल येथून जी निघाली, ती वाटेंत फक्त जरूरीपुरते मुक्काम करीत करीत केरो येथें येऊन दाखल झाली. ही छोटीच पण बादशाही थाटाची स्वारी एकाएकीं आलेली पाहून केरो येथील लोकांचें साहजिकच तिकडे [illegible]र लागलें, व त्यांपैकीं कित्येकजण, ही मंडळी कोण,

कोठली, वगैरेबद्दल ते चौकशी करूं लागले. त्यांतून त्या दिवशीं तेथील बड्या दर्ग्यांत मोठा उरूस भरला असल्याकरणानें तर तेथें चोहोंकडून पुष्कळ लोक येऊन मोठीच गजबज झालेली होती. बहरामाच्या हुकुमावरून त्याच्या मुख्य कारभाऱ्यानें त्यांतील एका संभावित गृहस्थास विचारिलें, 'हें येथें काय चाललें आहे हो?' तो उत्तर करितो, 'साहेब, आपणांला येथील कांहींच माहिती नाहीं असें दिसतें. आज बरोबर एक वर्ष झालें, आमच्या या शहरावर एक महाअनर्थ गुदरला.' कारभारी विचारतो, 'तो कोणताहो बाबा?' गृहस्थ उत्तर करितो, 'थोडक्यांत सांगतों, ऐका. येथें खाडीमध्यें कित्येक कोळी मासे धरीत असतां एकास एक भला मोठा जंगी मासा सांपडला. पुढें काय चमत्कार सांगूं महाराज! त्या माशाच्या पोटांत त्या कोळ्याला एक सोळा सतरा वर्षांचा राजबिंडा मुलगा मिळाला! तेव्हां आमच्या सुलतानसाहेबांस मूल नसल्यामुळें त्या कोळ्यानें तो मुलगा त्यांना नजर केला. त्यांचें त्या मुलावर इतकें प्रेम जडलें कीं, त्याच्यावांचून त्यांना रात्रंदिवस दुसरें कांहींएक सुचेनासें झालें! त्यांनीं राज्यकारभाराचें काम पाहणेंही सोडिलें! तेव्हां आमचे येथील वजीरसाहेब मोठे धोरणी, विचारी व अत्यंत स्वामिभक्त असल्यामुळें त्यांनीं मोठ्या युक्तीनें व अदबानें सरकारची कानउघाडणी केली. परंतु दैवाची गति विचित्र! त्याचा परिणाम असा झाला कीं, महाराजांनीं तत्काळ राज्यकारभार वजीरसाहेबांच्या हातीं देऊन आपण मोकळे होऊन बसले, व सर्वस्वीच

त्या मुलाच्या आधीन झाले! पुढें एके दिवशीं राजवाड्याच्या गच्चीवर आमचे सरकार त्या मुलाबरोबर खेळत बसले असतां एकाएकीं एक मोठा राक्षसी पक्षी येऊन त्या मुलाला चोंचींत घेऊन चालला! तेव्हां सरकार त्याचे पाय धरून ओळकंबले, व एक खिजमतगार सरकारच्या पायांस धरून ओळकंबला. नंतर आमचें सरकार व तो खिजमतगार हे हात सुटून खालीं पडले व प्राणास मुकले, आणि तो पक्षी त्या मुलास घेऊन कोणीकडच्या कोणीकडे जो गेला, त्याचा पत्ता नाहीं! त्या मुलाचें नांव बहराम असें होतें. असो. पुढें सरकारचें प्रेत या दर्ग्यांत पुरून त्यावर कबर बांधिली. आतां शेवटची मोठ्या नवलाची गोष्ट सांगावयाची ही कीं, त्यांच्या कबरींतून ' हाय बहराम !' ' हाय बहराम ! ' असा ध्वनि ऐकूं येऊं लागला! तो अद्यापिही कधीं कधीं ऐकायाला येतो! या गोष्टीस आज बरोबर एक वर्ष झालें. आमच्या सुलतान साहेबांस त्यांची सर्व प्रजा केवळ बापाप्रमाणें—किंबहुना देवाप्रमाणें—मानीत असल्यामुळें, त्यांचें वार्षिक स्मारक ह्मणून आज येथें हा उरूस भरविण्यांत आला आहे.'

ही हकीकत त्या कारभाऱ्यानें ऐकून, बहरामाची जी हकीकत इस्तंबूल येथें प्रसिद्ध झालेली होती, तिच्यांतील केरोचा भाग अगदीं बरोबर मिळालासें पाहून त्याला मोठें आश्चर्य वाटलें, व ती सर्व त्यानें बहरामास निवेदन केली. ती ऐकतांच सर्व मंडळीनिशीं बहराम दर्ग्यांत गेला. तों कबरींतून ' हाय बहराम !' ' हाय बहराम !' असा आवाज कसारखा मोठमोठ्यानें होऊं लागला! मग काय विचा-

वें ! जोहरा व नूरमहाल यांस ही हकीकत माहीत होतीच, ाचा प्रत्यक्ष अनुभव पाहून त्यांच्या नेत्रांतून सारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या ! आणि बहराम तंद्री लावून व डोळ्यांवर रुमाल धरून पुतळ्यासारखा निचेष्ट उभा राहिला ! हा अत्यंत कारुण्यप्रद देखावा पाहून सभों-वतालचीं सर्व मनुष्यें आश्चर्यचकित झाली ! याप्रमाणें दोन घटका लोटल्या. तेव्हां जिकडे तिकडे ही बातमी सरून सारें शहर तेथें लोटलें, पण या प्रकरणाचा फाड ,सा पाडावा हें कोणासही सुचेना! इतक्यांत तेथें एक अद्भुत मत्कार झाला. तो असा कीं, एकाएकीं मेघांनी सर्व आकाश व्याप्त होऊन जिकडे तिकडे अंधार पडला, आणि विजा चमकूं लागल्या. अशा स्थितींत दहा पांच पळें जाऊन पर्जन्याचे तुषार येऊं लागले. त्याबरोबर मोठ्यानें आकाशवाणी झाली कीं, 'अरे सुलतान ! ज्याला तूं हांका मारीत आहेस तो बहराम तर तुझ्या जवळ येऊन उभा राहिला आहे ! दुःख सोडून दे, आणि उठून त्याला भेट ! ' तेव्हां तत्काळ सुलतानाचें धडगें दुभंग होऊन त्यांतून तो दिव्य पुरुष बाहेर पडला, आणि त्यानें बहरामाच्या गळ्यास मिठी घातली ! ' दिव्य पुरुष ' असें ह्मणण्याचें कारण, तो जो धडग्यांतून बाहेर पडला त्याची कांति पूर्वीपेक्षां फारच भिन्न—केवळ स्वर्गी-च्या देवदूताप्रमाणें तेजस्वी—दिसूं लागली ! हा विलक्षण प्रकार पाहून बहुतेक सर्व लोक भयभीत होऊन पळूं लागले ! नूरमहाल ही तर मूर्छित होऊन पडली ! पण बहराम व जोहरा हीं दोघें मात्र बिलकुल न घाबरतां तशींच उभीं असून,

'देव करील तर काय न होईल' अशा भरंवशानें त्यांच्या वृत्ति तल्लीन झालेल्या दिसल्या! नूरमहाल हीस या संबंधाचा पूर्वीचा इतिहास कळलेलाच होता; त्याची आठवण देऊन जोहरा हिनें लवकरच तिला सावध केलें, आणि परमेश्वराच्या अगाध कृतीचा हा एक मासला आहे अशी तिची खात्री करून देऊन तिला नेहमींच्या वृत्तीवर आणिलें. इतक्यांत आकाश स्वच्छ होऊन विजा चमकण्याचें व पावसाचे तुषारही पडण्याचें बंद राहिलें. तेव्हां हळू हळू सर्व लोक फिरून त्या जागीं येऊं लागले. सुलतानाचा मुख्य वजीर व दरबारचे इतर लोक त्यांत होतेच; त्यांनीं बहरामास तेव्हांच ओळखिलें, व सुलतान, बहराम आणि त्याची सर्व मंडळी इतक्यांना राजवाड्यांत ते घेऊन गेले. तेथें बहरामानें आपली पहिली सर्व खरी हकीकत व पक्ष्यानें नेल्यापासून आजपर्यंत घडलेल्या गोष्टी दरबारच्या मंडळीस सांगितल्या. त्या ऐकून सर्वांना—मुख्यतः सुलतान व वजीर यांना—पराकाष्ठेचें आश्चर्य व आनंद वाटला. मग त्या दिवशीं दुसरें कांहींएक न करितां सर्वांनीं दुसरे दिवसपर्यंत सारा वेळ आनंदांत घालविला. असा आनंदाचा दिवस, सुलतानावर तो प्रसंग गुदरल्या वेळेपासून तहत एक वर्षपर्यंत केरो शहरास हाच काय तो प्राप्त झाला!

दुसरे दिवशीं सुलतानानें दरबार भरवून वजिराचे संमतीनें बहरामास केरोचा सुलतान ह्मणून तेथील गादीवर बसविलें. बहरामानें होय नाहीं ह्मटलें, पण त्याला त्या पदाचा स्वीकार करावाच लागला. तथापि आपणास हिंदु-

स्थानास गेलेंच पाहिजे, असें त्याचें आग्रहाचें ह्मणणें पडल्यावरून सुलतान त्यास ह्मणाला, 'कांहीं चिंता नाही, आज वर्षभर चालविल्याप्रमाणें वजीरसाहेब राज्याचा कारभार तसाच पुढें चालवितील. मग दिल्लीस गेल्यावर कांहीं तरी कायमची व्यवस्था करितां येईल. कारण मीही माझ्या पूर्वीच्या संकेताप्रमाणें तुह्मांस सोडून कोठेंही राहणार नाहीं; मीही तुमचेबरोबर दिल्लीस येणार!' नंतर एक दोन दिवसांतच सुलतानासह बहराम व त्याची सर्व मंडळी तेथून निघाली.

भाग सव्विसावा.

—:*:—

हिंदुस्थानास प्रयाण—सौंदर्यवल्लीची कामनापूर्त्ति.

सत्यप्रेमरसानें हृदयकमल वा तुडुंब जें भरलें ।
तापें सुकलें यद्यपि कोण म्हणे तरि सदायु कीं सरलें ! ॥

याप्रमाणें ही मंडळी निघाल्यावर बहुत दिवसांनी सौंदर्यवल्लीच्या स्वर्गभुवनानजीकच्या कुव्यापाशीं येऊन पोहोंचली. तेथून स्वर्गभुवनास जाण्याचा मार्ग कुव्यांतील विवराखेरीज दुसरा अर्थातच बहरामास माहीत नव्हता. तेव्हां बहरामाच्या सांगण्यावरून आंत उडी टाकून खुणेनें विवर शोधण्याच्या कामास त्याच्या बरोबरचे कांहीं जवान लागले. पण तेथें त्यांना विवरबिवर कांहींच सांपडेना! तेव्हां बहराम रागानें म्हणतो, 'विवर सांपडत नाहीं ह्मणजे काय गोष्ट आहे! मी स्वतः त्यांतून गेलों आहें, आणि तुम्ही नाहीं म्हणतां याला काय म्हणावें? पहा, मी आतां आंत उडी टाकतों

आणि तें तुम्हांला दाखवितों ! ' परंतु कोणीही त्यास तसें करूं देईनात. तरी पण तो त्यांजकडे लक्ष न देतां उडी टाकण्यास सरसावला ! इतक्यांत कुव्यांतून गंभीर शब्द झाला !—' अरे, अविचार करूं नको ! विवर आतां सांपडणार नाहीं. कुव्याला वळसा घालून डाव्या हातानें डोंगराकडे जा, म्हणजे इच्छित स्थळीं पोहोंचशील ! ' हें ऐकल्यांच सर्वांनीं तो रस्ता धरला.

दोन तीन कोस गेल्यावर त्यांना एक मोठी झाडी लागली. तेथून डोंगर जवळच दिसत होता. त्याचें एक टेंकाड ती मंडळी चढली. त्याच्या सपाटीवर ताड, तमाल, सुरू, मंदार, पारिजातक वगैरे अनेक जातींचे वृक्ष असून ते इतके उंच गेलेले होते कीं, गगनाला सांवरून धरीत आहेत कीं काय असें भासत होतें ! त्याचप्रमाणें चंपक, अशोक, बकुल, चंदन वगैरे नानाप्रकारचे वृक्ष, तसेंच जाई, जुई, मोगरा, नेवाळी, चमेली वगैरे वेली यांच्या फुलांच्या सुवासानें सारा आसमंतात्भाग दरवळून गेला होता. शिवाय तेथें मधुर शब्द करणाऱ्या पक्ष्यांचे थवेचे थवे झाडांवरून बसलेले असल्यामुळें तें स्थळ अत्यंत मनोरम झालें होतें. तेथें दोन सरोवरांच्या आडसट्ट्यांत, डोळे फिरण्यासारखा नीट उंच गेलेला भला मोठा कडा असावा याप्रमाणें एक जंगी दरवाजा या मंडळीच्या दृष्टीस पडला. त्याकडे हीं माणसें कौतुकपूर्वक पहात असतां आंतून एकानें खाडकन् तो उघडला ! तों उघडणारा इसम तीन ताड उंच असून त्याच्या उंचीच्या प्रमाणानेंच त्याचें शरीर होतें! त्याला पाहून ही

सारी मंडळी गर्भगळित होऊन गेली ! हें पाहून त्या इसमानें साधारण मनुष्यासारखें रूप घेतलें, आणि या मंडळीची खातरजमा करून म्हणाला, ' तुम्ही कांहीं भिऊं नका. ह्या दरवाज्याचे आंत यक्षांचें नगर आहे, त्या नगराचा मी द्वारपाल आहें. आह्मां यक्षांत मनुष्यांप्रमाणेंच दुष्ट व सुष्ट असे प्रकार आहेत. त्यांपैकीं आम्ही अगदीं गोडवे यक्ष आहों. आम्ही प्रसंगीं कठोर भाषण करूं, पण आमच्या हातून घातपात ह्मणून कधीं कोणाचा व्हावयाचा नाहीं. असो. तुम्ही वाट चुकून भलतीकडे चाललां आहां. आतां हें टेंकाड उतरून परत जा, आणि झाडी लागेल तेथून डाव्या अंगचा रस्ता धरा, ह्मणजे दीड दोन कोसांवर ' स्वर्गभुवन ' नांवाचें स्थळ तुह्मांला आढळेल. तेथें कदाचित् तुमचें मोठें कार्य होण्याचा संभव आहे. पण वर्ष दीड वर्षापूर्वी एकजण जसा हरामखोरपणा करून गेला तसला कांहीं प्रकार तुमच्या हातून घडला तर मात्र तुमचें कसें काय होईल तें सांगवत नाहीं ! '

हें त्या यक्षाचें भाषण ऐकून बहरामाला सर्व खाणाखुणा पटल्या. जोहरा, नूरमहाल, सुलतान वगैरेंनाही त्या संबंधाची हकीकत कळलेली असल्यामुळें, आतां सौंदर्यवल्ली आपणांस दिसणार हें मनांत येऊन सर्वांना मोठा आनंद झाला. थोडक्याच वेळांत ही मंडळी स्वर्गभुवनाच्या कोटापाशीं गेली. पण आंत शिरण्याचा दरवाजा सांपडण्यास त्यांना बराच वेळ लागला. तो दरवाजा उघडाच होता. पण हीं माणसें आंत जाऊन पाहतात तों बहरामानें वर्णन

केल्याप्रमाणें तेथील बागाचा मागमूस बहुतेक कांहींच दिसत नसून, थोडींशीं वठलेलीं झाडें व पानांचा वाळून कोळ झालेला पाचोळा मात्र त्यांच्या दृष्टीस पडला. त्यावरून सर्व-जण फारच खिन्न झालीं. पुढें मंदिरापाशीं जातात तों त्याचाही दरवाजा उघडा असून आंत जो अत्यंत कारुण्य-प्रद देखावा त्यांच्या दृष्टीस पडला, त्याच्या योगानें सर्वांचें काळीज दुभंग झालें! तेथें सर्व कांहीं व्यवस्था स्वर्गभुवन या नांवाला अनुरूप असून, बाकीचा प्रकार मात्र हृदय-भेदक होता. तेथें पलंगावर एक अत्यंत सुंदर तरुण स्त्री निजली असून ती इतकी कृश झालेली होती कीं, अस्थि आणि चर्म यांचा सांगाडाच केवळ तो होता असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं! तिचे डोळे अगदीं खोल गेले होते, व तिच्या हातांत एक जपमाळ असून तिचा एक एक मणी ती दहा दहा वीस वीस पळांनीं ओढीत असे, व त्याबरोबर कांहीं दुःखोद्गार काढीत असे; पण ते दुरून ऐकणाराला मुळींच समजण्यासारखे नव्हते. तिच्या सभों-वतीं दहा तरुण रूपवती स्त्रिया बसलेल्या असून त्याही दुःखानें व्याप्त व कृश झालेल्या होत्या. ही इतकी मंडळी तेथें येऊन उभी राहिली तरी त्या स्त्रियांपैकीं कोणींही त्यां-कडे लक्ष दिलें नाहीं. त्या सर्वजणी रडत व स्फुंदत असून त्यांपैकीं दोघी दोघी आळीपाळीनें तशाच स्थितींत पुढील अर्थाच्या गाण्याचें एक एक कडवें करुणस्वरानें पण मोठ्या तालसुरावर ह्मणत होत्याः—

मातापितरां सोडुनि येथें हेतु धरुनियां जो बसलें ॥
विषय तयाचा प्राप्तहि होतां दुर्दैवानें फसवियलें ॥ १ ॥

वेडी होऊनि वाट प्रियाची बघत दिवस बहु कंठियले ॥
दुर्दैवाची कमाल झाली ! दर्शन त्याचें नच घडलें ॥ २ ॥
कठोर शब्दीं मन प्रियाचें वळवायाचा यत्न कसा ॥
करण्याची मज बुद्धि जहाली ! दुर्दैवाचा योग तसा ! ॥ ३ ॥
प्रेमामृत तें काळकूट कीं बनलें माझ्या दैवबळें ॥
चटका त्याचा लागुनि माझें हृदय किती तरि होरपळे ॥ ४ ॥
दावा ! दावा ! त्वरित सख्यांनो प्रियमुखचंद्राप्रति मजला ॥
ना तरि विरहाग्नि हा घेइल प्राणाच्या मम आहुतिला ॥ ५ ॥

इतकें गाणें ह्मणून होत आहे तों केरोच्या सुलतानाचा कंठ सद्गदित होऊन, तो त्या निजून राहिलेल्या स्त्रीच्या तोंडापाशीं कान करून ती कोणाचें नांव घेऊन माळेचा मणी ओढीत आहे हें ऐकूं लागला. तों 'हाय बहराम !' 'हाय बहराम !' ह्मणून माळेचा एकेक मणी ती ओढीत आहे असें त्याला स्पष्ट ऐकूं आलें. त्याबरोबर त्याच्या नेत्रांतून खळखळ अश्रु वाहूं लागले ! तो ह्मणतो, 'बेटा, प्राण सोडूं नको ! हा बहरामच येथें उभा आहे !' तें ऐकून ती स्त्री तशीच डोळे न उघडतां हळूच म्हणते, 'मला 'बेटा' कोण म्हणत आहे ! बाबा आले काय ?' हें ऐकून सुलतान ह्मणतो, 'बेटा, ऊठ. हा तुझा प्रियकर येथें उभा आहे !' इतकें होतांच पुढें पहिलें कडवें फिरून म्हणण्याची ज्यांची पाळी होती त्या दोघी स्त्रियांनीं तें न म्हणतां प्रसंगास अनुसरून तितक्याच्या तितक्यांत नवीन तयार करून पुढील दोन चरण म्हटले:—

आला ! आला ! प्रियकर बाई ! तुझ्या जिवाचा परमसखा ॥
नेत्र उघडुनी पाहिं तयाला जोडिशील स्वर्लोकसुखा ! ॥ ६ ॥

इतक्यांत त्यांपैकीं एकजण उठून तिनें रत्नजडित सोन्याच्या प्याल्यांत पांढऱ्या शुभ्र रंगाचें सरबत आणून त्या निजलेल्या स्त्रीच्या तोंडास तो प्याला लाविला. त्याचे दहा पांच थेंब तिच्या पोटांत उतरतांच, मरणोन्मुख मनुष्याच्या जिव्हेला त्रैलोक्यचिंतामणीच्या मात्रेचा एक वळसा लागल्याबरोबर तो जसा बोलायाला लागतो, त्याप्रमाणें ती खाडकन् उठून बसली! तिनें डोळे उघडले तों खरोखरच बहराम आपल्याजवळ उभा आहे असें तिच्या दृष्टीस पडलें! तेव्हां त्याजकडे प्रेमयुक्त रागानें पाहून तिनें तितक्यांत रचून पुढील चुटका ह्मटला:—

निर्दय किति तरि पुरुषजात हीं भोळ्या अबलांप्रती।
प्रेमा वरवर दावुनि त्यांतें अकस्मात त्यागिती!॥

हा चुटका ह्मटल्याबरोबर तिला तेवढाही शीण सहन न होऊन ती फिरून ग्लानि येऊन पडली! तेव्हां पूर्वी सांगितलेल्या त्या स्त्रीनें पुनः तें पांढरें सरबत तिला चांगलें अर्धा प्याला पाजिलें. तेव्हां मात्र तिला पुष्कळच शक्ति येऊन ती चांगली बोलायाला लागली. पण फिरून आणखी पहिल्यासारखें होऊं नये ह्मणून त्या स्त्रीनें तिला पुढें बोलूं न देतां चटकन् तें राहिलेलें सारें सरबत तिजकडून पिवविलें. तेव्हां तर ती अगदीं खडखडीत होऊन गेली; इतकेंच नाहीं, तर चमत्कार हा कीं, साधारणपणें जितकें आरोग्य मनुष्याच्या शरिरीं दिसावें तितकें तिच्या ठिकाणीं दिसूं लागलें! त्याबरोबर तिनें आपण होऊन आणखी एक सरबताचा प्याला आणवून तो सगळाचा सगळा पार केला.

मग तर अद्भुतच चमत्कार झाला! तो असा कीं, ती इतकी टवटवीत व तेजस्वी दिसूं लागली कीं, तिला पाहून हीं आलेली सर्व माणसें दिपून गेली!

ही आसन्नमरण झालेली स्त्री कोण होती हें वाचकांच्या ध्यानांत येऊन चुकलेंच असेल. हिचें व हिच्या त्या स्वर्गभुवनाचें वर्णन पूर्वी दहाव्या भागांत सविस्तर केलें असून, सदर भागाच्या शेवटीं सांगितल्याप्रमाणें बहरामानें तेथील नदीच्या डोहांत उडी टाकल्या दिवसापासून ही यक्षराजकन्या त्याच्याकरितां झुरणीस लागून राहिली होती; कारण तो जिवंत असून कोठें तरी सुखरूप आहे असें ती अंतर्ज्ञानानें जाणून होती. पण तो केव्हां भेटेल—किंबहुना भेटेल कीं नाहीं—याविषयीं मात्र तिला संशय होता; आणि खरोखर इतक्यांत बहराम वर सांगितल्याप्रमाणें जर तेथें येऊन तिला न भेटता, तर तिचें प्राणोत्क्रमण होण्यास कांहीं फारसा वेळ लागला नसता. तिनें यापूर्वी थोडे दिवसपर्यंत, बहराम आज भेटेल, उद्यां भेटेल, ह्मणून त्याची वाट पाहिली; व पुढें निराश होऊन खाणेंपिणें वर्ज्य केलें. तसेंच तिच्या त्या दासींनींही केलें होतें, हें वरील वर्णनावरून सहज लक्षांत येईल. असो. अशा स्थितींत वर सांगितल्याप्रमाणें ती सुंदरी बहरामाच्या नांवाचा जप करीत कित्येक दिवस पडून राहिली असून, तिच्या दासी त्याच्या विरहाचें तिनेंच रचलेलें तें गाणें एकसारखें ह्मणत राहिल्या होत्या. तिनें दासींस सांगून ठेविलें होतें कीं, ‘ मी आतां पाव घटकेनें मरणार अशी स्थिति येऊन पोहोंचली ह्मणजे माझ्या बापास बोला-

वून त्याच्या हातून माझी शेवटची व्यवस्था होईल असें करा; व कदाचित् त्याच प्रसंगीं माझ्या सुदैवानें येथें बहराम प्राप्त झाला, तर पांढऱ्या रंगाचें सरबत मला पाजून सावध करा.' याप्रमाणें वाचकांच्या सोईसाठीं या गोष्टीचा हा सांधा येथें जुळवून दाखवून आम्ही पुढील हकीकतीस आरंभ करितों.

सौंदर्यवल्ली मागें सांगितल्याप्रमाणें हुशार झाल्यावर तिनें आपल्या दासींसही तें पांढऱ्या रंगाचें सरबत पिण्याविषयीं सुचविलें. त्याप्रमाणें त्यांनीं तें प्राशन केल्याबरोबर त्याही पहिल्यासारख्या हुशार झाल्या. नंतर बहरामाच्या बरोबरच्या लवाजम्यांतील मंडळीस एका मोठ्या दालनांत नेऊन त्यांना एके प्रकारचें जांभळ्या रंगाचें सरबत देण्याविषयीं तिनें आपल्या कांहीं दासींस आज्ञा केली, व इकडे आपण स्वतः दोन दासी बरोबर घेऊन केरोचा सुलतान, बहराम, जोहरा, नूरमहाल व मैमुना आणि अमीना ह्या दोन दासी इतक्यांस घेऊन मंदिराच्या थोरल्या दिवाणखान्यांत गेली, आणि मागें सांगितलेलें तें जांभळ्या रंगाचें सरबत या सर्व माणसांस तिनें स्वतः रत्नजडित सोन्याचे प्याल्यांतून यथेच्छ प्यावयास दिलें. मग बहरामानें आपण होऊनच बोलण्यास सुरुवात केली. तो सौंदर्यवल्लीस म्हणतो, 'पण कायहो, येथें मागच्या बाजूस जो अत्यंत रमणीय बाग होता त्याची अशी अवस्था कशानें झाली?' सौंदर्यवल्ली आतांपर्यंत त्याजकडे प्रेमयुक्त रागानेंच पाहत असून प्रथम त्यानेंच आपल्याशीं बोलण्यास सुरुवात करावी अशी तिची इच्छा होती, त्या-

प्रमाणें वडून आलें, तेव्हां तिला जरा समाधान वाटलें. मग ती किंचित् हंसून त्यास खोंचून उत्तर करिते, 'काय चमत्कार सांगावा! आपणच ह्या सर्व गोष्टीचें मूळ असून आतां नामानिराळे होतां कीं?' हें ऐकून बहराम जरा हंसला, व बाकीचीही मंडळी हंसूं लागली. सौंदर्यवल्ली ह्मणते, 'तुम्हांला हंसूं येतें, पण यांच्या करणीनें माझ्या जिवावर येऊन बेतली होती हें तुह्मांला ठाऊक आहे काय?' जोहरा ह्मणते, 'युवराजांनीं आह्मांला तुमची सर्व हकीकत सांगितली व त्यावरूनच आम्ही मुद्दाम तुमच्या भेटीस सर्वजण आलों!' सौंदर्यवल्ली ह्मणते, 'एकुण हे राजश्री कांहीं कोणी साधे मुशाफर नव्हत—हे राजपुत्र आहेत—असें तुमच्या बोलण्यावरून स्पष्ट होतें! ही गोष्ट यांनीं मजपासून चोरून ठेविली होती; आणि हे आपण होऊन कांहीं येथें आले नाहींत हेंही स्पष्ट दिसतें!' जोहरा ह्मणते, 'अहो, यांचा सर्व इतिहास तुह्मांला कळला ह्मणजे तुम्ही यांना दोष देणार नाहीं!' सौंदर्यवल्ली म्हणते, 'हें हें, जोहराबाई तुमचेंच नांव ना? तुम्ही यांची संपादणी न करून काय कराल!' केरोचा सुलतान ह्मणतो, 'बेटा, तूं रागावूं नको. हिचेंच नांव जोहरा. ही फार सुशील मुलगी आहे. हिचा पराक्रम तर केवळ अद्भुत आहे; आणि—' इतक्यांत सौंदर्यवल्ली ह्मणते, 'असूं द्या. पुढें आपण पुष्कळ याबद्दल बोलूं. सध्या, पूर्वीच्या भेटीच्या वेळीं मीं या युवराजांना, आपला हेतु साधण्यासाठीं बाह्यात्कारी दरडावणीच्या कांहीं गोष्टी सांगितल्या, त्याबद्दल क्षमा मागून

यांचा बाग यांना अगोदर दाखवितें, ह्मणजे यांचें समाधान होऊन मलाही तुह्मां सर्वांची हकीकत ऐकण्यास बरें पडेल. अहो, माझेच देव देव्हारीं नव्हते, तेव्हां त्या बागाकडे पाहणार कोण? आतां मी त्याच्याकडे पाहतेंच तर!' असें ह्मणून तिनें खिडकींत तोंड केलें आणि फुंकर घातला. त्याबरोबर मोठा वारा सुटून बागेंतला सर्व पाचोळा उडून गेला. नंतर तिनें टाळी वाजविली. त्यासरसा मेघांचा मोठा गडगडाट होऊन पर्जन्यवृष्टि सुरू झाली. ती पाव घटका चालून लागलीच आभाळ निखरलें, व जिकडे तिकडे स्वच्छ व गारेगार झालें! पण आणखी मोठा अद्भुत चमत्कार हा झाला कीं, तत्क्षणीं तो बाग पूर्वी दहाव्या भागांत वर्णन केल्याप्रमाणें हुबेहूब दिसूं लागला! ही त्या यक्षिणीची अजब करामत पाहून सर्वांना इतकें कांहीं पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें कीं, तीं सर्व क्षणभर स्तब्ध राहिलीं!

मग सौंदर्यवल्लीनें त्या मंडळीची बागांत फिरण्याची इच्छा जाणून ती त्यांस तिकडे घेऊन गेली. लवाजम्यांतील मंडळीसही तिनें तेथें बोलावून आणविलें. स्वर्गीच्या नंदनवनाप्रमाणें सर्व प्रकारें शोभणाऱ्या त्या बागांत हीं माणसें फिरत असतां त्यांना किती सुख वाटलें असेल याची कल्पना वाचकांनींच करावी! तेथील अप्रातिम सुवासिक फलपुष्पांचा यथेच्छ उपभोग घेण्यांत यांना इकडे गुंतवून सौंदर्यवल्लीनें तिकडे सर्वांच्या भोजनाची तयारी करविली. इतक्यांत दिवे लावण्याची वेळ आली. त्याबरोबर तिनें आपल्या मंत्रसामर्थ्याच्या योगानें त्या सर्व मंदिरांत सुवा-

सिक दिव्यांचा चकचकाट करून सोडला. नंतर तिनें सर्वांस ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें व अधिकाराप्रमाणें जेथच्या तेथें भोजनास बसविलें. 'पण आमच्या पंक्तीस आज आपण बसलें पाहिजे,' असा जोहरा व नूरमहाल यांनी तिला आग्रह चालविला. तेव्हां ती हंसून ह्मणते, ' ती गोष्ट होणें अशक्य आहे ! तुम्हां मानवांच्या व आमच्या चाली भिन्न आहेत. आम्हांला तुमच्याप्रमाणें कांहीं कांहीं बाबतींत मात्र वागतां येतें. पण पुष्कळ गोष्टींत आम्हांस तसें करितां येत नाहीं. त्यांतलीच ही जेवण्याची गोष्ट होय. आमचें खाणेंपिणें काय तें नुकतेंच तुम्हीं पाहिलेलें पांढऱ्या रंगाचें सरवत होय. तें केवळ अमृत असून आमचें सर्व जीवन तेंच आहे. तें आम्हांला इच्छामात्रेंकरून उत्पन्न करितां येतें, पण तुम्हां मानवांस तें देण्यास परवानगी नाहीं. तुम्हांला द्यावयाचें झालें तर आम्ही जांभळ्या रंगाचें सरबत देतों. तें तुम्हीं पाहिलेंच आहे. असो, तर तुम्ही हा व्यर्थ आग्रह करूं नका.'

हें ऐकून ती मंडळी निरुत्तर झाली. मग त्यांनीं तें नानाप्रकारच्या सुंदर व मिष्ट पकान्नांचें यथेच्छ भोजन केल्यावर, सौंदर्यवल्लीनें सर्वांस विडे देण्याची तजवीज करून लवाजम्यांतील माणसांची निजण्याची वगैरे व्यवस्था दासींकडून करविली; आणि बाकीच्या शेलक्या मंडळीस घेऊन ती मुख्य महालांत गेली. तेथला तो थाट पाहून सर्वांचे डोळे दिपून गेले ! सौंदर्यवल्लीनें सर्वांस कोंचावर बसावयास सांगून आपण एका लहानशा खुर्चीवर बसली. मैमुना व

अमीना ह्या दोघी दासी रीतीप्रमाणें अदबीनें उभ्या राहिल्या. नंतर पुढें फिरून संभाषणास सुरुवात झाली. सौंदर्यवल्ली म्हणते, ' जोहराबाई, वास्तविक पुसाल तर, तुम्हांला पाहून तुमच्या दोस्तीस बहरामजी भुलले याचें मला मुळींच नवल वाटत नाहीं; कारण तुम्ही खरोखर तशाच योग्यतेच्या आहां ! ' हें ऐकून नूरमहाल किंचित् हंसून ह्मणते, ' नाहीं हो ! तुम्हीं मनांत आणिलेला प्रकार केवळ तुमच्या भ्रमाचें फळ आहे ! ' सुलतान ह्मणतो, ' खरेंच बेटा, बहराम व जोहरा यांची केवळ पाकदोस्ती आहे. ती अशी कीं, तिला या जगांत कोठें उपमा सांपडेल कीं नाहीं याची शंका आहे ! ' इतकें बोलून सुलतानानें, बहराम व जोहरा यांचा प्रथमपासूनचा वृत्तांत, त्यांनीं भोगिलेलीं संकटें, नूरमहाल हिशीं चमत्कारिक रीतीनें लागलेलें लग्न, वगैरे गोष्टी ऐकिलेल्याच होत्या त्या थोडक्यांत सौंदर्यवल्लीस सांगून येथपर्यंत एकंदर हकीकत आणून पोहोंचविली. ती ऐकून यक्षिणीनें तोंडांत बोट घातलें ! ती ह्मणाली, ' ह्या बाईच्या पराक्रमाची व थोरवीची हद्द आहे ! ' नूरमहाल ह्मणते, ' आणखी येथें आम्ही जीं आलों तीं तरी यांच्याच आग्रहावरून आलों. आतां खरोखर प्रथम मींच ही गोष्ट काढिली व जोहराबाईनीं माझी त्यावेळीं थोडी थट्टाही केली; पण येथें आम्ही येण्यास मुख्य कारण ह्याच ! ' हें ऐकून यक्षिणीला फारच गहिंवर आला, व तिनें उठून मोठ्या प्रेमानें जोहरा हिच्या हाताचें चुंबन केलें. सौंदर्यवल्ली पुढें बोलते, ' पण कायहो जोहराबाई, बहरामजींनीं तुमच्याकरितां डोहांत उडी टाकून

जें आपणावर संकट ओढवून घेतलें, त्यापेक्षां तें मलाच अगोदर जर बोलते तर मीं आपल्या सामर्थ्यानें तत्काळ तुमची त्यांची भेट करून दिली असती !' जोहरा म्हणते, 'तुम्ही त्याप्रमाणें केलें असतें, मी नाहीं ह्मणत नाहीं. पण ईश्वरी संकेत निराळा होता, तदनुसार गोष्टी घडून येऊन बहरामजी दोन ठिकाणचे बादशहा झाले, व त्यानंतर त्यांच्या तुमच्या भेटीचा व प्रेमाचा योग जुळावयाचा होता त्याप्रमाणें घडून आलें !' सौंदर्यवल्ली ह्मणते, 'खरेंच, ईश्वरी संकेत ह्मणून तुम्ही ह्मणतां तें किती बरोबर आहे ! अहो, मीं आपल्या सामर्थ्यानें तुमची त्यांची गांठ घालून दिली असती ह्मणून ह्मणालें, त्याप्रमाणेंच बहरामजींस सातां समुद्रांपलीकडूनही मला का येथें आणितां आलें नसतें ? पण ईश्वरी संकेत तसा नव्हता, तेव्हां तशी बुद्धि कशी होणार ? त्या संकेतानुरूप मी आपली वेडी बनून गेलें, व आजपर्यंत कष्ट सोशीत झुरत राहिलें !' सुलतान ह्मणतो, 'बेटा, तुला पाहिल्यापासून मला माझ्या परीजादीची आठवण होऊन राहिली आहे. मला संतान नव्हतें, तरी माझ्या भावाची याच नांवाची एक कन्या होती, तिजवर माझें अत्यंत प्रेम होतें. ती दुर्दैवानें वारली. पण प्रेमरूपानें ती अद्यापि माझ्यासमोर उभी आहे; आणि बेटा, काय सांगूं ! तुला पाहिल्यापासून ती फिरून जिवंत होऊन मला भेटली कीं काय असा मला सारखा भास होत आहे ! तर आतां एव्हां-पासून तुला मी माझी परीजादीच मानितों !' यावर सौंदर्य-वल्ली उत्तर करिते, 'वाहवा ! हा तर मी मोठाच लाभ

समजतें ! मी बाबांना सोडून येथें राहिलें आहें, तरी तुम्ही मला बाबांच्या ठिकाणीं झालां याचा मला केवढा आनंद वाटतो याची साक्ष ईश्वर आहे ! ' असें ह्मणून तिनें उठून सुलतानास नमन केलें, व त्यानें तिची पाठ कुरवाळून, ' तुझी इच्छा पूर्ण होईल ' असा तिला आशीर्वाद दिला. जोहरा हंसून म्हणते, ' यांची इच्छा पूर्ण करण्याचें श्रेय आम्हांला कांहींच का नको ! ' सुलतान म्हणतो, ' मुली, मीं हिला फक्त आशीर्वाद दिला. पुढें राहिलेलें सर्व कार्य तुमच्याच हातून व्हावयाचें आहे ! ' हें ऐकून सौंदर्यवल्लीनें लाजून खालीं मान घातली. जोहरा म्हणते, ' ठीक आहे तर, परीजादीबाई—' हे शब्द ऐकतांच सुलतानाला प्रेमाचें भरतें आलें, व इकडे सौंदर्यवल्लीही त्याजकडे पितृप्रेमदृष्टीनें पाहूं लागली. जोहरा पुढें बोलते, ' आतां फार बोलून तुम्हांला तिष्ठत ठेवीत नाहीं. ज्या ईश्वराच्या सत्तेनें न घडायाच्या गोष्टी घडून आल्या, त्याच्याच कृपेनें तुमचे मनोरथ या क्षणींच कां पूर्ण होणार नाहींत ? ' हें ऐकून सौंदर्यवल्ली नूरमहाल हिजकडे बोट करून म्हणते, ' पण ह्या बाई कांहींच बोलत नाहींत ! ' त्यावरून नूरमहाल ह्मणते, ' जोहराबाईच्या पुढें मला काय बोलावयाचें आहे ! पण बोलण्याचा प्रश्न ज्याअर्थी निघालाच, त्याअर्थी मी अंतःकरणपूर्वक सांगतें कीं, तुमच्यासारखी थोर सखी माझ्या बरोबरीच्या अधिकारांत मला मिळण्याचा योग आला हें माझें परमभाग्य होय असेंच मी समजतें ! यापेक्षां आणखी तें काय बोलून दाखवूं ? '

इतकें बोलणें होतांच सुलतान उठून महालाबाहेर आला. बहरामही आपला पाय काढूं लागला. तों जोहरा व नूरमहाल आणि त्यांच्या दोघी दासी ह्या पटकन् उठून त्याच्या पुढें झाल्या, आणि हंसत हंसत महालाचें दार लावून घेऊन बाहेर पडल्या! यांची निजण्याबसण्याची व्यवस्था करायाला सौंदर्यवल्लीच्या दासी उभ्याच होत्या. त्यांनीं ती सर्व यथास्थित केल्यावर सर्वांनीं सुखानें निद्रा केली.

याप्रमाणें सौंदर्यवल्लीचे मनोरथ पूर्ण झाले. दुसरे दिवशीं ती जोहरा हीस म्हणते, 'आतां तुम्ही सर्वजण कांहीं दिवस येथें रहाल, तर तुमच्या सहवासानें मला मोठा आनंद होणार आहे.' जोहरा उत्तर करिते, 'तुम्ही आह्मांला आतां राहण्याचा आग्रह ठीकच कराल! पण तुमच्या बाबांनीं काल आमचा जो इतिहास तुह्मांस सांगितला त्यावरून आमचीं आईबापें आमची किती मार्गप्रतीक्षा करून राहिलीं असतील हें सहज तुमच्या लक्षांत येईल!' सौंदर्यवल्ली ह्मणते, 'तें तर खरेंच! पण मी आपल्या बाबांना तर नाहींच येथून जाऊं देणार!' सुलतान ह्मणतो, 'बेटा, मी तुला हवा आणि बहरामजी मला हवे; आणि बहरामजी व जोहरा यांना वडिलांना भेटायाला गेलें पाहिजे. तेव्हां येथें रहायाचें कोणी आणि जावयाचें कोणीं, याचा मोठा विचार आहे!' नूरमहाल ह्मणते, 'कोणी कांहीं ह्मणा, मला तर हें ठिकाण सोडून जावेंसेंच वाटत नाहीं—इतकें कांहीं येथें कालपासून माझें मन रमलें आहे!' सौंदर्यवल्ली ह्मणते, 'कांहीं

चिंता नाहीं. तुम्हां सर्वांच्या मनाप्रमाणेंच करण्याचा मीं आतां विचार केला आहे.' जोहरा म्हणते, 'हें हो बाई कसें घडणार! तुमचे बाबांना तुम्ही सोडीत नाहीं, ते आम्हांला सोडीत नाहींत, आणि आह्मांला तर वडिलांच्या भेटीस गेलें पाहिजे! तसेंच नूरमहालबाईचें मन रमलें ह्मणून त्या का येथें राहणार आहेत? आणि हो गडे—तुह्मी तरी आतां आह्मांला कशा सोडून राहणार?' हें ऐकून सौंदर्यवल्ली हंसली आणि ह्मणाली, 'याचें एवढें कोडें तुम्हांला पडायाला नको! हें पहा, हें मंदिर व हा बागचसा काय, पण ह्या कोटाच्या आंत जेवढा प्रदेश आहे तेवढा सर्व त्यांतील एकूनएक चीज-वस्तसुद्धां डोळ्याचें पातें लवतें न लवतें तों येथून उचलून तुह्मां सर्वांसुद्धां दिल्लीस घेऊन जाण्याचें सामर्थ्य माझ्या-मध्यें आहे!' हें ऐकून सर्वांनीं मोठा अचंबा केला, व ही गोष्ट शक्य कशी असा संशय दर्शविला. त्याबरोबर सौंद-र्यवल्लीनें थोडें रागावल्यासारखें दाखवून ह्मटलें, 'तुम्ही मानव म्हणजे मोठे संशयखोर खरे! मिटा तर पाहूं सर्वजण डोळे?' त्याप्रमाणें सर्वांनीं डोळे मिटल्यावर दोन पळांनीं ती त्यांस ह्मणते, 'उघडा आतां डोळे पाहूं? येथें आसपास कांहीं ओळखीचें दिसतें का?' त्यावरून सर्वांनीं डोळे उघडले. तेव्हां जोहरा तोंडांत बोट घालून ह्मणते, 'अग बाई! खरो-खरच येथून चार पांच कोसांवर दिल्ली असावीशी वाटतें!' बहराम ह्मणतो, 'खचीतच बुवा! सर्व खाणाखुणा तर पटल्या! पण हें सारें स्वप्न तर—' सुलतान म्हणतो, 'बेटा, चप् बैस! इकडे पाहिलेंस का काय झालें तें!' त्या-

वरून सौंदर्यवल्ली ऊर्फ परीजादी हिजकडे सर्व पाहूं लागलीं. तों तिचे डोळे रक्तासारखे लाल झाले असून ती घामाघूम होऊन गेलेली दिसली! तें पाहून नूरमहाल हिच्या अंगाचा थरकांप झाला! पण जोहरा हिनें तिला न भिण्याविषयीं खुणवून ती सौंदर्यवल्लीजवळ गेली, आणि तिला पदरानें वारा घालूं लागली; आणि ह्मणते, ' यांनीं हें फार अघटित कृत्य केलें, यामुळें यांना श्रम झाले आहेत, दुसरें कांहीं नाहीं ! '

सौंदर्यवल्ली ह्मणते, ' यांनीं बरोबर ताडलें. अशीं कृत्यें करणें जरी आमच्या हातचें आहे, तरी आतां झालें हें खरोखर अघटितच कृत्य! अशाला आह्मांस इतरांपेक्षां जास्त श्रम पडतात. मला आतां इतक्यांत जे हे एवढे श्रम पडले, त्यांच्या योगानें माझी अशी स्थिति झाली. ' इतकें ती बोलते तों तिच्या डोळ्यांची लाली उतरून घाम नाहींसा झाला, व तिची मुद्रा पूर्ववत् सौम्य व प्रसन्न दिसूं लागली. मग ती ह्मणते, ' आतां तुमचा पुढील कार्यक्रम मला अंतर्ज्ञानानें सर्व समजून चुकला आहे. तर नूरमहालबाईच्या लग्नाचा उलगडा पडला त्या रात्रीं युवराजांना जसें तुह्मीं चकित करून सोडिलें, त्याप्रमाणें आज तुमच्या वडिलांच्या भेटी व्हावयाच्या आहेत त्या वेळीं तिकडचीं सर्व माणसें जेणेंकरून अत्यंत चकित होऊन जिकडे तिकडे आनंदलहरी उसळतील अशी व्यवस्था करण्याचें मीं योजिलें आहे. आतां दोनप्रहर लवकरच होतील; करितां सर्वजण जेवणेंखाणें आटपून घ्या, व थोडी वाम-

कुक्षी करा. इतक्यांत मला भगवदिच्छेप्रमाणें सूचना होतांच तुह्मांस कसें व कोणत्या रीतीनें दिल्लीस पोहोंचवावयाचें त्याची मीं व्यवस्था योजिली आहे, ती सर्व वेळेवर आयतीच तुमच्या दृष्टीस पडेल. अगोदर ती सांगितल्यानें तिच्यांत जी बहार उडणार आहे ती कमी होईल, ह्मणून त्यासंबंधानें मी आतां कांहींच बोलत नाहीं!'

भाग सत्ताविसावा.

दौलतबागांत सर्वांच्या भेटी व आनंदीआनंद.

शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥

तुकाराम.

आतां आपण दिल्लीकडे वळूं. मागें नवव्या भागाचे शेवटीं सांगितल्याप्रमाणें बहराम व जोहरा यांच्या शोधासाठीं बादशहानें फौज पाठवून केलेला यत्न व्यर्थ गेल्याचें वाचकांस स्मरतच असेल. हीं अत्यंत गुणसंपन्न मुलें अशीं एकाएकीं नाहींशीं झाल्यामुळें साऱ्या दिल्ली शहरांत केवढा हाहाकार उडून गेला त्याचें वर्णनही वर निर्दिष्ट केलेल्या स्थळीं थोडेंसें दिलेंच आहे. असो. यासंबंधानें विशेष सांगण्यासारखी गोष्ट ही कीं, बहराम व जोहरा हीं आपापल्या आईबापांचीं एकुलतीं एकच असल्यामुळें त्यांना त्या मुलांबद्दलचें सारखेंच दुःख होऊन राहिलें होतें हें खरें, पण 'दगडापेक्षां वीट मऊ' ह्मणतात त्याप्रमाणें, जोहरा ही फक्त कोणीकडे नाहींशी झाली असून कायमचीच

हातची गेली असें मानण्यास विशेषसें कारण नव्हतें. यामुळें 'कः कालः फलदायकः' या न्यायानें ती कदाचित् कधीं तरी भेटेल अशी आशा वजीर व त्याची पत्नी यांस होती. परंतु बहराम आपल्या देखत कुव्यांत पडून नाहींसा झाला असें बादशहाच्या फौजेंतील शिपायांनीं प्रत्यक्ष पाहिलें असल्याकारणानें, ती त्यांच्या तोंडून ऐकिलेली वार्ता त्याची पुनः भेट होण्यासंबंधानें पूर्ण निराशेची वाटणें त्याला अगदीं साहजिक होतें. अशा प्रकारें, मुसळाला अंकुर देखील एकादे वेळीं फुटेल, पण माझा बहराम मला आतां कधींही भेटण्याचा मुळींच संभव नाहीं, असें त्या बिचाऱ्या बादशहास वाटून त्याच्या दुःखास अगदीं पारावार नाहींसा झाला! त्याच्या राणीची म्हणजे बहरामाच्या आईचीही तशीच अवस्था झालेली होती. त्या उभयतांनीं अन्नपाणी बहुतेक सोडिलें असून, रात्रंदिवस तीं अश्रु ढाळीत राहिल्यामुळें थोडक्याच दिवसांत त्यांच्या दृष्टीस अंधत्व आलें!

अशा स्थितींत दोन एक वर्षे गेलीं. तेव्हां एके दिवशीं राजवाड्यामध्यें बादशहा व वजीर यांच्या त्यासंबंधानें गोष्टी चालल्या असतां वजिराच्या मनांत एकाएकीं कांहीं निराळेच विचार आले. वजीर बादशहास म्हणतो, 'सरकार, मला वाटतें या प्रकरणाच्या मुळाशीं एकवार आपण जाऊन त्या दृष्टीनें त्याचा विचार करावा हाच काय तो या बाबतींत एक मार्ग उरला आहे.' बादशहा म्हणतो, 'काय म्हणतां? या प्रकरणाच्या मुळाशीं जावयाचें? म्हणजे आपण होऊन

जो अविचार केला त्याबद्दल आपण आपल्यासच आजपर्यंत हजार वेळां शिव्या घेतल्या तशा आणखी एकवार घ्यावयाच्या, एवढेंच ना ? ' वजीर उत्तर करितो, ' नाहीं नाहीं, तसें नाहीं. माझ्या ह्मणण्यांतला उद्देश निराळाच आहे. खावंद, आपणांला जो ह्या दोन मुलांचा लाभ झाला तो केवळ त्या सत्पुरुषाच्या कृपाप्रसादाचें फळ होय; आणि त्या सत्पुरुषाचा प्रसाद हें आपल्या तपश्चर्येचें फळ होय. ' बादशहा किंचित् हंसून ह्मणतो, ' वाहवा ! आम्हीं अशी कोणती तपश्चर्या केली होती ! ' वजीर उत्तर करितो, ' आपणांस हीं फळें प्राप्त होण्यापूर्वी एक वर्षभर आपण निवांत स्थळीं राहून भगवच्चिंतनांत जो काळ घालविला, तीच आपली तपश्चर्या; याहून दुसरी आणखी कोणती तपश्चर्या पाहिजे ? ' बादशहा वजिरास विचारतो, ' बरें, मग तुमचें आतां ह्मणणें तरी काय तें कळूं द्या !' वजीर बोलतो, ' राजाधिराज, ह्मणणें इतकेंच कीं, आपण फिरून तशीच तपश्चर्या करून परमेश्वराची ध्यानधारणा करावी, ह्मणजे तो प्रसन्न होऊन पूर्वीप्रमाणेंच आपला एखादा दूत आपल्या दुःखाच्या निवारणार्थ पाठवून देईल !'

बादशहाला ही गोष्ट फारच रुचली. तो वजिरास ह्मणाला, ' ठीक ! हाच या कामीं शेवटचा व उत्तम उपाय मला दिसतो. पण हें पहा, आतां पूर्वीसारखी ताकद आमच्या अंगीं राहिली नाहीं. तेव्हां रानावनांत राहणें आपल्याच्यानें कसें निभेल, हा एक प्रश्न आहे. ' यावर वजीर उत्तर करितो, ' सरकार, तितक्या अडचणींत आपल्याला पडायाला नको.

त्या सत्पुरुषानें फिरून आपल्यास प्राप्त करून दिलेल्या त्या छायेखालीं ह्मणजे दौलतबागांतच आपण राहून भगवच्चिंतनांत काळ घालविला असतां त्या प्रभूस आपली दया येऊन आपल्या निराशेची आपल्याला आशा उत्पन्न होईल असा योग तो खचीत आणील असें माझी मनदेवता मला पुनः पुनः सांगत आहे.'

यावरून बादशहा लागलाच दुसरे दिवशीं बहरामाची आई म्हणजे पट्टराणी व थोडीं चाकरमाणसें घेऊन दौलतबागांत जाऊन राहिला. त्यानें बहराम नाहींसा झाल्यापासून राज्यकारभारांतलें आपलें मन बहुतेक काढलेंच होतें, व आतां तर त्यानें अगदींच सर्वसंगपरित्याग करून पहिल्याप्रमाणेंच भगवच्चिंतनांत सारा वेळ घालविण्याचा निश्चय केला. त्याचप्रमाणें तो अत्यंत स्वामिभक्तिनिष्ठ वजीरही पूर्ववत् मोठ्या चातुर्यानें, न्यायानें, व इभ्रतीनें सर्व राज्याचा कारभार फिरून चालवूं लागला. अशा प्रकारें इकडे बादशहाची अहोरात्र परमेश्वराकडे तंद्री लागली असून वजीरही केवळ निरपेक्षबुद्धीनें इमानेंइतबारें स्वामिसेवा करीत राहिला होता. ही त्या दोघांचीही इष्टफलसिद्ध्यर्थ कडकडीत तपश्चर्याच चालली होती असें म्हणण्यास काय प्रत्यवाय आहे? असा 'निष्ठावंत भाव' ज्या ठिकाणीं वसेल तेथें परमेश्वर काय दूर आहे?

असो; या रीतीनें चार सहा महिने लोटले तों एके दिवशीं तिसरे प्रहराचे सुमारास दौलतबागांत एकाएकीं एक अवलिया येऊन तेथील पहारेकऱ्यास विचारतो, 'या मका-

णाचा मालक कोठें आहे ?' पहारेकरी उत्तर करितो, 'याचे मालक, आमचे परम दयाळू धनी—बादशहा—हे आंत दिवाणखान्यामध्यें पडून राहिले आहेत.' अवलिया आश्चर्य दर्शवून म्हणतो, 'काय बोलतोस? तें पडून राहिले आहेत? ही काय पडून राहण्याची वेळ आहे?' त्या सत्पुरुषाची विलक्षण तेजस्विता पाहून व तें मोठ्या जोराचें भाषण ऐकून पहारेकरी थरथर कांपूं लागला! तेव्हां अवलियानें हास्य-वदन करून म्हटलें, 'अरे बेट्या, घाबरूं नको! तुझा तो धनी कोठें आहे तो मला दाखीव.' त्यावरून पहारेकरी अवलियास घेऊन बादशहाकडे गेला, व कोणी फकीरजी आले असून त्यांच्या इच्छेवरून त्यांस मी येथें घेऊन आलों आहें, असें त्यानें बादशहास हळूच सांगितलें. त्याबरोबर बादशहा उठून उभा राहिला. पण त्या बिचाऱ्याच्या डोळ्यां-च्या भिंती झालेल्या असल्यामुळें त्याला पुढचें काय दिसणार? तरी पण अदमासानें त्यानें त्या अवलियास नमन करून कोंचावर बसावें, असें म्हटलें. अवलिया त्याप्रमाणें बसून त्यानें बादशहाचा हात धरून त्याला आपल्या समोरच्या कोंचावर बसविलें. मग तो बादशहास ह्मणतो, 'कायरे, तुझी अशी दशा कशानें झाली?' बादशहा उत्तर करितो, 'कर्म माझें—आणखी काय सांगूं!' अवलिया ह्मणतो, 'बरें, पण मला अगोदर कांहीं तरी खायाला आणीव—एक दोन फळें आणीव—दुसरें कांहींएक नको.' त्या-वरून एक खिजमतगार लगबगीनें जाऊन कांहीं द्राक्षें व अंजीर एका सोन्याच्या तबकांत घेऊन आला, व त्यानें तें

तबक बादशहाच्या हातांत देऊन अवलियापुढें ठेवविलें. त्यांतील दोन द्राक्षें व एक अंजीर भक्षण करून अवलिया म्हणतो, ' बस, पुरे. आत्मा थंड झाला! आतां तुझ्या कर्माची कहाणी काय असेल ती सांग पाहूं ? '

हें ऐकून, दौलतबाग पूर्वी जळाला होता तेव्हांपासून आजपर्यंतची सर्व हकीकत संक्षिप्त रीतीनें बादशहानें अवलियास सांगितली; आणि शेवटीं ह्मणाला, ' अशा प्रकारें फिरून भगवत्कृपेची आशा धरून मी येथें येऊन राहिलों आहें. ' अवलिया बादशहास विचारितो, ' पण तुझा तो वजीर कोठें आहे ? ' बादशहा उत्तर करितो, ' तो राजवाड्यांत दरबारचें कामकाज या वेळेस पहात बसला असेल. त्याला बोलावून आणूं काय ? ' अवलिया ह्मणतो, ' अलबत, तो आलाच पाहिजे ! ' त्यावरून एक शिपाई धांवत जाऊन वजिरास टाकोटाक घेऊन आला. वजीर येऊन पाहतो तों पूर्वी आपणास ज्यांनीं प्रसाद दिला होता तेच हे फकीरजी असें त्यानें तत्काळ ओळखिलें. त्याबरोबर त्यानें त्या सत्पुरुषाच्या चरणांवर लोटांगण घालून अश्रूंनीं ते न्हाणिले ! अवलिया वजिरास ह्मणतो, ' अरे, पुरे आतां, ऊठ ! ' वजीर न उठतां तसाच स्फुंदत स्फुंदत बोलतो, ' महाराज, माझ्या धन्याचे आणि धनिणीचे डोळे अगोदर आले पाहिजेत. ते येत तोंपर्यंत मी वर तोंड करावयाचा नाहीं ! ' अवलिया त्यास ह्मणतो, ' ओहो ! हा तर तुझा मोठाच हट्ट दिसतो ! बरें, ऊठ; हीं चार द्राक्षें घे; आणि दोन दोन दोघांच्या डोळ्यांत पीळ ह्मणजे झालें ! ' वजिरानें उठून

तीं चार द्राक्षें घेतलीं, व त्यांपैकीं दोन बादशहाच्या डोळ्यांत पिळिलीं, व राहिलेलीं दोन एका दासीच्या हातीं देऊन तीं राणीच्या डोळ्यांत पिळण्यास सांगितलें. त्याबरोबर असा विलक्षण चमत्कार झाला कीं, बादशहा व राणी यांस अगदीं पूर्वीप्रमाणें उत्तम दिसूं लागलें !

इतकें झाल्यावर वजीर बादशहास ह्मणतो, ' सरकार, हे फकीरजी कोण हें ओळखलें ना !' बादशहानें अर्थात् त्यास ओळखून तत्काळ त्याच्या चरणीं मिठी घातली. पण अवलियानें लागलीच त्याला उठवून बसविलें. नंतर वजीर अवलियास ह्मणतो, ' महाराज, आपलें चरणदर्शन झाल्या-बरोबर आमचा हृद्रोग नाहींसा होणार ही मीं मनांत पक्की गांठ बांधिली होती, व त्याप्रमाणें घडवून आणण्यास महाराज समर्थ आहेतच. पण तो जो आनंदोदकाचा सागर उचंबळूं लागणार, तो पाहण्याचें साधन माझ्या धन्याला व धनिणीला जर नाहीं, तर मला—' इतकें बोल-तांच त्या परमस्वामिभक्त वजिराचा कंठ दाटून आला, व त्याच्या तोंडांतून पुढें शब्द निघेना ! हें पाहून अवलियास-ही गहिंवर आल्यावांचून राहिला नाहीं. तो ह्मणतो, ' हो हो—तूं पुढें काय बोलणार तें मी समजलों. धन्याचे देव जर देव्हारीं नाहींत तर आपल्याला त्या सुखाचा काय उपयोग, असा तुझे बोलण्यांतला हेतु, खरें ना !' वजीर म्हणतो, ' महाराज सर्वज्ञ आहेत, म्यां पामरानें आणखी काय बोलावें ?' अवलिया म्हणतो, ' बरें, अरे बादशहा !—वजीर ! —आतां तुमची इच्छा काय आहे ती मला कळूं द्या. ती

पूर्ण करण्याची मला आज्ञा झालेली आहे.' बादशहा म्हणतो, 'माझा बहराम—आपल्या कृपेचें फळ—तो दुनियेंतून नाहींसा झाला!' इतकें बोलतांच बादशहाचा कंठ भरून येऊन त्याच्या तोंडांतून पुढें शब्द निघेना! तसेंच राणीनें तर हंबरडाच फोडिला! तो ऐकून सर्वांच्या पोटांत अगदीं कालवून गेलें! मग अवलिया वजिरास ह्मणतो, 'अरे बाबा, तुझाही कबिला घरीं रडत बसला असेल, नाहीं का? त्यालाही येथें आणीव ह्मणजे एकदा सर्वांचीं रडणीं होऊन जाऊं दे!' हें ऐकून वजिरानें आपल्या कुटुंबास घेऊन येण्याची तजवीज केली. मग अवलिया वजिरास ह्मणतो, 'बरें कायरे, तुझें काय म्हणणें आहे?' वजीर उत्तर करितो, 'माझें ह्मणणें काय आहे तें महाराजांस सांगावयास नको. पण विचारल्या प्रश्नाचें उत्तर दिलें पाहिजे ह्मणून म्हणतों, हे महासमर्थ प्रभो! आपण मला जें अमोलिक कन्यारत्न दिलें, तें मजपासून हरपलें!' इतक्यांत वजिराची पत्नी तेथें येऊन दाखल झाली, तिला जोहरा हिचें स्मरण होऊन तिनेंही मोठा आकांत मांडिला! अवलिया हंसून म्हणतों, 'तुह्मी सर्वजण भ्रमांत आहां. तो कोठें गेला नाहीं आणि तीही कोठें गेली नाहीं! बरें, आणखी कांहीं तुमचें ह्मणणें आहे का?' हें ऐकून बादशहा व वजीर दोघेही एकदम म्हणाले, 'आमचें दुःख आम्हीं काय होतें तें सांगितलें. तेवढें निवारण झालें ह्मणजे आम्हांला कांहींएक नको!' हें ऐकून अवलियाला फारच हंसूं आलें. तो म्हणतो, 'तुह्मी खरोखर फार चांगलीं माणसें आहां; कारण तुमचा थोडक्यांत संतोष होतो! असे

जे अल्पसंतोषी असतात, त्यांना देव पुष्कळ देतो. याचा प्रत्यय इतक्यांतच तुम्हांला येईल!'

इतकें होत आहे तों अस्तमानाचा समय आला. त्याच दिवशीं सौंदर्यवल्ली ही दोन प्रहरांपूर्वी बहरामाच्या सर्व मंडळीस घेऊन स्वर्गभुवनासह दिल्लीपासून सुमारें पांच कोसांवर येऊन राहिल्याचें मागील भागांत सांगितलेंच आहे. आतां पुढें दौलतबागांत सर्वांच्या भेटी होऊन जो आनंदीआनंद होणार, त्यासंबंधाचा कार्यक्रम तिनें अंतर्ज्ञानानें जाणून, एकदम आपण तेथें सर्वांनीं जाऊन तेथील माणसांना कसें आश्चर्यचकित करून सोडावयाचें, याची तिनें मोठ्या चातुर्यानें सर्व योजना करून ठेविली होती. असो, वर सांगितल्याप्रमाणें अवलियाच्या तोंडून 'याचा प्रत्यय इतक्यांतच तुह्मांला येईल' हे शब्द निघतात न निघतात तों तोफांचे आवाज ऐकायाला येऊं लागले! नंतर डंका, त्याचे मागून करणे, तुतान्या, शिंगें व मधुर मंगलवाद्यें यांचे ध्वनि क्रमाक्रमानें ऐकूं येऊं लागले. त्यावरून, 'हा काय प्रकार आहे तो पाहून तर ये,' असें अवलियानें वजिरास ह्मटलें. वजिराला तेंच पाहिजे होतें! तो लगबगीनें बागाच्या दरवाज्याबाहेर जाऊन पहातो तों एखाद्या बादशाही थाटाच्या लग्नाची मोठी थोरली मिरवणूकच जशी काय येत आहे असें तें प्रकरण त्याला दिसलें! त्या मिरवणुकींत हजारों घोडेस्वार व शेंकडों हत्ती असून त्या हत्तींपैकीं कांहींवर अंबाऱ्या व बहुतेकांवर हौदे होते. त्यांत आपापल्या दर्ज्याप्रमाणें लोक बसले आहेत असें वजिराच्या दृष्टीस पडलें.

हें पाहून वजीर आंत येऊन बोलतो, ' आज काय चमत्कार आपल्या नजरेस पडणार समजत नाहीं! बाबाजी !— सरकार !—एक मोठी मिरवणूक निघाली आहे, आणि ती इकडेसच येत आहे ! आणि ती कोठून निघालेली आहे भगवान् जाणे ! ' अवलिया ह्मणतो, ' भगवानच सर्व जाणतो : मनुष्य काय जाणील ! ' बादशहा म्हणतो, ' महाराज, आमचा जीव खालीं जातो वर येतो असें झालें आहे, व आमची बुद्धि अगदीं गुंग होऊन गेली आहे—आम्हांला लवकर या यातनांतून सोडवावें एवढेंच मागणें आहे ! ' अवलिया ह्मणतो, ' धीर सो गंभीर ! उगीच तळमळ करण्यांत काय अर्थ आहे ? '

इतक्यांत दिवेलागणीची वेळ झाली. तों एका क्षणांत सारखा चोहोंकडे पौर्णिमेच्या शुभ्र चांदण्याप्रमाणें प्रकाश पडून गेला, व तोफांचे आवाज बंद होत जाऊन वरील स्वारी मधुर वाद्यांच्या ध्वनींत दौलतबागाच्या दरवाज्याशीं येऊन ठेपली. त्याबरोबर, त्या स्वारीच्या शोभेकरितां ह्मणून सौंदर्यवल्लीनें तात्पुरतें तेथें आपल्या मंत्रसामर्थ्यानें आणिलेलें जें साहित्य होतें त्याचें काम आटपल्यामुळें, तिनें टाळी वाजविल्याबरोबर तें अदृश्य झालें !

इकडे ही आलेली स्वारी ह्मणजे बहराम, जोहरा, नूरमहाल व त्यांच्या बरोबरचा लवाजमा, तसेंच फेरोचा सुलतान, सौंदर्यवल्ली ऊर्फ परीजादी व तिच्या दासी, या सर्वांचा घोळकाचा घोळका एकदम दिवाणखान्यांत शिरला. त्यापैकीं बहराम व जोहरा यांनीं, आपणांस संकटसमयीं प्रत्यक्ष

दर्शन देऊन व स्वप्नांत येऊन ज्यांनीं साहाय्य केलें तेच हे बावाजी असें तत्काळ ओळखून त्या अवलियाच्या चरणांवर लोटांगण घातलें. अवलिया त्यांस ह्मणतो, 'मुलांनो, उठा; आतां अगोदर आपल्या आईबापांस भेटा. तुमची त्यांना फार तहान लागून राहिली आहे.' हें ऐकून तीं दोघें अनुक्रमें बादशहा व वजीर यांच्या पायां पडलीं. त्यांना बहुत दिवस वियोग झालेल्या आपल्या त्या आवडत्या मुलांस सोडवेना. पण यांच्या आया यांच्या भेटीकरितां किती तळमळ करीत राहिल्या असतील हें लक्षांत आणून, त्या आंत जवळच उभ्या होत्या तिकडे त्यांना लागलीच त्यांनीं लावून दिलें. राणी बहरामास पोटाशीं धरून म्हणते, 'बेटा, तूंच कारे मला हा फिरून भेटत आहेस! तूं आमच्यावर इतका कांरे निष्ठुर झाला होतास!' इतकें म्हणतांच तिचा कंठ दाटून येऊन तिला पुढें बोलवेचना. इकडे वजिराच्या पत्नीस जोहरा भेटली असतां तिचीही तशीच अवस्था झाली. परंतु नूरमहाल व सौंदर्यवल्ली यांची या गडबडींत थोडी हेळसांड होत आहे असें जोहरा हिच्या लक्षांत येऊन तिनें आईस म्हटलें, 'आई ग, जरा थांब, मी आलेंच.' असें ह्मणून तिनें ह्या दोघींस आईकडे नेलें, व सर्वजणी मिळून राणीपाशीं गेल्या. त्याबरोबर बहराम बाहेर निघून आला, व केरोच्या सुलतानासंबंधानें जोहरा हिजप्रमाणेंच त्याच्या लक्षांत गोष्ट येऊन, त्यानें हे कोण हें बादशहास सुचवून त्याचा योग्य आदर करविला. इकडे जोहरा हिनें नूरमहाल व सौंदर्यवल्ली यांचें राणीशीं नवीन

झालेलें नातें तिला सांगून दिलें. तेव्हां नूरमहाल हिनें तिच्या पायांवर डोकी ठेविली, व सौंदर्यवल्लीनेंही तसेंच केलें. राणीनें त्यांना कुरवाळून मोठ्या प्रेमानें त्यांचें अभिनंदन केलें.

मग बादशहा व वजीर यांस अवलिया ह्मणतो, 'बाबांनो, आतां तुमचें काम तर झालें. पण बाकीचीं माणसें तिष्ठत उभीं आहेत त्यांजकडे कोणीच पहात नाहीं हें कसें ! असो. अशा स्थितींत असेंच व्हावयाचें ! बरें, वजीर, हे तुमच्या मुलांच्याबरोबर आलेले नोकरचाकर व दासदासी यांची जिकडच्या तिकडे सर्व सोय अगोदर लावून दे. यांचीं व तुम्हां सर्वांचीं जेवणेंखाणें झाल्यावर आपण निवांतपणीं बसूं, आणि मग पुढें पुष्कळ बोलावयाचें आहे तें बोलूं.'

सर्व माणसांचीं जेवणेंखाणें आटपलीं. अवलियानें फक्त थोडी फळफळावळ खाल्ली. सौंदर्यवल्ली व तिच्या दासी ह्यांनीं पूर्वी सांगितलेलें कारण दाखवून आपलें सरबतच तेवढें घेतलें. नंतर अवलियाच्या आज्ञेवरून सर्व खाशी मंडळी ऐनेमहालांत जमून, बहराम व जोहरा हीं दिल्लीहून निघून गेल्यापासून आजतागाईत घडलेल्या सर्व गोष्टींची विचारपूस करण्याचें ठरलें. परंतु बायकांना—विशेषतः राणी व वजिराची पत्नी यांना—अशा प्रकारें पुरुषमंडळींत बसण्याचें कधींच माहीत नसल्यामुळें त्या थोड्या कांकूं करूं लागल्या. तेव्हां अवलिया म्हणतो, 'येथें कोणाला संकोच करण्याचें कारण नाहीं. हा आजचा येथें भरणारा छोटा दरबार देवाचे घरचा आहे. आज दोन अडीच वर्षे या सुंदर स्थळीं दिवा देखील लागण्याची मारामार पडलेली होती. आज

ईश्वराच्या दयेनें सर्वांचाच भाग्योदय झाला आहे. तेव्हां ही सोन्याची रात्र, कांहींएक पडदा न ठेवितां, प्रत्येकानें आनंदांत घालवावी. एका हिंदी कवीनें म्हटलें आहे—

सबी भूम गोपालकी, वामें अटक कहा ?
जाके मनमें खटक रही, सोही अटक रहा !

हें ऐकून, एका कुटुंबांतल्या माणसांप्रमाणें ऐनेमहालांत येऊन बसण्याचें सर्वांस कबूल झाल्यावर, बादशहा व वजीर यांनीं अवलियास ह्मटलें, ' महाराज, हा दौलतबाग तयार झाल्यापासून या महालांतील सिंहासनावर कोणीच बसलें नाहीं; तर सर्व गोष्टींचा विचार करितां, यावर आज आपणच प्रथम बसावें हें योग्य आहे, असें आम्हांस वाटतें.' याप्रमाणें सर्वांचा आग्रह पाहून अवलिया त्या रत्नजडित सिंहासनावर विराजमान झाला. मग त्यानें आपल्या उजवेकडील कोंचावर प्रथम दिल्लीचा बादशहा, त्याचे शेजारीं फेरोचा सुलतान, व त्याच्या शेजारीं वजीर, याप्रमाणें बसविलें. डावे बाजूकडील कोंचावर प्रथम बहराम, त्याच्या शेजारीं त्याची आई, तिच्या शेजारीं नूरमहाल, तिच्या पलीकडे जोहरा व तिच्या शेजारीं वजिराची पत्नी, याप्रमाणें बसल्या; व यांच्यामागें मैमुना व अमीना ह्या दासी उभ्या राहिल्या. समोरच्या कोंचावर सौंदर्यवल्ली बसली, व तिच्यामागें तिच्या दासी उभ्या राहिल्या.

प्रथमतः अवलियानें बहराम व जोहरा यांस म्हटलें, ' कायरे पोरांनो, तुम्ही आज इतके दिवस बंडाळी माजवून आईबापांस त्रास दिला तो काय ह्मणून, याबद्दलचा

तुमचा वाका आह्मांला ऐकावयाचा आहे. तर तो काय असेल तो सांगा पाहूं !' हें ऐकून बहराम व जोहरा यांनीं खालीं माना घातल्या. ठीकच! बाहेरची गोष्ट निराळी आणि घरची गोष्ट निराळी ! बाहेर त्यांनीं मोठमोठे पराक्रम केले व धिटाईच्या गोष्टी सांगितल्या; पण वडिलांसमोर त्यांना चकारशब्द काढवेना! इतक्यांत मैमुना दासी नूरमहाल हिच्या कानाशीं लागली. अमीना हिनेंही तसेंच केलें. आणि त्या दोघींनीं रेशमी वस्त्रांत बांधिलेले दोन ग्रंथ तिच्या हातीं दिले. या योगानें बहराम व जोहरा यांना स्वमुखानें आपलें वर्णन करेण्याचा संकोच वाटत होता तो प्रसंग आयताच टळला. तो कसा याचा खुलासा थोडासा केला पाहिजे.

इस्तंबूलचा बादशहा मक्केस जाते वेळीं बहराम-जोहरा-चरित्राच्या चार प्रती त्यानें जामदारखान्यांत ठेवण्यास सांगितल्याचें वाचकांस स्मरतच असेल. त्यांपैकीं दोन प्रती नूरमहाल हिनें येतांना बरोबर घेतल्या असून त्या ह्या दासींजवळ तिनें दिल्या होत्या. त्या दासींना वाटेनें त्यांपासून मोठी करमणूक होऊन त्यांनीं एकमेकींच्या मदतीनें तेव्हांपासून आजपर्यंतचा इतिहासही पुरवणीरूपानें लिहून काढिला होता, व त्या प्रती मुख्य ग्रंथांस लपेटून बांधून ठेविल्या होत्या. तेव्हां या ग्रंथाचें येथें वाचन झाल्यास सर्वच काम होईल, असें त्या चतुर दासींनीं आपल्या धनिणीस सुचविलें.

इतक्यांत, ' या पोरींची काय पुटपुट चालली आहे—

तीं पुस्तकें कसलीं आहेत ? ' असें म्हणून अवलियानें तीं मागून घेतलीं. तीं चाळून पाहून तो ह्मणतो, ' ओहो ! ही गाथा आयतीच तयार आहे. हिच्यांत यांचा सर्व इतिहास उत्तम प्रकारें रेखला असल्याचें दिसत आहे. हा कोणी तरी वाचा म्हणजे झालें ! कोण घेतें वाचायाला पाहूं ? ' तेव्हां सौंदर्यवल्लीनें त्या संबंधानें आपली उत्सुकता दर्शविल्यावरून अवलियानें पुरवणीसह एक पुस्तक तिच्या हातीं दिलें, व तिनें तें वाचण्यास आरंभ केला.

सौंदर्यवल्लीचें सर्वच कांहीं अमानुष ! तिचें जसें रूप अतिशय गोड होतें तसा तिचा आवाजही फारच गोड होता ! तिनें तो इतिहास वाचण्यास सुरुवात केल्यापासून अर्ध्या घटकेच्या आंत सर्वांना तल्लीन करून सोडिलें ! कोठें ठासून वाचावयाचें, कोठें करुणस्वर काढावयाचा, कोठें थोडें थांबावयाचें, कोठें जास्त थांबावयाचें, त्यांतल्या त्यांत कोठें हात वर किंवा खालीं करावयाचा, कोठें कशी मुद्रा फिरवून दाखवावयाची, या गोष्टींत ती मोठी निष्णात असल्यामुळें, त्या ग्रंथवाचनांत तिनें बहारीची इतकी कांहीं कमाल करून सोडिली कीं, बादशहा व राणी, तसेंच वजीर व त्याची पत्नी, यांना त्यांतली कांहींच माहिती नसल्यामुळें, त्यांना आपण ही खरोखर अद्भुत कादंबरीच ऐकत आहों कीं काय असें वाटलें ! त्याचप्रमाणें केरोचा सुलतान, नूरमहाल व तिच्या दासी, यांस कांहीं गोष्टी प्रत्यक्ष अनुभवानें व कांहीं ऐकून माहीत होत्या, तरी त्यांच्याही मनावर ह्या वाचनाचा असा कांहीं विलक्षण

परिणाम झाला कीं, त्यांनाही बहुतेक ही अद्भुत कादंबरीच वाटली ! स्वतः सौंदर्यवल्ली व तिच्या दासी यांचीही सदहू-प्रमाणेंच स्थिति झाली—फार काय सांगावें, खुद्द बहराम व जोहरा यांनीं त्या गोष्टी आपापल्या परी अनुभविलेल्या होत्या, तरी त्यांनाही त्यांचें तें खुमारीनें केलेलें व इतक्या सुरेख रीतीनें वाचलेलें वर्णन ऐकून, त्या त्या स्थळीं तीं तीं पात्रें आम्हीच होतों काय ! अशाबद्दल नवल वाटून त्यांनीं सुद्धां तोंडांत बोटें घातलीं ! अवलिया मात्र सर्व कांहीं जाणत असून अगदीं स्वस्थ बसलेला होता. फक्त मधून मधून जेथें त्याचा संबंध येई, तेथें तेथें तो बहराम व जोहरा यांजकडे पाहून हास्यवदन करी.

ही मंडळी येथें बसल्यापासून बहुतेक बायकामाण-सांनीं संकोचास्तव कांहीं वेळ खालीं माना घातल्या होत्या. परंतु जसजसा या चरित्रवाचनाला रंग येऊं लागला, तस-तसें सर्वांचेंच भान सुटत गेलें, व त्यांचा संकोच अगदीं नाहींसा झाला; आणि कथानकांतील प्रसंगानुरोधानें जस-जसा रस जेथें जेथें येई, तसतसे हर्षशोकादिकांचे ठसे त्यांच्या चेहऱ्यांवर उमटूं लागून, बावाजीनें सांगितल्या-प्रमाणें खरोखरच ही रात्र अप्रतिम आनंदाची होय यांत संशय नाहीं, असें सर्वांच्या प्रतीतीस येऊन चुकलें !

शेवटीं केरोचा सुलतान व सौंदर्यवल्ली यांची पुरवणीं-तील हकीकत वाचणें जेव्हां सुरू झालें, तेव्हां प्रथम केरोच्या सुलतानाच्या पुनरुत्थानाचा तो अघटित प्रकार ऐकून सर्व-जण—विशेषतः बादशहा, वजीर व त्यांच्या पत्न्या—यांच्या

मनाची जी स्थिति झाली व त्यांना जो कांहीं आनंद झाला, तो केवळ अवर्णनीय होय! नंतर सौंदर्यवल्लीची पुढील हकीकत आली. तिचें चित्र त्या दोघी दासींनीं अगोदरच फार उत्तम रेखलेलें असून, त्या यक्षराजकन्येनें वाचतां वाचतां त्यांत आपल्या दासींच्या मदतीनें तेथें अत्यंत करुणापर देखावा उठवून देऊन आकाशपाताळ जें एक करून सोडिलें, त्याच्या योगानें तर प्रत्येकाच्या नेत्रांतून खळखळखळ अश्रु वाहून त्यांच्या हातांतील रुमाल भिजून चिंब झाले!

असो. या प्रसंगाचें वर्णन आणखी फारच वाढलें असतें, पण विस्तारभयास्तव आम्हीं तें आटपतें घेतलें आहे. ही सर्व हकीकत ऐकून बादशहा, राणी, वजीर व त्याची पत्नी यांना पराकाष्ठेचा आनंद वाटून त्यांनीं आपापल्या मुलांवरून लिंबलोण केलें! राणीनें नूरमहाल हिच्या निःसीम प्रेमाची व थोरवीची मोठी तारीफ केली; तसेंच सौंदर्यवल्लीच्याही अकृत्रिम प्रेमाचें, असामान्य सौंदर्याचें व अद्भुत पराक्रमाचें मोठें वर्णन करून ती तिला म्हणाली, 'अग बाई! तुझी थोरवी आह्मां सर्वांहून अधिक आहे हें मला यापूर्वी कळलें नव्हतें; नाहीं तर मघांशीं मीं तुला आपल्या पायां पडूं दिलें नसतें!' ती किंचित् हसून म्हणते, 'कां बरें? तुह्मी माझ्या सासूबाई नाहीं का?' हें ऐकून राणीला प्रेमाचा इतका कांहीं गहिंवर आला कीं, तिनें तिला लहान मुलाप्रमाणें पोटाशीं घट्ट आवळून धरिलें, आणि तिला कुरवाळून ह्मणाली, 'पोरी, आतां मला तुझी दृष्ट अगोदर काढिली पाहिजे!' इतकें

झाल्यावर अवलिया म्हणतो, ‘ आतां एक गोष्ट राहिली आहे. ती बहराम आणि जोहरा यांच्या लग्नाची होय. ’ असें ह्मणून तो त्या दोघांच्या तोंडाकडे पाहूं लागला. तों त्यांनीं खालीं माना घातल्या. अवलिया ह्मणतो, ‘ मुलांनो, तुह्मी आजपर्यंत एकमेकांशीं अनुपम व अत्यंत निर्मळ प्रेमानें वागलां, हें नव्यानें सांगावयास नको. ही गोष्ट महशूर झालीच आहे. ह्या तुमच्या पाकदोस्तीचा परिपाक तुम्हां उभयतांचा संयोग अशा रीतीनें होऊनच झाला पाहिजे; नाहीं तर, एकनिष्ठा म्हणून जी ईश्वरास रुजू आहे तिचा अर्थ काय ?’ मग बादशहा व वजीर यांजकडे पाहून तो म्हणतो, ‘कसें काय बाबांनो, तुमचें काय ह्मणणें आहे ?’ यावर दोघांनीं एकदम उत्तर दिलें, ‘ जशी महाराजांची आज्ञा ! ’ शेवटीं अवलिया हंसून नूरमहाल व सौंदर्यवल्ली यांस म्हणतो, ‘ बरें, पण पोरींनो, तुमचाही मानस कसा काय तो कळला तर बरें ! ’ नूरमहाल हळूच म्हणते, ‘ या योगानें माझ्या तर आनंदास पारावार राहणार नाहीं ! ’ असें ह्मणून जोहरा हिचा हात बळकट आपल्या हातांत धरून तिची हळूच पण फार थट्टा तिनें केली ! सौंदर्यवल्ली म्हणते, ‘ बाबाजी, हें काय विचारावें ? मला यापासून केवढा संतोष होणार आहे तें मी आतां बोलून दाखवीत नाहीं; काय तें प्रसंगीं करूनच दाखवीन ह्मणजे झालें !’ अवलिया म्हणतो, ‘ ठीक आहे, उद्यांचे उद्यां मी आपल्या समक्ष हा विधि उरकवणार.’ इतकें झाल्यावर सर्वजण उठून निजावयास गेलीं.

भाग अठ्ठाविसावा.

—:*:—

बहराम आणि जोहरा यांचें लग्न—अजब आतषबाजी व देखावे.

अमर कुसुमघन वर्षति तननन करिती समस्त गंधर्व ।
सर्व जनाला झालें आनंदाचेंचि तें महापर्व ॥
मोरोपंत.

मागील भागांत, बहराम व त्याजबरोबरची मंडळी दौलतबागांत तिनीसांजा प्रवेश करीत असतां एकाएकीं जिकडे तिकडे चंद्रज्योतींसारखा प्रकाश पडून चकचकाट झाल्याचें सांगितलें आहे, तें सौंदर्यवल्लीच्या मंत्रसामर्थ्याचें फळ होय. असो. तो तेथील विलक्षण लखलखाट दिल्लीच्या लोकांच्या नजरेस पडून, हें काय असावें तें समजण्याची त्यांस साहजिकच जिज्ञासा उत्पन्न झाली. तेव्हां चौकशी करितां, बहराम व जोहरा हीं परत सुखरूप आलीं असून त्यांजबरोबर लवाजमाही मोठा आहे, अशी एकाचे तोंडून दुसऱ्यास, दुसऱ्याचे तोंडून तिसऱ्यास बातमी कळून ती वाऱ्यासारखी साऱ्या शहरभर पसरली, व या कारणानें ते हजारों लोक दौलतबागाकडे यावयास निघाले; आणि मागील भागांत सांगितलेला कार्यक्रम आटपेपर्यंत ही मंडळी चार पांच लाखांपर्यंत तेथें जमली ! तेव्हां एवढा मोठा विस्तीर्ण तो दौलतबागही गच्च भरून जाऊन पुष्कळांना बाहेर उभें रहावें लागलें ! इतक्यांत बादशहा वगैरे सर्व मंडळी निजावयास जाऊं लागली असतां

'अशा प्रकारें ही बाहेर लोकांची थाप लागून राहिली असून युवराज व जोहराबाई कोठें आहेत ती आम्हांस दाखवा, त्यांना पाहिल्यावांचून आम्ही जाणार नाहीं, असें त्या लोकांचें ह्मणणें आहे,' अशी बातमी वजिराचे कानीं गेली. तेव्हां त्यानें त्या सर्व लोकांस समजावून सांगितलें कीं, 'परमेश्वराच्या कृपेनें व तुह्मां सर्वांच्या सदिच्छेनें युवराज शहाअल्ली बहरामखान बहादूर हे दोन ठिकाणची बादशाही संपादन करून येथें सुखरूप आले आहेत; त्याचप्रमाणें आमची प्रिय कन्या जोहराही मोठा लौकिक संपादन करून आली असून त्या उभयतांचा उद्यां येथें विवाह व्हावयाचा आहे, व त्यानंतर येथून मोठी मिरवणूक निघणार असून ती साऱ्या शहरभर फिरावयाची आहे. तर आतां धाईगर्दींत त्या उभयतांस पाहण्याचें नीटसें जमणार नाहीं; करितां सर्व लोकांनी मेहेरबानी करून उद्यांपर्यंत दम धरावा. उद्यां मिरवणुकीनंतर लागलीच आह्मी त्यांचा सर्व वृत्तांतही लोकांस कळण्याची व्यवस्था करणार आहों.' हें वजिराचें भाषण ऐकून त्या लोकांस अत्यंत समाधान वाटलें, व ते आपापल्या घरीं जाऊन उदईक होणाऱ्या समारंभाची चातकपक्ष्याप्रमाणें वाट पहात राहिले.

इकडे अदले दिवशींच्या संकेताप्रमाणें बहराम व जोहरा यांचा विवाहविधि यथासांग आपल्यासमक्ष अवलियानें दौलतबागांत करविला. नंतर ठरल्याप्रमाणें मोठी मिरवणूक निघाली. ती केवळ अपूर्व होती एवढेंच सांगून, पुढें मीदर्यावल्लीनें या उत्सवानिमित्त आतषबाजी व चित्रांचे

देखावे या संबंधानें जो विलक्षण चमत्कार करून दाखविला, तिकडे आह्मी वळतों. वर सांगितल्याप्रमाणें विवाहविधि व मिरवणूक निर्विघ्नपणें पार पडून राजवाड्यांत सर्व मंडळी येऊन दाखल झाली. पुढें रात्रीं आतषबाजी व चित्रांचे देखावे दाखविण्याचे त्या संबंधाचें काम वर सांगितल्याप्रमाणें सौंदर्यवल्लीनें स्वतः अंगावर घेतलें. बहराम व जोहरा यांच्या लग्नाचा विचार ठरल्यावर सौंदर्यवल्लीनें, या आनंदाच्या प्रसंगीं काय करावयाचें तें मी या वेळेस बोलून दाखवीत नाहीं, तर करूनच दाखवीन, असें ह्मटल्याप्रमाणें तिनें तें काम केवळ अप्रतिम करून सोडलें! ती वजिरास ह्मणाली, 'तुह्मी काल रात्रीं लोकांस वचन दिलें आहेना, कीं हा बहराम-जोहरा यांचा वृत्तांत आह्मी लवकरच सर्वांस विदित करूं ह्मणून? तें वचन आतां तुह्मी कसें पुरें करणार?' वजीर ह्मणतो,' मी बोलून तर चुकलों खरा, पण एवढ्या समाजास एकसमयावच्छेदेंकरून तो वृत्तांत कळवितां येणें दुर्घट आहे, हें आतां माझ्या लक्ष्यांत आलें; व लोक तर एकसारखे त्याकरितां कावकाव करून राहिले आहेत; तर आतां याबद्दलची तोड काय काढावी?' सौंदर्यवल्ली हंसून ह्मणते, 'तुम्ही या संबंधानें अडचणींत पडाल हें मी जाणूनच होतें, व त्याबद्दलची योजनाही मीं करून ठेविली आहे.' वजीर मोठ्या उत्सुकतेनें विचारितो, 'ती कोणती, बाईसाहेब?' ती उत्तर करिते, 'अहो, त्यांत काय आहे? मी चित्रांचे देखावे दाखविणार आहें त्या प्रत्येक चित्रपटांत या इतिहासांतीलच सर्व गोष्टी चित्ररूपानें

वठवून देऊन प्रत्येक चित्रपटावर त्याच्या खुलाशाचें संक्षिप्त वर्णनही त्यांतल्या त्यांत देऊन टाकीन म्हणजे झालें!' वजीर अचंबा करून म्हणतो, 'बाईसाहेब, आपली धन्य आहे! हें अत्यंत चातुर्याचें व अचाट कृत्य घडवून आणण्यास आपणच एक समर्थ आहां. याहून मी आणखी काय बोलूं?' सौंदर्यवल्ली त्यास म्हणते, 'एव्हां मी ही तुमची स्तुति ऐकण्यास तयार नाहीं, सर्व कांहीं होईल जाईल तेव्हां खरें! तूर्त तुम्ही दवंडी पिटवून शहरच्या तमाम लोकांस कळवा कीं, 'सर्वांनीं प्रहर रात्र झाल्याबरोबर, आज मोठा चमत्कार होणार आहे तो पाहण्याकरितां, आपापल्या घराच्या गच्चीवर बसावें.' हें ऐकून वजिरानें तावडतोब त्याप्रमाणें तजवीज केली.

दिल्ली शहरांत लोकांनीं या मंगलकार्यानिमित्त जिकडे तिकडे गुढ्या, तोरणें, पताका वगैरे उभारून सर्व शहर उत्तम प्रकारें शृंगारलें होतें. त्यांतून सौंदर्यवल्लीनें तिनीसांजा होतांच अदले दिवसाप्रमाणेंच जिकडे तिकडे साऱ्या शहरभर अतिशय शुभ्र व तेजस्वी प्रकाश पाडण्याची तजवीज केली असल्यामुळें, शहरास केवळ अवर्णनीय शोभा आली होती. त्या प्रकाशाची रचना अशी कांहीं लोकोत्तर केली होती कीं, जसे काय हजारों चंद्र एकत्र करून त्यांचा एक भला मोठा गोळाच बनविला आहे असें तें एकंदर शहर त्यायोगानें दिसत असून, सौंदर्यवल्लीनें त्याच्या भोंवतीं असंख्य चिरागदानें, झाडें, वेली वगैरे आतषबाजींत ज्या दाखविल्या होत्या, तें एकंदर मंडळ जसें काय वरील भल्या मोठ्या तेजोमय गोळास बावनकशी सोन्याचें कडेंच वेष्टिलेलें आहे असें भासत

होतें! पूर्वी सांगितल्याप्रमाणें ठरलेल्या वेळेवर लोक आपापल्या घराच्या गच्चीवर बसले, व राजवाड्यांतील शेलकी मंडळी अवलियासुद्धां अगदीं वरच्या मजल्याच्या गच्चीवर बसली. तेथें सौंदर्यवल्ली आपल्या दासींसह एका चौरंगावर बसली असून हातानें कांहीं ओढल्यासारखें करी. त्याबरोबर घंटानाद होऊन वर सांगितलेल्या कळ्यांत मोठ्या चतुराईनें ज्या आणखी शेंकडों मेहरापी बनविलेल्या होत्या, त्या प्रत्येक मेहरापींत बहराम-जोहरा-चरित्रांतील एक किंवा अधिक गोष्टींचीं चित्रें दृष्टीस पडत, व त्यांवर त्यांच्या खुलाशाचीं कांहीं वाक्यें असत. हा चित्रपट कांहीं वेळ लोकांनीं पाहिल्यावर दुसरी घंटा होऊन प्रत्येक मेहरापींत पहिला पट नाहींसा होऊन दुसरा दृष्टीस पडूं लागे. असे जे चित्रांचे देखावे प्रहर-रात्रीपासून मध्यरात्रीपर्यंत असंख्य दाखविण्यांत आले, त्यांपैकीं कांहींचें वर्णन मासल्याकरितां खालीं दिलें आहे:---

१. अवलिया बादशहाचे मस्तकीं हात ठेवून, तुला पुत्र होईल म्हणून आशीर्वाद देत आहे; तसेंच वजिरासही, तुला कन्या होईल म्हणून भाक देत आहे.

२. बहराम व जोहरा यांना एके ठिकाणीं ठेवणें इष्ट नाहीं असें पंडित बादशहास सुचवीत आहे.

३. बहराम व जोहरा (सर्दानी पोषाख करून) घोड्या-वर बसून दौड करीत चाललीं आहेत!

४. बहराम व जोहरा आपल्या भोंवतीं गराडा घातलेल्या फौजेवर सारखी बाणांची वृष्टि करीत आहेत, व ती पाहून हे लोक आश्चर्यानें तोंडांत बोटें घालून राहिले आहेत.

५. बहराम घोड्यासुद्धां कुव्यांत कोसळला ! जोहरा फौजेला हुलकावणी देऊन पार निघून गेली !

६. सौंदर्यवल्लीनें बहरामाचा हात धरला आहे, व प्रेमयुक्त हास्य करून ती त्यास बागेंतून मंदिरांत घेऊन चालली आहे.

७. बहरामानें सौंदर्यवल्लीसमक्ष एकदम डोहांत उडी घातली !

८. केरो येथील राजवाड्याचे गच्चीवरून बहराम, सुलतान व खिजमतगार यांचें लटांबर घेऊन पक्षी चालला आहे; सुलतान व खिजमतगार धाडकन् खालीं आपटले ! बहरामास पक्ष्यानें भयंकर अरण्यांत नेऊन सोडिलें !

९. खोतानचा खान व त्याची सोरट मंडळी वेषधारी सौदागरास घेऊन शहरांत चालली आहे. त्याची ऐट पाहून सारेजण त्याची वाहवा करीत आहेत.

१०. दाई खानाचा निषेध करून ह्मणते, ‘ तूं जर का त्या पोराचा पिच्छा पुरविलास, तर तो तुझें नाक कापून तुझ्या हातांत देईल हें खूब समज ! ’

११. खुदाबक्ष नायकिणीच्या गाण्याचा रंग—पानसुपारी, अत्तरगुलाब, हार वगैरे वांटण्यांत येत आहेत.

१२. वेषधारी सौदागर खानाच्या हातून मद्याचा प्याला घेऊन हलकेच शिताफीनें आंगरख्याचे आंत ओतून देत आहे. तो खानास व त्याच्या मंडळीस मद्यानें तर्र करून सोडीत आहे !

१३. खान सिंहासनावरून खालीं लोळत येऊन त्याचें

पांगोटें भलतीकडे गेलें आहे, व तो तोंड वासून बेहोष पडला आहे!

१४. खानाच्या जिवलग दोस्तांपैकीं कित्येक सुस्त पडले आहेत; कित्येकांच्या तंगड्या दुसऱ्यांच्या गळ्यांत पडल्या आहेत; कित्येक लाथा झाडीत आहेत; कित्येक हातपाय ताणून प्रेतवत् पडले आहेत!

१५. वेषधारी सौदागर त्या बदमाषांच्या नाकांवरून सपासप आपला चाकू फिरवीत आहे!

१६. इस्तंबूलच्या बादशहाचा दरबार. या दरबारांत वेषधारी मुशाफर मोठ्या आविर्भावानें तरवारीच्या मुठीवर थाप मारून, आपणाला जाण्यास अडथळा करण्याची कोणाची मगदूर आहे असें जोरानें म्हणत आहे.

१७. बहरामाचा वाघाशीं सामना!

१८. फकीरबावा बहरामास सावध करून त्याच्या जखमेस औषध लावीत आहे. बहराम देत असलेलें पारितोषिक बावा स्वीकारीत नाहीं, सबब बहरामानें बाईट तोंड केलें आहे.

१९. खुषरू गस्तवाल्यावर तमंचा रोंखून त्यास पाडीत आहे. बहराम हत्तीची सोंड चिरीत आहे.

२०. भव्यारी बहरामास कठोर शब्द बोलत आहे, व त्यामुळें बहराम अत्यंत कष्टी झालेला आहे.

२१. बावा बहरामास स्वप्नांत दर्शन देऊन धीर देत आहे.

२२. दर्यादौलतमहाल. तेथील ऐनेमहालांत बहराम पलंगावर बसलेला आहे, अमीना त्यास गुळणा करण्याकरितां पाण्याची झारी पुढें करीत आहे, व मैमुना वारा घालीत आहे.

२३. 'ही तुमची बालमैत्रीण जोहरा' असें ह्मणून जोहरा दार उघडून आंत आली. बहराम तिला पाहतांक्षणीं चकित होऊन मटकन् खालीं बसला !

२४. जोहरा नूरमहाल हिचा हात बहरामाच्या हातीं देऊन मलंगाकडे बोट दाखवीत आहे.

२५. शालू नेसलेली व गळ्यांत मोत्यांचें पेंडें घातलेली ती परीसारखी शोभणारी जोहरा हिचें राणी कौतुकपूर्वक अभिनंदन करीत आहे.

२६. मोतीमहालांतील बैठक.

२७. इस्तंबूल येथील बडा दरबार. बादशहा बहरामास तक्तावर बसवीत आहे.

२८. जोहरा व नूरमहाल यांस प्रेमानें कुरवाळून राणी निरोप देत आहे.

२९. केरो येथील दर्ग्यांत सुलतानाच्या कबरींतून 'हाय बहराम !' 'हाय बहराम !' असा ध्वनि निघत असलेला ऐकून जोहरा व नूरमहाल यांच्या नेत्रांतून अश्रु-धारा चालल्या आहेत, व बहराम तंद्री लावून व डोळ्यांवर रुमाल धरून पुतळ्यासारखा निचेष्ट उभा आहे !

३०. स्वर्गभुवनांत सौंदर्यवल्ली मरणोन्मुख होऊन पडली आहे, व 'हाय बहराम !' 'हाय बहराम !' ह्मणून जप-माळ ओढीत आहे. तिच्या दासी तिच्या भोंवतीं बसून करुणस्वरानें तिच्या विरहवर्णनाचें गीत गात आहेत.

३१. बादशहा व वजीर यांस अवलिया ह्मणतो, 'आतां तुमची इच्छा काय आहे ती मला कळूं द्या !'

३२. बहराम व जोहरा अवलियाच्या पायांवर डोकें ठेवीत आहेत. बादशहा व राणी आणि वजीर व त्याची पत्नी हीं त्यांच्या भेटीकरितां अत्यंत उत्कंठित होऊन राहिलीं आहेत.

३३. अवलिया, बादशहा, वजीर, बहराम, राणी, नूर-महाल, वजिराची पत्नी, जोहरा, सौंदर्यवल्ली व दासी वगैरे ऐनेमहालांत बसलेलीं आहेत. सौंदर्यवल्ली त्यांस बहराम-जोहरा-चरित्र वाचून दाखवीत आहे. त्या कौतुकाच्या योगानें प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हर्षशोकादि मनोविकार स्पष्ट दिसत आहेत.

३४. दौलतबागांतून मोठी मिरवणूक दिल्ली शहरांत चालली आहे.

३५. दिल्लीच्या राजवाड्याचे गच्चीवर बसून सर्व खाशी मंडळी आतषबाजीची मौज पहात आहेत. त्यांत सौंदर्यवल्लीची अजब करामत बघून सर्वजण तिची वाहवा करीत आहेत. तीही जयमुद्रेनें प्रेमपूर्वक हास्यवदन करून सर्वांकडे पहात आहे !

याप्रमाणें हा देखाव्यांचा चमत्कार पाहून आबालवृद्ध सर्व लोक थक्क होऊन गेले यांत काय नवल आहे ? कारण सौंदर्यवल्लीनें आपल्या अपूर्व सामर्थ्यानें तें मोठें अघटितच कृत्य केलें यांत संशय नाहीं ! या देखाव्यांतील चित्रांना 'चित्रें' हें नांव खरोखर अन्वर्थक नाहीं; कां कीं, त्यांत जें जें ह्मणून दाखविण्यांत आलें, तें नांवाला मात्र चित्ररूप असून त्यांत हुबेहूबपणा इतका कांहीं ठेवून दिला होता

कीं, झाडें, नद्या, पर्वत इत्यादि—तसेंच हत्ती, घोडे, इमारती वगैरे—त्याचप्रमाणें त्या त्या प्रसंगानुरूप क्रिया करीत आहेत अशीं दिसत असलेलीं मनुष्यें—हीं पाहून, त्या त्या प्रसंगानुरोधानें, प्रेक्षकांपैकीं कोणी—'तोबा ! तोबा !' कोणी—'अबब ! आतां कसें होणार !' कोणी—'वाहवा ! वाहवा !' कोणी—'शाबास जोहरा !' कोणी—'आतां बहराम काय करणार हो ?' कोणी—'ओहोरे बादशहा !' कोणी—'धन्य नूरमहाल !' कोणी—'काय ईश्वरी कौतुक तरी !' कोणी—'सौंदर्यवल्लीनें कमाल केली !' कोणी—'हा सर्व त्या बावाजींचा प्रताप !' असे प्रत्यक्ष त्या गोष्टी पहात असल्याप्रमाणें हर्ष, आनंद, शोक इत्यादिकांचे उद्गार एकसारखे काढून टाळ्या पिटीत असत ! त्याच्या योगानें जिकडे तिकडे एवढी मोठी गडबड उडून राहिली होती कीं, त्या अवधींत कोणाचा शब्द कोणाला ऐकूं येण्याची सुद्धां मारामार होती !

भाग एकुणतिसावा.

—:*:—

उपसंहार.

कोकां शोकास्त त्यांच्या शमवुनि दयितासंगमें हर्षवी जो।
कारागारें करांहीं उघडुनि कमलें भृंगही सोडवी जो ॥
जेणें अंधार सारा पळवुनि हरिलें सृष्टिच्या दृष्टिदोषा ।
त्या मित्राचा बघूनी उदय कवण तो चित्ति मानी न तोषा ! ॥

कृष्णशास्त्री चिपळूणकर.

याप्रमाणें बहराम व जोहरा यांच्या परत आगमनाच्या व लग्नाच्या निमित्तानें झालेला हा अपूर्व समारंभ निर्विघ्नपणें

पार पडला. पुढें या आनंदाप्रीत्यर्थ राजधानींत व राज्यांत चोहोंकडे बादशहाच्या हुकुमावरून एकसारखा तीन महिने-पर्यंत मोठा उत्सव चालून दरबारच्या व इतर लोकांस मोठ-मोठीं बक्षिसें व इनामें देण्यांत आलीं, व लाखों रुपयांची खरखैरात झाली. समारंभ आटपल्यावर दुसरे दिवशीं अवलि-यानें, 'आमचें काम आतां संपलें, आम्ही जाणार,' असें ह्मणून तो एकाएकीं अदृश्य झाला! त्यापूर्वी त्यानें बहराम व जोहरा यांस आशीर्वाद दिला कीं, 'तुमचें कल्याण होऊन याहूनही तुमची कीर्ति फार वाढेल; आणि तुमचा वंश पुढें सत्तावीस पिढ्यांपर्यंत राज्य करील.' नंतर सौंदर्यवल्लीही आपल्या दासींसह स्वर्गभुवनांत जाऊन राहण्याकरितां निघाली. ती बहरामास ह्मणाली, 'तुह्मीं माझें स्मरण केलें कीं मी तुमच्या सेवेस हजर आहें असें समजा. त्याचप्रमाणें तुमच्या भेटीची मला इच्छा झाली ह्मणजे मी आपली दासी तुमच्याकडे पाठवीत जाईन, तेव्हां तुह्मी मला येऊन भेट-ण्यास अनमान करूं नये, एवढेंच माझें मागणें आहे. तसेंच बाबांना (केरोच्या सुलतानाला) आतां तुह्मी माझ्या येथेंच राह-ण्यास पाठवावें. त्यांना माझा लळा लागला असून ते मला मुली-प्रमाणें मानितात, आणि मीही त्यांना पितृवत् समजतें, त्याअर्थी त्यांचा माझा समागम उभयतांसही मोठा सुखाचा व समाधा-नकारक होणार आहे.' सुलतानानेंही ती गोष्ट आनंदानें कबूल केली. तो बहरामास म्हणाला, 'बेटा, तूं माझा जीव कीं प्राण असून तुझा वियोग मला दुःसह हो[illegible] आहे, तरी पण तूं आतां आपल्या आईबापांच्या समागमा[illegible]

कुटुंबी होऊन राहिला आहेस, हें तुझें सुख पाहून मी कृतकृत्य झालों असें मला वाटत आहे; आणि मी जरी या मुलीच्या येथें राहिलों, तरी तूं कांहीं मला दूर नाहींस आणि मीही तुला दूर नाहीं. मनांत येतांक्षणींच एकमेकांस भेटूं. तरी माझ्या असलेल्या स्थितींत मीं स्वर्गभुवनांत रहावें हेंच मला बरें वाटतें.' बहरामास यांत कांहींच वावगें न दिसल्यामुळें त्यानें त्या उभयतांच्या इच्छेस आपली संमति दिली, व याप्रमाणें तीं स्वर्गभुवनांत जाऊन राहिलीं. पुढें स्वर्गभुवनांतील मंडळी राजवाड्यांत व राजवाड्यांतील मंडळी स्वर्गभुवनांत पुष्कळ वेळां आपापल्या इच्छेप्रमाणें व सवडी-प्रमाणें जाऊन येऊन राहूं लागली, व त्यायोगानें परस्परांच्या सुखांत आणखी पुष्कळच भर पडली.

इकडे नूरमहाल व जोहरा ह्या थोडथोड्या अंतरानें गरोदर राहिल्या, व योग्य काळीं उभयतांनाही पुत्ररत्नें झालीं. त्या योगानें सर्वांस जो आनंद झाला तो किती ह्मणून सांगावा! बादशहानें या निमित्तानें फार मोठा उत्सव केला, व ही आनंदाची खबर इस्तंबूल व केरो येथें खलिते पाठवून कळविली. तेव्हां तेथेंही सर्वांना अत्यानंद होऊन मोठे उत्सव करण्यांत आले. या मुलांचीं नांवें अनुक्रमें सुलतान अबदुल हमीद व सुलतान मुबारिक अशीं ठेविलीं. हे मुलगे अत्यंत रूपवान् व तेजस्वी असून तसेच मोठे गुणसंपन्न निपजले. बहरामानें इस्तंबूल व केरो येथें जाऊन येऊन राज्यकारभार करण्याचें पूर्वी योजिलें होतें, परंतु अनेक कारणांनीं त्याला फिरून दिल्ली सोडतां आली नाहीं. तथापि

वर सांगितल्याप्रमाणें त्यांच्या दोन्ही राण्यांस लवकरच पुत्र होऊन त्यांची योजना अगोदरच सदहू दोन ठिकाणच्या राज्यांवर करण्याचें ठरल्यामुळें, तेथील प्रधानमंडळीनें पुढील आशेवर बहरामास तिकडे येण्याबद्दल विशेष आग्रह केला नाहीं. पुढें हे मुलगे पंधरा सोळा वर्षांचे झाल्यावर त्यांची अनुक्रमें इस्तंबूल व केरो येथील राज्यांवर रीतीप्रमाणें स्थापना झाली.

सौंदर्यवल्लीची मानवसृष्टींत राहण्याची मुदत दीड तपाची ह्मणजे अठरा वर्षांची होती, ती या वेळेस संपल्यामुळें ती आपल्या दासींसह आपल्या बापाच्या नगरांत निघून गेली. जातांना तिनें आपलें तें भुवन आपलें स्मरण म्हणून बहरामास अर्पण केलें, व तें दौलतबागांत सामील करून दिलें. तिचें व राजवाड्यांतील माणसांचें फारच प्रेम जुळलें असल्यामुळें हा तिचा वियोग सर्वांस फारच असह्य झाला. केरोच्या सुलतानास तर मुळींच चैन पडेनासें झालें. दिल्लीच्या बादशहाचाही आतां वृद्धापकाळ झाला होता, सबब त्यानें बहरामास राज्याभिषेक करून त्याच्या अंगावर राज्यकारभार टाकून दिला, व आपण आणि केरोचा सुल्तान असे बरोबर मक्केस निघून गेले. तेथे इस्तंबूलच्या बादशहाची व त्यांची गांठ पडून खेरीज तिघांना अवलियाचेंही एकवार दर्शन झालें. त्या वेळीं बहरामाच्या राज्याभिषेकापर्यंतची सर्व हकीकत इस्तंबूलच्या बादशहास कळून त्याला फारच आनंद झाला. अशा प्रकारें या तिघांही बादशहांचे हेतु पूर्ण

होऊन ते भगवच्चिंतनांत अत्यंत समाधानपूर्वक काळ वाळवीत राहिले.

या पंधरा सोळा वर्षांच्या अवधींत नूरमहाल व जोहरा यांस अनेक पुत्र व कन्या होऊन त्यांचा परिवार मोठा वाढला. बहरामाच्या ह्या दोन्ही राण्या अत्यंत चतुर व सुशील असून त्या परस्परांचें प्रेम केवळ अवर्णनीय होतें; यामुळें बहरामाच्या सुखास व समाधानास पारावार नाहींसा झाला. सारांश, एकंदरीनें अशा उत्तम स्थितींत तो बादशाही पदास चढल्यामुळें, खाजगी व राजकीय अशा दोन्ही रीतींनीं त्याला लोकप्रियता संपादन करण्यास साधनांची कांहींच उणीव पडली नाहीं. अशा प्रकारें 'बहराम बादशहा महाधन्य प्रभु' ह्मणून जी त्याची कीर्ति दिगंतरीं पसरली, ती अद्यापिही कित्येक लोकांच्या तोंडून ऐकूं येते!

समाप्त.

PRINTED AT THE "INDIRA" PRESS, POONA